कालनिर्णय

सांस्कृतिक

दिवाळी

१९९७

मूल्य ३५ रुपये

- किशोर आरस
- प्रदीप आपटे
- नानाजी देशमुख
- दत्तप्रसाद दाभोळकर
- विलास देशमुख
- सुनील देशमुख
- न्या. अशोक देसाई
- विठ्ठलराव गाडगीळ
- शरच्चंद्र विष्णू गोखले
- शांता गोखले
- बी.पी.गुणाजी
- नितीन गडकरी
- राज ठाकरे
- मनोहर जोशी
- भंवरलाल जैन
- माधव जोग
- कुमार केतकर
- केशुब महिंद्र
- अब्दुल कादर मुकादम
- शरद पवार
- बाळ फोंडके
- श्रीनिवास पंडित
- प्रदीप रावत
- सदानंद वर्दे



या विभागातील सर्व लेखकांच्या आडनावांचा क्रम इंग्रजी आद्याक्षरांप्रमाणे आहे.

नव्या विचारमंथनापूर्वी

महाराष्ट्राच्या भवितव्याची जेवढी चिंता मराठी लोक करतात त्याकडे पाहिले असता, इतकी चिंता करूनही, इतक्या वर्षांत म्हणावा तसा फरक महाराष्ट्राच्या परिस्थितीत का पडला नाही, असा प्रश्न पडतो. जेथे शालिवाहनासारखा शककर्ता होऊन गेला, विजयनगरसारखे साम्राज्य होऊन गेले, ज्ञानोबांपासून विनोबांपर्यंत संत-विचारवंत झाले, समर्थ-शिवरायांचा वारकरी-धारकरी सुवर्णकाळ झाला. नानासाहेब पेशवे, झाशीची राणी, तात्या टोपे हे १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धातील महत्त्वाचे मोहरे होऊन गेले. रानडे, गोखले, टिळक, आगरकर अशी बुद्धिमान नेतेमंडळी झाली, तर कर्वे, जोशी, फुले, आंबेडकर, लोकहितवादी, लोखंडे, शिंदे, भाऊराव पाटील अशी सुधारकांची प्रचंड शक्ती उभी राहिली. सावरकर, फडके, चाफेकर, राजगुरू असे जहाल देशभक्त निर्माण झाले.

अत्रे . ठाकरे आणि बापट यांच्या सारखे लढवय्येही इथेच निर्माण झाले . टाटा, किर्लोस्कर, बजाज, वालचंद, फिरोदिया, महिंद्रसारखे बिनीचे उद्योजक निर्माण झाले. मुंबई, पुणे, नाशिक, कोल्हापूर, औरंगाबाद, जालना, नागपूरसारखी औद्योगिक शहरे निर्माण झाली, तरी महाराष्ट्र आपला मागे मागेच! यात खरे काय आणि खोटे काय हे समजून घेण्याची गरज आहे. का हा नुसताच न्यूनगंड आहे? का अहंगंड लपविण्याची धडपड सुरू आहे? याचाही विचार होणे आवश्यक आहे. या संदर्भात **'ज्योत्स्ना'** या वि. स. खांडेकर संपादित मासिकात १९४० साली तत्कालीन विचारवंतांचे विचार आमंत्रित करून **'पंचवीस वर्षांनंतरचा महाराष्ट्र'** या नावाने एक परिसंवाद प्रसिद्ध करण्यात आला होता. त्या अनुषंगाने वर्तविलेली भाकिते १९६५ साली किती खरी झाली, हे पाहणे उद्‌बोधक ठरेल.

'पंचवीस वर्षांनंतरचा महाराष्ट्र' या परिसंवादात सहभागी झालेले एकापेक्षा एक नामवंत आणि मातब्बर विचारवंत काय म्हणतात त्याच्याकडे एक धावता दृष्टिक्षेप आता टाकूया.

न. चिं. केळकर यांच्या मते, 'पंचवीस वर्षांनंतरचा महाराष्ट्र' या विषयाचा म्हणजे कोणत्याही एका हिंदी प्रांताचा, तुटक विचार करणे, यापुढे शक्य नसून एकंदर हिंदी राष्ट्राच्या राजकीय व आर्थिक प्रगतीवरच महाराष्ट्रीय प्रगतीचे पाऊल अवलंबून राहणार हे उघड आहे. या दृष्टीने विचार करता येत्या २५ वर्षांचे आतच 'डोमिनिय स्टेटस्' स्वरूपाचे हिंदी फेडरेशन अवश्य अंमलात येईल. २५ वर्षांअखेरीच्या या फेडरेशनची संरक्षण, परराष्ट्र व्यवहार इत्यादी एक-दोन खाती इंग्लंडच्याच तंत्राने चालवली गेली तरी राष्ट्रीय प्रगतीच्या सर्व बाजू खुल्या झालेले म्हणजेच इष्ट स्वरूपाचे डोमिनियन स्टेटस्चे तूर्तचे स्वराज्य स्थापन होईल. दुसरे कारण असे की, बहुतेक सर्व मोठी हिंदी संस्थाने उत्तरेतच असल्यामुळे, या संस्थानिकांच्या फेडरेशनमधील डोईजडपणाचा फायदा अर्थात उत्तरेतील प्रांतांनाच मिळेल. भावी फेडरेशनमध्ये महाराष्ट्राला आजच्याप्रमाणे दुय्यम प्रांत म्हणून लेखण्याची व त्याला डोके वर काढू न देण्याची वृत्ती मुळीच कमी होणार नाही व म्हणून एखादा तेजस्वी नेता मिळून हिंदी स्वराज्य स्थापनेत महाराष्ट्राने अग्रस्थान मिळविले तरी उद्योगधंदे व व्यापार यात येत्या २५ वर्षांत महाराष्ट्र पुष्कळ प्रगती करील हे खरे असले, तथापि गुजराथ, पंजाबादी महाराष्ट्रापेक्षा कितीतरी संपन्न असलेल्या प्रांतातील आजचे अंतर त्याला पंचवीस वर्षांत फारसे तोडता येणार नाही. कारण येत्या पिढीत महाराष्ट्र औद्योगिक प्रगती करील तेव्हा हे प्रांत थोडेच स्वस्थ बसणार? असो. एकूण नव्या महाराष्ट्राची कुंडली माझ्या मनाशी मांडताना त्याच्या भावी परिस्थितीबद्दल मी मुळीच निराश नाही आणि दृढनिश्चय आणि आत्मविश्वास यांचे जोरावर नवा महाराष्ट्र सांप्रतच्या निराशामय वातावरणातून खचित मार्ग काढील असा मला पूर्ण विश्वास आहे.' एकंदरीत न. चिं. केळकर यांनी, व्यापारी बाणा आणि मुलुखगिरी ही महाराष्ट्राने काबीज करावी तरच महाराष्ट्राची प्रगती होईल असे म्हणणे मांडले आहे.

प्रि. धनंजयराव गाडगीळ यांनी इतिहासाचे दाखले देत या विषयावर असे विधान केलेले आहे - 'येथे थोडे पूर्वेतिहासाकडे लक्ष दिलेले बरे. जोपर्यंत इंग्रज अधिकारी धोरण ठरवीत होते तोपर्यंत बहुतांशी हिंदुस्थानातील निरनिराळ्या राष्ट्रांचे व लोकसमुहांचे अस्तित्वच त्यांनी हिशेबात घेतले नाही, असे म्हणण्यास हरकत नाही. या बेपर्वाईमुळे व परकी सत्तेच्या एकंदर परिणामांमुळे आमचा समाज विस्कळीत झाला व बाहेरील कोणत्याही हल्ल्याचा प्रतिकार करण्याचे सामर्थ्य त्यात राहिले नाही. जसजसा मराठी समाज चिरफळला गेला तसतसे परकीयांनी पाय पसरविण्यास सुरुवात केली व आज ते अनेक बाबीत आपणापासून विलग राहून आपणांवर कुरघोडी करीत आहेत. इतकेच नव्हे, तर समाजशास्त्राच्या दृष्टीने विशेष विचारार्ह अशी एक गोष्ट अलीकडे आढळते ती ही की, काही परस्थ समाज जे एकेकाळी आपणात मिसळले होते व या प्रदेशाबाहेरचे आपणास समजत नसत त्यांच्यात भिन्नत्वाची भावना अलीकडे पुन्हा उद्भवलेली दिसते. या सर्वांच्या बुडाशी कारण एकच, आमच्या हातात राजसत्ता नाही व आमच्या समाजात धारणाशक्ती व प्रतिकाराचे सामर्थ्यही नाही.' महाराष्ट्राचा फक्त भूभाग नव्हे तर सामाजिक विचार हा एका समाजाचा विचार असा दृष्टिकोन धनंजयरावांनी घेतला आहे. आपल्या लेखाचा शेवट करताना धनंजयराव म्हणतात, 'एकंदरीत आज महाराष्ट्राचे आर्थिक भवितव्याचा विचारच शक्य नाही. महाराष्ट्राची परिस्थिती व त्याची परंपरा ही विशिष्ट आहेत. आपणास योग्य असे आर्थिक धोरण आखावयाचे असेल. तर त्यांचा विचार करणे महत्त्वाचे आहे. व योग्य आर्थिक पुनर्घटना झाल्याशिवाय आपले अंत:कलह नष्ट होऊन आपला समाज उत्साही व वर्धिष्णु बनणे शक्य नाही. सामाजिक राजकीय दृष्ट्याच नव्हे तर आर्थिकदृष्ट्याही म्हणजे एकंदर समाजजीवनाचे दृष्टीने महाराष्ट्राचा एक राजकीय घटक बनणे अत्यावश्यक आहे. किंबहुना ही पहिली पायरी गाठल्याशिवाय दुसऱ्या कोणत्याही व्यापक सुधारणेस खरोखर सुरुवातच करिता येत नाही असे माझे ठाम मत आहे. पण आजच्या परिस्थितीत या प्रश्नास महाराष्ट्राचे दृष्टीने तोडच लागत नाही. कारण असल्या प्रश्नाबाबत सुद्धा पक्षभेद विसरण्याची आपल्या राजकीय पुढाऱ्यांची तयारी दिसत नाही पक्षाभिमानाचा उन्माद ओसरल्याशिवाय या दिशेने काहीच घडणे शक्य नाही. ही परिस्थिती जोवर बदलत नाही तोवर महाराष्ट्र व मराठी समाज यांच्या भवितव्याचा फुका विचार तरी कशास करावा?' १९४० साली या द्रष्ट्या माणसाने हे लिहून ठेवले आहे! आजही त्याची शंभर टक्के सत्यता मनाला पटून अंगावर काटा उभा रहातो.

'महाराष्ट्र' या नियतकालिकाचे मुख्य संपादक श्री. दादासाहेब ओगले हे नागपूरचे. त्यांच्या लेखातील खालील परिच्छेद प्रस्तुत करावासा वाटतो.

'मला पीछेहाट होत आहे असे वाटत नाही. पण प्रगती मात्र कुंठीत झाली आहे. याला कारण महाराष्ट्राचे दारिद्र्य. दारिद्र्यामुळे महाराष्ट्रातील प्रमुख पुढाऱ्यांनासुद्धा पोटाच्या विवंचनेत राहावे लागते. शिवाय लोकमान्य टिळकांसारखा सांपत्तिक अडचणीची पर्वा न करणारा राजकीयदृष्ट्या बेडर पुढारी आज महाराष्ट्रात नसल्यामुळे इतर प्रांतांच्या मानाने त्याची पीछेहाट झालेली दिसते. परंतु ती खरी नाही. महाराष्ट्राला अलीकडे आपल्या आर्थिक हीनस्थितीची व तिच्यामुळे झालेल्या पीछेहाटीची जाणीव हळूहळू पण तीव्रतेने होऊ लागली आहे. इतर प्रांतांत जी बेकारी पसरली आहे त्यापेक्षांही अधिक भीषण अशी बेकारी

महाराष्ट्रात झपाट्याने वाढत आहे. या आर्थिक अडचणींची कोंडी फोडून निरनिराळ्या धंद्यात आपण पडावे असे महाराष्ट्रीय तरुणांना वाटू लागले आहे. ही प्रवृत्ती जसजशी बळावत जाईल आणि महाराष्ट्रातील तरुण पिढी जास्त स्वावलंबी आणि कर्तबगार बनत जाईल, तसतसे सर्वच क्षेत्रांत महाराष्ट्राचे पाऊल पुढे पडू लागेल, अशी मला आशा वाटते.'

नागपूरचे प्रसिद्ध कार्यकर्ते डॉ. मो. रा. चोळकर हे त्या काळी दहा महिने चीनच्या रणांगणावर काम करून आले होते. असहकाराच्या चळवळीत बंदिवास भोगलेले अशी त्यांची आजही आठवण आहे. महाराष्ट्रीयांनी काँग्रेसमध्ये सरसकट सामील व्हावे असा सल्ला त्याकाळी डॉ. चोळकरांनी दिला होता. त्यांच्या लेखातील काही भाग असा - '१९२० मध्ये लोकमान्य टिळक कालवश झाले. महाराष्ट्रात विचारवंत पुढारी होते. पण टिळकांनी स्थापन केलेल्या पीठावर बसून त्यांचे राजकारण पुढे चालविण्याइतकी धडाडी, करारीपणा त्यांच्यामध्ये नव्हता आणि त्यामुळे आपल्याला आज काय दिसते ? टिळकांच्या मृत्यूनंतर योग्य नेत्याच्या अभावी गेल्या वीस वर्षांत महाराष्ट्राची जी पीछेहाट झालेली दिसत आहे ती लक्षात घेता येत्या २५ वर्षांनंतरचे भवितव्य विशेष उज्ज्वल आहे, असे मला तरी वाटत नाही. सोशॅलिस्ट हे आघाडीवर जाऊ शकत नाहीत. काँग्रेसला पुढारी नाही. तेव्हा फक्त राहिला हिंदुसभेचा प्रश्न. हिंदुसभा हीसुद्धा सावरकरांच्यामुळेच पुढे आली हे लक्षात घेतले तर मग असे वाटू लागते की, सावरकर जर काँग्रेसमध्ये शिरले तर तेथेही ते आपली छाप पाडून काँग्रेसच्या राजकारणात महाराष्ट्राला अग्रेसरत्वाचा मान मिळवून देतील. एखाद्या संस्थेशी आपले जमत नाही म्हणून तिच्यापासून दूर न रहाता त्या संस्थेमध्ये शिरून, तिच्याबरोबर झगडत राहण्याचा लोकमान्यांनी घालून द्रिलेला धडा आज जर सावरकर गिरवतील तर मला वाटते महाराष्ट्र पुढाऱ्यांच्या अभावी येत्या २५ वर्षात हिंदी राजकारणातून मागे पडणार नाही. येत्या २५ वर्षांत महाराष्ट्र औद्योगिक क्षेत्रात खात्रीने पुढे जाईल यात बिलकूल संदेह नाही. राजकारणात पीछेहाट झाल्यामुळे उदासीन झालेला महाराष्ट्र इतर क्षेत्रांमध्ये मागे पडेल असे म्हणणे चूक ठरेल. सामाजिक क्षेत्रांमध्येही महाराष्ट्राचे येत्या २५ वर्षांत पाऊल पुढेच पडणार आहे. इतकेच नव्हे तर महाराष्ट्राचे सध्या पडलेले चार तुकडे एकत्रित करता येऊन महाराष्ट्राचा एक संघप्रांत निर्माण झाला तर महाराष्ट्र राजकारणाच्या आघाडीवर पूर्ववत् यायला वेळ लागणार नाही.'

नामदार मुकुंदराव जयकर यांनी अत्यंत कमी शब्दात आपले मत मांडले आहे. त्यातील काही भाकिते खालीलप्रमाणे :

'आमच्या आर्यन एज्युकेशन सोसायटीच्या शाळेत शिकत असलेल्या चवथ्या इयत्तेत बसलेला एखादा मुलगा दिल्लीला फेडरल प्राईम मिनिस्टरच्या जागेवर येईल. जातिभेदांची बंधने पार तुटून हिंदु-हिंदुमधील मिश्रविवाह ही अगदी मामुली बाब होईल व हिंदु-मुसलमानांमधील तेढ पार नाहीशी झालेली असेल. त्यांच्यामधील बुरख्याची चाल पार नाहीशी झालेली असेल. गांधींच्या चरख्याच्या व ग्रामोद्योगाच्या कामाचा कोठे मागमूसही न रहाता अनेक नवे उद्योगधंदे वाढून हिंदुस्थान हा एक औद्योगिक देश झालेला असेल. मराठी दैनिके दररोज लाख प्रती काढू लागतील. मुंबई शहराची वाढ लंडनसारखी होईल. असा विस्तार करावा तितका थोडाच. मला भविष्यकाळ उज्ज्वल असाच दिसतो आणि काही तरी भीषण अथवा मलीन घटना आपल्या देशाच्या नशिबी आहेत अशी भीती मला मुळीच वाटत नाही.'

या मोजक्या शब्दांमधून मुकुंदराव जयकर केवढे द्रष्टे व्यक्तित्व असावे याची कल्पना येते.

प्रो. न. र. फाटक मात्र आपल्या लेखाची सुरुवातच धोक्याच्या सूचनेपासून करतात. उदाहरणार्थ,

'आजपासून पंचवीस वर्षांनी म्हणजे सुमारे १९६५ साली महाराष्ट्राची स्थिती काय असेल याचा अंदाज करताना किती तरी अचिंत्य गोष्टींना सोडून दिल्याशिवाय भागणार नाही.' पानशेत, कोयनेचा भूकंप, चीन, पाकिस्तान, बांगलादेश ही युद्धे, ७२ चा भयानक दुष्काळ अशा घटनांविषयी जणू पूर्व सूचना देत सुरुवात करून ते पुढे म्हणतात, 'महाराष्ट्राचे राजकारण यामुळे समाजसत्तावादाच्या संस्काराचे दिसू लागेल. समाजसत्तावादाला महाराष्ट्र ही अतिशय अनुकूल भूमी आहे. शेतकरी सरकारनेच उपरा करून ठेवला आहे. त्यातलाच मोठा भाग शहरातील कारखानदारीत खपणाऱ्या कामगारांचा आहे. जमीनदाऱ्या, इनामे, वतने, संस्थाने ही सारी कलमे इतर प्रांताच्या मानाने क्षुद्र आहेत. महाराष्ट्राच्या समाजरचनेत या नवीन मताने जी क्रांती अस्तित्वात येईल ती दुसऱ्या प्रांतांना मार्गदर्शक व्हावी, असे म्हणावयाला हरकत नाही. हिंदूंतील जातवारी ऱ्हास पावल्यावर मुसलमानांच्या जातवारीला आजचे आपले काटे फेकून द्यावे लागतील. मुसलमानांमध्ये समाजसत्तावादाची स्फूर्ती इतस्तत: दिसू लागली आहे व ती फैलावत आहे. पुढील पंचवीस वर्षांत आजच्या भेदभावांना ग्रहण लागल्याशिवाय राहणार नाही. या कालावधीत हिंदुस्थान देश बहुतांशी राजकारभारात स्वतंत्र व्हावा, अशी चिन्हे आजच दिसत आहेत. संरक्षणासाठी एका कवीने म्हटल्याप्रमाणे सह्याद्रीचे रोज रोज पाय धुणाऱ्या पश्चिम सागरात आरमार उभे राखण्याची एक जबाबदारी स्वातंत्र्यामुळे येणार आहे. या आरमाराची सिद्धता करणारे मोठाले कारखाने काठियावाडापासून तहत कन्याकुमारीपर्यंत निघण्याचा संभव निश्चित आहे. आरमार, लष्कर, विमान यांच्या साहित्याचे कारखाने निघाल्यावर बेकारीचा मागमूसदेखील काही वर्षे पहावयाला सापडणार नाही. व्यापाराची व

उद्योगधंद्याची कारखानदारी अफाट वाढावी असा अंदाज आहे. परंतु लष्कर व आरमार यांचा बराचसा बोजा महाराष्ट्राला सांभाळावा लागेल व महाराष्ट्राच्या कर्तबगारीला या योगाने सहजच उजाळा चढेल. महाराष्ट्राचे राजकीय भवितव्य उज्ज्वल, भव्य, निर्दोष व सगळ्या हिंदी जनतेच्या राजकीय उर्जितावस्थेला अनन्यसाधारणपणे वेग पुरविणारे होईल. ही स्थिती पुढच्या पंचवीस वर्षांतच येईल, असे म्हणवत नाही. पण स्थितीचा भक्कम पाया सदर कालावधीत भरला जावा, हे खास.'

श्री. ना. गो. चाफेकर यांनी, 'दीर्घ विचारांती माझे असे स्पष्ट मत बनले आहे की, येत्या पंचवीस वर्षांअखेर महाराष्ट्र इतर मोठ्या प्रांतांच्या बरोबरीनेच राहील, मागे पडणार नाही किंवा टिळकांच्या हयातीतील अग्रपूजेचा मानही त्याला मिळणार नाही' असे म्हटले आहे. त्यापुढे जाऊन त्यांनी महाराष्ट्र पुढे का होता आणि तो २५ वर्षांनंतर कसा असेल याचे वर्णन केले आहे.

श्री. लक्ष्मणराव किर्लोस्कर यांनी फक्त औद्योगिक व व्यापारविषयक बाबींपुरतेच क्षेत्र मर्यादित ठेवून आपला आशावादी दृष्टिकोन मांडला आहे. औद्योगिक बाबींसंबंधी महाराष्ट्राच्या भवितव्याचा विचार करण्यापूर्वी या बाबत पूर्वीच्या अनुभवाचा आढावा घेऊ. आपल्या मराठे लोकात उद्योगधंद्यांची वाढ व्हावी तशी न होण्याला मुख्य दोन गोष्टी कारणीभूत झाल्या आहेत. पहिली अंग मोडून काम करणाऱ्या उद्योगी माणसासंबंधी समाजाची उदासीनच नव्हे तर हेटाळणीची वृत्ती आणि दुसरे व्यावहारिक शहाणपणाची व प्रामाणिकपणाची कमतरता. ही परिस्थिती आता कुठे ६०-७० वर्षांनी थोडी बदलू लागली आहे, असे नाही तुम्हाला वाटत? लक्ष्मणराव पुढे म्हणतात, "७५ टक्के यश सामग्री, उत्कृष्ट विक्री-संघटन शाखेवरच अवलंबून असते. या बाबतीत महाराष्ट्रीयांनी नुकतीच कुठे प्रगती सुरू केली असली तरी अद्याप मोठी मजल मारावयाची आहे. ही गोष्ट नवीन पिढीने जरूर ध्यानात धरावी. यशस्वी विक्रेत्याला एकलकोंडेपणा, फाजील मानापमानाच्या कल्पना आणि एकांडे शिलेदारी ही सर्व वावडी असून महाराष्ट्रीय स्वभावाची ही वैशिष्ट्ये अजूनही आम्हाला नडत आहेत. तथापि तरूण पिढी कारखानदारीप्रमाणे व्यापारातही (विक्रेते) आता जोरात पडत असल्यामुळे प्रत्यक्ष अनुभवाने टक्केटोणपे खाऊन आणखी पंचवीस वर्षांनी यशस्वी कारखानदार व उत्कृष्ट विक्रेते ठरतील अशी मला पूर्ण खात्री वाटते." लेखाच्या शेवटी लक्ष्मणरावांनी खालील महत्त्वाचा सल्ला दिला आहे.

"शेवटी तरुण महाराष्ट्राला मला एका गुरुकिल्लीची जाणीव करून द्यावयाची आहे. ती गुरुकिल्ली म्हणजे चिकाटी आणि पुढाऱ्याच्या हाताखाली काम करण्याची लष्करी शिस्त. 'चिकाटी'च्या आम्हा मराठ्यांच्या वैशिष्ट्यांत अंतर्भूत असलेल्या अमोघ शक्तीच्या आणि 'शिस्ती'च्या जोरावर महाराष्ट्र पंचवीस वर्षांनी औद्योगिक आणि व्यापारी शाखांतच काय परंतु कोणत्याही प्रकारच्या जीवनक्रम झगड्यात हिंदुस्थानातल्या कोणत्याही प्रांताला हार जाणार नाही. चिकाटीच्या मानवी शक्तीला महाराष्ट्रात अत्यंत स्वल्प दरात निर्माण करता येणाऱ्या विजेला निसर्गशक्तीची जोड दिली गेली की एका हातात चिकाटीच्या मानवशक्तीचा 'विळा' आणि दुसऱ्या हातात स्वस्त विजेच्या निसर्गशक्तीचा 'हातवडा' हाती घेऊन चढाओढीला सज्ज झालेल्या महाराष्ट्रीय तरुणापुढे आणखी पंचवीस वर्षांनी इतर हिंदीचा प्रांतच काय परंतु परदेशी कारखानदारही आदराने आपली मान लववतील". किर्लोस्करांची १९४० सालातील दृष्टी ही किती प्रगल्भ आणि प्रगत होती हे यातून दिसते.

डॉ. जी. एस. घुर्ये या समाजशास्त्रज्ञाने समाजशास्त्राच्या दृष्टीने आपले म्हणणे मांडले आहे. जसे पोषाख, विवाह, मुले, जातिभेद इ. त्यांच्या लेखातील कोकण आणि देश यांच्या बलस्थानाचा विचार उद्बोधक वाटतो. तो खालीलप्रमाणे :

"कोकण दरिद्री म्हणून तिथला कुणबी पोट भरण्यासाठी मुंबईची वाट पकडतो आणि गिरणीत काम करू लागतो. अर्थात गिरणगावात प्रचलित असलेल्या कामगार चळवळीचा त्याच्यावर काहीतरी परिणाम होऊन तो निव्वळ खेड्यात जन्म गेलेल्या कुणब्यापेक्षा काही वेगळ्या कल्पना बरोबर घेऊन गावी परत जातो. या त्याच्या नव्या विचाराचा परिणाम त्याच्या राहणीवर, कुटुंबावर आणि शेजाऱ्यापाजाऱ्यांवर देखील झालेला आढळून येतो. याप्रमाणे खेड्यातले लोक मुंबईसारख्या गिरणगावात येतील तितके ते अधिक प्रगमनशील होतील हे सांगावयास नकोच. याच्या उलट पुणे हे महाराष्ट्रीय भाषा व संस्कृतीचे आगर समजले गेले असले तरी तिथे व्यापार धंद्यासंबंधाने शिथिलता असल्यामुळे तेथील रहिवाशांची रहाणी व रहाणीमुळे विचार देखील भिन्न स्वरूपाचे असणे साहजिकच आहे. तिसरे उदाहरण आपण खानदेशचे घेऊ. खानदेश सुपीक आहे. शेतकरी स्थाईक असल्यामुळे त्यांच्या रहाणीत व विचारसरणीत फरक पडणे अधिक कठीण असते. अर्थात कोकणच्या कुणब्याच्या वृत्तीत मुंबईच्या रहाणीचा जो परिणाम होतो तो खानदेशच्या शेतकऱ्यावर होणार नाही व दोन्ही जरी एकाच पेशाचे मूळचे असले तरी त्यांच्या चालचलणुकीत अतिशय अंतर आढळून येईल...

आनुवंशिक संस्काराचे महत्त्व असे की कोकणच्या वाळूची चलाखी देशावरच्या कामकरीवर्गात दिसून येत नाही. त्याचप्रमाणे घाट्याचे शारीरिक वळण कोकण्याला क्वचितच येईल. अशा कारणाने सांस्कृतिक भिन्नता निर्माण होत असते. ही भिन्नता वाढविण्यास शेजारील

प्रांतांच्या संस्कृतीचा व आर्थिक परिस्थितीचाही बराच परिणाम होत असतो.''

शेवटचा लेख हा एस. एम. जोशी यांचा आहे. लेखाची सुरुवातच त्यांनी अशी केली आहे, ''राजकारणामध्ये महाराष्ट्राला मिळावे ते स्थान मिळत नाही व आमच्या गुणांचे चीज होत नाही, अशी तक्रार बऱ्याच सुशिक्षित महाराष्ट्रीयांकडून आजकाल ऐकू येत असते. लोक आपली उपेक्षा का करतात? असे विचारले तर महाराष्ट्राजवळ पैसा नाही असे सांगण्यात येते. खरोखर इतके लोक आपली उपेक्षा करीत आहेत की आमच्यामध्येच हा न्यूनगंड निर्माण झाला आहे, याचा आपणास विचार करावयास हवा.'' काहीसे स्वप्निल वाटणारे परंतु पुढे जाऊन स्वत:च्या आयुष्यात यातील बऱ्याच गोष्टी करणारे एस. एम. जोशी यांचे भावी महाराष्ट्राविषयीचे मत हे असे होते. ते पुढे म्हणतात, ''म्हणून तरुण महाराष्ट्राला निराश होण्याचे मुळीच कारण नाही. आपल्या ध्येयवादाने, बुद्धिसामर्थ्याने आणि चिकाटीने त्याला एक आदर्श अभिनव महाराष्ट्र निर्माण करता येण्यासारखा आहे. विद्युतशक्तीने सर्व खेडेगावात प्रकाश नेता तर येईलच पण तेथील सामाजिक अंध:कारही आपणास दूर करता येईल. प्रत्येक गावात एक सुंदर शाळा, त्यामध्ये बौद्धिक व शारीरिक शिक्षण देण्यास लागणारी साधने आणि लोकोपयोगी संस्था चालविण्यासाठी सर्वस्वी बहुजन समाजाशी तन्मय झालेले कार्यकर्ते आपण निर्माण केले तर महाराष्ट्रामध्ये आपणास क्रांती घडवून एका नव्या संस्कृतीची उभारणी करता येईल. वर्णवैमनस्य, धर्मकलह, जातिभेद, दुष्ट रूढी, अज्ञान या सर्वांचा उच्छेद करून एक नवी सृष्टी आपणास करावयाची आहे.''

१९६५ ते १९९५ या तीन दशकातील 'महाराष्ट्र राज्य' आपल्या दृष्टीसमोर आहे. या कालखंडातील जीवनाच्या सर्व स्तरांवरील महाराष्ट्राचे यशापयश आपण अनुभवले आहे. महाराष्ट्राचे जीवन म्हणजे महाराष्ट्रीयांचे जीवनच होय. प्रगती-अधोगती, आशा-निराशा, चिंतन-चिंता आणि प्रत्यक्ष-कल्पित या परस्परविरोधी ताण्याबाण्यातून समाजजीवनाचे जीवन वस्त्र विणले जाते. नव्या शतकाचे दूत आगामी काळाचे आगमन सुचवीत आहेत. त्या शतकाला सामोरे जाण्यापूर्वी आपण स्व-मूल्यमापनाला सिद्ध होऊया, तसेच आगामी काळाची कल्पना करून थोडी वैचारिक घुसळण सुरू करूया. या मंथनातून हलाहल नव्हे, तर परस्पर सामंजस्य, परस्पर संवाद आणि परस्पर सहकार्याचे मंत्रध्वनी आपल्या मनाचा-बुद्धीचा ठाव घेतील असा विश्वास वाटतो. नव्या मर्मदृष्टींच्या आधाराने नवा सामर्थ्यशाली महाराष्ट्र घडविणे हेच तर आपले ध्येय आहे. म्हणूनच ही पुढील २५ वर्षांची विचारपूर्ण संफर!

***

K G C
K.G.CHURI & CO.
MFG. OF SPECIAL PURPOSE MACHINES

'कालनिर्णय' च्या वाचकांस
आमच्यातर्फे हार्दिक शुभेच्छा!

391/A,K. G. Marg, Next to Siddhivinayak Temple,
Dadar (W.), Mumbai 28. (INDIA)
Tel-Fax 437 0460 Tel.: 431 3633 /436 6050

दृष्टिक्षेपातला महाराष्ट्र २०२०

सुहास फडके

पुढचा विचार करणे किंवा भविषाचा वेध घेणे हे समाजाच्या, देशाच्या प्रगतीच्या दृष्टीने आवश्यक असते. कारण आता विचार झाला तरच ध्येयधोरणे आखता येतात आणि अमलात आणता येतात. अर्थात असा वेध घेणे हे कधीच सोपे नसते, याचे मुख्य कारण म्हणजे सभोवतालचे असंख्य ज्ञात आणि अज्ञात घटक कसे बदलतील याचे ठोकताळे केवळ आपण बांधलेले असतात. कोणत्याही गणिती फार्म्युल्याचा आधार त्याला नसल्याने आपले अंदाज चुकण्याची शक्यता असते. तरीही असा प्रयत्न विविध चर्चासत्रे, अभ्यासवर्ग, परिसंवाद याद्वारे होत असतो.

यंदा आपण आणखी सुमारे २५ वर्षांनी म्हणजे २०२० साली महाराष्ट्राचे आणि मराठी समाजाचे राजकीय, आर्थिक, सामाजिक, कला इत्यादी आघाड्यांवर चित्र काय असेल, याचा अंदाज घेण्याचा प्रयत्न केला आहे. या चर्चेमध्ये त्या त्या क्षेत्रातील तज्ज्ञ आपण आमंत्रित केले आहेत. यामागे या तज्ज्ञमंडळींनी त्यांच्या आवडीच्या क्षेत्रांमध्ये अव्वल स्थान मिळवले आहे एवढाच निकष नसून भविष्यात साक्षेपी नजरेने बघण्याची आणि कोणताही पूर्वग्रह न ठेवता आपले विचार मांडण्याची त्यांची क्षमताही आम्ही लक्षात घेतली आहे.

असाच एक प्रयत्न, ज्योत्स्ना मासिकाने १९४० साली केला होता. '२५ वर्षांनंतरचा महाराष्ट्र' या विषयावर 'ज्योत्स्ना'ने विचारमंथन घडवून आणले होते. तो स्तुत्य प्रयत्न अधिक व्यापक प्रमाणावर आम्ही नेला आहे. महाराष्ट्राच्या राजकीय नेतृत्वाने आणि विविध क्षेत्रांतील समाजधुरिणांनी या ठिकाणी दिलेले धोक्याचे इशारे, मांडलेली परखड मते यांच्यापासून मराठी भाषिकांनी काही बोध घेऊन आचरण केल्यास त्यात सर्वांचेच हित आहे. या परिसंवादात सहभागी झालेल्यांनी महाराष्ट्राचा, मराठी भाषेचा, मराठी माणसांचा विचार करताना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय संदर्भांचा विचार केला आहे. झपाट्याने होणाऱ्या वैज्ञानिक बदलांचा मागोवाही त्यांनी घेतला आहे त्यामुळे आपल्याला पुढच्या २५-२७ वर्षांत कोणत्या आव्हानांना तोंड द्यावे लागेल याचे संपूर्ण चित्र वाचकांच्या डोळ्यासमोर उभे राहील.

परिसंवादात भाग घेतलेल्या विचारवंतांनी महाराष्ट्राच्या सद्यस्थितीचा विचार केला आहे आणि भूतकाळातही त्यांनी डोकावून पाहिले आहे. सुनील देशमुख या अमेरिकेत राहणाऱ्या उद्योजकांना सध्याच्या महाराष्ट्र हा Lord of Paradox वाटतो. कारण येथील ध्येयवादी, पुरोगामी नेतृत्वाने राष्ट्रीय पातळीवर मोठी कामगिरी केली तर याच भूमीत धर्मांध, निमफॅसिस्ट संघटनांचाही उदय झाला, त्यामुळे पुढच्या २५ वर्षांत पुरोगामी काही घडेल अशी आशा त्यांना नाही. मराठी तरुण अधिकाधिक प्रमाणात अनिवासी भारतीय होतील आणि मूलतत्त्ववादी चळवळीचा जोर झालाच तर यापैकी काहीजण अर्थसहाय्यही करतील, दलित समाज नेतृत्वहीन, दिशाहीन असल्याने या समाजाच्या प्रगतीची फारशी अपेक्षाही देशमुख यांना नाही.

गेली ४० वर्षे राज्याचे आणि राष्ट्राचे राजकारण डोळसपणे पाहणारे, अभ्यासणारे बॅरिस्टर विठ्ठलराव गाडगीळ यांनी राज्याच्या राजकारणात असभ्यता आणि असंस्कृतता वाढते आहे आणि ती रोखण्याची ताकद काँग्रेस मजबूत झाल्यास या पक्षात आहे असे वाटते. परंतु हा पक्ष मजबूत करण्याचे काम अवघड आहे हे देखील ते मान्य करतात. ब्राह्मणविरोध हा विषय आता येथे उरला नाही हे देखील ते सांगतात. महाराष्ट्राला राष्ट्रीय राजकारणात स्थान दिले जात नाही आणि हा बुद्धिवादी प्रदेश आहे महत्त्वाचे गैरसमज आहेत. हे गाडगीळ उदाहरणे देऊन स्पष्ट करतात.

किशोर आरस यांच्या मते २५ वर्षांत नोकरी व्यवसाय यांतून मराठी भाषा बरीच हद्दपार होईल आणि नाटक, सिनेमा, घरात बोलण्यापुरती आणि ग्रामीण भागातल्या व्यवहारापुरती मराठी भाषा मर्यादित राहील. जीवघेण्या स्पर्धेमुळे भरपूर पैसे कमावणाऱ्या माणसालाही मानसोपचार तज्ज्ञाची अधिक गरज भासेल, याउलट मॅनजमेंट काउन्सेलर श्रीनिवास पंडित, महाराष्ट्राचा वृत्तीवेध सकारात्मक झुकल्यामुळे प्रगतीच्या पहिल्या पायरीच्या दिशेने महाराष्ट्र वाटचाल करील, त्याचवेळी कोकणात येणाऱ्या विविध उद्योगांमुळे कोकणात विद्रोहाचे विदारक दर्शन घडेल.

रस्ते, पूल बांधकाम तज्ज्ञ माधव जोग यांनी महाराष्ट्राच्या एकंदर प्रगतीचा ताळेबंद मांडताना याहून अधिक वेग गाठण्यासाठी काय करता येईल याची ब्ल्यू प्रिंटच मांडली आहे. प्रगतशील म्हणवणाऱ्या महाराष्ट्राची अनेक आघाड्यांवर किती असमाधानकारक स्थिती आहे हे त्यांनी दाखवून दिले आहे. अधिकृत आकडेवारीचा आधार घेतच त्यांनी हे चित्र मांडले आहे. दलित समाज, काल्पनिक सवर्णद्वेष, वंशद्वेष सोडून देईल आणि समाजहित, अर्थहित साधेल अशी ग्वाही जोग देतात.

गेली २० वर्षे महाराष्ट्राबाहेर संपूर्णपणे सामाजिक चळवळीला वाहून घेतलेले नानाजी देशमुख यांनी, पालक आणि शिक्षक यांची सांगड जुळून तरुण पिढीला मार्गदर्शन केले तरच देश आणि जग यांच्यासमोर महाराष्ट्र अनुकरणीय उदाहरण उभे करू शकतो असे वाटते.

शास्त्रज्ञ आणि लेखक डॉ. बाळ फोंडके यांनीदेखील मराठी भाषा, एकंदरीत शिक्षण पद्धतीमुळे घराच्या भिंतीआड होत जाईल, अशी आशंका व्यक्त केली आहे.

मनोहर जोशी आणि शरद पवार या आजी-माजी मुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्रात अधिक चांगले घडेल असा ठाम विश्वास व्यक्त केला आहे. जोशी यांनी आता इतर राज्यांशी नव्हे तर इतर प्रगत राष्ट्रांशी स्पर्धा करावी असे सुचविले आहे. या दोघांनींही वेगाने प्रगती होणारे तंत्रज्ञान आत्मसात करणे हा विकासाचा प्रमुख टप्पा मानला आहे. त्यामुळे मेंदू हे भविष्यात भांडवल राहणार असे पवार सांगतात, तर परदेशात स्थिरावलेल्या मराठी माणसाने महाराष्ट्रात परतावे आणि 'महा'राष्ट्र घडवावा असे आवाहन जोशी यांनी केले आहे.

माजी मंत्री विलासराव देशमुख यांनीदेखील ''शिक्षणाचा प्रसार झाला, पण व्हावा तसा अभ्यास झाला नाही'' या शब्दांत प्रचलित शिक्षण व्यवस्थेचे दोष दाखविले आहेत. आजही गावांमध्ये तेथे आवश्यक असणारे छोटेछोटे तंत्रज्ञ मिळणे दुरापस्त झाले आहे ही उणीव त्यांनी मांडली आहे.

सार्वजनिक बांधकाम मंत्री नितीन गडकरी यांनी नवमहाराष्ट्र घडविण्याचे आव्हान का कठीण आहे याचे उत्तर पुढील शब्दांत दिले आहे. ''स्वार्थी राजकारणी, बुद्धिभेद करणारे विद्वान, समाजहिताचा स्पर्श नसलेले प्रशासन, परस्परविरोधी कायदे व नियमांचे जाळे, संवेदनशून्य नेतृत्व हे सारे घटक आणि त्यांच्या वृत्ती इतक्या जड होऊन स्थिरणाऱ्या आहेत की राज्याला नवीन दिशा देण्याचा प्रयास सफल होईल की नाही याची काळजी वाटावी.''

प्रदीप रावत यांनी मुळात महाराष्ट्र पुढारलेला आहे हा लाडका समजच कसा खोटा आहे हे सांगितले आहे. माधव जोग यांनी आकडेवारी देत हाच मुद्दा वेगळ्या पद्धतीने मांडला होता. महाराष्ट्राचा सध्याचा प्रगतीचा दावा हा रावत यांना ''सातवी 'ब'मधील मुलांनी सातवी 'ड'मधील तुकडीकडे तुच्छतेने बघण्यासारखे आहे'' असा वाटतो.

उद्योजक केशुब महिंद्र यांनी महाराष्ट्र कसा असेल हे सांगण्याऐवजी कसा असावा यावर भर दिला आहे. तर पत्रकार कुमार केतकर यांनी, काही एकलव्य अंत:प्रेरणेने नवमहाराष्ट्र घडवत आहेत. त्या एकलव्यांचा शोध घेऊन त्यांना प्रकाशात आणणे आणि काही नवीन 'रोल मॉडेल्स' (आदर्श) तयार करण्याइतके जरी काम आपण केले तरी २०२०चा महाराष्ट्र आपल्या मनासारखा उभारता येईल अशी भूमिका मांडली आहे.

भावी महाराष्ट्राचा सामाजिक आणि सांस्कृतिक आलेख मांडताना अब्दुल कादर मुकादम यांनी दलित, ओबीसी यांची हक्कांसाठी अन्यायांविरुद्ध आंदोलने अधिक तीव्र होतील आणि त्याचा फायदा मुस्लिम समाजालाही मिळेल असे म्हटले आहे.

कायदातज्ज्ञ अशोक देसाई यांनी कायदा हा श्रद्धेचा विषय असावा असे मत मांडले आहे. तसे नाही झाले तर पुढल्या २५ वर्षांत महाराष्ट्रात सर्वत्र 'उल्हासनगर' होईल हा त्यांचा इशारा सर्वांनीच विचार करण्याजोगा आहे.

बी. पी. गुणाजी यांच्या मते मूलत: प्रबोधन घडणे निकडीचे आहे कारण आपण जागतिकदृष्ट्या एकत्र येणाऱ्या आर्थिक व सामाजिक परिवर्तनाकडे वाटचाल करीत आहोत. या बदलांना सामोरे जाण्यासाठी दृष्टिकोन, वागणूक या सगळ्यात परिवर्तन होणे आवश्यक आहे.

संगीततज्ज्ञ शरच्चंद्र गोखले संगीतातही 'फ्यूजन'चा जमाना आहे, असे सांगतात आणि भविष्यामध्ये संगीताचे क्षेत्र विविध अंगांनी ढवळून निघणार आहे आणि लोकाभिरुची वेगळ्या वाटांनी जाणार आहे, असे निदर्शनास आणतात.

डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर म्हणतात की, ''आपण प्रगतीची आस न धरता, पुढे जाणाऱ्याचे पाय खेचण्याच्या मराठी वृत्तीलाच धरून बसलो. तर पंचवीस, पन्नासच काय तर शंभर वर्षांनीही आपण आज आहोत तिथेच असू. ही परिस्थिती बदलायची असेल तर विचारमंथन सुरू ठेवून आपल्याला काही व्यूहरचना करावी लागेल. तसे काही केले तर आपण सहजपणे जपानच्या जागी असू.''

भंवरलाल जैन यांचे मत असे आहे की, एकविसाव्या शतकामध्ये आपल्या जीवनाच्या प्रत्येक दालनात सुमारे सात ते दहा वर्षांत किंबहुना त्यापेक्षा कमी काळात मूलभूत बदल घडून येणार असे चित्र स्पष्ट दिसते आहे.

सदानंद वर्दे महाराष्ट्र २०२० साली कसा असेल हे सांगताना म्हणतात, 'उत्तम विद्या, मध्यम शेती आणि कनिष्ठ व्यापार' या त्रिसूत्रीत व्यक्त झालेले मराठी माणसाचे ब्रीद वा निष्ठा यात निश्चितच परिवर्तन झालेले आहे. हे ब्रीद २०२० सालापर्यंत कालबाह्य होऊन प्रसिद्ध आंग्ल कवी रॉबर्ट ब्राऊनिंग यांच्या प्रसिद्ध कवितेतील पुढील ओळी हे महाराष्ट्राचे ब्रीद झालेले असेल-

'Ah but a man's reach should exceed his grasp, or what's a heaven for?'

या सर्व विचारवंतांच्या लेखांच्या आढाव्यावरून त्यांची महाराष्ट्रीय जीवनाविषयीची आस्था दिसून येते आणि त्यांनी सांगितलेले भविष्यातील संभाव्य धोकेही नेटकेपणाने दिसून येतात. या विचारमंथनामुळे आपली त्या लेखांविषयीची उत्सुकता वाढली असेलच. आता हे लेख वाचून या विचारवंतांची मते अधिक स्पष्ट होतील.

***

संगणकांचं युग येईल

किशोर आरस

समाजजीवनाच्या सुरुवातीस गाय हीच संपत्ती होती. परंतु माणसानं जेव्हा पहिली टोळी बनवली, तेव्हाच मनुष्य हीही संपत्ती असल्याचा साक्षात्कार त्याला झाला असला पाहिजे. शिकार करून भक्ष्य मिळवणं हे मुख्य काम तर होतंच परंतु जंगल तोडून निवाऱ्याची व्यवस्था करणं, नदीवरून पाणी आणून साठवणं अशी विविध कामं करण्याकरिता टोळीप्रमुखाला निरनिराळ्या माणसांची गरज लागत असे. काळ पुढे सरकत राहिला, कामं बदलली तरी मनुष्य ही संपत्ती आहे, या मूलभूत संकल्पनेत काहीही बदल झालेला नाही. पूर्वकाळापासून काम करणाऱ्यांची विभागणी हातानं काम करणारे आणि विचार करण्याचं काम करणारे अशी झालेली असली तरी त्या वेळी विचार करण्याचं काम फक्त टोळीच्या प्रमुखाकडे असे. त्या प्राथमिक अवस्थेत 'हल्ला चढवा', 'पळा' किंवा 'आहे तिथेच थांबा' असा क्षणार्धात घेण्याजोगा निर्णय सोडला तर ही विचारशक्ती फारशी वापरली जात नसावी. आजही ही विभागणी कायम असली तरी महाराष्ट्रात तिच्यात प्रचंड संख्यात्मक आणि गुणात्मक बदल झालेले आपल्याला आढळून येतील. आजपासून पंचवीस वर्षांनंतर महाराष्ट्रातल्या मनुष्यसंपत्तीच्या एकंदर स्वरूपात कितीसे आणि कुठच्या प्रकारचे बदल होणार आहेत याचा विचार आपल्याला करावयाचा आहे.

प्रथम हे सांगितलं पाहिजे की अशा प्रकारच्या विवेचनाला संख्याशास्त्राचा आधार घेण्याची जी पद्धत आहे ती यापुढे निरुपयोगी ठरणार आहे. या संदर्भात मागील पन्नास वर्षांकडे नजर टाकल्यास हा मुद्दा बराचसा स्पष्ट होईल. १९४७ ते १९७२ या पंचवीस वर्षांत सारं कसं शांत शांत होतं. जास्तीत जास्त मेहनत घेऊन म्हणजे जादा तास काम करून किंवा यंत्रांचा वेग वाढवून जास्त उत्पादन करणं यापलीकडे विचार करण्याची आपली तयारी नव्हती. १९६७ आणि तद्नंतर पीटर ड्रकर (Effective Executive), सी. नॉर्थकोट पार्किन्सन (Parkinson's Laws) आणि पीटर लॉरेन्स (Peter Principle) अशा पाश्चात लेखकांनी मनुष्यसंपत्तीच्या विषयात आपल्या विचार करण्याच्या पद्धतीतच बदल घडवून आणण्यास सुरुवात केली असली तरी १९७२ ते १९९७ या पंचवीस वर्षांच्या प्रथमार्धात हे विचार रुजतात न रुजतात तोच उत्तरार्धात शास्त्रज्ञांनी विचार करणारी जी यंत्रे निर्माण केली होती त्यात पूर्वी न कल्पिलेले असे क्रांतिकारक बदल घडवून आणून संख्याशास्त्र आणि आपल्या पूर्वीच्या संकल्पना यांना मोडीत काढण्याचा विक्रम करून दाखवला. या विलक्षण फारकतीचा केवळ गुणात्मक धागा पकडूनच महाराष्ट्रातल्या मनुष्यसंपत्तीच्या भविष्यात पुढील पंचवीस वर्षांत काय घडणार आहे याचा वेध आपल्याला घ्यावयाचा आहे.

उद्योगधंदे आणि नोकऱ्या

उद्योगधंद्याबद्दल मराठी माणसाची फारशी ख्याती नव्हतीच. पंचवीस वर्षांनंतर मराठी माणसाच्या स्वभावात काही बदल होईल असा संभव दिसत नाही. परंतु ज्या नोकऱ्यांवर मराठी माणसाची भिस्त होती, त्या सर्व बहुतेक नाहीशा झालेल्या असतील. जग ही एकच बाजारपेठ होऊन कुठल्याही राष्ट्राला या बाजारपेठेबाहेर राहणं शक्य होणार नाही. राष्ट्राचं संरक्षण हा विषय सोडला तर इतर विषयांत सरकारची भूमिका दुय्यम किंवा नगण्य असेल. खाजगीकरणामुळे सरकारी नोकरदारांची संख्या अतिशय घटेल. टपालखातं अस्तित्वात नसेल. कारकुनी कामांची नावनिशाणीही शिल्लक राहिलेली नसेल. उदाहरणार्थ, भरपाई विम्याची रक्कम संगणक विशिष्ट संगणकप्रणालीच्या आधारे ठरवून हक्कदाराच्या बँकखात्यात परस्पर जमा करतील. शिक्षक नसतील कारण शाळा आणि कॉलेजं असणार नाहीत. शिक्षण हे घरच्या घरीच संगणकावर पार पडेल. फार काय, विमानं वैमानिकाशिवाय उडतील. आजच्या अवजड यंत्रांची जागा स्वयंचलित छोटी यंत्रं घेतील, अवजड कामं यंत्रमानव पार पाडतील. सुट्या भागांची निर्मिती जगात निरनिराळ्या ठिकाणी तर त्यांची बांधणी आणखी निराळ्या ठिकाणी असं उत्पादनाचं स्वरूप राहील. त्यामुळे कारखान्यांची आणि कार्यालयांची संख्या तर घटेलच परंतु त्यांचा आकारही कमी होईल. मोठ्या कार्यालयांचा संसार खोलीत मावण्याएवढा उरलेला असेल. याचा अर्थ मराठी माणसं बेकार होऊन सैरावैरा हिंडत राहतील असा बिलकूल नाही. उलट जागतिकीकरणामुळे, मुंबई- महाराष्ट्राच्या भौगोलिक स्थानामुळे आणि मराठी माणसाच्या बौद्धिक क्षमतेमुळे महाराष्ट्रात बेकारीचं जवळजवळ उच्चाटन झाल्याचं आढळून येईल.

नव्या युगातील नोकरदार

पुढील पंचवीस वर्षं ही संगणकांच्या नवनवीन अवतारांची असतील. परंपरागत नोकऱ्यांची नावनिशाणी पुसून गेल्यानंतर मराठी माणसाच्या मानसिक घडणीशी निगडित असलेल्या, संगणकांशी संबंधित असलेल्या असंख्य नोकऱ्या मराठी नोकरदारांकडे चालून येतील. पुढपुढील यत्तेतले संगणक शोधण्याचं संशोधन करणाऱ्या प्रयोगशाळेत काम करणं, संगणकांची किंवा संगणकप्रणालींची बांधणी करणं, संगणक चालवणं आणि दुरुस्त करणं अशा कामात हे नोकरदार गुंतलेले असतील. पुढील पंचवीस वर्षांत या दिशेनं होणाऱ्या प्रगतीची झेप किती असेल याची थोडीशीच कल्पना आज आपण करू शकतो, इतकी ती उत्तुंग असेल. आजचे टेलिफोन्स, फॅक्स, टू-वे व्हिडीओ, इ-मेल कालबाह्य ठरतील. त्यांची जागा कदाचित अवकाशातील उपग्रह यंत्रणा आणि पृथ्वीवरील टी. व्ही. कॉम्प्युटर्स यांनी घेतलेली असेल. कलकत्ता, बंगलोरसारख्या ठिकाणी आज जी दहा टक्के मराठी माणसं नोकरीला आहेत त्यांची अशा शहरातल्या नोकऱ्यांतली टक्केवारी वाढेलच, परंतु अशा नोकऱ्यांकरिता मराठी माणसं आजच्या मलेशिया, सिंगापूर, थायलंड यापलीकडेही जातील. एकविसाव्या शतकात इस्लामचा कडवेपणा कमी होऊन मध्यपूर्वेतल्याच नव्हे तर इतरही इस्लामी प्रदेशात हिंदू मराठ्यांना मोठ्या प्रमाणात नोकऱ्या मिळतील. जग जवळजवळ येण्याच्या झपाट्यापुढे अमेरिकेसारख्या ठिकाणी स्थायिक होण्याचं आकर्षण मराठ्यांना उरणार नाही. तात्पुरत्या मुशाफिऱ्या करून मायदेशातल्या आपल्या गावी काही दिवस निवांत येऊन राहण्याची प्रवृत्ती बळावलेली असेल.

व्यवसाय

नोकऱ्यांचं प्रमाण घटलं असलं तरी मुंबईत आणि महाराष्ट्रात छोटे छोटे व्यवसाय करणाऱ्यांची संख्या अतोनात वाढलेली असेल. यातले बरेचसे व्यवसाय बसल्या ठिकाणाहून म्हणजे स्वत:च्या घराच्या चौकटीतूनच जगभरच्या गिऱ्हाईकांकरिता चालवले जातील. आताच्या प्रत्येक घरात जसे टी. व्ही. असतात, तसे उद्याच्या घरात संगणक असतील. बरीच मंडळी घरूनच स्वत:च्या संगणकावर निरनिराळी कामं करून देण्याच्या ठेक्याच्या व्यवसायात असतील. संघटित उद्योग किंवा व्यापारी आस्थापना यांच्या कार्यालयाच्या अभावामुळे माणसं कामाकडे जाणार नाहीत, कामं माणसांकडे जातील. पुरुष काय किंवा स्त्रिया काय, अन्न शिजविण्याच्या प्रक्रियेत भाग घेण्यास नाखूष असतील. पूर्वी अंगमेहनतीची कामं करणारा एक मोठा वर्ग आता तयार अन्नाची पाकिटं पुरवणं किंवा शिशुगृहात मुलांचं संगोपन करणं यात गुंतलेला असेल. माहिती जमवण्याला महत्त्व राहणार नाही. पण कल्पकतेनं तिचं वर्गीकरण करून ती क्षणार्धात पुरवण्याच्या व्यवसायाची एक मोठी बाजारपेठ महाराष्ट्रात निर्माण झालेली असेल. अशा प्रकारचं आजच्या काळातलं एक नमुनेदार उदाहरण म्हणून 'कालनिर्णय'च्या नेहमीच्या दिनदर्शिकेच्या व्यतिरिक्त किसान, स्वादिष्ट व आरोग्य असं वर्गीकरण केलेल्या दिनदर्शिकांचा निर्देश करता येईल. हे सर्व व्यवसाय करण्याची मुंबईची मक्तेदारी संपुष्टात आलेली असेल. महाराष्ट्राभरची मराठी माणसं संगणकविषयक कामात पारंगत आहेत याची ख्याती दूरवर जाऊन पोहोचलेली असेल. विद्युतीकरणाचं जाळं, उपग्रहाकरवी पसरलेलं दूरसंचारांचं तंत्र यामुळे आणि त्याला लागणारी हुशारी अंगी असणाऱ्या माणसांमुळे महाराष्ट्रात अनेक नवनवीन व्यवसाय केंद्रं उदयास येतील. मराठवाड्यातील औरंगाबाद, विदर्भातील नागपूर, पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर, कोकणातील रत्नागिरी आणि कुडाळ, त्याचप्रमाणे या छोट्या शहरांचा उपग्रह असलेली आजूबाजूची खेडी अशा काही ठिकाणांचा इथे निर्देश करता येईल.

स्त्रियांचा सहभाग

काम करणाऱ्या स्त्रियांमधली पांढरपेशा आणि कष्टकरी ही विभागणी बदलणार नसली तरी त्या करत असलेल्या कामांच्या स्वरूपात आमूलाग्र बदल झालेले दिसून येतील. कारकुनी करणाऱ्या स्त्रिया मोठ्या प्रमाणावर संगणकाकडे वळतील. विवाह न करणं. लग्न न करता झालेल्या मुलांबरोबर एकट्याने राहणं, घरून चिकाटीनं आणि जिव्हाळ्यानं कामं करून देणं अशा अनेक कारणांमुळे संगणकाच्या क्षेत्रात त्या पुरुषांना मागे टाकतील. घरकाम करणाऱ्या स्त्रिया इतिहासजमा झालेल्या असतील. कष्टकरी स्त्रिया कार्यालयं, कारखाने यांच्या किंवा संगणकांच्या साफसफाईचे ठेके घेणे, तयार अन्न घराघरात पुरवणे ही कामं तर करतीलच, परंतु कुरियर्स, टॅक्सी व बसचालक, कंडक्टर्स, लिफ्टमन, पेट्रोलपंप अटेंडंट अशी पुरुषांची राखीव क्षेत्रं काबीज करतील.

नवे आजार

संगणकानं काही सेकंदात केलेल्या रोगनिदानानं आणि प्रगत औषधोपचारानं शारीरिक व्याधी काबूत आलेल्या असल्या तरी डोक्यानं काम करणारी जी मंडळी असतील त्यांना नवीन प्रकारच्या विशेषत: मेंदूच्या आजारांना सामोरं जावं लागेल.

(पुढील मजकूर पान ९२ वर)

महाराष्ट्राची स्वप्नकुंडली

प्रदीप आपटे

पंचवीस वर्षांनंतरचा महाराष्ट्र! बापरे, मराठी मनाला स्वप्ने पडत नाहीत, पडलीच तर आठवत नाहीत. चाळीस वर्षांपूर्वी मुंबईसह महाराष्ट्र हे स्वप्न होते. आता मात्र जमलेच तर निदान नव्या मुंबईसह महाराष्ट्र अशी वेळ आहे.

मनाचे मांडे खायलासुद्धा भूक लागते. राकट कणखर दगडांच्या देशी हीच काय पोटाचीदेखील भूक कमी आणि स्वप्नातसुद्धा दुष्काळ. अतिवंचनेने माणूस अल्पसंतुष्ट होतो म्हणतात. सुराज्य-स्वराज्य आले तर काय होणार, तर उदंड जाले पाणी! कुणासाठी तरी स्नानसंध्या करावया - बारमाही पिकांइतपत नव्हे.

१९६२ साली एका आयोगाने सांगितले की, तीस टक्के जमीन ओलिताखाली येईल. हे 'बर वे' वाटे ना. मग १९७८ साली दुसऱ्या आयोगाने आहे तेच पाणी सर्वदूर वाटले म्हणून ओलिताखालची जमीन पन्नास टक्के झाली. याच युक्तीने पंचवीस वर्षांनंतर पाऊणशे टक्के सहज गाठू. त्याहून महत्त्वाची खूशखबर म्हणजे आताच्या वेगाने शेतीमधील जमीन व लोक आजच्या पन्नास टक्क्यांवर येणार. मग तर शंभर टक्के जमीन ओलिताखाली येईल.

माहितीच्या महामार्गावरून शेतकरी प्रत्येक धरणाच्या जाळ्यात, कालव्यांच्या कोळिष्टकात जाऊन चौकशी करील. पाणी येईल का विचारील. हो म्हटले तर ऊस पेरील नाहीतर कवितेतला अजरामर शाळू पेरील. 'हरित गृह' आणि 'कृषि-हरितांची' संख्या वाढेल. घरोघर, गच्चोगच्चीत शेती होईल. पंचवीस वर्षांनंतरचे महानोर,

"गच्चीत उभी मी होते,
निसवीत पिक ओले
वेड्या मुसाफिरा तू,
त्याचेच गीत केले ..."

असेच काहीतरी गुणगुणतील. या ओलेत्या काळ्या आईला पूजायला किती पटके आणि शिक्के आजवर झाले. पंचवीस वर्षांनंतर एखादा तरी पंधरा आणि जरीपटका नक्की असेल. कुणाच्या तरी बासनात, कुणाच्या तरी आसनात. शेतीमालाला भाव पूर्वीपेक्षा बरा मिळेल. मिळो न मिळो शरद जोशींच्या नावाने कृषिविद्यापीठ काढण्याचा सूड कुणाला तरी नक्की स्फुरेल.

सत्तेचाळीस साली भूगोलाच्या पुस्तकात रंगीत क्रांती झाली. भारत, पाकिस्तान, पूर्व पाकिस्तान, ब्रह्मदेश असे चार वेगवेगळे रंग वापरणे भाग पडले. साठ सालाच्या भारताच्या नकाशात पण चार रंगांची कसरत बदलली. त्यातून चितारला भाषावार महाराष्ट्र (भाषावार हे विदर्भातील आडनाव नव्हे.) 'मराठा' राज्याचे 'मराठी' राज्य होण्यातच साडेतीन दशके गेली. साडेतीन महाराष्ट्राचा लाडका आकडा! शहाणेसुद्धा साडेतीन! आजमितीलासुद्धा महाराष्ट्राचे साडेतीनच भाग आहेत. विदर्भ, मराठवाडा, मुंबई आणि उर्वरित. मुंबई वगळता उरलेल्यातले अर्धवट कोण? हे शोधण्याकरिता तर आपण विकास-महामंडळे नेमली.

पंचवीस वर्षांनंतर यात काय बदल होणार? कीर, रघू व पोपट या तीन पक्ष्यांना विभागवार भविष्य विचारावे. (ही एकाच पक्षाची तीन भाविक नावे आहेत हे सर्व मराठी रसिक जाणतात.) सगळे एकच पत्ता काढतील. "या साडेतीनांना एकत्र राहण्याची खुमखुमी राहणार नाही पण त्यातली खुमारी कळेल." यात काय कपाळ भविष्य. पण भविष्य कधीच अग्रलेखासारखे बाणेदार नसते. ते नेहमीच दुर्लक्षणीय स्फुटासारखे मोघम असते. आपण चुकल्याची भविष्याला कध्धी कध्धी लाज वाटत नाही.

कोकणचा कॅलिफोर्निया हे स्वप्न जुने झाले. पुढील पंचवीस वर्षांत कॅलिफोर्नियाचा कोकण नक्की होईल. सर्व कोकणस्थांनी उचललेला हा अल्-विडा आहे. परवाच एक पर-देशस्थ चित्पावन सांगत होते की, कॅलिफोर्नियात 'होम-पेज' हा आता द्वैभाषिक शब्द गणला जातो. कुठला किती भाग मराठी हे ज्याचे त्याचे स्वातंत्र्य. अमृतापरिस पेज व अमृताते पैजा हा बाणा कॅलिफोर्नियात खरा ठरेल. 'महाराष्ट्र टाइम्स' (हा द्वैभाषिकानंतरचा पहिला द्वैभाषिक शब्द!) आपली वर्गणी दिनार, डॉलर, सिंगापूर डॉलरमध्ये छापेल. आखडा दिवाळी अंक पाडव्याला तुमच्या टीव्हीवर बटन न दाबता जाहिरातीसारखा फुक्कट मिळेल. या भाऊ-गर्दीत कालांतराने मराठवाडा वऱ्हाडीपण सामील होतील. जे या साडेतीन भावंडांचे तेच उर्वरित देशाचे. मध्य प्रदेशाला वऱ्हाड-नागपूर, आंध्रला

मराठवाडा म्हणजे माहेर विसरलेल्या मुलीसारखा. बेळगावचे लायखेन स्टाईन करता येईल का याकरता एकीकरण समिती इंटरनेटवर विचारणा करते आहे. (महापौरांनी प्रत्यक्ष जाऊन येण्यापेक्षा हे स्वस्तच.) अन्य महाराष्ट्रेतरांना महाराष्ट्र माहीत आहे तो मुंबापुरी नामक अप्सरेमुळे. ही अप्सरा दुरून सुंदर, जवळून भीषण आहे असे प्रत्येकजण आपल्या खिशावर हात ठेवून शपथपूर्वक सांगतो. पंचवीस वर्षांत या अप्सरेच्या स्पर्धेत निदान दोन-तीन मेनका नक्कीच अवतरतील. त्यांचा विश्वामित्र कोण हे फक्त पर्यावरणवादीच सांगू शकतील.

महाराष्ट्रापैकी शेवटच्या दोन अक्षरांवर जोर द्यायला मराठी माणूस शिकेल? शिकला तर बरेच, पण गोव्यातून यायला जायला दोन बाटल्यांपुरते परमिट नव्हे तर 'आख्खा' पासपोर्ट लागेल. पंचवीस वर्षांनंतरचा पासपोर्ट व परमीट हे मराठी शब्दच असतील. शेवटी हा मराठी भाषियेचा वेलु आहे. तो गगनावरी जायला दुसरा 'आधारवडु' पाहिजेच. मराठी माणूस आजही उद्योगप्रिय आहे. उद्याही राहील. उद्योगात उद्योग महत्त्वाचा. भांडवल कोणाचे का असेना. आज 'मऱ्हाठी' आणि 'राठी' भांडवल सर्व पक्षांच्या सभेत मांडीला मांडी लावून बसते. पंचवीस वर्षांनंतर ही प्रगती सरकत सरकत 'खांद्याला खांदा' पर्यंत पोहोचेल. केरळमधील रबरावर 'अँटीडंपिंग ड्यूटी' लावावी असा कोकणपट्टीचा दावा असेल. (म्हणजे कोर्टातला उभा दावा) अर्थात काही राज्यांची राष्ट्रे होतील. त्यांच्यात भिंती उभ्या असतीलच असे नव्हे. आधी भिंती बांधायच्या आणि जायला-यायला दार करायचे यातला फोलपणा का मराठी मनाला कळत नाही?

जग जवळ येत आहे म्हणजे आपण सरकत आहोत की जग हे दुय्यम. 'हिंदी-चिनी भाई भाई' काळातील साहित्याला स्पर्धात्मक उजाळा व दुजोरा मिळेल. पूर्वांचलातील सात बहिणी 'साऱ्या टापूत चौफेर कित्ती सासर- माहेर' म्हणून बागडतील. महाराष्ट्र मात्र जा जरा पूर्वेकडे म्हणत सवदी अरब, कुवेत सुवेत, मॉरिशस अशा दिशांना तोंड वळवेल.

(प्रदीप आपटे : पुणे येथे अर्थशास्त्राचे प्राध्यापक)

(संगणकाचं युग ... पान ८९ वरून)

एकटेपणाचं प्रमाण वाढलेलं असेल. याची अनेक कारणं असतील. आयुष्यमर्यादा वाढेल, पण निवृत्तीचं वय चाळीसच्या आसपास आलेलं असेल. जीवघेण्या स्पर्धेमुळे फक्त चपळ व महत्त्वाकांक्षी माणसं नोकऱ्यात किंवा व्यवसायात टिकून राहतील. जास्त वय म्हणजे जास्त शहाणपणा या सिद्धांताला कोणी विचारणार नाही. उलट जास्त वयाच्या माणसाकडे भंगारात टाकण्यालायक आणि इतरांच्या उत्साहावर पाणी फिरवणारी व्यक्ती अशा नजरेनं बघितलं जाईल. भरपूर पैसा जमा केलेल्या या एकाकी माणसाला मानसोपचार तज्ज्ञाची गरज भासेल. आजच्या प्रसूतिगृहांऐवजी मनोरुग्णांवर उपचार करणाऱ्या इस्पितळांची संख्या वाढेल. न ऐकलेले मानसिक रोग सोडले तर डोळ्यांचे विकार, हृदयविकार, मधुमेह, उच्च रक्तदाब किंवा कर्करोग झालेल्या रुग्णांची संख्या वाढलेली असेल.

मराठीची हालहवाल

नोकऱ्या आणि उद्योगधंद्यात दळणवळणाकरिता वापरायच्या भाषेचा विचार करता मराठी भाषेची पंचवीस वर्षांनंतरची परिस्थिती फारशी उत्साहवर्धक नसेल. काही चमत्कार घडला नाही तर मराठी भाषा, नाटक, सिनेमा अशा दृश्य माध्यमात, घरात बोलण्याकरिता आणि अगदी ग्रामीण भागातल्या खेड्यातील व्यवहारापुरती मर्यादित राहील. १९५० साली मराठी साहित्यात भरभरून रस घेणारी पिढी २०२० साली काळाच्या पडद्याआड गेलेली असेल आणि मराठी साहित्य हे आजच्या संस्कृत भाषेसारखं अभ्यास करणाऱ्या एका ठराविक वर्तुळापुरतं मर्यादित राहील. या सर्वांचं कारण संगणकाशी संबंधित सर्व कामकाज जगाच्या बहुतांश भागात इंग्रजी माध्यमातून होईल हेच असणार आहे.

या सर्व ऊहापोहात विषयांतर होईल म्हणून महाराष्ट्राच्या भौगोलिक सीमांविषयी चर्चा केलेली नाही. परंतु आणखी पंचवीस वर्षांनंतर प्रादेशिक अभिमान नाहीसा झालेला आढळून येईल. मोठ्या शहरातून बाहेर पडून तळेगाव, इस्लामपूर, लातूर अशा लहान गावांत जाऊन राहण्याची प्रवृत्ती वाढीला लागेल. मराठे जसे सर्वत्र पसरतील तसे इतर भाषिकसुद्धा महाराष्ट्राच्या तत्कालीन भौगोलिक सीमांतर्गत आतपर्यंत आलेले आपल्याला आढळून येतील.

(किशोर आरस : मनुष्यबळ तज्ज्ञ आणि व्यवस्थापन सल्लागार)

****

कुटुंब आणि विद्यालय महत्वाचे

नानाजी देशमुख

ज्या काळी संचार साधनांचा अगदीच अभाव होता, वर्तमानपत्रे प्रचलित नव्हती, रेडिओ व टेलिव्हिजनची कल्पना करणेसुद्धा अशक्य होते, दळणवळणाची साधने खूपच मंद गतीची होती, अशा काळी आपल्याच पूर्वजांनी 'वसुधैव कुटुंबकम्'ची स्वप्ने बघितली होती. आत्मीयतेच्या भावनेवर आधारित एक दुसऱ्याला पूरक बनल्याशिवाय मानव समाजाला सुखशांती लाभत नाही, हे तथ्य त्यांनी अनुभवले होते. ह्या तत्त्वाचे जन्मस्थान माणसांचे कुटुंब. त्यातच एक दुसऱ्याच्या सुखासाठी काम करण्याची निसर्गदत्त प्रेरणा मिळते. ह्या आत्मीय तत्त्वांमुळेच आप्तांच्या सुखासाठी माणूस आपल्या उपभोग लालसेवर संयमाचा अंकुश लावतो. कौटुंबिक वातावरणातच मानव मनात संवेदनशीलता अंकुरित होते आणि ती व्यापक बनू शकते. तीच माणुसकीची आधारशीला आहे. त्यामुळेच माणूस चराचरासाठी उपकारक ठरू शकतो. हे सगळे समजून-उमजून आपल्या पूर्वजांनी कुटुंबाला सामाजिक भावनेचे उगमस्थान मानले होते. त्यांनीच कुटुंबासाठी व्यक्ती, गावांसाठी कुटुंब, जनपदासाठी गांव, देशासाठी जनपद आणि विश्वासाठी देश असा मानवासाठी विकासक्रम ठरवून दिला होता. काळाच्या ओघात तो विकासक्रम नजरेआड झाला आहे, त्याची पुनर्प्रतिष्ठा करणे ही काळाची गरज आहे.

आजकाल संचार साधनांचा विस्मयकारी आविष्कार झाला आहे. अगदी खेड्यातील अडाणी माणूससुद्धा घरी बसल्या-बसल्या जगात कुठेही घडणारी घटना टेलिव्हिजनवर बघू शकतो. पण तो आपल्या शेजाऱ्यापासून मात्र अधिकाधिक दूर होत चालला आहे. त्याचा व्यवहार यंत्रवत झाला आहे. परस्पर व्यवहारात केवळ व्यापारवृत्ती काम करीत आहे. संवेदनहीनता सर्वव्यापी बनली आहे. माणुसकी दुर्मिळ झाली आहे. नैतिकता तळाला गेली आहे.

खूप हौसेने लग्नसमारंभ आयोजित होतात. तारुण्याने नटलेली नववधू कोमल भावनांच्या मनोरम पाकळ्यांनी सहजीवनाची स्वप्ने रंगवीत सप्तपदीची पावले टाकते. पण सोबत अपेक्षित हुंडा आणणे शक्य न झाले तर तिला बळी जावे लागते, अशा बातम्या वाचून हृदय विदीर्ण होते. असल्या राक्षसी घटना शिक्षित व सुखवस्तू घराण्यांतच घडतात. ह्या अमानवीय मानसिकतेला प्रगती म्हणावे काय? सन २०२० मधील महाराष्ट्राची प्रगती म्हणजे काय हे आपणास ठरवावे लागेल.

त्यापूर्वी आपण स्वतंत्र भारताच्या नेतृत्वाची मानसिकता बघूया. त्यासाठी स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वीची स्थिती बघणे उपयोगी ठरेल. ईश्वरकृपेने स्वातंत्र्यप्राप्तीच्या संघर्षाचा काळ मला बघावयाला मिळाला होता. शाळेत १९२९ मध्ये वंदे मातरम्‌चा जयघोष केल्यामुळे पोलिसांच्या चाबकांचा उघड्या अंगावर मिळालेल्या प्रसादाच्या खुणा अजूनही अंगावर कायम आहेत. स्वातंत्र्यप्राप्तीच्या संघर्षकाळी अर्थात भारत स्वतंत्र होण्यापूर्वी पुढारी निस्वार्थ भावनेने देशासाठी लढत असत. आता मात्र सत्ता मिळविण्यासाठी आपसातच लढत आहेत. देश आणि समाज त्यांच्या नजरेआड झाला आहे.

देश स्वतंत्र झाला. आपले सरकार सत्तेवर आले. देशासाठी संविधान तयार केले गेले. वयस्क लोकांना मतदानाचा अधिकार मिळाला. घरोघरी मतदाता बनले. संसदीय लोकतंत्र स्वीकारले गेले. अनेक राजकीय पक्ष अस्तित्वात आले. लोकशिक्षणाचे अभियान प्रारंभ झाले. प्रत्येक घरी मतदाता म्हणून प्रत्येक घरच लोकशिक्षणाची पाठशाळा बनली. विभिन्न पक्षांचे पुढारी व त्यांचे सहयोगी शिक्षकांचे काम करू लागले. ते १९५२ पासून आजपर्यंत एकच धडा शिकवीत आहेत, ''तुम्ही आमच्याच पक्षाला निवडून द्या. तुम्हाला मतदानाशिवाय काहीही करण्याची गरज नाही. आमच्या पक्षाचे सरकार तुमच्या सगळ्या अडचणी दूर करील व तुमच्या सगळ्या गरजा भागवील.'' स्वतंत्र भारताच्या पुढाऱ्यांनी सगळ्या नागरिकांच्या मनावर हीच एक गोष्ट बिंबवून ठेवली आहे की, आता आपल्याला देशासाठी किंवा समाजासाठी काहीही करणे उरलेले नाही. देशातील नागरिकांच्या विशेषतः युवक-युवतींच्या असीम शक्तीला देशाच्या नवनिर्मितीच्या कामापासून दूर ठेवले जात आहे. हे असेच चालू राहिले तर सन २०२० मध्ये

महाराष्ट्राची दशा काय होईल?

प्रवासात असताना मला मराठी मंडळींशी भेटण्याचे प्रसंग येतात. गप्पागोष्टी चालू असता त्यांना सांगण्यात अभिमान वाटतो की त्यांचा मुलगा वा मुलगी विदेशात स्थायिक झाली आहे. त्यांच्या योग्यतेची तिथे खूप कदर होत आहे. ह्या मानसिकतेत न आई-वडिलांचा दोष आहे न विदेशात राहून कमाविणाऱ्या तरुण-तरुणींचा दोष. हा दुष्परिणाम आहे आपल्या राजकीय पुढाऱ्यांनी चालविलेल्या लोकशिक्षणाचा. विचार करणे आवश्यक आहे की, देशाचे राजकीय नेतृत्व लोकशक्तीचे सहकार्य न घेता केवळ नोकरशाहीच्या बळावर देशाचे भविष्य बनवू शकेल काय? स्वातंत्र्याच्या गेल्या पन्नास वर्षांचा अनुभव पूर्णतः निराशाजनक आहे. म्हणून प्रत्येक मराठी माणसाला समजायला हवे की केवळ शासनावर अवलंबून राहून सन २०२० मध्ये महाराष्ट्राला अधिक उन्नत अवस्थेत बघणे शक्य होणार नाही.

आपला देश आणि महाराष्ट्र गेल्या शेकडो वर्षांपासून स्वातंत्र्यप्राप्तीच्या लढ्यात गुंतलेला होता. युगानुकूल सामाजिक पुनर्रचना वा आर्थिक नवरचना करणे त्या काळी शक्य नव्हते. पण स्वराज्यप्राप्तीनंतरचा काळही आपण विचार न करता जगात विकसित समजल्या जाणाऱ्या देशांची नक्कल करण्यातच घालविला आहे. विचार केला तर सहज लक्षात येण्यासारखे आहे की स्वातंत्र्यप्राप्तीच्या कामापेक्षा राष्ट्र नवरचनेचे काम कितीतरी पटीने अवघड आहे. स्वराज्यप्राप्तीसाठी झालेल्या लढाईत पुष्कळ लोक स्वप्रेरणेने लढत होते. स्वतंत्रता प्राप्त झाल्यावर तर राष्ट्र नवरचनेच्या कामांत प्रत्येक मतदाराला लागणे आवश्यक होते. प्रत्येक कुटुंबात सामाजिक प्रेरणेचे संस्कार मिळायला हवे होते. पण घडले ह्याच्या अगदी उलट. पण घडल्या गोष्टीची खंत करीत बसून चालणार नाही. झाले ते गेले. त्यापासून काही धडा घेणे शक्य असेल तर घ्यावा इतकेच. ह्यावेळी सन २०२० पर्यंत आपणास महाराष्ट्राचा अभिमानस्पद विकास कसा करता येईल हाच विचार आपण करीत आहोत. त्यासाठी कामाला लागणे आवश्यक आहे. नुसत्या कल्पना करून महाराष्ट्राचे भविष्य घडू शकणार नाही.

सन २०२० मध्ये महाराष्ट्राला उन्नत बनविण्याची प्रत्येक मराठी माणसाला उत्कंठा असणे स्वाभाविक आहे, त्यासाठी त्यांनी खालील गोष्टी करणे उपयोगी ठरेल.

मुले घरोघरी जन्माला येतात. कुटुम्बनियोजन पाळण्यात आले तरी ही प्रक्रिया बंद पडणार नाही. पडायलाही नको. जन्माला येणाऱ्या पिढीवर सामाजिक संस्कार होणे आवश्यक आहे. त्या शिवाय भविष्याचा महाराष्ट्र आपल्याला हवा तसा बनणार नाही. गर्भवतीने कोणती स्वप्ने बघावीत ह्याचा आज विचार होत नाही. गर्भावर आईच्या स्वाथ्याचाच फक्त परिणाम होत नाही. तिच्या भावनांचा, तिच्या मनातील सुखदुःखांचा, तिच्या भावी जीवनाबद्दलच्या आकांक्षाचाही परिणाम होतो. हे सर्वविदित आहे. जुन्याकाळी ह्याच हेतूने गर्भवतीला झोपाळ्यावर बसवून अर्थपूर्ण गाणी म्हणण्याची प्रथा होती. तिच्या मनोकामना पूर्ण करण्याचे प्रयत्न होत असत.

टेक्नॉलॉजीच्या नवनव्या आविष्कारामुळे जन्माला येणाऱ्या मुलाच्या तारुण्यात त्याला कोणते कर्तृत्व करावे लागेल, समाजासाठी तो कसा उपकारक ठरू शकेल, समाजावरच्या माझ्या जन्माला येणाऱ्या मुला-मुलीच्या कामगिरीची छाप कशी उमटेल, ह्या विषयांना घेऊन वर्तमानकाळातील कवींनी सुंदर सुंदर गाणी रचावित, संगीततज्ज्ञांनी सरळ व सुमधुर चाली बसवाव्यात आणि ती गीते गरोदर बाईसाठी सोहळा आयोजित करून घरोघरी गाईली जावीत, अशी नवीन प्रथा प्रारंभ करणे आवश्यक आहे. महाराष्ट्राचे भविष्य घडविण्याचे काम इथूनच सुरू करायला हवे. दुर्दैवाने स्वतंत्र भारतात ह्या मूलभूत कामाकडे कुणीही लक्ष पुरविलेले नाही. जन्माला येणाऱ्या लेकरांचे योग्य प्रकारे स्वागत करणे आवश्यक असते. तो किंवा ती भावी महाराष्ट्राला उन्नत करणारी नागरिक होणार आहे म्हणून विशेष काळजी बाळगण्याची गरज आहे. त्या दृष्टीने जन्माला आलेल्या मुलाचे वा मुलीचे फार मोठे महत्त्व आहे.

नवीन बाळ जन्माला आले म्हणजे कुटुम्बामध्ये आनंदोत्सव साजरा केला जातो. मुलगा झाला तर आनंदाला पारावार राहत नाही. पण मुलगी झाली तर मात्र तितका आनंद झालेला दिसत नाही. ह्या पक्षपाती व्यवहाराचा मुलींच्या मनावर काय परिणाम होतो, ह्याकडे कुणीच लक्ष देत नाही. महिलांना समान अधिकार मिळविण्याची चळवळ करणाऱ्या स्त्रियांना पण मुलगा होणेच अधिक आवडते. समाजाच्या भविष्याच्या दृष्टीने मुलां-मुलींपैकी न कुणी कनिष्ठ आहे न कुणी श्रेष्ठ. दोन्हीचे महत्त्व समान आहे.

वस्तुतः न पुरुष एकटा पूर्ण आहे न स्त्री. दोघे मिळून पूर्णत्व प्राप्त करतात. आपली वंशपरंपरा चालवतात, समाजाचे सनातनत्व टिकवून ठेवतात. अशा स्थितीत स्त्रिच्या मनात स्वतःबद्दलची कमीपणाची भावना घर करून बसली तर समाजात संतुलन व सामंजस्य कसे

निर्माण होईल?

गर्भधारण करण्याचे वरदान ईश्वराने म्हणा वा निसर्गाने म्हणा स्त्रीलाच दिलेले आहे. तीच मुलाला नऊ महिने आपल्या गर्भात पाळते. त्या काळात तिच्या मानसिकतेचा परिणाम गर्भावर होतो. म्हणून तिच्या मनात स्वत:बद्दल कमीपणाची नाही आत्मगौरवाची भावना असणे आवश्यक असते. हे तथ्य जाणूनच आपल्या परंपरेत विद्येची देवता सरस्वती, समृद्धीची देवता लक्ष्मी आणि पराक्रमाची देवता पण दुर्गाच मानली गेली आहे. सर्वगुणसंपन्न जननीच. नव्या पिढीला कर्तृत्ववान बनविण्याची हीच आधारशीला आहे. हा आदर्श समोर असूनही कन्यारत्न प्राप्त झाले म्हणून कमी आनंदाची दोषपूर्ण प्रथा आपल्या समाजात का रुळली हेच समजत नाही. ही मनोवृत्ती दूर केल्याशिवाय नवी पिढी भविष्य निर्माण करण्याच्या दृष्टीने परिणामकारक ठरणार नाही. महाराष्ट्र आजही सांस्कृतिकदृष्टीने अन्य प्रांतांपेक्षा अधिक चांगल्या स्थितीत आहे. म्हणून महाराष्ट्रात या बाबतीत पुढाकार घेऊन अन्य लोकांसाठी अनुकरणीय ठरायला हवे.

समाजाच्या उन्नतीच्या दृष्टीने शिक्षणाची महत्ता अद्वितीय आहे. कुटुंबात अंकुरित सामाजिक संस्कारांना व्यावहारिक रूप देण्याचे दायित्व विद्यालयाचे असायला हवे. विद्यालय म्हटले की सर्वप्रथम डोळ्यांसमोर शिक्षक उभा राहतो. खरे बघितले तर शिक्षकच खरा युगानुकूल समाजाचा रचनाकार असतो. तोच नव्या पिढीच्या सहवासात येतो. वेगवेगळ्या वातावरणातून शिकण्यासाठी एकत्रित येणाऱ्या मुलामुलीमध्ये सामंजस्य, सहानुभूती व सहयोगात्मक स्वभाव विकसित करू शकतो. शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या माध्यमाचा उपयोग करून शिक्षक मुलांच्या कुटुंबाशी संबंध आणू शकतो. शिक्षकच कुटुंबाची सामाजिक संस्कारक्षमता वाढवू शकतो. म्हणूनच जुन्या काळी शिक्षकाला ''गुरुर्ब्रम्हा-गुरुर्विष्णू-गुरुर्देवो महेश्वर'' समजले जात होते. गुरू म्हणजे शिक्षकाच्याच अंगी देशासाठी काळानुसार उपयुक्त शिक्षापद्धती विकसित करण्याची क्षमता असू शकते.

परंतु स्वतंत्र भारतात आवश्यक शिक्षण पद्धतीचा विकास करण्यात त्याला स्थानच दिले गेलेले नाही. त्याला एक नोकर म्हणून वागविले जात आहे. ह्यामुळे शिक्षकांचीही मनोवृत्ती नोकरपेशा माणसांसारखीच बनली आहे. ते समजू लागले आहेत की, इतर कामासारखेच अध्यापन कार्य हे केवळ आजीविका अर्जित करण्याचे एक साधन आहे. अशा अवस्थेत नवी पिढी महाराष्ट्रासाठी कशी उपयोगी ठरेल?

सन २०२० मध्ये महाराष्ट्र खरोखर विकसित व्हावा असे वाटत असेल तर दोन आधारभूत तत्त्वांना प्राधान्य द्यावे लागेल. ही दोन तत्त्वे आहेत कुटुंब आणि विद्यालय. उदीयमान नागरिकांची जडणघडण करणाऱ्या ह्याच दोन संस्था आहेत. ह्या दोन्हींची सांगड घालणे आवश्यक आहे. त्या शिवाय नवी पिढी सामाजिक उन्नतीच्या दृष्टीने कर्तृत्ववान बनू शकत नाही. ह्या दोन्ही संस्थांचा दृष्टिकोण व व्यवहार महाराष्ट्राच्या उन्नतीसाठी आधारभूत बनवावा लागेल. स्वतंत्र भारताच्या जीवनाचा प्रारंभ इथूनच व्हायला हवा होता. आता महाराष्ट्राचे भविष्य घडविण्यासाठी महाराष्ट्राने तरी ह्या कामाची सुरुवात करायला हवी. ह्या दिशेने वाटचाल केली तर सन २०२० मध्ये महाराष्ट्र देशासाठीही मार्गदर्शक ठरू शकेल.

नवी पिढी करियर बनविण्याच्या म्हणजे आपले व्यक्तिगत जीवन उत्कर्षपूर्ण करण्याच्या मागे लागली आहे. सरकारी व अर्धसरकारी शाळांची स्थिती अगदीच वाईट आहे. सुखवस्तू लोकांना आपली मुले अशा शाळांमध्ये शिकवणे परवडत नाही. ह्या गोष्टीचा फायदा घेऊन महागड्या शाळा चालविणे एक उत्तम व्यवसाय बनला आहे. अधिक धनवान लोकांच्या मनी इंग्रजांनी स्वत:च्या मुलांसाठी वेगवेगळ्या शाळा चालविल्या होत्या तशा शाळेत आपल्या मुलांनी शिकावे ही आकांक्षा बळावली आहे. अशा शाळा दर महिन्याला प्रत्येक विद्यार्थ्याकडून पाचशे, हजार, तीन हजार रुपये फीज घेत आहेत. त्यांत धनाढ्य लोकांच्या व राजकीय पुढाऱ्यांच्या मुलांनाच शिक्षण घेणे शक्य होत आहे. ह्या शाळांत शिकणाऱ्या नव्या पिढीचा साधारण व अभावग्रस्तांच्या मुलांशी मुळीच संबंध येत नाही. ह्यांचे जग समाजापासून अगदीच वेगळे बनते. व्यक्तिगत भविष्य बनविणे हेच ह्यांचे एकमेव ध्येय असते. त्यामुळे शिक्षणामुळेच लोकतंत्र व समाजवादाचे पुरस्कर्ते म्हणविणारे पंडित नेहरूसारखे लोक पण आपलीच मुलगी देशाची पंतप्रधान व्हावी ही इच्छा बाळगतात. श्रीमती इंदिराजींनी तर स्वत:नंतर पंतप्रधानपदावर बसण्यासाठी तयार केलेला आपला मुलगा अपघातात ठार झाला म्हणून दुसऱ्या मुलाला, ज्याला राजकारणाची आवडही नव्हती, पंतप्रधान बनविण्याची व्यवस्था केली. अशा प्रकारे कौटुंबिक व शालेय वातावरणात वाढलेला शिक्षित युवा वर्ग अधिक संख्येत सरकारी प्रशासक व औद्योगिक संस्थांचा अधिकारी बनतो. त्यांच्या मनात

मागासल्या लोकांबद्दल कळकळ मुळीच नसते. अशा परिस्थितीत सन २०२० मध्ये महाराष्ट्राचे व देशाचे चित्र कसे असेल?

उसाच्या शेतीपासून साखरेचे कारखाने चालवून धनाच्या बळावर राजकारण करणाऱ्यांनी भूगर्भातील पाण्याच्या सदुपयोगाचा संतुलित विचार न करता अधिक धनार्जनाच्या पायी पाण्याचा जो दुरुपयोग चालविला आहे त्यामुळे महाराष्ट्रात भूगर्भजलाची पातळी खोल खोल होत चालली आहे. शेकडो गावातील विहिरी कोरड्या पडून लाखो लोक पिण्याच्या पाण्यापासून वंचित झाले आहेत. पण पुढारीपण करणाऱ्यांना त्याची मुळीच पर्वा नाही.

कारखानदार श्रमिकांच्या जागी स्वचलित यंत्राचा अधिकाधिक उपयोग करून बेकारी वाढवीत आहेत. कॉम्प्युटर आणि यंत्रमानवाच्या सहाय्याने श्रमिकांपासून जवळजवळ पूर्णतः मुक्त होण्याकडे पावले टाकू लागले आहेत. भविष्यकाळी त्यांच्याही पुढच्या पिढ्यांना किती कठीण परिस्थितीचा सामना करावा लागेल ह्याचीसुद्धा काळजी न करता टेक्नॉलॉजिकल प्रगती करीत आहोत हा अभिमान मनी बाळगून तात्कालिक समृद्धीच्या मागे लागले आहेत. ह्याचे दुष्परिणाम किती भयंकर होणार आहेत ह्याची कल्पना करूनच अंगावर काटे उभे राहतात. अशा अवस्थेत सन २०२० चा महाराष्ट्र कसा बनेल, हा विचार मनाला भेडसावीत आहे.

दुःखाची गोष्ट आहे की स्वतंत्र भारताचे नेतृत्व वर्गसंघर्षाला अनिवार्य समजून काम करीत आहे. खरे म्हटले तर कारखाना समाजाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी उभारायला हवा. फक्त स्वतः धनाढ्य बनण्यासाठी नाही. भांडवल, व्यवस्थापन आणि श्रम मिळून कौटुंबिक वातावरणात उत्पादन वाढवून देशाला समृद्ध करायला हवे. भांडवल, व्यवस्थापन व श्रमांत परस्परपूरकता असायला हवी, पण आपण अविचारांनी वर्गसंघर्षाची विनाशकारी दिशा पत्करली आहे.

वरील वस्तुस्थितीमुळे निराश होण्याचे कारण नाही. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर चुकीची दिशा स्वीकारल्यामुळे कसे नुकसान होत आहे ह्याची कल्पना आल्याशिवाय राष्ट्र व महाराष्ट्राची गाडी रुळावर आणणे शक्य नाही. म्हणूनच वस्तुस्थिती स्पष्ट केली आहे. मराठी माणसात भरपूर चिकाटी आहे. ध्येयपूर्तीची जिद्द आहे. त्यासाठी संपूर्ण जीवन खर्ची घालण्याची वृत्ती आहे. पण त्याच्यासमोर आवश्यक आदर्श आणि त्यानुरूप व्यवहार करण्याची प्रेरणा मिळणारे ठिकाणच दिसत नाही. हीच खरी अडचण आहे.

आई-वडील आपल्या मुलांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी वाटेल ते करायला तयार असतात. पण आज जी लाभप्रद गोष्ट वाटते तीच भविष्यकाळी आपल्याच मुलांना घातक ठरणार ह्याची कल्पना देणारे कोणीच नाही, म्हणून ते जसे वारे वाहते आहे तसे पाऊले टाकीत आहेत.

शिक्षक पण मानव आहे. त्याच्याही हृदयात संवेदनशीलता आहे. ती जागविली तर तो ह्या काळीसुद्धा गुरुपदी आरूढ होऊ शकतो. हा माझा अनुभव आहे. त्याच्या मनात शिकणाऱ्या मुलांबद्दल कळकळ उदयाला येऊ शकते. समाजासाठी आपल्या जीवनात आवश्यक बदल घडवून आणायला तो तयार होतो. पण त्याच्याशी सख्य जोडून तो आपल्या महाराष्ट्रासाठी व देशासाठी फार मोठे काम करू शकतो हे त्याला पटवून देण्याचे काम कुणीच करीत नाही. त्याला समाजात प्रतिष्ठेचे स्थान प्राप्त होऊ शकते. तसे वातावरण बनविण्याची आवश्यकता आहे. ते बनविले तर तो ह्या कामासाठी तत्पर होतो. ही अनुभवलेली गोष्ट आहे. खूप संख्येत नवनवीन शाळा-कॉलेज काढून सामाजिक जीवनात बदल घडून येत नाही, ह्या कटू अनुभवाची आपल्या देशात परंपरा आहे. ज्या शाळा चालताहेत, त्या सरकारी असोत, अर्ध सरकारी असोत वा खाजगी असोत, त्यांत शिकविणाऱ्या महिला पुरुषांच्या मनात सामाजिक प्रतिबद्धता जागृत करण्याची आवश्यकता आहे. हीच खरी आजची गरज आहे.

आई-वडील आणि शिक्षकांची सांगड जुळली आणि त्यांनी मिळून महाराष्ट्राला उन्नत बनविण्याचे ठरविले तर सन २०२० मध्ये महाराष्ट्र देशाच्या व जगाच्या समोर अनुकरणीय उदाहरण प्रस्तुत करण्याच्या स्थितीत येऊ शकतो.

हे काम सत्तालोभाने पछाडलेल्या राजकीय पुढाऱ्यांकडून होणार नाही. ह्यासाठी महाराष्ट्राचे पत्रकार, स्तंभलेखक, संपादक, कवी, संगीतकार, कथाकार, नाटककार आदी मंडळींनी मिळून मनावर घेतले तर महाराष्ट्राचे तरुण व तरुणी ह्या कामी लागण्यास सहज तयार होतील. ह्यासाठी दैनिकांनी, साप्ताहिकांनी, मासिकांनी आणि दिवाळी अंक प्रकाशित करणाऱ्यांनी पुढाकार घ्यायला हवा. त्यांनी पुढाकार घेतला तर सन २०२० मध्ये महाराष्ट्र देशात व जगात चमकू लागेल.

(नानाजी देशमुख : ज्येष्ठ विचारवंत आणि 'दीनदयाळ उपाध्याय शोध संस्थान', म. प्र. चे संस्थापक आणि सल्लागार)

***

नवी व्यूहरचना हवी

दत्तप्रसाद दाभोळकर

भविष्य आणि विज्ञान दोघेही नियतीला समजावून घेण्याचा प्रयत्न करत असतात. नियती त्यांना हुलकावणी देऊन मजेत पुढे सरकते. भविष्य ग्रहगोलांची गणिते मांडते. त्यात अधूनमधून भृगुसंहिता, ॲमस्टरडॅम वगैरेंची सरमिसळ करते. विज्ञान तर समाजशास्त्र, अर्थशास्त्र, भूगोल, इतिहास, औद्योगिक प्रगती अशा एक ना अनेक गोष्टी विचारात घेते. या सर्वांला तर्कशास्त्राची आणि योगायोगाच्या गणिताची (Theory of Probability) छान फोडणीपण देते. – पण नियती कशी मजेत गुंगारा देत पुढे सरकते. कुठला तरी हातचा एक अधीमधी येऊन कडमडतो. समोरचे गणित साफ चुकते. हातातले समीकरण पार बदलते. बाकी उरते फक्त वजाबाकी–नियती फक्त मिस्किलपणे हसत असते.

पण याचा अर्थ नियतीचा वेध घेऊ नये असे नव्हे. त्यातून काही फायदा होत नाही असेही नव्हे. – पण हा असा शोध घेताना त्याच्या अंगभूत मर्यादा आणि सामर्थ्य अधिक डोळसपणे स्वीकारावे. आता आपला आजचाच विषय बघा – 'पंचवीस वर्षांनंतरचा महाराष्ट्र'. यापूर्वी या अशा विषयावर प्रसिद्ध झालेले दोन लेख माझ्यासमोर आहेत. त्यातला एक आहे संपादकांनी माझ्याकडे पाठवलेला ज्योत्स्ना मासिकातून १९४० साली प्रसिद्ध झालेला. अनेक नामवंतांनी २५ वर्षांनी म्हणजे १९६५ साली महाराष्ट्र कसा असेल याचे बांधलेले अंदाज त्यात दिलेत. १९६५नंतर २५ वर्षांनी म्हणजे १९९० साली किस्त्रीम दिवाळी अंकात मी महाराष्ट्राच्या समस्यांचा आणि भविष्याचा वेध घेण्यासाठी एक परिसंवाद घेतला होता. काही प्रश्न पुढे मांडून बी. जे. देशमुख, मोहन कात्रे डॉ. गोवारीकर, उद्योगपती म. गो. भट, डॉ. प्रभाकर माचवे, नानाजी देशमुख, मधू लिमये, मधू दंडवते अशा अनेक मान्यवरांचे या विषयावरचे विचार त्यात समजावून दिले होते. पन्नास वर्षांचा कालावधी मध्ये असलेला हे दोन लेख. त्याच्या मध्यावर असलेले ज्योत्स्नाला अभिप्रेत असलेले १९६५ हे वर्ष. त्या वेळी महाराष्ट्राची स्थिती नेमकी काय होती, हे आपल्यापैकी सर्वांना पूर्णपणे माहीत असलेले – या तीन गोष्टींचा 'ल. सा. वि., म. सा. वि.' वगैरे काढला तर काही गोष्टी अगदी सहजपणे आपल्या लक्षात येतील.

एक मजेशीर गोष्ट प्रथम लक्षात घेऊ. नियतीचा वेध घेताना भले भले कसे छानपैकी चुकतात हे जरा समजावून घेऊया. १९४०चे वर्ष. गांधीजी की सावरकर, संघ की सेवादल हा वाद महाराष्ट्रात त्या वेळी रंगात असेल. ऐदी ऐतखाऊ संस्थानांची बजबजपुरी सर्वत्र पसरलेली असेल. पिढ्यान्‌पिढ्या काहीही न करता मानसन्मान घेत मौजमजा करणाऱ्या संस्थानिकांवर अनेक जण मनापासून प्रेम करत असतील. जग हादरवणारे दुसरे महायुद्ध सुरू आहे. ४२चा लढा कुणाच्या मनातपण नाही. स्वातंत्र्य तर दूर क्षितिजावर कुठेच नाही.

आता न. चिं. केळकरांनी ४० साली काय म्हटलेय ते जरा पाहूया – "पंचवीस वर्षांअखेरही हिंदी संस्थाने अजिबात नष्ट होणार नाहीत व खऱ्या अर्थाने अर्धवट का होईना पण लोकशाही स्वरूपांचीही होणार नाहीत. तर संस्थानिक वर्ग आपल्या हातातील पैसा, प्रतिष्ठा आणि दंडुका यांच्या जोरावर निमित्तमात्र नामधारी लोकसत्तेचा देखावा करून आपापल्या राज्यात फॅसिस्ट मनोवृत्ती तेवत ठेवतील आणि खुशाल देशभक्त म्हणून उजळ माथ्याने वावरतील... भारतात फेडरेशन असेल आणि बहुतेक सर्व मोठी हिंदी संस्थाने उत्तरेतच असल्यामुळे, या संस्थानिकांच्या फेडरेशनमधील डोईजडपणाचा फायदा अर्थात उत्तरेतील प्रांतांनाच मिळेल. भावी फेडरेशनमध्ये महाराष्ट्राला आजच्या प्रमाणेच दुय्यम दर्जाचा प्रांत म्हणून लेखण्याची व त्याला डोके वर काढू न देण्याची वृत्ती मुळीच कमी होणार नाही... सर्व राष्ट्रभर जिकडे तिकडे अन्नान्न दशा, उत्पात आणि दडपशाहीच्या वरवंट्याचेच अधिराज्य चालू राहील... एक गोष्ट तर निश्चित की रणभूमीवर पुरा पराभव झाल्याशिवाय हिंदुस्थानला स्वराज्य देण्याची बुद्धी इंग्रजांना होणार नाही आणि निदान या युद्धात तरी त्यांचा तसा पराभव होण्याचा संभव दिसत नाही."

न. चिं. केळकरांना जरा विसरा. आपल्या नामदार मुकुंदराव जयकरांनी म्हटलेय – "जातीभेदांची बंधने पार तुटून हिंदू हिंदूमधील मिश्रविवाह ही अगदी मामुली बात होईल व हिंदू–मुसलमानातील तेढही पार नाहीशी झालेली असेल. हल्ली जसे मोटारगाड्यांनी दळणवळण अगदी सुलभ केले आहे तसेच हे विमानांनी झालेले असेल आणि मुंबई शहराची वाढ लंडनसारखी होईल." प्रा. न. र. फाटक यांनी लिहिलेय, "देश स्वतंत्र झाल्यावर आरमार, विमाने, लष्कर यांच्या साहित्याचे कारखाने निघाल्यावर बेकारीचा मागमूसदेखील काही वर्षे पाहावयास सापडणार नाही. लष्कर व आरमार यांचा बराचसा बोजा महाराष्ट्राला सांभाळावा लागेल व महाराष्ट्राच्या कर्तबगारीला त्या योगाने सहजच उजाळा मिळेल. हिंदूतील जातवारी ऱ्हास पावल्यावर मुसलमानांच्या जातवारीला आपले आजचे काटे फेकून

द्यावे लागतील. पुढील पंचवीस वर्षांत आजच्या भेदभावांना ग्रहण लागल्याशिवाय राहणार नाही.'' धनंजयराव गाडगीळांनी म्हटलेय, ''रशियन संघ-राष्ट्रात अंतर्कलहाचा जो बराच अभाव दिसून येतो त्याचे प्रमुख कारण हे मुत्सद्देगिरीचे धोरण होय (म्हणजे भाषावर प्रांतरचना) यात शंका नाही. हे धोरण अवलंबिण्याचे श्रेय स्टालिनकडे जाते. डॉ. जी. एस. घुर्येसारख्या समाजशास्त्रज्ञांचे मत आहे. -''पंचवीस वर्षांनंतर टोपी राहील. कारण ती स्वस्त व सुटसुटीत असते. परंतु पांढरी गांधी टोपी मात्र रूढ होणार नाही. कारण गांधी-काँग्रेसची पकड महाराष्ट्रावर प्रांतांप्रमाणे राहील असे दिसत नाही. आखूड कोट व लांब कोट यामध्ये आजच झगडा चालू आहे. शॉर्ट कोट राहील असे वाटते तरी पण निश्चित सांगता येत नाही. कारण शॉर्ट कोट विदेशी समजला जातो. राष्ट्रीयत्वाच्या भावनेमुळे लांब कोट फार दिवस झगडेल. पादत्राणात बूट किंवा चढाव सार्वत्रिक होणार नाही. पुणेरी जोडा नामशेष होईल. वहाण आणि चप्पल मात्र रूढ होतील.'' उद्योगरत्न वेलणकरांनी म्हटलंय - ''पुढचा २५ वर्षांचा भविष्यकाळ महाराष्ट्राच्या दृष्टीने मला खचित भरभराटीचा वाटतो. कापड धंद्याच्या बाबतीत तरी महाराष्ट्राचा भविष्यकाळ अत्यंत उज्ज्वल आहे याबाबत मला शंका वाटत नाही. २५ वर्षांअखेर महाराष्ट्र ही हिंदी कापडधंद्याची उतारपेठ ठरू घातली जाईल अशी मला बळकट आशा आहे... अहो मांजरे कितीही वाढली तरी उंदराची जात नष्ट झाल्याचे कोणाच्या एकिवात आहे काय? तीच गोष्ट हातमागाच्या बाबतीत. आमच्या पॉवरलूमपासून तर काय परंतु नागपूर-सोलापूरच्या हातमागापासूनही गिरण्यांना उद्या संरक्षण मागावे लागले तर मला आश्चर्य वाटणार नाही.''

मी वर जे सारे दिलेय ते या व्यक्तींना कमीपणा यावा म्हणून नव्हे. हे सारेजण तुमच्या माझ्यापेक्षा अनेक पटीने अधिक बुद्धिमान आणि कर्तृत्ववान होते. पण अनेक राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय घटनांनी आणि वैज्ञानिक तंत्रज्ञानाने भोवतालचे सारे संदर्भ बघता बघता बदलतात. पायाखालची वाट हरवून जाते. नवीन चक्रव्यूह आपणाला वाकुल्या दाखवत मजेत पुढे सरकतात. हे सारे खरे आहे. पण तरीही हे मंथन आवश्यक असते. कारण आपल्या पायातील ताकद आणि बळ तेच असते. आणि त्याचा अंदाज या मंथनातून येतो. या पन्नास वर्षांच्या कालखंडात कोणते दोष आणि कोणते गुण आपल्याबरोबर राहिलेत याची समज येते. आणि ती आली तर आपल्या गुणांचा गुणाकार आणि दोषांची वजाबाकी कशी करायची याचा आपण अंदाज घेतो. आणि हा असा अंदाज आपल्याबरोबर असेल तर नियतीने समोर ठेवलेला चक्रव्यूह पाहून आपण गांगरत नाही तर आपल्या ओठावर मिस्किल हसू उमटते अणि नियतीला आव्हान देत आपण पुढे सरकतो. हे जपानने केलेय, जर्मनीने केलेय. शिवरायांच्या वेळी महाराष्ट्रने केलेय आणि आणखी २५ वर्षांनी महाराष्ट्रपण करील.

या वरील सर्व लेखांकडे आपण आता एका वेगळ्या उमदेपणाने सामोरे जाऊया. या सर्व दिग्गजांनी आपल्या गुणदोषाबद्दल काही महत्त्वाच्या मर्मबंधातल्या गोष्टी सांगितल्या त्या तरी समजावून घेऊया. आणखी एक मजेशीर गोष्ट आपल्या लक्षात येईल. या मंडळींनी ४० साली जे सांगितलेय नेमके अगदी तसेच १९९० साली इतर मान्यवर मंडळींनी आपणाला सांगितलेय. न. चिं. केळकर म्हणालेत, 'इंग्रजी आणि हिंदी भाषाप्रभुत्व आणि मुलुखगिरी महाराष्ट्राला जमली पाहिजे. महाराष्ट्राने त्यात चमकले पाहिजे. आणि त्यानंतर पन्नास वर्षांनी बी. जे. देशमुख म्हणालेत, 'मराठी खासदारांना आणि नेतेमंडळीना इंग्रजी आणि हिंदी धड बोलता येत नाही.' मोहन कात्रे म्हणालेत, 'सी. बी. आय.ला ऑफिसर हवेत म्हणून वृत्तपत्रात जाहिरात दिली. एकाही मराठी तरुणाचा अर्ज नाही. मराठी तरुण इंग्रजी वृत्तपत्रे वाचत नसतील म्हणून मी लोकसत्तेत जाहिरात दिली. तरीही मराठी तरुणांचा प्रतिसाद नाही.' बी. जे. देशमुख म्हणालेत, 'मुंबईतले अनेक मराठी तरुण मला माहीत आहेत. त्यांनी बँकेत बढती नाकारलीय. कारण बढती घेतली तर मुंबई सोडायला लागेल!' दंडवतेंनी सांगितलेय ते अधिक नेमके आहे. ते म्हणालेत, 'लोकसभेत, पक्ष कोणताही असो. कांबळे, मोरे, कुळकर्णी ही तमाम मराठी मंडळी. आपापसात कोंडाळे करून असतात. आणि लोधी कॉलनीत राहणारी समस्त मराठी चाकरमाने नित्यनेमाने आलटून पालटून एकमेकांकडे जेवावयास जातात. इतर प्रांतीयांशी मिसळतच नाहीत. यांचे राहू देत, मी माझा अनुभव सांगतो. २५ वर्षे मी महाराष्ट्राबाहेर आहे. दिल्लीतल्या खाजगी क्षेत्रातल्या प्रमुख संशोधन केंद्राचा संचालक आहे. तीनशेहून अधिक माणसे येथे काम करतात. भारतातल्या सर्व भाषिक विभागातले खूप तरुण येथे आहेत. मराठी माणूस मी एकटा. कारण कोणी मराठी तरुण अर्जच करत नाहीत. आपणाला इंग्रजी, हिंदी येत नाही. आपण मुलुखगिरी करत नाही. परप्रांतात जावे लागले तर इतर प्रांतीयात न मिसळता कोंडाळे करून राहतो. - खेड्यातून, शहरात महाविद्यालयात आलेली बुजलेली मुले जशी कोंडाळे करून एकमेकांना चिकटून राहतात तशा प्रकारे!'

न. चिं. केळकरांनी आणखी एक विचार पुढे मांडला होता. त्यांनी सांगितले होते, 'आपण मागे पडतोय. कारण महाराष्ट्राने आजवर उपेक्षा केली आहे ती व्यापारीबाण्याची. पन्नास वर्षांनंतर परिस्थिती नेमकी अशीच होती. बी. जे. देशमुख म्हणाले होते, 'संपत्ती निर्माण करण्यात पुरुषार्थ आहे हे मराठी तरुणांनी ओळखले पाहिजे. मराठी तरुणांनी नोकरीचा धोपट मार्ग सोडून उद्योगधंद्याकडे वळले पाहिजे म्हणून मोहन कात्रे आणि प्रभाकर माचवे यांनी आवर्जून सांगितले. ४० साली या विषयावर नेमके विवेचन करताना धनंजयराव गाडगीळ यांनी सांगितले होते, 'ज्या प्रमुख व्यवसायात पैशाचा संचय होतो ते आपल्या हाती नाहीत व पैशाचे अभावी, जे महत्त्व व जी सत्ता आजच्या परिस्थितीत पैशावर अवलंबून आहे त्यास आपला समाज मुकला आहे.' पन्नास वर्षांनंतरही ही परिस्थिती का बदललेली नाही. हे असे का होतेय हे सांगताना ९० साली दंडवते म्हणालेत,

'व्यापार करणे, पैसा मिळवणे यात काही पाप आहे असेच जणू आपणाला वाटते. एखाद्याची टिंगल टवाळी करायची असेल तर आपण म्हणतो तो काय मारवाडी आहे, तो तर बनिया आहे... आणि लुळी पांगळी श्रीमंती धट्टीकट्टी गरिबी ही गोष्ट आपण मुलांकडून गिरवून घेत असतो!'

आणखी एक गोष्ट आहे. आपल्याकडे सामाजिक समरसता नाही. आपल्या गुर्जर बंधूंत याच्या उलट परिस्थिती आहे. हे मत घुर्येसारख्या समाजशास्त्रज्ञाने ४० साली नोंदवलंय. हे नेमके काय आहे ते त्यानंतर अधीमधी एकदा आचार्य अत्रेंनी त्यांच्या शैलीत सांगितलंय. त्यांनी सांगितलंय, कोळीणीने टोपलीत ठेवलेल्या खेकड्यांपैकी एकही बाहेर पडू शकत नाही. एक जरा वर निघाला की बाकीचे इमाने इतबारे त्याला खाली खेचण्याच्या मार्गास लागतात. ९० साली, महाराष्ट्राबाहेर राहिलेले प्रभाकर माचवे म्हणालेत, महाराष्ट्राबाहेरही आम्ही दोन मराठी माणसे जरी एकत्र आलो तरी तीन संस्था निर्माण होतात. प्रत्येकाची एकेक आणि दोघांनी मिळून केलेली एक! मोहन कात्रे म्हणालेत, प्रत्येक प्रांतीय माणूस आपापल्या माणसाला मदत करतो. आपण आता तरी हे करावयास शिकले पाहिजे. पण आपल्या मनात अशावेळी नेमका तत्त्वांचा प्रश्न येतो.

एक वेगळी गोष्ट नीटपणे समजावून घ्या. आपला अहंगंड हा आपल्या न्यूनगंडातून निर्माण झालाय. हे फार कटू वाटले तरी खरे आहे. ४० साली जवळजवळ अशाच स्वरूपाचे विचार एस्. एम्. जोशी यांनी ज्योस्नात मांडलेत. ९० साली हे अधिक भेदकपणे बी. जे. देशमुखांनी सांगितलंय. त्याचवेळी हॉ. माधव चितळे यांनी त्याचे नेमके विवेचन केलंय. त्यांनी सांगितलंय आपल्या इंग्रजी उच्चाराला आणि लुंगीला जगभर हसतात, याची छदाम पर्वा न करता मद्रासी माणूस जगभर नोकरी करतो. आपली दाढी आणि पगडी कायम ठेवून सरदारजी जगभर भटकतो. – आपण मात्र आपल्या गणपती उत्सवातसुद्धा धोतर नेसून जात नाही. आपण आपले वेगळेपण आणि आपली अस्मिता विसरलोय!

आपल्यातले काही प्रमुख दोष आपण पाहिले. आपणाकडे काही खास गुण पण आहेत. यांचय बेरीज-वजाबाकीवर आणखी २५ वर्षांनी आपण कोठे असू हे ठरणार आहे. ते आपण कसे ठरवू शकतो, ते आपण आता पाहणार आहोत. ४०, ६५ व ९० साली आपण कोठे होतो हे आपणाला माहीत आहे. आपण एक आलेख काढू शकतो. तो वाढवला तर २५ वर्षांनी आपण कोठे असू हे आपल्या लक्षात येईल. तो आलेख बदलण्यासाठी व आणखी पुढे जाण्यासाठी आपणाला काय करावे लागेल याचा अंदाज येईल. पण हे काम करण्यापूर्वी आपण नियतीकडे जरा परत जाऊ. नियती फार मोठी हे तर खरेच. नियती व्यक्तीचे आयुष्य बदलवू शकते. नियती भोवतालची सामाजिक परिस्थिती हवी तशी बदलवू शकते. पण नियती एखाद्या समाजाचे, बाकीच्या समाजातले स्थान व त्या समाजाचा दर्जा फारसा बदलवू शकत नाही. कारण या गोष्टी नियतीवर नव्हेत तर त्या समाजाच्या मूलभूत गुणदोषांवर अवलंबून असतात. हे गुणदोष बदलण्यासाठी वचनबद्ध असलेला समाज स्वत:चे प्राक्तन बदलू शकतो.

आपण जरा खोलात जाऊन विचार करूया. ४० साली ज्योस्नामध्ये भल्याभल्यांनी केलेली भाकिते चुकली. कारण नियतीने पुढील ४-५ वर्षांत सारा पट बदलवून लाकला. देश स्वतंत्र झाला, देशाची फाळणी झाली. गांधीजींचा खून झाला आणि तो एका महाराष्ट्रीयन माणसाने केला. पुढील काही दशकात विज्ञानाने एक विलक्षण भरारी मारली. सारे जग फार झपाट्याने जवळ आले. या घटनांचे मराठी समाजाला तत्कालीन हादरेपण बसले. काय झाले ते थोडक्यात पाहू. फाळणी झाल्यामुळे, धडक मारण्याची ताकद असलेला व कावेबाजपणाने डावपेच खेळू शकणारा पंजाबी व सिंधी समाज एका क्षणात भारतभर पसरला. उद्योगधंद्यात व राजधानी दिल्लीत तो फार झपाट्याने स्थिरावला व त्याने आपली पकड मजबूत केली. याचा या समाजाला फायदा झाला. इतरांना त्याचे नुकसान झाले. पण यातही लक्षात घेण्यासारखी गोष्ट ही की कलकत्त्याला निर्वासित म्हणून आलेले बंगाली मात्र तसेच कायमचे झोपडपट्टीत कारकुनी करत राहिले. समाजाचे मूळ गुणधर्म असे कोणत्याही परिस्थितीत काम करतात. किंवा आपण असेही म्हणू शकतो की फाळणी झाली नसती तर सिंधी-पंजाबी माणसांना आपली आजची स्थिती भारतभर प्राप्त करावयास आणखी थोडा वेळ लागला असता. गांधीजींची हत्या झाली आणि ती एका मराठी माणसाने केली याचा मराठी समाजाला काही काळ फार तोटा झाला. गांधीजींच्या हत्येमुळे संघकार्य २५-५० वर्षे मागे गेले असे काहीसे गोळवलकर गुरुजी म्हणाले होते. असेच काही मराठी समाजाबाबत भारतभर पुढील काही वर्षे तरी झाले, असे भारतभर वेगवेगळ्या क्षेत्रात हिंडलेल्या प्रभाकर माचवेंचे मत होते. 'या बिनभरवशाच्या खुनशी माणसांपासून दूर राहावे' असे गुप्त सरकारी आदेश आपण अगदी १९६० सालापर्यंत पाहिल्याचे त्यांनी मला सांगितले होते व मी ते माझ्या लेखात त्या वेळी नोंदवले होते. मला ते खरे वाटते. पण तरीही या अशा नियतीच्या भयानक दानाचा परिणाम मराठी समाजावर दहाएक वर्षांपलीकडे होऊ शकला नाही. आणखी एक गोष्ट लक्षात घेऊ. विज्ञान-तंत्रज्ञान यांनी गेल्या काही दशकात कल्पनेत न मावणारे चमत्कार केले. जग झपाट्याने जवळ आले. सारे जग एकसंध खेडे बनले. खेड्यात एका ठिकाणी घडणारी घटना क्षणात दुसऱ्या ठिकाणी पसरते तसे काहीसे परदेशात फार चांगल्या नोकऱ्या सहजपणे मिळतात, म्हणून महाराष्ट्रातले अनेक कर्तृत्ववान तरुण कायमचे परदेशात निघून गेले. असे काही झाले नसते व ही कर्तृत्ववान मराठी माणसे महाराष्ट्रात वा भारतात राहिली असती तर महाराष्ट्र बदलला असता असे काहीजण म्हणतात. पण असे काहीही झाले नसते हे आपण पुढे पाहणार आहोत कारण नियतीच्या दानाचा, एखाद्या समाजाच्या बाकी समाजामधील स्थानावर कायमचा असा काही परिणाम होत नाही. अगदी भरमसाट पेट्रोल मिळाले आणि पेट्रोलचे दर अमाप

वाढले तरी तत्कालीन समृद्धी मिळण्यापलीकडे आखाती देश बदलू शकत नाहीत. पण आपले गुणदोष ओळखणारा आणि त्याला योग्य ते बदल करण्याचा प्रयत्न करणारा समाज आपले प्राक्तन बदलवू शकतो. हे जपानने करून दाखवलेय. जपानी मालाला एकवेळ जगभर कचकड्याच्या वस्तू म्हणून हसायचे. पण स्वतःच्या गुणांचा गुणाकार आणि दोषांचा भागाकार करत पुढे जाणाऱ्या जपानने चमत्कार केला. आज जपानी वस्तू पुढे आली की जगभरचे कारखानदार घाबरतात. जपान समृद्ध आहे. संपन्न आहे. जपान जगातील एक अग्रेसर देश आहे. नियतीने पदरात टाकलेल्या भयानक दानाची पर्वा न करता केवळ पंचवीसएक वर्षांत जपानने आपले भविष्य घडवले. आपण मराठी माणसे हे करू शकतो.

१९४० साली ज्योत्स्ना मासिकाने प्रसिद्ध केलेल्या लेखात एक नेमके विधान आहे. त्यात म्हटलेय, 'आणखी २५ वर्षांनी महाराष्ट्र भारतात आहे तिथेच असेल! भारतात औद्योगिक प्रगती होईल. पण मराठी माणूस उद्योगधंद्यात पंजाबी, गुजराथी माणसांच्या मागे असेल. भारतीय राजकारणात पण त्याला दुय्यम स्थान असेल – हे सारे असेच घडून आले. त्यानंतर २५ वर्षांनी म्हणजे ६५ सालीच नव्हे तर त्यानंतर २५ वर्षांनी ९० साली पण परिस्थिती अशीच होती. आणि आणखी २५ वर्षांनी पण परिस्थिती तशीच असेल. कारण आपले सारे गुणदोष तेच होते. आपण आपल्या वृत्तीत थोडा जरी बदल केला असता तरी हे चित्र पूर्ण बदलले असते. किंवा आज जरी आपण काही बदल करण्याचे मनावर घेतले तर पुढील २५ वर्षांत आपण भारतात सर्व क्षेत्रात आघाडीवर असू.

काय झाले व काय होऊ शकले असते हे जरा नीटपणे समजावून घेतले तर काय करावयास पाहिजे याचा आपण सारेचजण आपापल्या परीने विचार करावयास लागू. आणि त्या मंथनामधून आपले उत्तर आपणाला मिळेल. आपला मार्ग आपणाला सापडेल.

९० साली किस्त्रीमसाठी दिलेल्या मुलाखतीत डॉ. वसंत गोवारीकर यांनी हा मुद्दा प्रथम पुढे मांडला. ते म्हणाले, 'आपले खरे दुःख हे आहे की आपल्याकडे खूप चांगल्या गोष्टी आहेत. त्यामानाने आपण पुढे गेलेलो नाही. कारण आपल्याकडे काही वाईट गोष्टी आहेत.' गोवारीकरांचे हे विधान मला पटते. पण मला ते अर्धसत्य वाटते. आपली खरी अडचण वेगळी आहे. एक उर्दू शेर आहे, 'देवा मी माझ्या शत्रूंचा समाचार घ्यावयास समर्थ आहे. पण देवा मला तू माझ्या मित्रांपासून वाचव!' म्हणून देवाला विनंती करणारा. आपणा मराठी माणसांबाबत हे नेमके खरे आहे. – आपले काही सद्गुण आज खऱ्या अर्थाने दुर्गुण आहेत आणि ते आपल्या वाटेत पदोपदी आडवे येताहेत.

आपण तत्त्वाचा बडेजाव करून व्यवहाराकडे दुर्लक्ष करतो. उगाच पुढे पुढे न करता माणसाने मागे राहवे असे समजतो. ते चांगले मानतो. काम होत आहे ना, मग आपण मागे राहून भोयाची भूमिका निभवावी असे आपणाला वाटते. गुजराल पंतप्रधान झाले. आपले दंडवते का झाले नाहीत याचा आपण विचार करावा असेही आपल्या महाराष्ट्रात कुणाला वाटले नाही. गुजराल पंतप्रधान झाले कारण गुजराल राज्यसभेवर निवडून आलेले होते. राज्यसभेवर माणसांनी फक्त आपल्याच राज्यातून निवडून जायचे असते. बिहारमधील आपल्या कायमच्या वास्तव्याची खूण म्हणून भाड्याच्या पावत्या त्यांनी सादर केल्या. त्यांचे राहू दे, अडवानी असेच गुजराथमधून एक-दोनदा राज्यसभेवर निवडून आले. राज्यसभेत गेल्यावर पुन्हा चारित्र्यसंपन्न राजकारण आणि भ्रष्टाचार विरोध यावर बोलायला मोकळे! राज्यसभेवर आपण असे जावे असे लिमये, दंडवते यांना काय, पण प्रमोद महाजन यांनासुद्धा वाटले नाही.

दंडवते बिहारमधून अगदी सहजपणे राज्यसभेत जाऊ शकले असते. किंवा त्यांनी तसे जावे म्हणून लालूप्रसाद यादवपासून अनेकांनी त्यांना गळ घातली होती. संघ आणि सेवादल उभे करणारी मराठी माणसे असे काही करत नाहीत याचा आम्हाला केवळ अभिमान वाटला. पण देवेगौडांचे सरकार कोसळले, त्यावेळी दंडवते जर राज्यसभेचे खासदार असते तर मराठी माणसांचे पंतप्रधानपद नक्की होते.

संघ, सेवादल मराठी माणसांनी उभे केले. पण आपण आपले मागे राहावे म्हणून कायम आपली भोयाची भूमिका स्वीकारली.

स्थापना – १४ फेब्रुवारी १९७६
रजि.नं. एनएसके/बीएनके-१३८

दि जनलक्ष्मी को-ऑप. बँक लि.

'समृद्धी' गडकरी चौक, जुना आग्रारोड, नाशिक-२

फोन नं. ५७७८७२, ७३,७४

सर्वसामान्य जनतेसाठी अविरत कार्य करणारी सहकारी बँकींग क्षेत्रातील अग्रेसर बँक, भरघोस मोबदला, तत्पर सेवा, बँकींगच्या सर्व सुविधा, व्याजाचा आकर्षक दर, रविवारीही बँकींग सेवा उपलब्ध, सेफ डिपॉझीट लॉकर सेवा उपलब्ध, बचतीच्या आकर्षक योजना व परिपूर्ण बँकींगकरिता आपण नजिकच्या शाखेस आजच भेट द्या.

आर्थिक स्थिती (रक्कम लाखात)

भाग भांडवल :-	४३८.१०	कर्ज :-	७२३१.११
गंगाजळी :-	१०६९.६१	नफा :-	३८३.८४ (३१-०३-१९९७)
ठेवी :-	१०६३६.३५	खेळते भांडवल :-	१२३८२.२३

(माधव ब.पाटील) संस्थापक अध्यक्ष
(आर्कि.दत्तात्रय द.नाथे) उपाध्यक्ष
(रामरतन रा. करवा) अध्यक्ष
(तु. वा. इंदुलकर) मुख्य कार्यकारी अधिकारी

बाजपेयी, अडवानी, मधोक यांचे आपापसात मतभेद कितीही असोत. हेडगेवार, गुरुजी, नानाजी यांच्याबद्दल बोलायचे म्हणजे शब्दांची आचमने सोडत गदगदून बोलतात, आणि पासवान, मुलायमसिंग, लालूप्रसाद यांचे आपापसातले हेवेदावे आणि स्वार्थ काही असोत, लिमये, गोरे, जोशी अशी नावे आली की हे आपले कानाला हात लावून मोकळे. ७७ साली काँग्रेसचा प्रचंड पराभव करण्याचा 'जनता पक्ष' नावाचा एक जो विलक्षण प्रकार झाला त्याचे शिल्पकार होते, मधु लिमये आणि नानाजी देशमुख. मध्यमवर्गीय मराठी कुटुंबात वाढलेल्या, दोन वेगवेगळ्या विचारधारा जीवननिष्ठा म्हणून स्वीकारलेल्या दोन मराठी मुलांच्या आयुष्यभरच्या अथक मेहनतीचा आणि बुद्धिकौशल्याचा तो जिताजागता आलेख होता. त्या वेळी हे दोघे केंद्रीय मंत्रिमंडळातसुद्धा सामील का झाले नाहीत आणि त्यानंतर एकजण सक्रिय राजकारणापासून व दुसरा राजकारणापासूनही दूर का झाला? नानाजींच्या तत्त्वनिष्ठ मराठी मनाला ती घृणा यावी अशी बजबजपुरी वाटली. एक गोष्ट तर नक्कीच की फक्त भोयाची भूमिका निभावून अफाट कर्तृत्वाची ही दोन मराठी माणसे बाजूला झाली. आणि त्यांचे राहू देत, दिल्लीत युतीचे सरकार आले. त्या वेळी, महाराष्ट्राला अजून कधीच पंतप्रधानपद मिळालेले नाही, महाराष्ट्रीय माणसाला हे पद देत असाल तर आमचा पाठिंबा देतो असे अगदी आमचे बाळासाहेब ठाकरेसुद्धा म्हणाले नाहीत. त्यांनी साधे गृहमंत्रीपदसुद्धा मागितले नाही. – त्यांनीसुद्धा भोयाचीच भूमिका निभावली!

माणसाने पुढे पुढे करू नये. मागे राहावे. आपल्यापेक्षा कार्याला महत्त्व द्यावे या उपदेशात आपण आपल्या मनाचे लोणचे लावले आहे. गांधीजी महाराष्ट्राला कार्यकर्त्यांचे मोहोळ म्हणाले होते. अफाट कर्तृत्वाच्या या माणसाने मराठी माणसाला नक्की जोखले होते. आपण या परिघाबाहेर कधी पडलोच नाही. चकव्यात सापडल्यासारखे आपण याच मार्गावर फिरत राहिलो. ४० साली ज्योत्स्नात एस्. एम्. जोशी यांनी आणि ९० साली किस्त्रीममध्ये नानाजी देशमुख यांनी महाराष्ट्र हा कार्यकर्त्यांचे मोहोळ आहे याचा अगदी गौरवाने उल्लेख केलाय.

'स्वयमेव मृगेंद्रता' म्हणत पुढे जात असताना तत्त्वाचा खोटा बाऊ उभा करून फायदा नाही. हे फक्त राजकारणात नाही, प्रत्येक क्षेत्रात आहे. ऑटो इलेक्ट्रिक आणि ॲपलॅबसारखे प्रचंड चांगले कारखाने अगदी मध्यमवर्गीय कुटुंबातून आलेल्या म. गो. भट व देवधर यांनी उभे केले. अंबानी वगैरे मंडळी साधे कारकून म्हणून काम करत होते, त्यावेळी यांचे उद्योग स्थिरावले होते. पण काही तडजोडी करणे यांनी नाकारले. यांनी त्या करावयास हव्या होत्या हे त्यांना आणि आपणालाही समजले पाहिजे. लिमये आणि दंडवते यांच्या साध्या राहणीचा आपणाला अभिमान वाटू नये असे नव्हे. पण बोंडोशीला चंद्रशेखर यांनी जे पंचतारांकित संस्थान उभे केले आहे, त्याचा अन्वयार्थ आपणाला समजला पाहिजे. चंद्रशेखर यांनी स्वत:चे व्यक्तिगत राहणीमान बदलले नाही, पण हे संस्थान जवळ नसते तर दिल्लीत राहून भारतीय राजकारणातले आपले स्थान चंद्रशेखर टिकवू शकले नसते.

तत्त्वाशी तडजोड करावी, पुढे पुढे करावे, पैसा मिळवावा हे मी जे वर म्हटलेय त्याचा नीट अर्थ समजावून घ्या. हे आपण करत नाही. त्यावेळी आपल्यापेक्षा कमी कर्तृत्वाचा, बेरकी मतलबी माणूस आपल्या पुढे जातो. आणि चांगला, कर्तृत्ववान माणूस जेव्हा कमी कर्तृत्वाच्या आणि कमी प्रामाणिक माणसाकडून पराभूत होऊन बाजूला पडतो, त्या वेळी तुमच्या कार्याचे, भोवतालच्या समाजाचे व मानवी संस्कृतीचे पण अपरंपार नुकसान होते हे आपण आपल्या मुलांच्या मनावर बिंबवले पाहिजे!

आणखी एक गोष्ट आहे. आपण अल्पसंतुष्ट आहोत. परदेशात गेलेले कर्तृत्ववान मराठी तरुण महाराष्ट्रात व भारतात राहिले असते तरीही महाराष्ट्राचे भविष्य म्हणून बदलले नसते. गेल्या २५-३० वर्षांत या देशात उद्योगधंद्यात प्रचंड संधी समोर आली. आळशावर गंगा यावी तशी आपल्यासमोर येऊन इतरत्र गेली. एका पाणक्याची गोष्ट सांगतात. त्याला एकदा एक कोटी रुपयांची सोडत लागली. तो म्हणाला, 'बरे झाले आता गॅबरडीनचा सूट आणि सोन्याचे दागिने घालून उद्यापासून पाणी भरत ऐटीत उभा राहीन!' फोन, बंगला, गाडी मिळाली की आयुष्याचे सार्थक झाले असे समजून मराठी माणूस मोडीत निघतो. 'ठेवीले अनंते तेथेच ठेवावे, चित्ती असो द्यावे समाधान' हे आपल्या मनावर वज्रलेप झालेय. अनंत म्हणजे आपली तत्त्वनिष्ठा असेल तर 'पाहिजे अनंता तेथेच ठेवावे चित्ती नसो द्यावे समाधान' हे आता आपण आपल्या मनावर कोरले पाहिजे. आपल्या प्रगतीच्या मार्गात अडथळे बनणारे असे आपले काही सद्गुण आपण योग्य वेळी, काही काळासाठी बाजूला ठेवले पाहिजेत. कारण यशाला स्वत:चे असे एक स्वयंसिद्ध मूल्य असते आणि मग तुम्ही कोणत्या मार्गाने तेथे पोचलात हे फार काळ महत्त्वाचे नसते. आयुष्याची लढाई पुस्तकी नियमांनी कधी लढता येत नाही. तत्त्वाचा खोटा बागुलबोवा आपल्या मनात उभा केल्याने प्रत्येक क्षेत्रात आपण मागे पडलोय. हे फक्त राजकारण आणि औद्योगिक क्षेत्रातच नाही. अगदी बौद्धिक क्षेत्रातसुद्धा झालेय. महाराष्ट्रात अफाट कर्तृत्वाचे वकील काय कमी आहेत? पण जेठमलानी यांना भारतीय पातळीवर जे यश व नाव मिळाले ते आपल्या वकिलांना का मिळाले नाही, हे कोणताही वकील तुम्हाला सांगेल वा तुम्हीसुद्धा आता आपल्या मनाशी शोधू शकाल. समाजातला कर्तृत्ववान माणूस जेव्हा पुढे जातो तेव्हा सारा समाज पुढे जाऊ शकतो. आणि आपले अंतिम ध्येय चांगले असेल तर वाटेत तत्त्वाचा बडेजाव न करता, त्याला मुरड घालत पुढे जावयास आपण शिकले पाहिजे व आपल्या मुलांना शिकविले पाहिजे.

आपण आपल्या माणसांच्या मागे आपला माणूस म्हणून उभे राहावयास शिकलो असतो तर अमोल पालेकर आणि

श्रीराम लागू, मिथून चक्रवर्ती, संजीवकुमार, अशोककुमार यांच्यासारखे पहिल्या रांगेत स्थिरावले असते. शरद जोशी, शरद पाटील, दत्ता सामंत भारतीय स्थरावर खऱ्या अर्थाने पोचले असते. अफाट कर्तृत्वाच्या या मराठी माणसांना तो न्याय मिळाला नाही त्याला आपण जबाबदार आहोत. परप्रांतीय माणसे आपापल्या माणसांसाठी जी व्यूहरचना करतात ती आपण करत नाही. मी वर जे म्हटलेय ते तुम्हाला पटत नसेल तर एका प्रश्नाचे उत्तर तुमच्या मनाशी शोधा. तामीळ, मल्याळम्, बंगाली नव्हे तर अगदी कन्नड भाषेतसुद्धा प्रत्येकी ४-५ साहित्यिकांना 'ज्ञानपीठ पारितोषिक' मिळालेय. मराठीत फक्त दोघांना. पु.ल., गाडगीळ, तेंडुलकर, जी. ए. यांच्या वाट्याला हा सन्मान का आला नाही? - या प्रश्नाचे उत्तर तुम्हाला मनाशी मिळत नसेल तर मागे किर्लोस्कर मासिकाने या विषयावर जी शोधयात्रा प्रसिद्ध केली होती ती एकदा नजरेखालून घाला.

आणि आपले खरे दुर्दैव हे की, असे कोणी काही म्हटले तर हा कसला कोता विचार असे आपल्यापैकी भल्या-भल्यांना वाटते. आपण आपल्या माणसांना व आपल्या प्रश्नांना विसरून जातो ही एक दाहक वस्तुस्थिती आहे. आपल्या गोखलेंना, गांधीजी आणि जीना यांना आपला गुरू मानले होते हे आपण मागे पाहिले. गांधीजी आणि जीना यांची भारत व पाकिस्तानमध्ये पूजा होते. आपण आपल्या गोखलेंना विसरून गेलोय. महाराष्ट्राचा एकही मंत्री केंद्रीय मंत्रिमंडळात आज नाही हे आपण समजू शकतो. पण अशा वेळीसुद्धा महाराष्ट्रातील काँग्रेस, भा. ज. प., शिवसेना यांच्या खासदारांना एकत्र येऊन बेळगावच्या प्रश्नावर लोकसभा हलवावी असे वाटत नाही! - बी. जे. देशमुख म्हणाले होते तसे 'वयम् पंचाधिकम् शतम्' हे आपण कधी शिकलोच नाही.

एखाद्या खेड्यात गरीब, विद्वान, सज्जन ब्राह्मणाला जो मान असतो तो मराठी माणसाला आज भारतभर आहे आणि त्याचा आपण फायदा करून घेऊ शकतो, असे ९० साली बी. जे. देशमुख म्हणाले होते. ते मुळातच आज चुकीचे आहे ते आपण ओळखले पाहिजे. कारण माणूस सज्जन आणि साधा असेल तर त्याला ठगवावे हा आज जगाचा न्याय झालाय. तुम्हाला हे पटत नसेल तर एक गोष्ट लक्षात घ्या. आपण साधी माणसे आहोत. एकमेकांना मदत करत नाही. एकमेकांचे पाय ओढतो आणि याचा बेरकी माणसे छान फायदा उठवतात. 'त्रयाणाम् धूर्तानाम' म्हणून पंचतंत्रात एक गोष्ट आहे. तीन धूर्त माणसांनी एका खेडुताला कसे फसवले ते सांगणारी. ४-५ वर्षांपूर्वी नेमके त्याच्या उलट घडले. आपल्यापैकी तीन धूर्त माणसांना एकाने चक्क मामा बनवले. शरद पवार, सुधाकरराव नाईक आणि गाडगीळ यांना एका तेलगू ब्राह्मणानें आपापसात छान लढवले आणि संपवून टाकले. ही माणसे आपापसात न भांडता 'वयम् पंचाधिकम् शतम्' म्हणून एकजुटीने राहिली असती तर सुधाकरराव मुख्यमंत्री राहिले असते, शरदराव संरक्षणमंत्री म्हणून राहिले असते आणि या दोघांनी पाठपुरावा केला असता तर गाडगीळांसारख्या स्वच्छ, बुद्धिमान माणसाला परराष्ट्र मंत्रीपद मिळाले असते. साधा सरळ स्वभाव आणि आपापसातील खोटे हेवेदावे यामुळे आपल्यातील, राजकीय डावपेच खेळणाऱ्या तीन प्रमुख नेत्यांची जर अशी दैना होत असेल तर माझी, तुमची व आपल्या मुलाबाळांची काय दैना होत असेल? - आणि यातून बाहेर पडावे म्हणून आपण काही करावयास हवे की नको?

हे सर्व करत असतानाच हे सर्व आपण का करतोय हे समजावून घ्यावयास हवे. महाराष्ट्राच्या इतिहासातील सर्वांत देदीप्यमान कालखंड कोणता तर शिवशाहीचा. 'हे तो श्रीची इच्छा' हे ओळखून मराठी माणसांनी तेव्हा हिंदवी स्वराज्य स्थापन केले. मराठी साम्राज्याच्या सीमा महाराष्ट्र ओलांडून बडोदा, ग्वाल्हेर, झाशी, तंजावर अशा बाहेर पडल्या. आजचे साम्राज्य हे आर्थिक साम्राज्य असते. जे जपानने निर्माण केलेय. चीन निर्माण करतोय, म्हणजे 'हे तो श्रीची इच्छा' म्हणून आज कामाला लागायचे असेल तर संपत्ती निर्माण करण्यात पुरुषार्थ आहे. हे आपण आपल्या व आपल्या मुलांच्या मनावर वज्रलेप केले पाहिजे. महाराजांच्या स्वराज्यासाठी किल्ले आणि जग उभारणे जेवढे आवश्यक होते, तेवढेच वीज प्रकल्प आणि जलसिंचन प्रकल्प महत्त्वाचे आहेत, हे आपल्या मनाशी नक्की ओळखावे लागेल. मग आपणाला एन्रॉनच्या जागी सिंधुदूर्ग निर्माण करणारे महाराज दिसतील आणि क्षणाचाही विलंब सहन न करता आपण कामाला लागू. भीमा खोरे प्रकल्प हा अफजलखानाविरुद्ध प्राणपणाने लढवायचा, इतिहासाला कायमची कलाटणी, अशी वा तशी देऊ शकणारा, लढा आहे हे समजून आपण कामाला लागू. शिवशाहीच्या निर्मितीसाठी आणि रक्षणासाठी प्रत्येक मराठी मुलाला भाला, बरची, तलवार, घोडा या गोष्टी शिकवणे जेवढे आवश्यक होते तेवढेच आज आपल्या खेड्यापाड्यातील मुलांना आज पडेल ती किंमत मोजून हिंदी-इंग्रजीत छान बोलायला आणि कॉम्प्युटर सुलभपणे चालवायला शिकवणे हे महत्त्वाचे आहे, हे समजून आपण सारेजण कामाला लागू.

...वर मी मांडलेले अनेक विचार अपुरे वा चुकीचे असतील. पण हे विचारमंथन सुरू ठेवून आपणाला काही व्यूहरचना करावी लागेल. तसे काही केले तर आपण सहजपणे जपानच्या जागी असू. पण असे काही न करता आपल्या मराठी स्वभावानुसार, छे! हे कसे काय शक्य आहे? - आणि हे कोण टिकोजीराव आम्हाला सांगणारे? म्हणून हा परिसंवाद आपण बाजूला फेकला तर आणखी पंचवीस, पन्नास, शंभर वर्षांनीसुद्धा आपण आज आहोत, तिथेच भारतात असू. कदाचित थोडे मागे! - आणि त्यावेळीसुद्धा २५ वर्षांनंतरचा महाराष्ट्र अशा एखाद्या परिसंवादात गुंतलेले असू...!

(दत्तप्रसाद दाभोळकर : शास्त्रज्ञ आणि संचालक, श्रीराम इन्स्टिट्यूट ऑफ सायंटिफीक रिसर्च, दिल्ली.)

***

सहकार आणि समतोल

विलास देशमुख

महाराष्ट्रात शहरांच्या व गावांच्या विकासाचे निश्चित प्रश्न कोणते ?

महाराष्ट्र राज्यात सद्यस्थिती बघताना थोडीशी गोंधळाची स्थिती दिसते. कारण एकतर सत्तेचे राजकारण हे अधिक प्रभावी ठरले. सत्ता लोकांसाठी जी वापरली गेली पाहिजे, त्यापेक्षा सत्तेमध्ये कसे राहायचे व सत्ता कशी टिकवायची याला पहिले प्राधान्य आले. त्यामुळे आता तर महाराष्ट्र राज्य आर्थिक दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर उभे आहे.

महाराष्ट्राची यापुढील प्रगती शहरी औद्योगिकीकरणाच्या माध्यमातून होईल की, शेती आणि सहकारातून होईल ?

महाराष्ट्राची यापुढील प्रगती ही शहरी औद्योगिकीकरणाच्या आणि ग्रामीण सहकाराच्या रूपात राहील. खरे म्हणजे यात समन्वय साधता यायला हवा. कारण शेती आणि सहकारातून जितकी प्रगती साधता येईल किंवा त्यात जितके स्थानिक औद्योगिकीकरण आणता येईल तितकी खेडी पुढारतील. ग्रामीण अर्थकारण शेती व सहकारावर आधारित असावे. नाहीतर खेडी ओस पडायला लागतील, माणसे शहराकडे वळतील आणि शहरातले जीवन अडचणीत येईल. म्हणून शेती आणि सहकाराला प्राधान्य देऊन खेड्यातला माणूस खेड्यातच कसा सुखात राहील अशा योजनांना प्राधान्य द्यायला हवे आणि शहरातले औद्योगिकीकरण शहरापुरते न ठेवता तेसुद्धा खालपर्यंत, तालुका व जिल्ह्यापर्यंत पोहोचायला पाहिजे. यासाठी सरकारने शिकलेल्या तरुणांना प्रोत्साहन दिले पाहिजे. त्यांना संधी व भांडवल उपलब्ध करून द्यायला हवे. त्यामुळे तिथल्या कच्च्या मालावर आधारित नवीन उद्योग निर्माण होऊ शकतात किंवा इथला एखादा मोठा उद्योग ग्रामीण भागात गेला तर पूरक उद्योग म्हणजे उदा. सुटे भाग तयार करण्याचे ॲन्सीलरी उद्योग त्यांना मिळू शकतील. त्यामुळे शहरीकरणावर भर न देता ग्रामीण भागात शेती आणि सहकारावर भर दिला तरच फायदा होईल. सहकार हा ग्रामीण अर्थकारणाचा गाभा आहे, त्याकडे दुर्लक्ष केले तर महाराष्ट्राची प्रतिष्ठा व अर्थव्यवस्था कोलमडून पडेल. कारण आतापर्यंतच्या बव्हंशी योजनांशी ग्रामीण अर्थकारणाचा खरोखरीचा फारसा संबंध येत नाही. कारण आता नवीन येणारे उद्योग आकड्यांमध्ये फार मोठे असतील पण आधुनिक तंत्रामुळे माणसे नोकऱ्यांमध्ये सामावून घेण्याची त्यांची क्षमता फार कमी असेल आणि त्यामुळे लोकांच्या हाताला काम पुरवणे हा एक कठीण प्रश्न सरकारपुढे राहाणार आहे. आता येणारे उद्योग अधिक आधुनिक पण कमी माणसांमध्ये अधिक उत्पादन तयार करणारे असतात.

मराठवाडा व लातूरचा कायापालट झाला तसा संपूर्ण महाराष्ट्राचा कायापालट कसा होईल ?

मुळामध्ये कुठलाही विकास हा आपोआप होत नसून तो खेचून आणावा लागतो. यासाठी जोवर विकासाच्या दृष्टिकोनाबाबत स्थानिक कार्यकर्त्यांची फळी निर्माण होत नाही व विकासाचा विचार स्थानिक पातळीवर होत नाही तोपर्यंत खऱ्या विकासाला सुरुवात होणार नाही. कारण विकासाचेही प्रश्न समजावून घेतले पाहिजेत. त्या त्या भागात काय घडू शकते याचा विचार व्हायला हवा. शेती, वीज असा एक भाग घेऊन त्या संबंधात काय करता येईल हे पाहावे लागेल. उदा. कापूस आहे तर त्याला जोडून दुसरा वस्त्रउद्योग निर्माण करता येईल असे नियोजन पाहिजे आणि जोवर या नियोजनाचा विचार पक्का होऊन स्थानिक कार्यकर्त्याच्या मनात ही संकल्पना रुजत नाही तोवर कुणीतरी येऊन काही करून त्याचा उपयोग होणार नाही. म्हणजेच अधिकारी येऊन सरकारी धोरण व योजनांप्रमाणे धरणाला एवढे, दवाखान्याला एवढे असे पैसे देऊन भागणार नाही. कारण विकास म्हणजे काय बांधकाम नव्हे की, नुसत्या इमारती बांधल्या किंवा सोयीसुधारणा निर्माण केल्या तर तो होत नसतो. यासाठी माणसाची आर्थिक परिस्थिती सुधारायला हवी तरच ग्रामीण भागातील माणसांची सामाजिक परिस्थिती सुधारून ते त्या सुविधांचा लाभ उठवू शकतील. आर्थिक सुधारणेसाठी प्रयत्न व्हायला हवेत. क्रयशक्ती वाढविण्यासाठी काय काय आवश्यक आहे याचे नियोजन पाहिजे आणि पुढे येणाऱ्या योजना कशा नीटपणे राबविल्या जातील याचाही कायम पाठपुरावा आवश्यक आहे. केवळ मंत्र्यांनी नुसते दौरे काढून काही उपयोग होत नाही. मंत्री आणि नोकरशाहीने धोरणांचा सतत आढावा घेत राहाणे आवश्यक आहे. जसे आम्ही लातूरमध्ये केले की, तिथे आखलेल्या प्रत्येक योजनेचा, त्यासाठी लागणाऱ्या कागदपत्रांचा सतत पाठपुरावा केला. कारण सरकारच्या तिजोरीतून पैसे कोणी सहजासहजी उचलून देणार नाही, तर ते मिळविण्यासाठी तेथील कार्यकर्त्याला संपूर्ण सहकार्य केले पाहिजे आणि ते आम्ही केले. त्यामुळे पैसा उपलब्ध झाला. पश्चिम महाराष्ट्रात कार्यकर्त्याची

जिद्द आहे. आज ज्यांना आपण मागासलेले म्हणतो त्याचा दोष केवळ सरकारलाच नाही. जो सतत पाठपुरावा करतो त्यालाच मदत मिळते, व्यवहारात तसेच होते. विदर्भातले, कोकणातले लोक मागे राहिले बाकीचे पुढे गेले त्याचे कारण हेच असावे. पण आता ही जागृती हळूहळू निर्माण होतेय.

गेली चाळीस वर्षे महाराष्ट्र सुधारण्यासाठी प्रयत्न चाललेत, संयुक्त महाराष्ट्राची चळवळ सुरू झाली, नंतरही महाराष्ट्र मागे. त्यावर अन्याय होतोय अशी चिंता व्यक्त झाली. एवढे करूनसुद्धा फारसा काही फरक का पडलेला नाही?

येथील मानसिकता व भारताचे कल्चर या दोन गोष्टींचा आपल्याला प्रामुख्याने विचार करावा लागेल. कारण थोडीफार आपली मराठी मानसिकता 'ठेविले अनंते तैसेची राहावे' अशी आहे. संघर्ष करून कुठल्याही मार्गांनी हवी ती गोष्ट मिळवावयाची असे जे संस्कार नाहीत हा संत-संस्काराचा परिणामच झालेला आहे. माणूस शिकलेला जरी असला अगर नसला तरी इतर लोकांसारखी पुढे घुसायची पद्धत आपल्यात नाही. फार थोड्या लोकांनी अशी प्रगती केली. आपण असंतुष्ट आहोत, यात आपल्या मानसिकतेचा दोष आहे. अल्प संतुष्टांची प्रगती होत नाही. मिळते त्यापेक्षा अधिक मिळवायची आकांक्षा असते तेव्हा त्या दृष्टीने धडपड केली जाते. आता महाराष्ट्रातील माणसे उद्योगातच काय आय. एस. एस., आय. पी. एस.मध्येही कमी आहेत. केरळ, तामिळनाडूमधील लोक सेक्रेटरियल बोर्ड वगैरे हुद्द्यावर दिसतील, इतर दिसतील पण आपला मराठी माणूस बाहेर जाऊन काम करण्याची प्रवृत्तीच दाखवीत नाही. तो महाराष्ट्रातच परत येण्याचा प्रयत्न करील. एखाद्याला नोकरी लावली की काही वर्षांत तो म्हणतो, मला आता जिल्ह्यात लावा, मग तालुक्यात लावा, नंतर गावात लावा, मग घरीच बसा की! ही जी संकुचित प्रवृत्ती आहे यातून जोपर्यंत बाहेर पडत नाही तोपर्यंत प्रगती होणार नाही. आपल्याकडे लढाऊ प्रवृत्ती आहे, पण संघर्ष करून काही मिळविण्याची तयारी आपल्याकडे नाही. ही अल्पसंतोषी वृत्ती जोवर बदलत नाही तोपर्यंत आपल्या परिस्थितीत बदल होणार नाही. योग्य तिथे घुसण्याची प्रवृत्ती मराठी माणसात नाही. सरळ सरळ मिळेल तेवढेच तो घेतो आणि पुढे जात नाही. बाकीचे आपल्याबद्दल काय बोलतील याचा विचार तो प्रथम करतो. यशवंतराव म्हणायचे, "मराठी माणसांनं मनात आणलं तर तो वाघही मारेल पण ते त्याच्या मनात मात्र कधी येणार नाही."

शिवाजी महाराजांचा हिंदवी स्वराज्याचा लढा, १८५७चा उठाव, स्वातंत्र्य चळवळ या सगळ्यांत मराठी माणूस पुढे होता पण स्वातंत्र्यानंतर मराठी माणसाकडे राष्ट्रपती, पंतप्रधान वगैरे मोठे मानाचे राजकीय पद आलेले दिसत नाही, असे का?

मुळामध्ये राष्ट्रीय पातळीवरून नेतृत्व करायचे असेल तर त्या त्या नेत्याने कमीत कमी लक्ष त्या त्या राज्यात द्यायला पाहिजे. आमचे वास्तव्य दिल्लीत आहे, पण आम्ही सतत तिथून महाराष्ट्रात कोण काय करतेय, कोण काय होणार आहे याचकडे पाहत राहिले तर आम्ही दिल्लीत टिकू शकणार नाही. कारण राष्ट्रीय पातळीवर जायचे झाले तर त्याला सगळ्या प्रांतांची मान्यता लागते. एकाच प्रांताची भलावण करून चालत नाही. हेच कारण आहे की, आम्ही वरपर्यंत पोहोचू शकलो नाही आणि आमची अडचण झाली, पण भविष्यात हे दोष घालवून आम्ही पुढे जाऊ. जसे यशवंतराव गेले! दुर्दैवाने त्यानंतर आम्ही देशाचे नेते झालो नाही, विभागलेले राहिलो. आम्ही सर्वांचे नेते आहोत अशी भूमिका घेतली तरच वरपर्यंत जाऊ. यशवंतराव चव्हाण सगळ्या बाबतीत पुढे होते, त्यांच्याकडे उत्तम विद्वता, वक्तृत्व, कला संघटन हे सगळे एकत्र होते म्हणून ते सर्वमान्य ठरले

मुंबईच्या आर्थिक परिस्थितीचा आणि सुबत्ततेचा काही संबंध आहे का?

उलट ही स्थिती फार फायद्याची आहे. मुंबईचे अर्थकारण कोणी व्यवस्थित केले असते तर महाराष्ट्रास काहीच कमी पडले नसते. पण मुंबई नेहमीच दुर्लक्षित राहिली आणि लक्ष ग्रामीण भागात केंद्रित केले गेले. या रंगीबेरंगी महानगरींत, सगळ्या प्रकारचे लोक आहेत हे किती फायद्याचे आहे! पण आम्ही तिकडे लक्ष दिले नाही, याचा फायदा आम्ही घेऊ शकलो नाही. मुंबईचे औद्योगिकीकरण एवढे प्रगत आणि मोठे आहे की, ती भारताची प्रातिनिधिक औद्योगिक राजधानी म्हणून ओळखली जाते. काँग्रेसच्या नेतृत्वात तिकडे लक्ष दिले गेले नाही. त्यामुळे आम्हाला त्याचा फायदा घेता आला नाही. गेली अनेक वर्षे महाराष्ट्र औद्योगिक क्षेत्रात पुढे आहे. तरी मुंबईत चांगली वाहतूक व्यवस्था आपण उभारली नाही. शेवटी रस्ते म्हणा, वाहतूक म्हणा किंवा इतरही काही प्रगतीचा विचार म्हणा याचा विचार करता नियोजनकारांनी आपल्या मतदारसंघापुरता विचार करून चालत नाही. पुढील पन्नास वर्षांचा विचार करायला हवा. पण तेव्हा दुर्दैवाने अशाप्रकारे नियोजन झाले नाही. पुढील विचार न करता, वाहतुकीचा विचार न करता नियोजन केले गेले. त्यामुळे आजच्या वाढत्या औद्योगिकीकरणामुळे वाढलेली वाहतूक समस्या सामावून घेण्याची क्षमता या रस्त्यांमध्ये राहिलेली नाही.

मुंबई सोडून महाराष्ट्रात इतरत्रही रस्ते अरुंद आहेत, त्यांची देखभाल होत नाही. चौकशी केल्यावर अधिकारी सांगतात की, रस्त्याची जबाबदारी केंद्राची आहे, असे का?

नॅशनल हायवेची जबाबदारी केंद्राकडे असली तरी मेन्टेनन्स मात्र राज्याकडेच आहे. सरकार पैसा देते पण दुरुस्ती करण्याचे काम राज्यालाच करावे लागते, याकडे दुर्लक्ष झाले हे मी मान्य करतो. म्हणूनच रस्ते नादुरुस्त राहिले. आता वाहने एवढी वाढलीत की, रस्ते अपुरे पडायला लागलेत. त्यामुळे महाराष्ट्रातील रस्त्यांची अवस्था वाईट आहे. या दृष्टीने नियोजन झालेले नाही. देशाच्या नियोजनाचा पाया डॉ. धनंजयराव गाडगीळ या महाराष्ट्राच्याच माणसाने घातला तरी आपल्याला ते योग्यप्रकारे राबवणे शक्य झालेले नाही. जे काम राज्य पातळीवर होऊ शकते, त्याला केंद्राच्या परवानगीची आवश्यकता नाही. पण हा विचार केंद्रातही झाला तर जास्त उपयोग होईल हेही लक्षात घ्यावयास हवे.

आपण उद्योगमंत्री असताना हे नियोजनाचे मुद्दे आपण सादर केलेल्या औद्योगिक धोरणात मांडले असतीलच, त्यातून आज काय निष्पन्न झालेले दिसते ?

काही ठराविक भागात जसे ठाणे, रायगड, रत्नागिरी वगैरे भागांत एवढे उद्योगधंदे वाढलेत की, लोक आता तिथे उद्योगधंद्यांना कंटाळले आहेत. ठाणे, बेलापूर या औद्योगिक पट्ट्यांचेही हेच आहे. आता जर उद्योग पसरवायचे असतील तर लोकांना काही सवलती द्यायला हव्यात. त्यांचा पैसा लवकर कसा मोकळा होईल हेच ते बघत असणार. तर अशा सवलतींनी त्यांचा पैसा लवकर मोकळा होईल असा विश्वास दिला तरच तो इतर भागात उद्योगधंदा सुरू करू शकेल आणि उद्योग वाढतील. याचसाठी डी. झोन पॉलिसी काढली. तिथे सोशल इन्व्हॉलमेंट निर्माण करता यायला हवी. त्या ठिकाणी चांगली शाळा हवी, एअरपोर्ट हवे, क्लब हवे, दवाखाने हवेत. सगळ्या सोयी हव्यात तरच तो तिथे जाईल. हे प्रथम निर्माण करायला हवे यासाठी एम. आय. डी. सी.त जागा राखून ठेवावी किंवा त्यांची सोय करणे अशा अनेक गोष्टी आमच्या धोरणात आहेत. त्याची अंमलबजावणी किती लोक कशी करतात, ते कसे राबवतात हे महत्त्वाचे असते. कारण धोरण हे धोरण आहे.

आर्थिक चढाओढीत अग्रगण्य असलेल्या महाराष्ट्राची जागा इतर प्रांत घेतील, ही भीती खरी आहे का ?

हो खरी आहे. जिथे स्थैर्य नसेल तिथे लोक यायला घाबरतात. कोणत्याही उद्योजकाला एक स्थैर्य असायला लागते. स्थैर्य नसेल तर तो तिथे राहणार नाही. औद्योगिक वातावरण असायला हवे. मजूर प्रश्न असतील तर उद्योजक पुढे यायला तयार होत नाहीत. म्हणजे मग त्याला यावेसे वाटेल असे वातावरण निर्माण करायला हवे. पण तसे वातावरण निर्माण होत नाही, त्याची खात्री पटत नाही. आज लोकांना असे वाटले तर ते येणार नाहीत.

महाराष्ट्राने शिक्षणाला दिलेल्या अवास्तव महत्त्वाचा परिणाम वर्तमानावर काय झाला आहे आणि भविष्यावर काय होईल असे वाटते ?

मला असे वाटते की, काही काही गोष्टी या राजकारणापलीकडच्या असाव्यात. जसे कुटुंबकल्याण, शेती वगैरे. शिक्षण हा राष्ट्रीय प्रश्न आहे. प्रत्येक प्रश्नाचे राजकारण होऊ नये. आज अमेरिकेमधील कुठलेही मोठे क्षेत्र घ्या तिथे भारतीयच दिसतात. पण मनुष्यबळ निर्माण करण्याच्या संदर्भात जो अभ्यास करायला पाहिजे तो झाला नाही. शिक्षणाचा प्रसार झाला पण व्हावा तसा अभ्यास झाला नाही. फेल (नापास) झालेल्या मुलांचे काय होते याचा अभ्यास झालेला नाही. त्यामुळे फॉर्मल एज्युकेशन आम्ही दिले पण अजूनही काही छोट्या छोट्या कोर्सेसची मागणी गावात, ग्रामीण भागात आहे. जसे की, टी. व्ही. दुरुस्त करणारा गावात नाही, स्कूटर, इलेक्ट्रीक, पंप दुरुस्त करणारा माणूस नाही. याचा मेळ साधला गेला नाही. मग असे वाटते की, डॉक्टर, इंजिनिअर होण्यात समाधान असते, पण पुढे तो स्वत:बद्दलच पाहतो. पुढचा विचारच होत नाही.

गांधीवादाला झालेल्या कडव्या विरोधाची कडू फळे यापुढे महाराष्ट्राला चाखावी लागतील काय ?

माझ्यासारखा मनुष्य एकदम या निष्कर्षाप्रत येणार नाही.

नाशिक कृषि उत्पन्न बाजार समिती, नाशिक

आमची ठळक वैशिष्ट्ये

१) महाराष्ट्रातील एक अग्रगण्य व नामांकित भाजीपाला शेतीमालाची घाऊक बाजारपेठ
२) शेतकऱ्यांच्या शेतीमालाला योग्य भाव व त्वरित रोखीने पेमेंट
३) शेतीमाल विक्रीसाठी भव्य सेलहॉलची व्यवस्था
४) शेतीउपयोगी सर्व साहित्य मिळण्यासाठी भव्य व्यापारी संकुल
५) महाराष्ट्रातील नामांकित बाजारपेठांचे भाव संगणकामार्फत देवाण घेवाण.
६) नाशिक बाजार समितीचे भाव दिल्ली येथे सुपर संगणकांस पाठविले जातात.
७) शेतकऱ्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी खास तक्रार निवारण विभाग.
८) शिंदे ता.जि.नाशिक येथे कांदा खरेदी-विक्रीसाठी मार्केटची सोय.

एन.जी.देशमुख, सचिव — हिरामण चौधरी, उप-सभापती — देविदास आनंदराव पिंगळे, सभापती

सदस्य

विजय बळवंतराव पाटील
हुकुमचंद चुनीलाल बागमार
दौलतराव पुंजाजी पाटील
ॲड.पंडीतराव पंढरीनाथ पिंगळे
दामोदर नारायण मानकर
शिवाजीराव रामचंद्र निमसे
ॲड. शंकरराव हरीभाऊ मांडे
भिवाजी राजु महाले
रमेश महादेव भोरे
संपतराव पंढरीनाथ तिदमे
रामदास लक्ष्मण महाले
रघुनाथ आनंदा वानखेडे
दिनकर गोटीराम आढाव

कृषि अधिकारी जि. प. नाशिक म. जिल्हा उपनिबंधक सह.संस्था, नासिक

गांधीजींचे विचार मागे पडले, त्यांची मूळ संकल्पना रामराज्य येणे ही होती. गावात सगळे मिळायला हवे असे त्यांचे म्हणणे, पण ग्रामोद्योग ही संकल्पना कागदावरच राहिली. ग्रामोद्योगाकडे जेवढे लक्ष पुरविले पाहिजे तेवढे लक्ष पुरविले गेले नाही. त्यापासून आम्ही दूर गेलो हे मान्य आहे. गांधीजींचे विचार आणि नवीन विचार यात समन्वय साधला जायला हवा होता तो साधला गेला नाही. त्यामुळे केवळ खादी मंडळ, खादी ग्रामोद्योग मंडळ, नॅशनल खादी कमिशन नेमणे यावर भागत नाही. यासाठी जी इच्छा लागते याचा अभाव निश्चितपणे दिसतो आहे. म्हणावा तितका जोर ग्रामोद्योगावर दिला गेला नाही. पुन्हा एकदा या कामाकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

दुसऱ्या महायुद्धानंतर बेचिराख झालेले जर्मनी, जपान पुढे आले, त्या तुलनेत कामसू वृत्ती असलेला महाराष्ट्र मागे राहिला. २०२० सालात या स्थितीत काय फरक होईल ?

वर्क कल्चर आपण सुधारू शकलो नाही, हक्कांची जाणीव करून दिली पण कर्तव्याची जाणीव करून देऊ शकलो नाही. त्यामुळे एखादे उत्पादन बाहेर येते ते राष्ट्रीय उत्पादन असते. ही संकल्पना यायला हवी होती ती पुढे आली नाही. छोट्या-मोठ्या प्रश्नांवर संप होतात, कामगार संघटना राष्ट्राच्या नुकसानीचा विचार करीत नाहीत. त्यांना युनियन चालण्याशी मतलब असतो. पैशाशी मतलब असतो. कामगारांच्या न्याय्य मागण्याच पूर्ण व्हाव्यात, अतिरेकीपणा टाळला जावा तरच उद्योग सफल होतील. तसे होत नाही. त्यामुळे उद्योजक जादा कामगार लागणाऱ्या उद्योगापेक्षा कमी कामगारांसह काम करणे पसंत करतात. असंघटित लोकांचे प्रश्न सुटत नाहीत. शेतकरी असंघटित असल्याने असुरक्षित आहेत. संघटित लोक अधिक मिळवतात. यात अधिक कोणाला मिळते याच्या स्पर्धा लागलेल्या आहेत. देणाऱ्याला ते परवडते की नाही हा विचार केला जात नाही. यामुळेही अर्थकारणावर वाईट परिणाम होतो. उत्पन्नात वाढ होत नाही पण बोजा सरकारवर पडतो, याचा वाईट परिणाम होणारच. सतत बदलते सरकार काहीच निर्णय घेऊ शकत नाही. यामुळे किती लोकांना त्रास होतो याचा विचार कोणीही करत नाही. माणूस स्वयंकेंद्रित झाला, प्रेमाची भावना मागे पडली आणि याचे दुष्परिणाम दिसतातच आहेत.

कृष्णा खोरे प्रकल्पामुळे बराचसा भाग सिंचनाखाली येणार आहे, विशेषतः दक्षिण महाराष्ट्राचा भाग याबद्दल २०२० सालचे चित्र आपल्याला काय दिसते ?

– जर त्या भागामध्ये सिंचन प्रकल्प वाढला तर तेथील मोठी पिके उदा. ऊस यात वाढ होईल आणि त्याला जोडून उद्योगही निर्माण होतील. साखरेचे उत्पादन आवश्यकच आहे. लोकसंख्येबरोबर साखरेची मागणी वाढेल. याबरोबर इतरही उद्योग वाढतील. पाण्याचा पुरवठा व्यवस्थित झाला तर इतरही अनेक उद्योगधंदे वाढतील. मग महाराष्ट्राचे नंदनवन होईल. फक्त हा प्रकल्प राबवला गेला पाहिजे. पाणी असेल तर पश्चिम महाराष्ट्रातील माणूस स्वस्थ राहणार नाही. तिथे मोठ्या प्रमाणात औद्योगिक क्रांती होईल, त्यात शेती-संस्कृती वाढेल.

जागतिकीकरण होत आहे, तसेच सॉफ्टवेअरमध्येही आपले लोक बरेच काही करत आहेत. या दोन्हींचा समन्वय करून येत्या दहा वर्षांत महाराष्ट्राचा कायापालट आपल्याला अपेक्षित आहे का ?

– नक्की होणार. कारण सॉफ्टवेअरचा उपयोग शेतीलाही होईल. पाण्याचा पुरवठा करताना, मोजमाप करताना कॉम्प्युटरचा वापर करता येईल. जगाशी स्पर्धा करायची असेल तर हे आवश्यकच आहे. या सगळ्या ठिकाणी प्रोफेशनल मॅनेजमेंटची आवश्यकता आहे आणि स्पर्धा करण्यासाठी जे दिसतेय ते अंगिकारायची गरज आहे आणि हे होईल असे मला दिसतेय. शेती विकसित करणे हे अत्यावश्यक आहे, त्यात आधुनिकता यायला हवी, हे चित्र मला २०२०मध्ये दिसतेय.

पर्यटन व मनोरंजन या इंडस्ट्रीज आता वाढणार, तर याविषयी आघाडी मिळवायला महाराष्ट्राने काय केले पाहिजे ?

– पर्यटन म्हणजे केवळ करमणूक, म्हणजे त्यात पैसा आहे ही संकल्पना जायला हवी. पर्यटन म्हणजे उद्योग, तेथील लोकांना रोजगार मिळवणारा उद्योग याकडे असे पाहिले पाहिजे. अधिक माणसांना समाविष्ट करणारा उद्योग मला हवाय. यासाठी सवलती देणे आवश्यक आहे. काही ठराविक मर्यादेत हे होणे आवश्यक आहे. यात आपल्या परिस्थितीचा विचार करायला हवा. प्रगती नक्कीच होणार याची मला खात्री आहे. एकंदरीत दृष्टिकोन सकारात्मक असावा. राष्ट्र म्हणून जी अस्मिता आहे ती जोपासली पाहिजे. शेवटी शहरी आणि ग्रामीण अशा दोन्ही पातळीवर समतोल साधता आला तर २०२०चे चित्र नक्कीच आशादायक आहे.

(विलासराव देशमुख : माजी उद्योग आणि महसूल मंत्री)

***

८० हून अधिक
वर्षे लोकांचे राहण्याचे आवडते ठिकाण
माधवाश्रम
प्रा. लि.
१८, पारेख स्ट्रीट, गिरगांव, मुंबई-४ फोन : ३८२२७६४/६५
• सर्वोत्कृष्ट लॉजिंगची व्यवस्था • मध्यवर्ती स्थान
• विनम्र सेवा • वाजवी दर

महाराष्ट्र : लँड ऑफ पॅराडॉक्स

सुनील देशमुख

पंचवीस वर्षे भारताबाहेर काढली असल्यामुळे अनिवासी भारतीयांचा एक प्रतिनिधी या भूमिकेतून महाराष्ट्राच्या भविष्याकडे पाहण्याचा हा प्रयत्न नाही तर एक जागतिक नागरिक म्हणून बुद्धिप्रामाण्यवादी दृष्टीने भावी काळातील महाराष्ट्राविषयी विचार करण्याचा हा प्रयत्न आहे. या विचारामागे मातृभूमीविषयीचे प्रेम व जिव्हाळा आहेच. फक्त भावनातिरेकाने हे विचार रंगलेले नाहीत एवढेच.

आज वैज्ञानिक प्रगतीमुळे सर्व जग जवळ येत असताना कोणत्याही देशाचा वा प्रांताचा विचार त्याच्यापुरत्या चौकटीत करणे योग्य ठरणार नाही हे उघड आहे. तो जागतिक संदर्भात करणेच आवश्यक आहे. म्हणूनच मराठी समाजाविषयीचे प्रेम विचार व कृती यांमधून व्यक्त करणाऱ्या माझ्यासारख्या अनिवासी मराठी व्यक्तीने केलेला विचार व्यवहाराला व वस्तुस्थितीला अधिक जवळचा असेल असे मला वाटते. मनात प्रेम व जिव्हाळा असूनही बाहेरून आजच्या महाराष्ट्राकडे पाहताना भविष्यातील त्याचे कोणते रूप माझ्यासारख्याच्या दृष्टीसमोर येते हे पाहिले तर भावी महाराष्ट्राविषयी विचार करताना ते उपयुक्त ठरेल असे वाटते. म्हणून तसा प्रयत्न पुढे करीत आहे.

कोणत्याही समाजाच्या भविष्याची बीजे त्याच्या वर्तमानातच असतात. आपण भविष्यात कोठे असू या विचाराची सुरुवात आज आपण कोठे आहोत ? काय आहोत ? या विषयाची प्रामाणिक व प्रांजळ चर्चा केल्याशिवाय होऊ शकत नाही. म्हणून सध्याचा मला दिसणारा महाराष्ट्र कसा आहे या विषयीची माझी निरीक्षणे मी प्रथम देत आहे. मला सामाजिक कार्याविषयी नितान्त आस्था आहे आणि वर्षातून तीन-चार वेळा मी महाराष्ट्रात येत असतो. या वास्तव्यात येणाऱ्या अनुभवाच्या आधारेच हे अनुभव मी मांडीत आहे. त्यात अपुरेपणा असू शकेल. परंतु 'हा तर अमेरिकेत राहणारा, याला इथले काय माहीत ?' असे म्हणून न पटणारे मुद्दे वा अप्रिय वाटणारे वास्तव झटकून टाकू नये, ही विनंती. प्रामाणिक मतभेद तर मित्रांमध्येही असू शकतात, ही बाब तशी सर्वमान्यच आहे. पंचवीस वर्षांनंतरचा महाराष्ट्र घडविणारी आजची तरुण पिढी (वय वर्षे २५-३०) कोणती मानसिक संदर्भरेषा बाळगून आहे ? त्यांचा अनुभव व 'मराठी बाणा' कसा आहे ? यावरच पुढील दिशा ठरणार असल्यामुळे सध्याच्या परिस्थितीचे अवलोकन महत्त्वाचे आहे असे मला वाटते.

आज

- दैनंदिन सामाजिक जीवनात दांभिकता, दुतोंडी, आपमतलबी भ्रष्ट वर्तन सर्रास होत आहे.

- आम्ही धार्मिक, आध्यात्मिकतेला महत्त्व देणारे आहोत अशी शेखी मिरविणारा समाजातील एक स्तर कमालीचा चंगळवादी झाला आहे.

- आपल्या पूर्वदिव्याच्या भुलावणीत समोरच्या वास्तवाकडे पूर्ण दुर्लक्ष करण्याचे दांभिक वर्तन साळसूदपणे चालू आहे.

- दोन दोन तास रांगेत उभे राहून देवाला भावूकपणे नमस्कार करणारा माणूस देवळातून बाहेर पडताच नंबर एक-नंबर दोन पैशाचे व्यवहार करणे, लाच घेणे, कर चुकविणे यासारख्या व्यवहारात उत्साहाने भाग घेतो. या वर्तनात त्याला कोणतीही विसंगती दिसत नाही.

- सुशिक्षितांची मानसिकता एक पाऊल एकविसाव्या शतकात तर दुसरे सतराव्या शतकात अशी आहे.

- राजकारणाला कोणतेही गांभीर्य वा नैतिकमूल्य राहिलेले नाही. सत्तेच्या राजकारणासाठी धर्मांधता व जातियता यांचे विष समाजात पसरविण्यात काही गैर आहे, असे कोणालाही वाटताना दिसत नाही.

- गेल्या तीस-चाळीस वर्षांत मराठी उद्योजकात म्हणावी तशी भर पडलेली दिसत नाही. किरकोळ धंद्यापलीकडे मराठी माणसाची मजल गेलेली दिसत नाही. अजूनही नोकरी हेच ध्येय आहे.

- आज समाजात कुपोषण असले तरी उपासमार नाही. संवादसाधने व यांत्रिक सुखसोयी सर्वसामान्यांपर्यंत काही अंशी पोहोचत आहेत.

- भयानक लोकसंख्यावाढीमुळे झालेल्या सुधारणा अपुऱ्या ठरत आहेत. परंतु लोकसंख्येला आळा घालण्याची सामाजिक वा राजकीय इच्छाशक्ती कोणाहीपाशी दिसत नाही.

- आजची तरुण पिढी हुशार व चटकन नवे शिकणारी आहे, परंतु समाजातील नैतिकमूल्यांच्या ऱ्हासामुळे झटपट पैसा मिळविणे हीच या पिढीची मानसिक बैठक आहे.

- या वातावरणात समाजसेवा हादेखील एक व्यवसाय बनू पाहत आहे. अनेकदा तथाकथित समाजसेवा करणाऱ्या संस्था ताजमध्ये बैठक घेऊन व ७०% एक्स्पेन्स रेशो दाखवून दुर्बलांची 'सेवा' करताना

दिसतात. देणग्या देणारे परदेशी बकरे मिळविणे हेच अनेकदा त्यांचे ध्येय असते, असे स्थानिक मंडळी बोलत असतात.

– ही आजच्या महाराष्ट्राची स्थिती आहे. कोणत्याही सर्वसाधारण अवलोकनाला बरे-वाईट अपवाद असतात हे खरे, परंतु एखाद्या समाजाचे समाज म्हणून Characterization करताना केवळ अपवाद दाखवून अवलोकन खोडून काढता येत नाही. आपल्या उणिवा प्रांजळपणे मान्य केल्या तरच त्या दूर करून वरची पायरी गाठण्याचे मार्ग दृष्टीस पडतात. म्हणूनच थोडेसे कटू वाटणारे सत्य येथे स्पष्टपणे मांडले आहे.

असा हा आजचा महाराष्ट्र जागतिक संदर्भात वावरत असल्यामुळे उद्या कसा दिसेल असा विचार करू लागलो तर, पुढील चित्र डोळ्यांसमोर येते.

– अमेरिका विरुद्ध रशिया, चीन इ. जुने वाद संपून, नवीन संघर्ष मूलतत्त्ववाद विरुद्ध सर्वधर्मनिरपेक्ष लोकशाही असा नाही.

– जागतिक बाजारपेठा, तंत्रज्ञान आणि आधुनिक उत्पादनपद्धती यांच्याशी संलग्न अशा अर्थव्यवस्थेतच पुढील पिढी वाढेल. त्यामुळे महाराष्ट्राचे वाढते शहरीकरण अटळ राहील.

– संवादसाधने व संगणक यांच्या प्रगतीच्या या युगात मराठी वैज्ञानिक व संगणकतज्ज्ञ जगभर जाऊन त्या त्या जागी महत्त्वाची कामे करतील व महत्त्वाची पदेही मिळवितील.

– जागतिक बाजारपेठेशी संलग्न असल्याचा Trickle own effect म्हणून तंत्रज्ञान-संवादसाधने इत्यादींचे फायदे आर्थिकदृष्ट्या खालच्या स्तरावर असणाऱ्या समाजालाही मिळतील.

– भावी काळात महाराष्ट्र ही आंतरराष्ट्रीय कंपन्यांची एक मोठी Assembly Line Factory होण्याचा संभव आहे. त्यायोगे भौतिक प्रगतीत भर पडेल. परंतु त्याचबरोबर परदेशाचे आकर्षण वाढत राहील. उच्चवर्णीय मंडळी शक्यतो परदेशी स्थायिक होण्यासाठी उपयुक्त असणाऱ्या व्यवसायांवर भर देतील. सामाजिक जाणीव, संस्कृती याविषयी त्यांना काही देणे-घेणे नसेल.

– प्रदूषणाचे दुष्परिणाम ग्रामीण भागापर्यंत पोहोचतील. सध्याच्या प्रदूषणाकडे दुर्लक्ष करणाऱ्या पिढीला 'करावे तसे भरावे' या न्यायाने प्रदूषणाचे दुष्परिणाम भोगावे लागतील. साठविलेला पैसा त्यांचे दुःख दूर करू शकणार नाही.

– जागतिक बाजारपेठेचा घटक होत असताना कोणत्याही मार्गाने चटकन पैसा मिळविण्याची वृत्ती वाढत राहील. विज्ञान, संगणक व उद्योगयोजना यासाठी इंग्रजीचा वापर वाढत राहील. परिणामी मराठीतून सांस्कृतिक प्रश्नावर विचारमंथन करण्याची प्रथा क्षीण होत जाईल. आधुनिकतेच्या अर्धवट हव्यासामुळे मराठी संस्कृतीचे वैशिष्ट्य भावी काळात धोक्यात येण्याची शक्यता आहे.

– भावी काळातील आधुनिकतेच्या प्रक्रियेत कुटुंबव्यवस्था शिथिल होऊन पाश्चात्य देशांप्रमाणे घटस्फोट, विवाहाशिवाय एकट्या स्त्रीला मातृत्वाचा अधिकार यांसारख्या बाबींचा समाजाला बाऊ वाटणार नाही. त्या त्याच्या अंगवळणी पडतील. स्त्री-स्वातंत्र्याच्या कक्षा विस्तारताना पुरुषप्रधान संस्कृतीच्या पुरस्कर्त्यांचे व धर्मांध मूलतत्त्ववाद्यांचे हिंसक अत्याचार होण्याची शक्यताही नाकारता येत नाही. संवादसाधने व प्रसारमाध्यमे यांच्यामुळे बिनचेहऱ्यांच्या जागतिक संस्कृतीचे जे आक्रमण या समाजावर होईल त्याला प्रतिक्रिया म्हणून या जागतिकीकरणाचा फायदा न मिळालेले घटक संघटितरीत्या हिंसक/अतिरेकी वर्तन करण्याचीही शक्यता आहे. अफगाणिस्तानातील तालेबानच्या वर्तनाशी याची तुलना करता येईल. केवळ उत्पादनयंत्रणेची घटक झालेली माणसे आणि प्रतिक्रियावादी, मूलतत्त्ववादी लोक यांच्या मिश्रणामुळे महाराष्ट्रातील उरलेसुरले सुधारक नेतृत्वही नष्ट होईल. नैतिकमूल्ये व सामाजिक जाणीव यांचा संस्कार नसलेली आजची तरुण पिढी त्यांच्या मध्यमवयात दिशाहीन, भोगवादी व केवळ क्षणिक फायद्याच्या मागे धावणारी झाली नाही तरच नवल.

जागतिकीकरणाकडे सांस्कृतिक आक्रमण म्हणून पाहणे हे न्यूनगंडाचे लक्षण आहे हे खरे. परंतु जगाला देण्यासारखे आपल्या संस्कृतीत काही आहे हा आत्मविश्वास आजच्या तरुण पिढीने गमावला आहे. धर्म व संस्कृती संवर्धनाच्या नावाखाली आज भोवताली काय काय धंदे चालले आहेत हे न कळण्याइतके आजचे तरुण बिनडोक नाहीत. त्यामुळेच हा तरुण cynical झाला आहे. म्हणून उत्पादनयंत्रणेचा कार्यक्षम घटक म्हणून तरुण पिढी काम करील, परंतु सामाजिक संवेदनशीलतेच्या अभावी कोणतीही सक्रिय भूमिका त्यांच्याकडून घेतली जाईल असे वाटत नाही.

सारांश, बुद्धिवादी, विचारवंत, समाजाला दिशा दाखविणारे समाजसुधारक यांची परंपरा असणारी भूमी हे महाराष्ट्राचे वैशिष्ट्य भावी काळात नष्ट होईल. मूल्यांच्या नावे उदोउदो खूप झाला तरी प्रत्यक्षात स्वच्छ आचरण, सामाजिक बांधिलकी या गोष्टी मृतप्राय होण्याचा संभव आहे.

भावी काळात हा समाज आपली सर्व वैशिष्ट्य नष्ट झालेला एक भोगवादी मानवसमूह म्हणून जगेल. हजार वर्षांत जोपासलेल्या संस्कृतीचा पंचवीस वर्षांत असा विनाश ओढवणे हा एक ऐतिहासिक विक्रमच म्हणावा लागेल. परंतु या ऱ्हासाची बीजे आपणच गेल्या पंचवीस वर्षांत पेरली आहेत हे लक्षात घेणे आवश्यक आहे.

या सर्व काळ्या पार्श्वभूमीवर काही गोष्टी मात्र चांगल्या होतील असे वाटते. आजच्या भ्रष्टाचारी वातावरणाकडे बघता या खालची पातळी असू शकेल असे वाटत

नाही. म्हणून जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे भविष्यात थोडीतरी आशा आहे असे म्हणता येईल. बेकायदेशीररीत्या मिळविलेली व भारताबाहेर काढलेली १२५ U.S. Billion dollars (६०,००० कोटी रुपये) एवढी संपत्ती स्वित्झर्लण्ड, जगभरची Taxhaven बेटे, इंडोनेशिया, नेपाळ इत्यादी ठिकाणी दडविलेली आहे. येत्या १०-१२ वर्षांत जागतिक व विशेषत: पाश्चात्य नैतिक दबावामुळे हा पैसा उघड करणे भाग पडेल. या खोट्या व्यवहारात गुंतलेले उद्योजक, सरकारी अधिकारी व राजकारणी उघडे पडतील. परिणामी सध्याचे माफिया-राजकारणी nexus संपुष्टात येण्याचा संभव आहे.

जागतिक पातळीवरील न्याययंत्रणेशी गाठ पडल्यामुळे अशा काळ्या व्यवहारांना आळा बसेल.

नेट वर्थ अकॉंटिंग (Net Worth Accounting) नावाच्या पद्धतीने पूर्वी अमेरिकेत व अलीकडे इटालीमध्ये आयकर व गुप्तचर खात्याच्या साहाय्याने माफियाचा पराभव केला. हे काम शक्तीपेक्षा युक्तीने झाले. जागतिकीकरणाच्या या युगात अमेरिकेसारखी प्रगत राष्ट्रे पुढाकार घेऊन माफियाचा पराभव करण्यासाठी भारतीय प्रशासनाला मदत करतील. जागतिक पातळीवरील कायदे, संगणकाचा वापर व त्यामध्ये होत असणारी प्रगती यामुळे आर्थिक व्यवहारात पारदर्शकता येऊन बेकायदा व्यवहार करणे कठीण होऊन बसेल.

परंतु या सर्व व्यवस्थेत अतिआग्रही अशा राजकारणाचे दिवस संपलेले असतील.

राष्ट्रवाद ही संकल्पना भावी काळात बरीचशी अर्थहीन होऊन अर्थकारणच प्रभावी राहील.

कदाचित अर्थकारण व राजकारण यांचा संबंध नसणारी, राजकारण गौण असलेली अशी इटालीसारखी एक working order येथे निर्माण होऊ शकेल.

अशा व्यवस्थेत जातिव्यवस्था संपेल असे भविष्य कोणी वर्तवू शकणार नाही. परंतु ती सौम्य होऊ शकेल. दलितांना देण्यात येणाऱ्या सवलतींना/उत्तेजनाला सुरुवातीच्या काळात अमेरिकेतही विरोध झाला. पण गेल्या तीस वर्षांत तो प्रश्न सुटण्याच्या मार्गावर आहे. त्याचीच सौम्य आवृत्ती महाराष्ट्रात संभवते. तथापि याचे श्रेय लोकांच्या सामाजिक संवेदनशीलतेपेक्षा जागतिक बाजारपेठेच्या न्याय्य धोरणाला द्यावे लागेल. पैशाला रंग व जात नसते ही कदाचित सर्वांत चांगली गोष्ट ठरेल.

येत्या दहा वर्षांत दलितांची शैक्षणिक पातळी वाढेल. त्यांची भौतिक प्रगती होईल. उत्पादन यंत्रणेचे ते चांगले घटक बनतील आणि त्यामुळे समाजातील सौहार्दात वाढ होईल. तथापि आतापर्यंत दिशाहीन, नेतृत्वहीन असलेल्या दलित समाजाकडून प्रगतीची फार मोठी अपेक्षा करता येईल असे दिसत नाही. शिवाय धर्मांध, मूलतत्त्ववादी प्रवृत्ती त्यांच्या प्रगतीच्या आड येण्याची शक्यता आहेच.

महाराष्ट्र हा Land of Paradox आहे. पुरोगामी ध्येयवादी चळवळीत मराठी विचारवंतांनी राष्ट्रीय स्तरावर कामगिरी केली हे ऐतिहासिक सत्य एका बाजूला तर याच भूमीत धर्मांध मूलतत्त्ववादी, निमफॅसिस्ट संघटनांचाही उदय झाला ही वस्तुस्थिती दुसऱ्या बाजूला असे हे चित्र आहे. असे दुहेरी व्यक्तिमत्त्व असणाऱ्या या भूमीकडून पुढील पंचवीस वर्षांत काय अपेक्षा करावी? वाढते यांत्रिकीकरण व आजची नैतिक पातळी या गोष्टी ध्यानात घेतल्या तर वैचारिक पातळीवर काही नवे घडेल असे वाटत नाही. आंतरराष्ट्रीय उद्योग समूहांच्या भूमिकांमुळे येणारी किमान समाजसुधारणेची धोरणे सोडली तर पुरोगामी असे काही होईलसे वाटत नाही. तरीही भोगवादी जीवनपद्धती व प्रसारमाध्यमांमुळे येणारे धार्मिक/आध्यात्मिक क्षेत्रातील औदासिन्य पाहून सांस्कृतिक ऱ्हासाच्या भीतीमुळे अतिरेकी, दहशतवादी हिंसक कृती करण्याची शक्यता दृष्टीआड करता येत नाही.

अशा महाराष्ट्राशी अनिवासी मराठी माणसांचा संबंध कसा असेल? भावी पंचवीस वर्षांत संगणकतज्ज्ञ, यंत्रविशारद व वैज्ञानिक असणारे अधिकाधिक मराठी तरुण परदेशात स्थायिक होऊ पाहतील. शहरी १०% घरातील एक तरी व्यक्ती परदेशात असेल. या अनिवासी मराठी पिढीचे महाराष्ट्राशी असणारे आदान-प्रदान व्यावहारिक पातळीवरचे व हलकेफुलके राहील. त्याला विशेष वैचारिक पातळी असणार नाही. महाराष्ट्रात मूलतत्त्ववादी धार्मिक चळवळीचा जोर झालाच तर काही अनिवासी मराठी त्याला आर्थिक साहाय्यही करतील. अमेरिकेतून खलिस्तानला लाभणाऱ्या पाठिंब्यासारखे हे असेल.

अनिवासी मराठी व्यक्तींनी उद्योगधंदा काढायचा प्रयत्न केलाच तर राजकारण वा शासन यंत्रणेत घट्ट पाय रोवलेल्या नातेवाईक-मित्रांच्या जोरावरच हे होऊ शकेल. काही हितसंबंध नसलेला प्रामाणिक मराठी तरुण केवळ कर्तृत्वावर महाराष्ट्रात धंदा उभा

(पुढील मजकूर पान ११७ वर)

आपल्या जीवाशी होणार
खेळ थांबवा
आजकाल आजार म्हटलं की संपूर्ण शारीरिक तपासणी, भरमसाठ औषधे, हेवी डोसेस आणि अदृष्य दूरगामी साईड इफेक्टस्. या साऱ्यातून मुक्त व्हा अन् स्वीकारा आगोमचा घरचा वैद्य (औषधी संच) गोड गोळ्यांच्या स्वरूपातील घेण्यास सुलभ अन् रूचकरही सोबत मार्गदर्शक पुस्तिका.
✦ सर्दी ✦ खोकला
✦ ताप ✦ अपचन
इत्यादी ५० /५२ विकार घरच्या घरीच थोपवा
विश्वास नाहीना बसत? मग आजच आपल्या औषध विक्रेत्याकडे मागा
सर्वत्र उपलब्ध
माहितीपत्रक मोफत मागवा.
गुटिका केशरंजनाचे निर्माते
आगोम कोळथरे - ४१५ ७१२.
आगोम
घरचा
वैद्य
(औषधी संच)
निरोगी समृध्द जीवनासाठी आगोम

कायदा श्रद्धेचा विषय व्हावा

न्या. अशोक देसाई

एकदा चीनचे सर्वेसर्वा माओत्से तुंग यांना विचारण्यात आले की, "१७८९च्या फ्रेंच क्रांतीचा जागतिक राजकारणावर काय परिणाम झाला?" त्यावर त्यांचे उत्तर होते, "It is too early to say."

पंचवीस वर्षांनी महाराष्ट्र कसा असावा याचे आदर्श चित्र रंगविता येईल. ते सोपेही आहे. परंतु तो वास्तविक कसा राहील हे नेमके सांगणे कठीण व्हावे इतक्या वेगाने जागतिक घडामोडी होत आहेत. इतकेच नव्हे तर २०२०मध्ये जरी कुणाला हा प्रश्न विचारला तरी त्याचे निश्चित उत्तर देता येणार नाही.

१९६५ साली याच विषयावर श्री. विष्णुपंत वेलणकर यांनी लिहिले होते की, २५ वर्षांनंतर महाराष्ट्र हिंदुस्थानचे लँकेशायर होईल. महाराष्ट्र भारतातील प्रगतीशील राज्य आहे. परंतु लँकेशायर होण्याइतकी संपूर्ण राज्याची प्रगती आजही झालेली नाही. २५ वर्षांनंतर महाराष्ट्राची राजधानी मुंबई ही बहुतेक हाँगकाँग, सिंगापूर यांच्यापेक्षाही मोठे आर्थिक आणि व्यावसायिक घडामोडींचे केंद्र ठरेल. महाराष्ट्र प्रगतीचा उच्चांक गाठेल. सार्वजनिक नव्हे तर वैयक्तिक घडामोडीसुद्धा संगणकाद्वारा संचालित केल्या जातील.

सध्या भारत हे भ्रष्टाचारात पहिल्या दहा राष्ट्रांमध्ये समाविष्ट आहे. या देशातला भ्रष्टाचाराचा वेग अधिक वाढत जाऊन २५ वर्षांनंतर कदाचित ते पहिल्या क्रमांकावर येईल. हे यश मिळविण्यात महाराष्ट्राचे आवश्यक ते योगदान निश्चितच राहील. एडस्ग्रस्तांच्या संख्येतसुद्धा महाराष्ट्राची राजधानी मुंबई ही उच्चांक गाठील.

कोल्हापूर, सोलापूर, नागपूर येथून मुंबईला भेट द्यायला येणाऱ्यांना आपण परदेशात आलो आहोत असा भास होईल. मुंबई महाराष्ट्रातच राहील, पण 'महाराष्ट्र' मुंबईतून अदृश्य होईल. २१व्या शतकातील पिढीला 'ऑगस्ट क्रांती' याच शहरात घडली हे कदाचित पटणार नाही आणि क्रांतिसूर्य लोकमान्य टिळकांनी 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळविणारच' हा मंत्र महाराष्ट्राच्या भूमीवरूनच दिला, याचे कसलेच भान पुढच्या पिढीला राहणार नाही.

कायदा ही संस्था सार्वत्रिक आहे. भावना किंवा स्वप्न यांसारखी ती सापेक्ष गोष्ट नाही. आंतरराष्ट्रीय आर्थिक नीतीचा निश्चित परिणाम होणार आहे. महाराष्ट्र हा जागतिक घडामोंडीवर आणि जडणघडणीवर अवलंबून राहील. कॉपीराईट नसावा असे म्हणणे लोकप्रिय आहे. पण त्यामुळे प्रगती होणार नाही. प्रगतीचे दरवाजे आपण बंद करणार आहोत का? आपण कोणती भूमिका घेणार आहोत, ते प्रथम आपल्याला निश्चित करावे लागेल.

'पैसा हा माणसाला मोजण्याचा मापदंड आहे' असे जर आपण म्हटले तर आपल्याला आजच्या पोलिसांचेच काय पण तुकारामाचेही कठीण आहे हे लक्षात येईल. पोलिसांवर असलेला कामाचा प्रचंड ताण लक्षात घेतला तरीही काम जबाबदारीने केले तर सुधारणेला भरपूर वाव आहे हे लक्षात येईल. तुंबलेले खटले जादूची कांडी फिरावी तसे एका दिवसात हातावेगळे होणार नाहीत हे खरे, पण आपल्याला जे करणे शक्य आहे ते तरी आपण जबाबदारीने करावे अशी अपेक्षा करू नये काय? प्रत्येकाने आपली जबाबदारी - थोडक्यात मूल्यांशी बांधिलकी याला महत्त्व दिले तर असंख्य अडचणी आपण दूर करू शकतो.

कायदा हा श्रद्धेचा विषय व्हायला हवा. जशी आई समोर असो किंवा नसो तिच्याविषयी आपल्या मनात श्रद्धा असते, तशीच कायद्याविषयी आपल्या मनात श्रद्धा असायला हवी. पोलीस दिसल्यावर कायदा पाळणे म्हणजे कायद्याबद्दलचा आदर व्यक्त करणे नव्हे. कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्याला कायद्याहूनही अधिक महत्त्व मिळते. तेव्हा ते भ्रष्टाचाराला दिलेले निमंत्रण असते. कायदा विरुद्ध फर्मान आणि उजवा विरुद्ध डावा हा काही कायदा नव्हे. लोकशाहीवरील श्रद्धा हीच कायद्याची शक्ती आहे. लोकशाही समर्थ असेल तर कायदाही समर्थ असू शकेल. आपण पुढच्या २५ वर्षांत कायदा हा श्रद्धेचा विषय केला नाही तर महाराष्ट्रात सर्वत्र 'उल्हासनगर' झालेले आपल्याला पाहावे लागेल. समाजाचे रक्ताभिसरण हे कधीही कायद्याच्या भरवशावर सोडू नये. समाजपरिवर्तनाचे काम कायदा करू शकत

(महाराष्ट्र : लँड ... पान ११५ वरून)

करू शकणार नाही. अनिवासी मराठी माणसांना तसे करण्यात फारसा उत्साहही नसेल. अधूनमधून नातेवाईक-मित्रांना भेटायला येण्यापलीकडे त्यांचा सहभाग किरकोळच राहील. सध्याचे अनिवासी मराठी लोक migratory birds प्रमाणे हिवाळ्यात पुणे-मुंबईत येतील, पण वयोमानाप्रमाणे पुढे तेही जमणार नाही. इच्छा असूनही हे संबंध हळूहळू नष्ट होतील. त्या त्या देशाच्या melting pot संस्कृतीत ते विलीन होतील.

आज आहे त्याच गतीने वाटचाल सुरू राहिली तर हे चित्र अटळ आहे. परंतु या परिस्थितीची जाणीव गेल्या काही वर्षांत महाराष्ट्रात होत आहे असे दिसते. सांस्कृतिक वारसा, पर्यावरणाचे संरक्षण, प्रबोधनाची निकड, एकांतिक अभिमान टाळणारी मराठी भाषेविषयीची आस्था याविषयी क्षीण स्वरूपात का होईना आज जाग येताना दिसत आहे. या सर्व चळवळींना योग्य असे नेतृत्व निर्माण झाले तर, हे सर्व चित्र बदलू शकेल. महाराष्ट्रात प्रचंड सुप्त शक्ती आहे. आधुनिक युगात येण्यासाठी आवश्यक असणारी बुद्धिमत्ता, कष्ट करण्याची जिद्द हे सर्व आहे. पण या महाराष्ट्राला आज गरज आहे एका नव्या प्रबोधन युगाची! ते युग अवतरले तर महाराष्ट्राचे चित्र इतरांनी हेवा करावा असे असेल.

दीपावली अभिष्टचिंतन
एम. के. मानकामे यांचे
एकविरा ज्वेलर्स
गोल्डस्मिथ
चोख सोने व चांदीचे व्यापारी
५, ड्रीमलँड, शॉप नं. ३, स्टेशन रोड, गोरेगाव (पूर्व),
मुंबई - ४०० ०६३. फोन : ८७२ ७६०२.

हे चित्र कसे हवे ते ठरविणे काही दैवाधीन नाही, ते मराठी तरुणांच्याच हाती आहे. म्हणून २०२० मध्ये महाराष्ट्र कसा असेल याचे खरे उत्तर 'मराठी माणसे घडवतील तसा' हेच आहे.

(सुनील देशमुख : परदेशस्थ भारतीय उद्योगपती, कायदेतज्ज्ञ, 'महाराष्ट्र फौन्डेशन' संस्थेचे उपाध्यक्ष)

***

नाही, ते काम समाजानेच करायला हवे. समाजाने केलेले काम कायदा फक्त बांधून ठेवील. विचार किंवा मतपरिवर्तन कायदा करू शकणार नाही. कायदा वाल्याला शिक्षा करू शकतो, पण तो त्याला वाल्मिकी करू शकत नाही. 'नारद' ही समाजशक्ती आहे. पुढील २५ वर्षांत महाराष्ट्रातील समाज कायदा आणि न्यायव्यवस्था यांचे महत्त्व आणि मौलिकता ओळखण्याएवढा विवेकशील होईल, अशी मी आशा करतो.

नऊवारी साडी, धोतर, पगडी-पागोटे इ. गोष्टी विदूषकी पोषाखातील लक्षणीय गोष्टी म्हणून ओळखल्या जातील. सदेह वैकुंठाला जाणारे ज्ञानसागर संत तुकाराम हे तांत्रिक शक्तीचे अधिकारी समजले जातील. तर क्रांतिसूर्य जोतिबा फुले यांची ओळख महाराष्ट्र ठेवणार नाही. २१व्या शतकातील भावी पिढ्यांना आचार्य विनोबा भावे म्हणजे पायी फिरण्याची आणि साने गुरुजी म्हणजे गोष्टी सांगण्यांची हौस बाळगणारी मुलुखावेगळी माणसे म्हणून कदाचित माहिती होतील. तसेच सहकाराचा मंत्र महाराष्ट्राच्या भूमीत रुजविणारे वसंतदादा पाटील अव्यवहारी ठरतील. निवडणूक लढविण्यापेक्षा ती विकत घेण्यावरच या क्षेत्रातील लोकांचा भर राहील. त्यामुळे लोकसंचय किंवा लोकांमधला लौकिक बाळगणे, जपणे निरर्थक ठरेल. चित्रमहर्षी भालजी पेंढारकर आणि चित्रपती शांतारामबापू यांची कलात्मक अस्मिता इतिहासजमा होईल. लता मंगेशकर, आशा भोसले यांच्या भावगीतांशी महाराष्ट्राचे भावविश्व निगडित होते हे २१व्या शतकातील पिढीला सांगूनही खरे वाटणार नाही. साधी राहाणी आणि उच्च विचारसरणीचे प्रतीक असणारे महात्मा गांधी या शतकात आराध्य दैवत होते. उद्याच्या पिढ्यांचे आराध्य दैवत एखादा पॉप सिंगर असेल.

२१व्या शतकात कदाचित बाजीप्रभूला पावनखिंड लढवतच राहावी लागेल आणि इतर लोकच गडावर पोहोचतील. म्हणून आज म्हणायचे ते एवढेच की,

'प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा.'

(न्या. अशोक देसाई : मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती)

***

ROCK GARDEN NURSERY
Shiv Kiran Co-op Hsg. Socy. Ltd,
Dr. Annie Besant Road
Opp: Glaxo, Worli,
BOMBAY 400025
Phone: 4949383
One of the biggest in town for: Outdoor, In door & decorative plants, BONSAI, CACTI!, ORCHIDS, Water-falls, landscapping, designing and maintenance of gardens.
Plants available on rental basis for offices, show-rooms and functions
Prop: KUMAR BHATIA

राज्यातून काँग्रेस संपण्याचा धोका

विठ्ठलराव गाडगीळ

महाराष्ट्रातील काँग्रेस पक्षाचे सध्याचे नेतृत्व आणि पक्षसंघटनेचे स्वरूप यामध्ये आमूलाग्र बदल न झाल्यास, पुढील पंचवीस वर्षांत त्याचे राज्यातील अस्तित्व नाममात्र उरेल. पश्चिम बंगाल आणि तामिळनाडू या राज्यांमध्ये १९६७ पासून काँग्रेस सत्तेच्या आसपासही पोहोचू शकलेली नाही. हीच लक्षणे महाराष्ट्रातही दिसून येत आहेत.

१९९० सालच्या विधानसभा निवडणुकीत या वाटचालीची चाहूल लागलेली होती, परंतु त्यापासून वेळीच योग्य बोध न घेतल्याने आजची स्थिती निर्माण झाली आहे.

माझ्या माहितीनुसार महाराष्ट्रात मराठा समाज साधारणपणे २८ टक्के आहे. अन्य कोणत्याही समाजाचे लोकसंख्येमध्ये एवढे प्राबल्य नाही. या समाजाच्या हाती बहुसंख्य साखर कारखाने, जिल्हा बँका, जिल्हा परिषदा अशी सत्ता एकवटली आहे. मंडल आयोगाच्या शिफारशींच्या स्वीकारानंतर काँग्रेस पक्षातील अन्य मागासवर्गीय समाजातील नेत्यांना मनापासून आनंद झाला होता. यावरून मराठा वर्चस्वाची भावना किती खोल गेली होती हे दिसून येते. शिवसेना-भारतीय जनता पक्ष यांच्याकडील नेतृत्व प्रामुख्याने मराठेतर समाजातील आहे, ही बाब ध्यानी घेतली पाहिजे.

दुसऱ्या बाजूला मराठा समाज एकसंधपणे काँग्रेसच्या मागे उभा आहे, असेही दिसत नाही. परिणामी दोन्ही पक्ष-मराठे आणि मराठेतर काँग्रेसपासून दुरावत आहेत. या बदलाची नोंद राज्यातील नेतृत्वाने घेतल्याचे दिसत नाही. "जोशी-महाजनांचं राज्य आलं" या स्वरूपाची टीका करून जुना ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद उकरून काढणे शहाणपणाचे लक्षण नाही. सद्य:स्थितीत सामाजिक, राजकीय आणि प्रशासकीय पातळीवर ब्राह्मणांचा वरचष्मा राहिलेला नाही ही वस्तुस्थिती आहे. यापुढच्या काळात ब्राह्मण विरोध हा राजकीय अजेंड्याचा विषय नसेल हे ध्यानी घेण्याची गरज आहे. परंतु विश्वासार्हता गमावलेल्या नेतृत्वाने या बदलांची दखल पुरेशी घेतलेली नाही.

जातीच्या आधारावरील राजकारण यापुढे जास्तीत जास्त दहा वर्षे चालू शकेल. उत्तर भारतात मागासवर्गीयांचे राजकारण यादवांनी काबीज केल्याने कुर्मी, कोयरी या जाती त्यांच्यापासून अलग होत आहेत. जातीवर आधारित राजकीय पक्ष आणि राजकारण यांच्या अशाच चिरफळ्या उडणे अटळ आहे. त्यामुळे पुढील दहा वर्षांत वर्ग म्हणून अनेक समाजघटकांचे हितसंबंध एकत्र येतील. हिंदुस्थानात ७० टक्के समाज शेतीवर अवलंबून असतानाही राजकारणामध्ये शेतकऱ्यांचे वर्चस्व निर्माण झाले नाही. कारण ऊस उत्पादक, कापूस उत्पादक, तेलबियांचे पीक घेणारे शेतकरी, धान्य उत्पादक यांचे हितसंबंध वेगवेगळे आहेत. भविष्यात मात्र वर्गावर आधारित राजकारणाची अपरिहार्यता लोकांच्या ध्यानी येईल.

महाराष्ट्रातील काँग्रेसचा पाया कमकुवत होण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे नागरीकरणाचा वाढता वेग. पूर्वी मुंबईसारख्या शहरातील कामगार गावाकडे आला की काँग्रेसशी नाते जोडत असे. शहरात भले तो अन्य कुठल्याही पक्षात असो. ही परिस्थिती झपाट्याने बदलली आहे.

१९८१ ते १९९१ या दहा वर्षांत राज्यात शेतकऱ्यांची संख्या २१ टक्क्यांनी कमी झाली. एवढ्या वेगाने शहरीकरण पसरते आहे. त्यामुळे शहरीकरणाच्या अनुषंगाने येणाऱ्या समस्या — शिक्षण, आरोग्य, वाहतूक, निवारा किंवा घरबांधणी, भावी काळात वाढणार. त्याबरोबरच शहरीकरणाचे दोष राजकारणात येणार, उदाहरणार्थ गुन्हेगारी, माफिया टोळ्यांचे वर्चस्व. पुण्याच्या आसपास अशी लाट आल्याचे स्वच्छ दिसून येते. स्वप्नातही कल्पना केली नसेल अशा दराने शेतजमिनी विकून हजारो कुटुंबे धनवान झाली आणि हाती आलेला पैसा उधळून कफल्लकही बनली. या प्रक्रियेचे झालेले गंभीर परिणाम आपण अनुभवत आहोत. मुंबईच्या गुन्हेगारीने शिकागोशी बरोबरी केली आहे. तेच लोण पुण्यातही येत आहे. औद्योगिकीकरण-शहरीकरण आणि शेती यामध्ये समतोल साधणारी फ्रान्सची अर्थनीती आपण स्वीकारण्याची गरज आहे.

सहकार चळवळ आणि पंचायत राज्य व्यवस्था यांना एक निश्चित राजकीय वळण यशवंतराव चव्हाणांनी दिले होते. त्यामुळे काँग्रेसची ही दोन शक्ती केंद्रे होती. परंतु ही दोन्ही आयुधे आता काँग्रेसवर उलटत असल्याचे दिसते. गेल्या वर्षीपर्यंत सर्व जिल्हा परिषदा काँग्रेसकडे होत्या. या वेळी ११ जि. प. काँग्रेसच्या विरोधात आहेत. याचा परिणाम विधानसभा आणि लोकसभा निवडणुकांवर होणे अटळ आहे. जळगाव आणि शिर्डी या दोन मतदार-संघात काँग्रेसच्या तिकिटावर निवडून आलेल्या आमदारांनी राजीनामे देऊन शिवसेनेच्या तिकिटावर विजयी होणे याचा अर्थ काँग्रेसचा पारंपरिक मतदार दुरावला आहे.

सहकारी चळवळीतही भाजप आणि विशेषत: सेना शिरकाव करीत आहे. मराठवाड्यातील किल्लारी साखर कारखाना सेनेच्या ताब्यात गेला ही बाब दुर्लक्ष करण्याजोगी नाही. पुणे जिल्ह्यातही काँग्रेसची पॅनेल कमी मतांच्या फरकाने साखर कारखान्यांच्या निवडणुकीत विजयी झाली. सहकारी चळवळीतील महत्त्वाचा दोष हा की संस्थांचे चालक मोठ्या प्रमाणावर गैरप्रकारात गुंतलेले असल्याने ते सरकारचे मिंधे बनतात.

सहकारी चळवळ सत्तेच्या राजकारणापासून दूर करण्याची जाणीव

राज्यात दिसून येत नाही. कारण संस्था चालक आणि सत्ताधारी यांचे हितसंबंध परस्परात गुंतलेले आहेत. कित्येक आजारी साखर कारखान्यांचे चालकही सरकारकडेच डोळे लावून असतात, कारण राजकारण करण्यासाठी लागणारे इन्फ्रास्ट्रक्चर म्हणूनच ते सहकारी चळवळीकडे पाहतात.

महाराष्ट्रात काँग्रेस पक्षाला जेधे-गाडगीळ ते यशवंतराव अशी वैचारिक परंपरा होती, ती आता लुप्त झाली आहे. पूर्वी पक्षाच्या अधिवेशनानंतर प्रतिनिधी आपापल्या भागात सभा घेऊन निर्णयांची, ठरावांची माहिती जनतेला देत असत. पक्षाची शिबिरे होत असत. महत्त्वाचे धोरणात्मक निर्णय शिबिरांमध्ये घेतले गेले आहेत. दारूबंदी, सिंचन धोरण, शेतीवर आधारित उद्योग धोरण, संपूर्ण देशाला आदर्श ठरलेली रोजगार हमी योजना हे निर्णय पक्षाच्या शिबिरांमध्ये घेतले गेले. शिबिरांमध्ये वैचारिक चर्चा होत. यामधून कार्यकर्ता तयार होत असे, परंतु गेली काही वर्षे हे सर्व थंडावले आहे. निवडणूक कशी जिंकायची, उमेदवारी कोणाला द्यायची याचीच चर्चा सध्या चालते.

राजकारण सध्या सभ्यतेकडून असभ्यतेकडे वेगाने जाताना दिसते. गुन्हेगारीकरण वाढत आहे. शिवसेनेचे राजकारण याला पोषक असे आहे. सत्तेतून पैसा आणि पैशातून सत्ता या चक्रात राजकारण फिरते आहे. माझ्यासारख्या माणसाचा जीव यामध्ये गुदमरतो. १९६७ सालापर्यंत स्वातंत्र्य चळवळीचे संस्कार असलेली पिढी राजकारणात होती. त्यामुळे वैचारिक बांधिलकी, मूल्यांबद्दल आस्था टिकून होती.

जुन्या काळाबद्दल वाटणाऱ्या प्रेमातून मी हे सांगत नाही. परंतु लोक आणि पक्ष यामधील अंतर कमी कसे करायचे? हा माझ्यापुढचा प्रश्न आहे. शिबिराऐवजी अन्य कोणता मार्ग असेल तर त्याचे स्वागतच आहे. परंतु एकंदरीतच राजकीय जीवनाची अधोगती रोखणे गरजेचे आहे.

या सर्वांचा एकत्रित परिणाम असा होतो की सेना-भाजपकडून भ्रमनिरास होऊनही मतदार काँग्रेसकडे वळताना दिसत नाही. आपलीच सत्ता असताना सेना-भाजपचे कार्यकर्ते पत्रकारांवर हल्ले करतात. नगरसेवक, आमदार, खासदार या पदांवरची माणसे राजरोस मारामाऱ्या करतात. विरोधी पक्ष नेत्याच्या घरावर हल्ला होतो. या सर्वांचे समर्थन नेतृत्व करते. यापेक्षा अधिक असंस्कृत पातळी आपण गाठणार आहोत का?

शिवसेना हा प्रामुख्याने प्रादेशिक पक्ष आहे. त्यांना दिल्लीच्या सत्तेत रस नाही. तिथे भाजपचे डोळे लागले आहेत. म्हणून सेनेबरोबर जाण्यात फरफट होत असली तरी ते सहन करतात. काँग्रेस सोडणारे ९० टक्के लोक सेनेत जात आहेत. त्यामुळे राज्यपातळीवर सेनेचे बळ वाढत आहे.

परंतु देशपातळीवरील राजकारणात प्रादेशिक पक्षांची गोची होते. संयुक्त आघाडीतील घटक पक्ष खाजगी चर्चेत ही बाब मान्य करतात. त्यामुळे आता era of coalition सुरू झाला आहे, हे भाकित मला मान्य नाही. ही एक तात्पुरती स्थिती आहे. प्रादेशिक पक्षांना राज्यापुरते सीमित करून लोकसभा निवडणुकांमध्ये राष्ट्रीय पक्षांना प्राधान्य देण्याचा सुज्ञपणा या देशातील मतदारांमध्ये आहे.

प्रादेशिक पक्षांच्या वाढत्या प्रभावाला विशेषत: महाराष्ट्राच्या संदर्भात वेगळा अर्थ आहे. महाराष्ट्राला राष्ट्रीय राजकारणात स्थान नाही आणि महाराष्ट्र बुद्धिवादी आहे असे दोन महत्त्वाचे गैरसमज आपल्याकडे आहेत. त्यांची मुळे बहुधा भारतीय राजकारणाची सूत्रे लोकमान्य टिळकांच्या पश्चात् महात्मा गांधींकडे गेली, या इतिहासात असावीत. अन्यथा लष्कर, नाविक दल, हवाई दल यांचे प्रमुख पद मराठी भाषिकांनी भूषविले आहे. केंद्रीय गुप्तचर खात्याचे प्रमुखपदीही मराठी व्यक्ती होतीच. त्याशिवाय एकाच वेळी सहा-सहा मराठी भाषिक मंत्री केंद्रीय मंत्रिमंडळात होते. परंतु तरीही ही भावना कायम राहिली आहे.

काँग्रेस पक्षाने पूर्वी राज्याच्या राजकारणात अडचणीची ठरणारी माणसे खासदार म्हणून दिल्लीत पाठविली. तीच स्थिती नोकरशहांची आहे. इथे नको असलेला माणूस, राज्याचा कमिशनर म्हणून दिल्लीत येतो. त्याचा केंद्र सरकारच्या विविध खात्यांशी संपर्क नसतो. उदाहरण देतो. राजा राममोहन राय त्रिशतक स्मृती महोत्सवाच्या निमित्ताने केंद्र सरकारने तीन हजार कोटी रुपये राज्य सरकारांना ग्रंथालय विकासासाठी उपलब्ध करून दिले. परंतु महाराष्ट्राचा अर्ज मुदत संपल्यावर सहा महिन्यांनी पोहोचला.

केंद्र सरकारच्या विविध योजनांचा जास्तीत जास्त लाभ करून घेणे आणि राज्याच्या प्रश्नांचा पाठपुरावा करणे यासाठी राज्य सरकारने एक योजनाच आखण्याची गरज आहे. त्यासाठी अतिशय उत्तम सनदी अधिकारी दिल्लीत नेमला पाहिजे. राज्याच्या केडरचे केंद्र शासनाच्या सेवेत असलेले अधिकारी या कामी महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. त्यांना विश्वासात घेतले पाहिजे. संपर्क यंत्रणा मजबूत केली पाहिजे. अभ्यासू खासदार असतील तर त्यांचा या कामी उपयोग होतो. या दृष्टीने सध्याची टीम चांगली आहे. श्री. राम नाईक याबाबत चांगले काम करीत असतात.

भविष्यकाळाचा वेध घेऊन महाराष्ट्राने विज्ञान-तंत्रज्ञान या क्षेत्रात भरीव कामगिरी केली पाहिजे. विशेषत: सॉफ्टवेअर, संगणक या क्षेत्रांत कोकणचा कॅलिफोर्निया करण्याच्या चर्चा आपण करीत असतो, परंतु कॅलिफोर्नियात मात्र कोकणी माणसे सॉफ्टवेअर क्षेत्रात आघाडीवर आहेत. त्यांचे सहाय्य या कामी मिळू शकेल.

दुसरी गरज अशी की केंद्र सरकारकडे पॉझिटिव्हली पाहण्याची दृष्टी हवी. अडवणुकीचे धोरण नको. उदाहरण देतो. मी माहिती व प्रसारण मंत्री होतो, त्यावेळी दूरदर्शन केंद्रांच्या विस्तारीकरणाचा कार्यक्रम राबवण्यात आला. त्यासाठी राज्य सरकारांनी जमिनी उपलब्ध करून द्यायच्या होत्या. मध्य प्रदेशने एका फटक्यात २३ ठिकाणी जमिनी दिल्या. महाराष्ट्रात मात्र ते होऊ शकले नाही.

ग्लोबलायझेशनच्या काळात मराठी संस्कृतीवरही परिणाम होणारच. विशेषत: दूरचित्रवाणीचा. या सर्व बदलांना आपण कसे सामोरे जातो यावर पुढील पंचवीस वर्षांचे भवितव्य अवलंबून आहे. आधी सांगितल्याप्रमाणे महाराष्ट्राच्या राजकारणात असभ्यता आणि असंस्कृतता याचा प्रादुर्भाव होतो आहे. तो रोखायचा असेल तर काँग्रेस मजबूत होणे गरजेचे आहे. याबाबत मी निराश नाही, परंतु काम अवघड आहे, हे मात्र निश्चित.

(विठ्ठलराव गाडगीळ : अखिल भारतीय कँग्रेस पक्षाचे नेते व प्रवक्ते)

***

जमाना 'फ्यूजन'चा आहे

शरच्चन्द्र विष्णू गोखले

भविष्यकथन आणि श्रवण कितीही मोहक असले तरी इमानीपणाची कसोटी पाहते. 'गोरखनाथ पुसे मत्स्येंद्रनाथ सांगे: सुख उपजे, कार्य सिद्धीस जाय.' असा झटपट कालनिर्णय या काळात अशक्यप्राय आहे. कारण एकूण जनता आता चिकित्सक झाली आहे. निदान होत आहे. एकेका व्यक्तीचे भविष्य जाणून घेण्यात अडचणी अपार, तर समाजाच्या भावी काळाचा बद्दल काय सांगावे? त्यातून, संगीत हा एक सर्वव्यापी, सर्वस्पर्शी विषय, संगीताबद्दलचा विचार आपणाला कित्येक भौतिक आणि मानव्य शाक्तांच्या दालनातून हिंडवून आणतो. तेव्हा संगीताच्या भवितव्याची उठाठेव न करणे हे उत्तम. कार्याला आरंभच न करणे हे प्रथम बुद्धिलक्षण सांगितले आहे. तरीसुद्धा, सुरुवात तर केली; म्हणून 'प्रारब्धस्य अन्तगमनम् द्वितीयं बुद्धिलक्षणम्' हे वचन मानणे प्राप्त आहे.

घटना घडतात त्यांमध्ये पूर्ववृत्तांताचा भाग किती असतो? दोन प्रकारांनी घटना घडू शकतात. मार्कॅफि (Markov) प्रोसेस, स्टोकॅस्टिक प्रोसेस अशी त्या क्रियाक्रमांना नावे आहेत आणि त्यांतही अनेक पोटभेद आहेत. समाजाची वाटचाल इतिहासगामी असते कीं नसते? 'अर्थात् असतेच; पूर्ववृत्त लक्षात घेतलेच पाहिजे' असा सहज जबाब येईल. कारण स्टोकॅस्टिक प्रोसेस आपण सहसा ध्यानी घेत नाही. फाशांचे आता पडलेले दान नंतर पडलेले दान यांमध्ये फाशांचे पूर्ववृत्त ध्यानी घेण्याची गरज नसते. प्रत्येक वेळचे दान हा एक 'नवा खेळ' असतो. क्रिकेटमध्ये मात्र, आधीच्या इनिंगमुळे बनलेली खेळपट्टीची अवस्था, आधीच्या स्कोअरमुळे खेळाडूंची बनलेली मनोवस्था, अशा प्रकारचे पूर्ववृत्त, चालू इनिंगचा निकाल कसा लागेल या भाकितात ध्यानात घ्यावा लागतो.

काल-आज-उद्या हे एकातून दुसरा अशा क्रमाने उद्भवतात खरे; परंतु त्या क्रमवारीला धक्का देणारा एखादा उत्पात उपटू शकतो. पूर्वसूचना देईल तर तो अपघात कसला? म्हणून की काय, त्याला गुजरातीमध्ये 'अकस्मात्' म्हणतात. मानवी जीवनाकडे दुर्बिणीतून पहायचे तर अशा 'अकस्मातां'चीही दखल घ्यावी लागते.

'अकस्मात्' नव्हे अशा वेगळ्याच प्रकाराचीही जाणीव पाहिजे. ती मानवी जीवनाच्या वेगाची. समाजजीवन संथ गतीने चालले असेल तर 'काल जे झाले तेच आज आणि तेच उद्या' असे दिनेश्वरभाष्य करता येईल. परंतु कधी जीवन अचानक जलदगतीने दौडू लागते. गेल्या अर्धशतकातल्या घडामोडींचा वेग आणि झपाटा पूर्वकाळापेक्षा फारच जोराचा आहे, आणि तो झपाटा अजून थांबलेला नाही. पन्नास वर्षांपूर्वी रेडियो रूढ झाला होता, पण ग्रामोफोनची चलती होती; कारण 'टेप मशीन' जन्मले नव्हते. ट्रान्झिस्टरचा शोध लागलेला, पण प्रसिद्ध नव्हता. आज गावगन्ना टी. व्ही. पाहिला-ऐकला जात आहे आणि रेडियोकडे लोकांचे लक्ष कमी झाले आहे. पन्नास वर्षांपूर्वी रंगीत बोलपट ही नवलाई होती, आज आपण रंगीत पट पाहत आहो याची जाणीवही होत नाही. पन्नास वर्षांपूर्वी भारतातल्या चार मुख्य महानगरांमध्ये डाकोटा विमानांच्या फेऱ्या होत, ती पंख्याची विमाने आज दिसत नाहीत आणि एअरबसच्या जोडीला 'कंकॉर्ड' कधी येणार असा प्रश्न काही आगाऊ लोक करू लागले आहेत. पन्नास वर्षांपूर्वी जगात तीनच संगणक होते आणि त्या एकेकासाठी एकेक मोठी इमारत होती. आज पुष्कळ घरांतील नवी पिढी 'पर्सनल कॉम्प्युटर' हे एक खेळणे म्हणून वापरीत आहे आणि इंटरनेटवर आपले नाव जावे अशा आशा बाळगीत आहे. या प्रगतीचा सालवारीने आलेख काढला तर तो सरसर वर सरकत जाणारा चक्रवाढव्याजासारखा दिसेल.

प्रगतीची ही एक बाजू. दुसरी बाजू तशीच वाढत्या गतीने परागती दाखवते. भारताने आज कैक गावांना धड पाणीपुरवठा नाही, जीवनाची शाश्वती नाही. ही रडकथा किती सांगावी?

म्हणून संगीताचे भविष्य कसे पहावे? कोठे शोधावे? अंधारात चाचपडावे लागते, तर चहूबाजूंनी लखलखीत प्रकाश डोळे दिपवू लागला की पावले अडखळतात. कीस काढताकाढता गाभाच नाहीसा व्हायचा. तेव्हा स्थूलमानाने पहावे, थोडे पण निरखून पहावे आणि केवळ अंदाज सांगावा, एवढेच पुरे. तर्कन्याय शास्त्रात अतिदेश (एक्स्ट्रापोलेशन) धोक्याचे मानले जाते, फार विवेक बाळगावा लागतो. सरळसीध्या गतीने चाललेली रेषा पुढे दीर्घकाळ तशीच सरकेल असे ठाम सांगता येत नाही. नजीकचा भविष्यकाळ हेरता येतो एवढेच. आली कोठून कसे हा तपशील पहावा, आजचा ठाव घ्यावा आणि फक्त पुढचे पाऊल कसे कोठवर पडेल एवढी अटकळ करावी, हा सुरक्षित पंथ. त्याच्या सीमाही महाराष्ट्रापुरत्याच आखलेल्या बऱ्या. पन्नास वर्षांपूर्वी जन्मलेली पिढी आजची कर्त्याधर्त्यांची आहे आणि ती माणसे येत्या वीस-पंचवीस वर्षांत 'ज्येष्ठ नागरिकां'मध्ये स्थिर झालेली

असणार आहे. तेव्हा तेवढा कालपट उलगडून ओझरता पाहतो.

शास्त्रीय संगीत हा शब्दप्रयोग पन्नास वर्षांपूर्वी स्थिरावला, आणि त्याची समर्पकता सिद्ध व्हावी म्हणून की काय, लोकसंगीत, भक्तिसंगीत, सुगमसंगीत, नाट्यसंगीत असेही पोटभेद मानण्यात येऊ लागले-आता उपशास्त्रीय हा सुद्धा एक प्रकार आला आहे. (उपशास्त्र म्हणजे काय?) म्हणजे पूर्वकाळी नसलेले एका प्रकारचे 'मंडलायझेशन' कायम झाले आहे.

पण ते अस्सल आहे काय? महाराष्ट्राचे खास संगीत म्हणून मानले जाते ते म्हणजे लावणी, पवाडा, ओवी, अभंग, 'पद' आणि नाट्यगीत. हे जनतेचे संगीत. ती जनता गावोगाव विखुरलेली. म्हणून पूर्वकाळी अभंगाचे आणि ओवीचे दोन रचनाप्रकार, पवाड्याचे तीन प्रकार आणि लावणीचे अकरा बाज मानले जात. कीर्तनकार, गोंधळी, तमासगीर इत्यादीकांमुळे त्यांचा फैलाव चहूंकडे होई. ही परंपरा कशीबशी धुगधुगी धरून होती, पण 'एसटी' आली मात्र आणि लोकाभिसरण झपाट्याने वाढले. कर्वे, आंबेडकर आणि त्यांचे अनुयायी यांजमुळे सामाजिक जाणीव तशी जवळीकही वाढली. त्या प्रगतीचे पडसाद मेळ्यांमधील, प्रभातफेऱ्यांमधील गाण्यांत उमटलेले असत. आज खेडे हे गाव, गाव हे शहर, शहर हे महानगर बनले आहे-म्हणून तर पु. ल. देशपांड्यांच्या 'वाऱ्यावरच्या वराती'तील खेडूत सांगतो-'तमाशा पाहायचाय्?-बॉम्बे!'

पण 'बॉम्बे' मध्येही अस्सल तमाशा उरला नाही. लावणीही मूळ विसरली. राधागवळण, गहू हरबरा, कोकणी ग वस्ती, घरावरून टिटवी, या कल्पनाही उरल्या नाहीत. त्यांची जागा सिनेमातील आकर्षक काव्यगीतांनी घेतली आहे आणि त्यांतला 'मानवी' समाज कृतक आहे. कोयनेची वीज सर्वदूर पसरली आणि जनता बदलली. वारकरीसुद्धा अभंग म्हणतील तो बालगंधर्व किंवा भीमसेन यांचा कित्ता समोर ठेवून. 'पदां'ची जागा भावगीत नामक वाद्यप्रचुर गीताने घेतली आणि नाट्यसंगीताला सतरा वाटा फुटल्या. विवादी स्वरांवर आणि विशाल आरोहावरोहावर आजची आवड आधारलेली आहे. ज्या चाली हृदयनाथ, लता, आशा, जितेंद्र यांना झेपतात त्या पेलणे आपल्याला कठिण, याचा विवेक नवी पिढी करीत नाही. साधे पण लाघवी स्वर गेले तसे मंद्रनादही विरले. 'शास्त्रीय' नामक संगीत, म्हणजे बैठकीची रागदारी, थाटमाटाने सजते. नित्य नवे राग पुढे येतात आणि तानांना महत्त्व आल्यामुळे गायन म्हणजे कंठवादन अशी धारणा बनलीशी वाटते.

महाराष्ट्रातले नृत्य आता भरतनाट्यम् आणि कथक एवढेच. एकाने दुसऱ्याची नक्कल करावी या पलीकडे त्यात नावीन्य नाही. त्याला प्रतिष्ठा मात्र लाभली आहे.

संगीत नाटक लोपले, त्याचे पुनरुज्जीवन करण्याचे अत्रे आणि विद्याधर गोखले यांचे प्रयत्न अनुकरण-अनुसरण याच रूपाचे होते. रांगणेकरांनी मात्र पार्सेकर, मास्तर कृष्णराव अशांच्या मदतीने त्यातील गायनात नवरंग आणला. पण तोही टिकला नाही.

या सर्वांचे एक महाकारण म्हणजे टेपरेकॉर्डर आणि टॉकी, आता टॉकीऐवजी टी. व्ही! गायनवादन खेड्यापाड्यांत, झोपडीत पोहोचले आहे आणि ते एकाच छापाचे. 'मंडलायझेशन' म्हणून जे म्हटले ते असे नाममात्र ठरले.

ही झाली आजची स्थिती. पण आज जे पौगंडावस्थेत आहेत तेच पंचवीस वर्षांनी कर्ते नागरिक होणार आहेत. त्यांनी आजच पूर्वपरंपरेपासून वेगळी वाट काढणाऱ्या संगीताची कास धरली आहे. त्यांचा नवा जमाना झपाटा अपेक्षितो. ठोसपणा मागतो. आघातांना महत्त्व देतो. जे संगीत साक्षात् शारीरिक आवाहन करील त्याला त्याचा तात्काळ प्रतिसाद मिळतो. तेथे भारतीय आणि पाश्चिमात्य या भेदाला अवसर नाही. त्यांचे विश्व 'फ्यूजन'चे आहे. त्यांचा आधार सिनेसंगीताचा आहे. पॉप, रॉक, हार्ड रॉक, रॅप हे प्रकार त्यांना भुरळ घालतात-ब्लूज, नीग्रो स्पिरिच्युअल्स, क्लासिकल जाझ हेही प्रकार त्यांच्या दृष्टीने कालबाह्य झाले आहेत. दलेर मेहेंदी, नुसरत फतेह अली, अनैदा, बाबा सहगल, सुखबीर, सागरिका असे कलावंत आणि गन्स'न रोझेस, बेटेड एक्स्ट्रीम्स, स्कॉर्पियन्स असे 'ग्रुप' त्यांना आवडतात. त्यातही अलका याज्ञिक, उदित नारायण, लता मंगेशकर, आशा भोसले ही मंडळी आपले स्थान टिकवून आहेत-पण नव्या जमान्याशी तडजोड करूनच.

शहरगावातील सुस्थित पौगंडांपुरतीच ही आवड आहे असे कोणी म्हणेल. पण कॅसेटचा घाऊक व्यापार, प्रसार आणि प्रचार पाहता, दूरदर्शनची ग्रहदशा उमजता, अंदाज होतो की हे नवे सर्वांना हवेसे होईल. कारण सवते सुभे मांडणारांना जाणीव नसली तरी सत्य हे आहे की सारा समाज ढवळला जात आहे. लोक जवळ येत आहेत. 'वंदे मातरम्'सुद्धा मार्चिंग साँगसारखे गायिले जाते आणि ती रीत रूढ होऊ पाहते - तेव्हा इतर गायनवादनाचे काय सांगावे?

मी म्हणतो ती अवस्था येत्या पंचवीस वर्षांतली. आजचे षोडषवर्षीय तरुणतरुणी तेव्हा चाळिशीत असणार. त्यांच्याबद्दल मी बोलत आहे. मी स्वतः तर इतिहासजमाच; पण आज जे चाळीस-पन्नास-साठ वर्षांचे असतील त्यांना हे पटणार नाही. वरच्याचे अनुकरण खालचा करतो आणि खालच्याचे वाणगुण वरच्याला लागतात, ही अभिसरणक्रिया किती वाढत्या भाजणीने चालली आहे हे त्यांनी लक्षात घ्यावे, स्वतःचे पूर्ववृत्त आणि वर्तमान ध्यानात घ्यावे, आणि मग काय ते ठरवावे.

-तरीसुद्धा प्रश्न आहेच. ही सामाजिक प्रकिया कोणत्या तऱ्हेची आहे? जर 'अकस्मात्'ला जागा असेल तर?

- तर काहीच सांगता येणार नाही.

(शरच्चंद्र विष्णू गोखले : ज्येष्ठ शास्त्रज्ञ आणि संगीत तज्ज्ञ)

***

नाटक राहीलच, तरीही...

शांता गोखले

'अंडरग्राऊंड' नावाच्या एका युगोस्लाव्हियन चित्रपटात एका इसमाला दूरच्या देशी सांगण्यात येते की, त्याला आता देशच उरलेला नाही. ज्या युद्धापासून तो पळालेला असतो त्या युद्धाने त्याच्या देशाची चार शकले केलेली असतात. त्याच्या चेहऱ्यावरचा भकासपणा ही आजची प्रातिनिधिक प्रतिमा झाली आहे. कोणापासून किती हिरावले गेले आहे, कोणाचे किती नष्ट झाले आहे! अनेकांचे विश्वास, ध्येय, स्वप्ने मोडीत काढली जात आहेत. आपल्या आजूबाजूला पाठीचे कणे कडाकड मोडल्याचे आवाज कानावर आघात करत आहेत. आपला स्वत:चा कणा शाबूत ठेवण्यासाठी आपल्याला २४ तास जागरूक राहण्यापलीकडे पर्याय उरलेला नाही. कोणी वाकवायच्या आधीच भीतीने, लाचारीने, आधाशीपणाने, सत्तेच्या हव्यासाने धुळीला नाक लागेपर्यंत वाकणाऱ्या मंडळींच्या मध्ये ताठ उभे राहणारे काहीसे मूर्खच दिसू लागले आहेत. अशा परिस्थितीत २५ वर्षांनी आपल्या देशाचे काय होणार आहे, याविषयी उत्स्फूर्त विचार येतो तो निर्भेळ निराशावादी असणे साहजिक आहे. पण निराशावाद हा आजच्या गचाळ परिस्थितीला आपण देत असलेला भावनिक प्रतिसाद आहे. निराशेतून आपल्याला भविष्याचे जे चित्र दिसते ते खरे ठरेलही. कोणी सांगावे? आज सत्ताधाऱ्यांनी राजकीय विचारप्रणालींची केलेली होळी बघता, सर्वसाधारण माणसाने कामाच्या ठिकाणी बिगर काम मिळेल तितका पैसा खिशात भरण्याची पद्धती स्वीकारली असता, आणि पैसे चारून न्यायही आपल्या बाजूने करून घेणाऱ्यांची संख्या रोज वाढत असता, आपण जंगल अवस्थेकडे वाटचाल करीत आहोत हे उघडच आहे. तेव्हा २५ वर्षांनी आपण एका काळ्याकभिन्न जंगलाचे रहिवासी असूही.

पण जसा काळ एका दिशेने जातो तसाच कधी कधी फिरतोही. आपण जंगलवासी म्हणून कोणती नाटके करीत असू, कोणती बघत असू, हे सांगणे अर्थातच कठीण आहे. पण २०२० पर्यंत सभ्य समाजाचे काही महत्त्वाचे गुण आपण राखू शकलोच तर नाट्यक्षेत्राचे चित्र काय असू शकेल याविषयी तर्क करण्यास काहीच हरकत नाही. भविष्याविषयी काहीही वर्तवणे हा एक लोभवणारा खेळ आहे. तो जर गांभीर्याने खेळला तर निदान भविष्याकडे नाही तरी भूत आणि वर्तमानाकडे बघण्याची आपली दृष्टी साफ, स्पष्ट होते. मराठी रंगभूमी २५ वर्षांनी कशी असेल या प्रश्नाच्या गर्भात एक गृहीत आहे. ते म्हणजे बदललेली असेल. या गृहिताला काही पाया आहे का, हे आपण आधी तपासून पाहिले पाहिजे. तर आजपर्यंतच्या तिच्या १५४ वर्षांच्या इतिहासात ती कधी, कशी आणि का बदलली, या प्रश्नांच्या उत्तरातून तिच्या यापुढील संभावित बदलाची दिशा आपल्याला उमगू शकेल.

प्रथम एक गोष्ट येथे नमूद करायला हवी. 'आपली' रंगभूमी म्हणजे कोणती? तर लोककलांपासून स्फूर्ती घेऊन जी नंतर त्यांच्यापासून दूर सरकत सरकत आज बंदिस्त नाट्यगृहांमध्ये, पैसे देऊन, पांढरपेशा शिक्षित वर्ग ज्यात प्रेक्षक म्हणून सहभागी होतो ती.

तर ही रंगभूमी कधी, कशी आणि का बदलली?

१८७४पासून विष्णुदासी नाटकात होऊ घातलेला बदल १८८०मध्ये पुण्यात दणदणीत उभा राहिला. संहिता बदलली, नाट्यप्रयोगाची नेपथ्य आणि संगीताची अंगे बदलली, कथानकाचे उगमस्थान बदलले. रामायणाची जागा कालिदासाने घेतली आणि नंतर शेक्सपियरने. या बदलांचे कारण ब्रिटिश राजवट आणि तीबरोबर वाहणारे शिक्षणाचे नवे वारे. प्रेक्षक बदलला. नाटक बदलले.

कमी-जास्त फरकाने तब्बल ५० वर्षे नाटकाचे मूळ रूप तेच राहिले.

१९३०च्या सुमारास पाश्चात्य देशांत नवे तारे उदयास आले. सर्वांत मोठा तारा हेन्रिक इब्सेन. शिक्षित वर्गास साहेबाचे रूप हवेहवेसे वाटू लागले. त्याच्या देशात नाटककार वास्तवाला वास्तव नाटकांनिशी सामोरे जात होते. वास्तवात गाण्याला स्थान नव्हते. छातीठोक्या भाषणांना स्थान नव्हते. 'आंधळ्यांची शाळा'च्या प्रणेत्यांना प्रतिमा रूपात प्रत्यक्ष रंगमंचावरच नेपथ्याचा भाग म्हणून स्थापन करण्यात आले. इब्सेन आणि शॉ दोघांनी मिळून प्रयोग डोळे भरून पाहिला. त्यांना काय वाटले याची नोंद नाही.

वास्तववादी नाटकाचे हे पहिले रूप जन्माला येत आहे की नाही तोच दोन आपत्तींच्या तोंडी बळी गेले-चलचित्राचे आगमन आणि दुसरे महायुद्ध. पण रोवलेले बीज तग धरून मातीत राहिले आणि

देशाच्या स्वातंत्र्यातून नवे स्फुरण मिळताच रुजून फुलू लागले. देशाची झाली तशी रंगभूमीचीही फाळणी झाली .

१९५४-५५. एका बाजूला हौशी तरुण नाट्यकर्मींचे नवे नाटक. कितपत नवे? गाण्याला पूर्णतः मज्जाव. नाटकाच्या अंगासरशी भाषा. संचत अभिनय. नेपथ्य अनेकदा सांकेतिक. दुसऱ्या बाजूस पुन्हा एकदा व्यावसायिक नाटक आपल्या बाडबिस्तऱ्यासाठी घर शोधू लागले आणि घर मिळताच विद्याधर गोखल्यांच्या आवाजात गाऊ लागले, बाळ कोल्हटकरांच्या आवाजात मुसमुसून रडू लागले.

१९६०च्या सुमारास मराठी रंगभूमीची ही परिस्थिती होती. त्यानंतरच्या २५ वर्षांत व्यावसायिक रंगभूमीने राजेरजवाड्यांचा त्याग केला, गाणे टाकले आणि ती पद्यात नांदू लागली. अधूनमधून अश्रू आवरते घेऊ लागली. मधूनमधून निखळ हसू लागली, पण हे सर्व सात फुटी बॉक्स सेटच्या चौकटीत. ती चौकट ओलांडून तिने फार क्वचित बाहेरच्या जगात पाऊल टाकले. त्याच २५ वर्षांत अव्यावसायिक नाटकांचा बराच संचार झाला. भौगोलिक स्तरावर बंगाल, कर्नाटक, तसेच अमेरिका, जर्मनी, इटली, फ्रान्स इ. देशांतील नाटके मराठीत आली. रूपाच्या स्तरावर वास्तववादाव्यतिरिक्त अनेक रूपांचा प्रयोग इथे झाला — एपिक, ॲब्सर्डिस्ट, फोक, इन्टिमेट इ. १९८५च्या सुमारास अव्यावसायिक नाटक दमले आणि धावणे बंद करून चालू लागले.

तेवढ्यात आभाळ फाटले आणि त्यातून एकावर एक अशा डझनावारी टी. व्ही. वाहिन्या बरसू लागल्या. त्या हल्ल्याखाली अव्यावसायिक रंगभूमीने जवळपास गाशा गुंडाळला.

पुढच्या २५ वर्षांकडे बघायचे ते मागच्या २५ वर्षांच्या सहाय्याने. तर आपल्याला पुन्हा एकदा स्वातंत्र्य मिळण्याची विशेष संधी दिसत नाहीच. आपण जेव्हा 'आपल्याच' माणसांच्या सत्तेखाली सापडतो तेव्हा सहजासहजी सुटका होणे अशक्य. परदेशी प्रेरणेतून काही बरे होण्याची संभावना नाही, कारण तिथून आपण भरभरून आयात करीत आहोत ती मोबाईल, हॅमबर्गर, कोक, रीबॉक, इ. भोगवस्तूंची. शिवाय नाट्यकलेचा आविष्कार म्हणून 'द बोल्ड अँड द ब्यूटिफुल' आहेच की! बरे युद्ध झाले तर सगळेच खाक होण्याची शक्यता अधिक. पण एक विचार मनाला त्रास देतो की, आपला आपण विचार करूनसुद्धा आपण जागचे हलू शकतो ना?

विजय तेंडुलकर-सर्वश्रेष्ठ नाटककार. त्यांनी आपल्याला नाट्य या संकल्पनेबिषयी काय विचार दिला की ज्याच्याशी आपण मनस्वीपणे सहमत होत किंवा भांडत नाट्याचा पुढचा विचार करू? त्यांच्या नंतरचे सतीश आळेकर, महेश एलकुंचवार यांनी रंगभूमीविषयी कोणते महत्त्वाचे सिद्धांत मांडले? गो. पु. देशपांडेंनी मांडले पण मराठी नाट्यकर्मींना त्याचे महत्त्व पटले नाही. त्यांची नाटके बंगालीत होतात, सत्यदेव दुबे करतात पण त्यांच्या काही अंशी फसलेल्या पण महत्त्वाच्या नाटकांचे आव्हान दुसरे कोणी स्वीकारताना दिसत नाही. त्यानंतरचे राजीव नाईक, मकरंद साठे, यांनी आपल्याला नाट्याविषयीचा कोणता दृष्टिकोण उघडा करून दाखवला? करणारे करतात, बोलत नाहीत हे जरी सत्य असले, तरी तो आळस, युक्तिवाद किंवा आस्थेतील कमतरतादेखील असू शकते. नाट्यकर्मी बोलेनात का, पण मग त्यांच्या करण्यातून तरी आपल्याला कळले पाहिजे की ते नाटक कशाला समजतात आणि ते नाटक का करतात? हबीब तन्वीर, कवलम पण्णीकर, रतन थिय्यम, वीणापाणी चावला ही मंडळी ज्या प्रकारची नाटके करतात ती का करतात या विषयीचे त्यांचे विचार पक्के आहेत आणि त्यांची नाटके हे विचार सांगत असतात. गेली २५ वर्षे आपण जी नाटके केली आणि त्यात राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवरही श्रेष्ठ ठराव्यात अशा कलाकृती होत्या — त्यामध्ये एक-दोन नाटककारांच्या बाबतीत जरी एका विशिष्ट दिशेने शोध दिसला तरी करणाऱ्यांनी ती का केली हे सांगणे कठीण होते. उदा. नाशिकच्या प्रयोग परिवारने 'वेटिंग फॉर गॉडो' का केले? नसीरुद्दीन शहांनी या नाटकावर पुण्यात एक कार्यशाळा घेतली होती आणि तेव्हा नाट्यप्रयोग होऊ शकला नव्हता म्हणून? आंतरनाट्य संस्थेने 'खर्रा खुर्रा इन्स्पेक्टर' नावाचे नाटक का केले होते? आणि 'मागोवा' नावाचेही? थिएटर ॲकॅडमीने 'उत्तररात्र' नावाखाली 'हूज अफ्रेड ऑफ व्हर्जिनिया वुल्फ'चा अनुवाद कोणत्या कारणास्तव सादर केला. या सर्व मंडळींनी या नाटकांचा त्यांच्या समाजाशी, त्यांच्या काळाशी काय संबंध लावला?

केवळ संहिता 'आवडणे', त्यात दिग्दर्शनाला वाव असणे, ग्रुपमधल्या कोणा नटासाठी मस्त रोल असणे, एवढ्यावरच नाटकाची निवड होत असेल, तर अशा रंगभूमीविषयी आपण काय म्हणू शकतो? की अबक नाटकाचा प्रयोग चांगला झाला, फलाण्या नटाचे काम उत्कृष्ट झाले. मग? पुढे?

मग २५ वर्षांनी असेच? किंवा असेदेखील नाही? सतीश आळेकर आणि महेश एलकुंचवार यांनी अनेक वेळेला म्हटलेले आहे की, मराठी रंगभूमीच्या सद्यपरिस्थितीचे एक कारण म्हणजे आपल्याकडे कोणी द्रष्टा (आळेकर) किंवा प्रॉफिट (एलकुंचवार) झाला नाही. ग्रोटॉव्हस्की किंवा युजिनिओ बारबासारखा. अशी कोणी एक व्यक्ती असणे ही कदाचित रंगभूमीच्या आरोग्यासाठी तितकीशी बरी गोष्ट नाही. पण विचाराची, चिंतनाची परंपरा असणे

हे फारच महत्त्वाचे आहे.

अव्यावसायिक/नाट्यकर्मी उद्या, परवा, दहा वर्षांनी आपल्या रंगभूमीला विचाराची जोड देतील का? सांगणे कठीण आहे. रंगभूमीची आर्थिक स्थिती सुधारेल का? अशक्य. मराठी माणसाचे नाटकवेड शाबूत राहील का? बहुधा. तो व्यावसायिक रंगभूमीकडून नव्या-नव्या प्रयोगांची मागणी करेल का? नाही. रंगभूमीकडून त्यांची काय अपेक्षा असेल? आज आहे तीच. आम्हाला भरपूर हसवा किंवा सनसनाटी धक्कादायक काहीतरी दाखवा, सामाजिक समस्यांविषयी सोपे विचार मांडा, ज्यामध्ये बऱ्या-वाईटाची नीटनेटकी विभागणी केलेली असेल आणि ज्याच्या शेवटी एक प्रत्येकाला पटेल असे उत्तर असेल.

एवढे म्हटल्यावर आणखी एक मुद्दा मांडणे महत्त्वाचे आहे की, जगातील कोणत्याही देशाच्या व्यावसायिक रंगभूमीवर मोठ्या प्रमाणावर बदल, मोडतोड कधीच होत नसते. या व्यवसायाचे गणितच असे आहे की प्रत्येक नवे पाऊल अत्यंत काळजीपूर्वक टाकावे लागणे. वेस्ट एंडवर काय किंवा ब्रॉडवेवर काय, डोळे दिपवून टाकणारी तंत्रे वापरून सादर केलेली म्युझिकल्स सर्वात लोकप्रिय आहेत. खऱ्या अर्थाने विचार करायला लावणारे नाटक कोठेही चालत नाही. फरक दोनच आहेत की वेस्ट एंड आणि ब्रॉडवे साच्यांच्या व्यतिरिक्त नाटके फ्रिंज आणि ऑफ-ऑफ ब्रॉडवेवर सतत होत असतात. त्या पर्यायी रंगभूमीचीही एक विशिष्ट व्यवस्था आहे — पर्यायी नाट्यगृहे, तिला बांधलेला एक प्रेक्षकवर्ग, तिच्यासाठी सातत्याने लिहिणारे लेखक आणि तिला वाहिलेले नाट्यसंच. थोडक्यात आपल्याकडे ७०च्या दशकात काही प्रमाणात होती तशी व्यवस्था.

अशी व्यवस्था पुन्हा एकदा निर्माण करता येईल का? या प्रश्नाचे उत्तर देण्याच्या भानगडीत पडण्याचे कारण नाही. प्रश्नच चुकला आहे. खरा प्रश्न हा आहे की, पुढच्या २५ वर्षांतील नवीन पिढ्यांमध्ये नाट्यकर्मी होण्याची इच्छाच मुळात असेल का? पर्यायी नाटकांची परंपराच जर खंडित झाली असेल तर पुढच्या पिढीच्या विचारांना चालना कशातून मिळणार? व्यावसायिक रंगभूमीतून? टीव्हीवर जे काही चाललेले असते त्यातून? टीव्ही उभा राहिला आहे हिंदी चित्रपटाच्या खांद्यावर आणि लवकरच 'तरुण' प्रेक्षकांसाठी निर्माण केली जाणारी व्यावसायिक रंगभूमी उभी राहू पाहत आहेत टीव्हीच्या खांद्यावर. उदा. 'सुयोग्य असा मी अशी मी' या साखळीत अडकलेल्या तरुणांना नाटक या शब्दाची कोणतीही वेगळी व्याख्या आढळली नाही, तर आज मृतावस्थेत असलेले अव्यावसायिक नाटक मेलेच असे समजावे.

पण थांबा. पुन्हा एकदा मागे वळूया. १९४३. मराठी रंगभूमी १०० वर्षांची झालेली. जिकडे तिकडे महोत्सव. मुंबई चौपाटीवर साहित्य संघाच्या नाट्य महोत्सवाला हजारोंचा जमाव. नंतर विजया जयवंतची पहिली भूमिका - डेस्डिमोनाची. म्हणजे अजूनही मागच्या पानावरून पुढे. पण नाटकांना पुन्हा उधाण आल्यामुळे नवीन लोकांनी खूप जुनी नाटके पाहिली. त्यांच्याशी आपले नाते जुळत नाही ही नवीन लेखकांना, कलावंतांना तीव्रतेने जाणीव झाली. तेवढ्यात भारतीय विद्या भवन आणि राष्ट्र नाट्यस्पर्धांची सुरुवात. या सर्व परिस्थितीतून झाला नवनाट्याचा जन्म. खरेच? आपण कुठेतरी अत्यंत महत्त्वाचा मुद्दा विसरत आहोत का?

हो, १९५४-५५च्या तरुण पिढीस आम्ही आमचा समाज नव्याने घडवणार आहोत, आमचे, देशाचे सांस्कृतिक भविष्य आमच्या हाती आहे असा एक विश्वास वाटत होता. राज्य शासनाने मंच दिला पण त्यावर काहीतरी खरे आणि नवीन आणि खास आमचे असे आम्ही करून दाखवणार ही उर्मी त्या विश्वासातून पैदा झाली. १९८०च्या दशकात हळूहळू तो विश्वास गळून पडला. ब्रिटिश नाटककार डेव्हिड हेअर नेमक्या याच काळातील तरुण पिढीबद्दल म्हणतो, "I find a generation who are carved, who seem to have given up on the possibility of change, who seem to think that most of the experiments you could make with the human spirit are likely to be doomed or at any rate highly embarrassing.... it would be sad if this historical period had no chronicler."

आजच्या आपल्या समाजात सर्वात महत्त्वाचे शब्द आहेत 'तडजोड' आणि 'ॲडजस्टमेंट'. सर्वाधिक वेळा ऐकण्यात येणारा उदासीन उद्गार आहे — ''पण आपण काय करू शकतो!'' जर या दलदलीतून, बॉम्बस्फोटाने का होईना, तरुण पिढी वर फेकली गेली तर जीवनाकडे पुन्हा एकदा नव्या दृष्टीने बघण्याची गरज त्यांच्यात निर्माण होईल. नाहीतर दंगेधोपे, अन्याय, गुन्हेगारी, अत्याचार सर्वांपासून आपण सुरक्षा कोपरे शोधून तोंडातून एकही 'ब्र' न काढता आपण बरे की आपले काम बरे या मार्गाने भरपूर खाऊन-पिऊन सुस्त जगू. असे नसते तर ९२-९३ नंतर आपण निदान एकतरी दणदणीत नाटक केले नसते?

आतापर्यंतची चर्चा काहीशी गोंधळलेली वाटली तर त्याला सरळ-सोपे कारण आहे — ती गोंधळलेलीच आहे. ती तशी का आहे त्यालाही एक सरळ-सोपे कारण आहे — की लेखिकेची मन:स्थिती गोंधळलेली आहे. त्या

मन:स्थितीचे नेमके प्रतिबिंब लेखनात सापडावे हे अगदी योग्य आहे. एवढे लिहिता-लिहिता आणखी एक गोंधळ वाढवणारा प्रश्न मनाचा कोपरा कुरतडू लागला आहे. नाटकाचे भवितव्य वर्तवताना आपण आपोआपच गृहित धरीत आहोत की नाटक ही एक चांगली गोष्ट आहे आणि त्यात बदल घडावा, त्याच्या कक्षा विस्ताराव्या, त्यातून प्रत्येक तरुण पिढीस आपल्या समस्या, कुचंबणा, आपले राग, लोभ या सर्वांना सामोरे जाता यावे. या समाजाच्या आरोग्यासाठी अप्रत्यक्षपणे का असेना पण उपकारक गोष्टी आहेत. पंचवीस वर्षांनी हा विचारच सांस्कृतिकदृष्ट्या सनातनी नाही ठरणार कशावरून? आज आपल्या सांस्कृतिक जीवनात जे बदल होऊ घातले आहेत त्यामध्ये सीडी रॉम आणि इंटरनेट यांचा परिणाम सर्वाधिक होणार आहे अशी दाट शक्यता आहे. एका विशिष्ट वर्गाच्या अभिरुचीस, मागणीस, प्रतिसाद देत-देत आज नाटक इथवर आले आहे. यापुढचा त्याचा प्रवास त्याच विशिष्ट वर्गाच्या अभिरुची आणि मागणीप्रमाणे होणार आहे. सध्या उसळलेली उदारीकरणाची लाट कोणालाच आणि कशालाच न जुमानता आपल्या आजवरच्या अनेक रीती, सामाजिक सवयी स्वत:त बुडवून सर्वत्र पसरते आहे. मग १९व्या शतकात शेक्सपियर, २०व्यात इब्सेन, बेकेट, ब्रेख्ट, तसे २१व्यात अमेरिकेतील चालू यशस्वी नाटककाराची कशावरून आपल्यावर छाप नाही पडणार? मायकल जॅक्सनला मिळालेला प्रतिसाद पाहता हे अगदीच अशक्य वाटत नाही. मग श्रीमंत लोकांना मोठे पैसे देऊन अमेरिकन नाटके पाहण्यात अभिमान वाटू लागेल आणि मराठी नाटक अंग मुरडून शहरांच्या कानाकोपऱ्यात जाऊन बसेल. मराठी नाटकाच्या या परिस्थितीला मराठीचा गर्व बोलून दाखवणारे राज्यकर्ते आणि त्यांना संपूर्ण पाठबळ देणारी जनता जबाबदार ठरेल.

या उसळलेल्या लाटेला अडवायचे असेल तर आपल्या संस्कृती आणि भाषेविषयी आपल्या तथाकथित गर्वाचा दांभिक उच्चार बंद करून आपण स्वत:कडे डोळसपणे बघण्याची प्रक्रिया लवकरात लवकर सुरू केली पाहिजे. कलाकारांना शासनाने विकत घेतल्याने समाजाचा एक जागरूक डोळा बंद केल्यासारखा होतो. आपण पवित्र मानतो अशा मूर्तींचे भंजन कलाकारांकडून झाले तरी ते सोसण्याची ताकद समाजात आली पाहिजे. प्रत्येक विचाराला जेव्हा वाव मिळेल तेव्हाच समाज विचारी बनेल. विचारी बनला की विचार करणे हे एक 'मनोरंजनाचे महत्त्वाचे अंग मानले जाईल आणि विचार करण्यास प्रवृत्त करणाऱ्या कलाकृतींचे समाज स्वागत करेल.

एकेकाळी कलाकार शासनापासून अलिप्त राहणे ही आपली पहिली जबाबदारी मानीत. आज मराठी रंगभूमीवरील अनेक कलाकार शासनाचे भाट झालेले दिसतात. शासन-गुन्हेगार, शासन-उद्योजक, शासन-बिल्डर या आजच्या नातेसंबंधांनी जितकी समाजाची हानी होताना आज आपल्याला दिसत आहे, तितकीच हानी प्रत्यक्षात दिसली नाही तरी अप्रत्यक्षपणे शासन-कलाकार या नातेसंबंधातून होत आहे. कलाकाराने स्वत:शी सातत्याने संवाद चालू ठेवला तर या गोष्टीचे भान त्याला येईल. पन्हाळ्याला १९९३च्या ऑगस्ट महिन्यात भरलेल्या रंगकर्मी आणि नाट्यसमीक्षकांच्या मेळाव्यात १९८५च्या आसपास कार्यरत झालेल्या पिढीच्या सदस्यांनी एका मुद्द्यावर पुन: पुन्हा भर दिला. तो मुद्दा होता की, आम्ही मोकळे आहोत, स्वतंत्र आहोत, कोणत्याही 'ism' ला बांधलेले नाही. पण प्रत्येक 'ism' बाहेरून लादलेले नसते. आपले वैयक्तिक 'ism' असू शकते आणि असायला हवे. तेव्हाच आपल्या समाजाचा घटक म्हणून आपण कोणती कृती करणे न करणे इष्ट आहे हे ठरू शकते. आपल्या कृतींना आपण वैचारिक बैठक न दिल्यास आपण आज सर्वधर्मसमभावाने ओथंबलेले नाटक करतो आणि उद्या शासनाने नेमक्या याच विचारास जबरदस्त धक्का पोचवला आहे, त्यांच्यासाठीच निवडणुकांच्या काळात आपल्या कलेचा वापर करतो किंवा ज्या शक्तींनी आपल्या जगभर गाजलेल्या नाटकावर अनेक प्रकारचे हल्ले केले त्या शक्तींच्याच प्रतिनिधीस मानाने आपल्या रंगमंचावर पाचारण करून त्यांचा हार-तुऱ्यांनी सन्मान करतो. कलाकारांच्या बाबतीत सामाजिक बांधिलकी म्हणजे घोषणा नव्हेत तर स्वत:च्या विचारांशी निष्ठा ठेवणे.

आजचेच चित्र जर गोंधळाने इतके भरलेले आहे तर उद्याचे चित्र स्वच्छ कसे दिसणार? पण आजच्या गोंधळात एक विशिष्ट विचार घेऊन 'प्रयोग परिवार' नामक एक गट नाशकात काही करू पाहतोय तर कशावरून असाच एखादा गट इतरत्र कुठे नाही उगवणार? मुंबई-पुण्याची आशा सोडूया. पण त्यांच्या पलीकडल्या या महा-राष्ट्रात पर्यायी रंगभूमीचे याक्षणी कुठेतरी बीजारोपण होतही असेल, तिथून पुन्हा एकदा चळवळ सुरू होईल. पुन्हा एकदा नाट्यकर्मींना वाटू लागेल की बदलत्या समाजात आपलाही काही कार्यभाग आहे. त्यासाठी आपल्याला कोणी पैसे दिले नाहीत, प्रेक्षक म्हणून फारसे प्रोत्साहित केले नाही तरी तो उचलणे ही आपली जबाबदारी आहे.

हे एक स्वप्न आहे? होऊ घातलेली वस्तुस्थिती असणार आहे? हे कोण सांगू शकेल? आपण तर नाहीच नाही.

(शांता गोखले : कादंबरीकर्ती, पत्रकार आणि ज्येष्ठ नाट्यअभ्यासक)

***

प्रबोधन व्हावे

बी. पी. गुणाजी

नव्या शतकात पदार्पण करायला आता केवळ तीन वर्षं शिल्लक राहिली आहेत. विसाव्या शतकाच्या दुसऱ्या भागात जेवढी प्रगती झाली आणि ज्या वेगानं झाली तसं आधीच्या समाजानं कधीही अनुभवलं नव्हतं.

मला ज्योत्स्ना मासिकातली १९४० सालात प्रकाशित झालेली चर्चा अंधुकशी आठवते आणि जाणवतं की, त्यावेळच्या विचारवंतांना भविष्यासंबंधी चिंतन करण्यासाठी वा भविष्यात डोकावण्यासाठी जेवढी फुरसत होती तेवढी आजच्या काळात मिळणं केवळ अशक्य. थोडक्यात म्हणजे त्याकाळी घडत असलेल्या घटना व आजच्या घटना ह्यांत महत्त्वाचा फरक झाला आहे व त्याला जबाबदार आहे प्रचंड वेगानं विकसित होणारं व विज्ञानावर आधारित तंत्रज्ञान.

खरं पाहिलं तर १९४० सालचा महाराष्ट्र आजसारखा अस्तित्वात नव्हता. मुंबई प्रांत, वऱ्हाड, निजामीतला मराठवाडा, अनेक छोट्या-मोठ्या संस्थानांत वाटला गेला होता. मराठी बोलणारे वा अभिमान बाळगणारे ते मराठी अशी भावना होती. वेगवेगळ्या आर्थिक स्तरावर जायचं तर मध्यमवर्गीय, सुशिक्षित व आर्थिक सुस्थिती लाभलेला अशा छोट्याशा वर्गात ह्या विचारवंतांचा भरणा. अर्थात इतर भारतीयांच्या तुलनेत बंगाली व मराठी मध्यमवर्गीय संख्येने जास्त व विचारवंतांचा वर्ग तुलनेनं मोठा.

नुकतंच कुठं दुसरं महायुद्ध सुरू झालेलं, पण त्याची झळ अशी लागली नव्हती.

तिकडे युरोप, अमेरिका, जपानमध्ये युद्धाचा एक विशेष परिणाम म्हणजे तंत्रज्ञानावर दिलेला भर आणि त्यामुळे उद्योग, दळणवळण, दूरसंचार इत्यादी क्षेत्रांत केलेली प्रगती. गेल्या पाच-सहा दशकांत पुष्कळ बदल घडले पण त्याचा परिणाम महाराष्ट्र, बंगालसारख्या एकेकाळी आघाडीवर असलेल्या प्रदेशात कमी झाला. उलटपक्षी, स्वातंत्र्योत्तर काळात राजकारणाने मुसंडी मारली आणि या दोन राज्यांची पीछेहाट झाली. त्यांचं राजकीय नेतृत्व तोकडं पडलं. जोपर्यंत यशवंतरावांसारखे पुढारी होते तोपर्यंत महाराष्ट्रात उद्योगधंदे वाढले पण त्यांत मराठी मागं राहिले. बेरजेचं राजकारण संपून आपल्याच लोकांना मागं खेचण्याचा खेळ सुरू झाला.

आपल्यालाच पुढं जायचं तर प्रथम एकोपा हवा. एकमेकांना सहाय्य करण्याची प्रवृत्ती हवी, प्रगती साधून आपल्या लोकांना वर काढण्याची भावना हवी, हे मराठी मनात कधी रुजलं नाही. आपण भांडत राहिलो. शिक्षण, तंत्रज्ञान, उद्योजकता इत्यादींत मागं राहिलो. राजकारण फुटीचं केलं. उद्योग केला लढाऊ कामगार निर्माण करण्याचा! जे बंगालमध्ये ६५ साली घडलं त्याचा परिणाम बंगाल्यांना आजही भोगावा लागत आहे व त्यापासून आपण काही शिकलो नाही.

महाराष्ट्र उद्योगधंद्यात आघाडीवर राहण्याची कारणं अनेक आहेत. त्यावर भाष्य करण्याची गरज नाही. परंतु १९९२ नंतर होत असलेल्या बदलाची जाणीव सर्वच राज्यांना झालीय. स्पर्धा तीव्र झालीय. अर्थात हे लक्षात ठेवलं पाहिजे की, महाराष्ट्राला आघाडीला नेण्यात इतरांचा बराच हातभार लागलाय. उदाहरणार्थ, मुंबईवगळता महाराष्ट्राची देशाच्या इतर राज्याएवढीच मागासलेली स्थिती. मुंबईत पारशी, खोजा, गुजराती, हल्ली दाक्षिणात्य व पंजाब्यांचा हातभार लक्षणीय. इतर विभागांतून येऊन स्थायिक झालेल्यांनी निदान आपलं कल्याण करून घेतलं. गेल्या दोन दशकांत मराठी माणसांचे हक्कांचे आर्थिक मानदंड हातून निसटले. मराठी अधिकारी प्रामाणिक, चारित्र्यवान, ताठ मानेनं चालणारे अशी प्रतिमा. आता सारी मूल्यच बदलली आणि आता बहुतेक सर्व मोक्याच्या वा महत्त्वाच्या जागा अमराठी भाषिकांकडे गेल्या. ज्या दिल्लीत देशाची सूत्रं हलवली जातात, तिथं वरिष्ठांत मराठी नाहीतच. जे महाराष्ट्राचं प्रतिनिधित्व करतात ते महाराष्ट्रातर्फे सेवेत रुजू झालेले इतर भाषिक. खुद्द महाराष्ट्रात आपल्या तरुण वर्गाच्या माफक अपेक्षा म्हणजे नोकरी. शिपाई, कारकून, हमाल असली! जे थोडेफार उद्योगांत धडपड करणारे त्यांनी स्पर्धेत मार खाल्ला.

एकंदरीत आपण अभिमान बाळगावं असं चित्र नाही. इतिहासकाळी मराठे व रजपूत लढाया व तलवारबाजीत अग्रेसर पण काळानुसार राजपुतानातल्या मारवाड्यांनी धंद्यात आघाडी घेतली आणि मराठे फक्त मनगट चावत बसले. घोषणाबाजी केली आणि मागे राहिलो.

आपल्यात एकांडी शिलेदारी फार. काही क्षेत्रांत अभिमानास्पद कामगिरी

बजावली पण ती सांघिक नव्हे तर व्यक्तिनिष्ठ. सिनेसंगीतात लता मंगेशकर, क्रिकेटमध्ये सुनील गावसकर, चित्रकलेत फिदा हुसेन, आणखी अशी कितीतरी उदाहरणं देता येतील. याउलट मारवाडी, गुजराती, सिंधी आदींनी आपला उत्कर्ष साधून घेतला तो ''एकमेका सहाय्य करू'' या भावनेनं.

मराठी माणसात धंदा करण्याची कुवत नाही असं म्हणणं योग्य होणार नाही. सुशिक्षित वर्ग बाजूला ठेवला तर काय आढळतं ? शेतात राबणारा शेतकरी आता नवीन तंत्रज्ञान आत्मसात करून आपली उन्नती करून घेत आहे. फुटकळ धंदे करणारे हजारो आहेत. मासे, भाजी विकणाऱ्या अशिक्षित बायासुद्धा आपली जिद्द दाखवून आहेत. दूध, फळं वगैरेचा धंदा तेजीत आहे आणि सहकारी क्षेत्र आपली क्षमता दाखवून आहे. जुन्या काळी रेडिओ रिपेअर करणारे आता दूरदर्शन संचाचही रिपेअर करू शकतो. पण चांगले मेकॅनिक, सुतार, गवंडी आदी कुशल कारागीर मागणीपेक्षा कमी होत आहेत म्हणून की काय, सुतार पंजाबातून आणि गवंडी गुजरात-राजस्थानातून आणि आंध्रातून मोठ्या संख्येनं आपलं नशीब आजमावण्याकरिता येत राहिले आहेत.

एकूण काय की मराठी माणूस आपल्या नाकर्तेपणामुळे तळागाळात पोचला आहे. मुंबई लोकलच्या प्रथम वर्गात किती मराठी दिसतात ? विमानानं जाणाऱ्या मराठी लोकांची किती संख्या आहे ?

यावरून आठवण झाली. कधीमधी महाराष्ट्राची तुलना जर्मनीशी व गुजरातची इंग्लंडशी केली जाते. दुसऱ्या युद्धाच्या अखेरीस जर्मनीनं पाठ टेकली आणि शरणागतीनंतर त्या देशाच्या पुनर्बांधणीत स्त्रियांनी फार मोठा वाटा उचलला. एक नवी पिढीच निर्माण झाली. शिस्तबद्धपणे कष्ट करून जर्मनीला पूर्वपदावर आणून ठेवलं. महाराष्ट्रात तर स्त्रियांची कर्तबगारी इतर राज्यांच्या तुलनेत केवढी तरी लक्षवेधी आहे. मला वाटतं, महाराष्ट्राला २०२० साली अग्रेसर राहायचं असेल तर आतापासून काही पथ्यं पाळावी लागतील, बदल घडवावे लागतील.

प्रथमत: महाराष्ट्रीय कोण याची व्याख्याच बदलावी लागेल. मराठी भाषेवर प्रेम करणारा, महाराष्ट्रात जन्मलेला वा राहणारा, महाराष्ट्राबाहेर असूनही स्वत:ला मराठी मानणारा व मराठी अस्मितेशी इमान राखणारा तो महाराष्ट्रीय अशी काहीशी सर्वसमाविष्ट कल्पना करावी लागेल. अर्थात मराठी अस्मिता म्हणजे काय हा प्रश्न राहतोच. कारण मुंबईतच नव्हे तर पुण्यासारख्या शहरी एक मराठी दुसऱ्याशी मोडक्या हिंदीत बोलतो.

स्वभाव, चालीरीतीवर आधारित निष्ठा बदलणं कठीण असलं तरी अशक्य नाही. पण प्रामाणिक प्रयत्न हवा. जिथं महाराष्ट्राचा तोटा होतो तिथं बदल निश्चित हवा. आपल्यातला तुसडेपणा, भांडखोर यादवी, आपल्याचेच पाय ओढण्याची कुपमंडूक वृत्ती हे सारं बदलायला हवं. तसंच जे चांगले गुण आहेत त्याची जोपासना करायला हवी आणि ते सर्व प्रत्येक महाराष्ट्रीय माणसानं जाणून अंमलात आणलं पाहिजे. धनंजयराव गाडगीळ व विखे पाटलांनी सहकार्याची कल्पना रुजवली आणि तिचे दूरगामी आर्थिक उन्नतीचे परिणाम आपण पाहतोच.

विज्ञान व त्यावर आधारित तंत्रज्ञानाची घोडदौड प्रचंड वेगानं चालू आहे. पंजाबी व दाक्षिणात्य तरुण-तरुणी परदेशातही नाव काढून आहेत. आपल्या किशोरवयीन तरुण वर्गाला ह्यापासून कितीतरी शिकण्याजोगं आहे.

ह्या जमान्यात सेवाधिष्ठित क्षेत्रांत (सर्व्हिस सेक्टर) कल्पनातीत वाव आहे. प्रत्येक नवीन खुलं होणारं दालन नवनव्या कल्पना मूर्त स्वरूपात आणणाऱ्यावर मेहेरनजर करतंय. पुढील काही वर्षांत सेवाक्षेत्राचा विकास इतक्या मोठ्या प्रमाणावर होणार आहे की, ५०-६० टक्के वा त्याहूनही अधिक प्रमाणात उपजीविकेच्या संधी उपलब्ध होणार आहेत. आजमितीस मराठी तरुण वर्गात कॉम्प्युटर इनफार्मटिक्स आदी क्षेत्रांत असावी तेवढी आस्था नाही, त्यामुळे नवीन निर्माण होत असलेल्या नोकऱ्या व छोटे-मोठे धंदे यात मराठी तरुण अतिशय अल्प प्रमाणात दिसतात, हे बदलायला हवं.

गेल्या एका पिढीत जेवढे बदल पाहिले तेवढे आधीच्या कोणत्याही पिढीनं पाहिले नसतील आणि आता तर आपण औद्योगिक पायावर आधारित समाजातून जागतिकदृष्ट्या एकत्र येणाऱ्या आर्थिक व सामाजिक परिवर्तनाकडे वाटचाल करत आहोत. तेव्हा या होत असलेल्या बदलांना आपण सामोरं जायचं म्हणजे आपल्या दृष्टिकोनांत, वागणुकीत आणि विचार करण्याच्या प्रवृत्तीत योग्य ते फेरफार करायला हवेत. नव्या पिढीपुढे मोठी आव्हानं उभी होतायत आणि त्यांना सामोरं जायचं तर जिद्द हवी आणि मूलत: प्रबोधनाची गरज आहे.

(बी. पी. गुणाजी : 'युरोपियन चेंबर्स ऑफ कॉमर्स' चे सचिव)

***

Omkar Naturotherapy Centre

Anant 3, Gokhale Rd. (W)
Near Portugese Church, Opp. UCO Bank, Dadar, Mumbai - 400 028.
Ph.No.-4221820/4227425 Resi.: 4301435

One & only 10 beds Naturotherapy Residential Hospital with modern aminities Trusted treatment for incurable diseases like Arthritis, Heart Diseases, High blood Pressure, Obesity, Diabetes, Cancer, Sinus, Scitica

No Side Effects

Treatment :- Enema, Masaj, Steam, Mudtherapy, Steam-bath, Calcium-bath, Pyramid therapy, Ahar Chikitsa, Yogachikitsa, Langhan Chikitsa.

Treatment based on Meditation.

काहीही अशक्य नाही

नितीन गडकरी

महाराष्ट्राच्या भविष्याचा विचार करताना गतकाळ आणि वर्तमान नजरेआड होऊ शकत नाही. विपुल नैसर्गिक साधनसंपत्ती असलेले हे राज्य, खळखळता समुद्र, सह्याद्रीचा डोंगर, भूभागातून वाहणाऱ्या नद्या, समृद्ध वनसंपत्ती, भूगर्भातील खनिजांचे साठे, सुपिक जमीन हे सारेच या राज्यात आहे. राज्याला दीर्घ इतिहासाची परंपरा आहे. ज्ञानदान आणि संस्कृतीचा वारसा आहे. कला-साहित्याचे हे माहेरघर. शौर्य आणि संतांच्या गाथा या राज्याने एकाचवेळी गायिल्या आहेत. येथील सर्वसाधारण माणूस पापभीरू आणि सत् प्रवृत्तीचा आहे. बुद्धी आणि कर्तृत्वाने आभाळाएवढी उंची गाठणारे महापुरुष या मातीत जन्माला आले. एवढी सारी अनुकूल परिस्थिती असतानाही राज्यातल्या सर्वसामान्य माणसाची परिस्थिती केविलवाणीच राहिली. एकीकडे संपत्तीचा महापूर आणि दुसरीकडे आत्यंतिक अभावामुळे वाट्याला आलेले किड्यामुंग्यांचे जीवन अशा दुहेरी चेहऱ्याचा महाराष्ट्र आज माझ्यापुढे आहे.

माणसाला धनाची हाव नसावी, पण गरजेएवढे धन मिळविण्याची जिद्द आणि कर्तृत्व मात्र हवेच, अशी माझी प्रामाणिक धारणा आहे. आपल्याला मिळालेले हात आणि बुद्धी नवनिर्मितीसाठी आहे. याच निर्मितीतून समृद्धी येत असते. कोणी चोरून नेईल म्हणून धन मिळविण्याचा प्रयासच करायचा नाही, हा निव्वळ पलायनवाद. या वृत्तीतूनच माणूस कर्तृत्वशून्य बनतो. पैसा-संपत्तीतून काही अवगुणही निर्माण होतात, हे खरे आहे. पण याच धनाचा अभाव हे अनेक समस्यांचे मूळ आहे, हेही नाकारता येणार नाही. धन-संपत्तीच्या संदर्भात महाराष्ट्र निष्कारण द्विधा मनःस्थितीत राहत आला. आहे त्या स्थितीत कसेबसे जगण्याची वृत्ती महाराष्ट्रातील मराठी माणसाने जोपासली. पुढे जाण्याची इच्छा असलेल्या माणसाला नवीनवी दालने खुली होत जातात, प्रगतीचे नवे मार्ग गवसतात आणि माणूस व समाजही समृद्ध होतो, या सूत्राचे भान व्यापक स्तरावर निर्माण झाले की त्या राज्याला-प्रदेशाला कोणी रोखू शकत नाही. माझ्या मते महाराष्ट्राच्या विकासाचा हाच मूलमंत्र आहे.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर या राज्याला विकासाच्या सर्व संधी उपलब्ध होत्या. मन्वंतर घडल्यामुळे नव्या समाजाच्या निर्मितीची संपूर्ण शक्यता होती. गरज होती ती कुशल सारथ्याची. पण या राज्याच्या दुर्दैवाने ही संधी गमावली. नेतृत्व आपल्या राजकारणात आणि सत्तेच्या गुर्मीत राहिले. राज्याच्या भल्याची काळजी घेतली गेली नाही आणि या राज्याची घडी व्यवस्थित बसली नाही. हीच स्थिती आजतागायत कायम आहे. आता तर आव्हान अधिकच मोठे होऊन गेले आहे. अपार गरजा आणि मर्यादित साधने असे व्यस्त प्रमाण निर्माण झाले आहे.

स्वार्थी राजकारणी, बुद्धिभेद करणारे विद्वान, समाजहिताचा स्पर्श नसलेले प्रशासन, परस्परविरोधी कायदे व नियमांचे जाळे, संवेदनशून्य नेतृत्व हे सारे घटक आणि त्यांच्या वृत्ती इतक्या जड होऊन स्थिरावल्या आहेत की राज्याला नवी दिशा देण्याचा प्रयास सफल होईल की नाही, याची काळजी वाटावी. पण मी अत्यंत आशावादी आहे. राखेतून जपान उभा होतो, जगातली प्रमुख आर्थिक शक्ती बनतो, दुसऱ्या महायुद्धात कमालीची दुर्गती झालेले राष्ट्र नव्या जोमाने उभे राहते, मग महाराष्ट्र आपली मरगळ झटकून आपल्या स्वत्वासह का उभा राहू नये ? राज्यातला मराठी माणूस एकदा का नव्या काळाचे स्वागत करायला सिद्ध झाला की मग या राज्याची वाट कोणीही अडवू शकणार नाही, अशी माझी ठाम धारणा आहे.

भविष्यातला नवा महाराष्ट्र घडविण्यासाठी आज खरी गरज आहे ती दुर्दम्य इच्छाशक्तीची आणि प्रामाणिक प्रयत्नांची. मला मिळालेल्या संधीचा पुरेपूर उपयोग करून मी असा प्रयत्न सुरू केला आहे. शहरांच्या गरजा लक्षात घेऊन नवे फ्लायओव्हर, रुंद रस्ते, पार्किंगच्या जागा आणि एक्स्प्रेस हायवे बांधण्याचा आमचा प्रयास आहे. याचवेळी ग्रामीण भागातील प्रत्येक गाव बारमाही पक्क्या रस्त्याने हमरस्त्याशी जोडण्याचाही संकल्प आहे.

" American roads are good not because America is rich, but America is rich because its roads are good." असे जॉन एफ. केनेडी म्हणाले होते. विकासाचा मार्ग चांगल्या रस्त्यांवरूनच

प्रशस्त होत असतो. ग्रामीण भागाचे सारे जीवनच या रस्त्यांशी निगडित आहे. राज्यातले अनेक भाग अजूनही दुर्गम असल्यामुळेच दुर्लक्षित राहून गेले आहेत. एकदा का सर्वदूर रस्त्यांचे जाळे निर्माण झाले आणि विश्वसनीय, कार्यक्षम संपर्कव्यवस्था उभी झाली की विकासाचे अनेक मार्ग आपोआप चालून येतील, याचा मला विश्वास आहे. आजमितीस शहरे अतोनात वाढली आणि गावे मात्र उद्ध्वस्त होण्याच्या स्थितीत पोहोचली. दोन्हीकडे समस्यांचे डोंगर उभे झाले. आमच्या नागपूरची 'अस्ताव्यस्त वाढलेले विशाल खेडे' अशी संभावना होते. खेड्यापाड्यांची संभावना कोणत्या शब्दात करावी ? ऑप्टिक फायबर, उपग्रह आणि संगणक या आजच्या तंत्रज्ञानाचा उपयोग करून राज्याच्या प्रत्येक गावखेड्यापर्यंत प्रभावी संपर्कव्यवस्था निर्माण झाली तर ग्रामीण भागाचे नागरीकरण व्हायला वेळ लागणार नाही. परिणामी ग्रामीणांचा शहराकडे चाललेला ओघ तर थांबेलच, शिवाय कुठूनही केव्हाही संपर्क शक्य झाला, डेटा ट्रान्समिशन, व्हिडिओ कॉन्फरन्सिंगसारखी तंत्र सर्वत्र उपलब्ध झाली तर शहरांमधील उद्योग-व्यावसायिकांनाही अन्यत्र वळायला हरकत राहणार नाही. शहर आणि खेड्यांमधील दुरावा संपुष्टात आणण्याचा काळ आला आहे पाणी, रस्ते, ऊर्जा, दळणवळणाची साधने आणि संपर्कव्यवस्था या विकासाच्या पंचसूत्रीचा उपयोग करून आणि विकासाभिमुख दृष्टिकोन, उपक्रमशीलता आणि रचनात्मक कार्याद्वारे राज्याचे भविष्य घडविण्याचा निर्धार करावा लागणार आहे.

आगामी काळात राज्याच्या विकासाचे नियोजन करताना विकासविषयांचा प्राधान्यक्रम निर्धारित करणे अपरिहार्य ठरणार आहे. शहरे व ग्रामीण भागाच्या विकासयोजना भिन्न असल्या तरी त्यात योग्य समन्वय साधावा लागणार आहे. शहराच्या पिण्याच्या पाण्याची सोय करतानाच त्यातून ग्रामीण भागातील सिंचनव्यवस्था कशी उभी राहील, नदीनाल्यांवर पूल बांधताना ते "पूल वजा बंधारे" कसे बनतील, नवे तंत्रज्ञ निर्माण करतानाच त्यांच्या कृषी औद्योगिकीकरण्यासाठी कसा उपयोग होऊ शकेल, याचे नियोजन करणे क्रमप्राप्त आहे. प. महाराष्ट्रात सिंचनाच्या सोयी येताच ऊस आला, साखर कारखानदारी वाढली, उत्तम शिक्षणसंस्था, इस्पितळे उभी झाली. कोकण, विदर्भ-मराठवाड्याच्या बाबतीत नव्या काळात हा विचार होईल. नवे सिंचनप्रकल्प उभे होताच उसाप्रमाणेच कापूस किंवा अन्य पिके, भाज्या-फळे आणि त्यावर आधारित उद्योगांचे जाळे तयार होऊ शकेल. ग्रामीण जनतेची पण क्रयशक्ती जेवढी वाढेल तेवढ्या प्रमाणात महाराष्ट्रात समृद्धी निर्माण होईल.

भविष्याचा वेध घेणाऱ्या महाराष्ट्राला आता खनिजसंपत्तीचा अधिकाधिक उपयोग आणि भूमीची उत्पादकता वाढविण्याचा प्रयास केल्याशिवाय गत्यंतर नाही. कोणत्याही मोकळ्या पडित जागी नव्या वनांची निर्मिती, उपलब्ध पाण्याचा अधिकाधिक वापर आणि कृषिमालाचे निर्यातक्षम उत्पादन करून महाराष्ट्राला अधिक संपन्न करणे फार अवघड नाही. अनेक क्षेत्रांचे खाजगीकरण करून शासकीय पैशाचा अधिकाधिक उपयोग पायाभूत विकासकामांसाठी करण्याचा विचार सुरू झाला आहे. यामुळेही विकासाचे चक्र वेगाने फिरणार आहे.

प्रत्येक काळाच्या विशिष्ट समस्या असतात, पुढील २५ वर्षांत नवनव्या समस्या निर्माण होतील आणि त्यावर उपायही गवसतील. उपलब्ध साधनसामुग्री, मनुष्यबळ आणि क्षेत्रनिहाय गरजा याकडे राज्याच्या नियोजन पद्धतीने पुरेसे लक्ष दिले नाही, किंवा तत्कालीन सत्ताधिशांनी समतोल विकासाचा ध्यासच घेतला नाही, त्यामुळे हे संपन्न राज्य निष्कारण समस्याग्रस्त बनले. या राज्याचे वर्तमान खूपच समस्यांनी वेढलेले दिसत असले तरी पुढील शतकाचा पूर्वार्ध महाराष्ट्राला संपन्न बनविणारा आणि जनतेचे जीवनमान उंचावणारा राहील.

२०२० सालच्या महाराष्ट्राचे जे चित्र माझ्या मनात आहे, ते साकार होईल की नाही, हे काळच ठरविणार आहे. राज्यातले सर्व तालुके विमानसेवेने आणि सर्व गावे कार्यक्षम संपर्कव्यवस्थेने एकमेकांशी जोडलेली आहेत. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून राज्यातले शेतकरी अधिक उत्पन्न मिळवीत आहेत. ग्रामीण भागात निरनिराळे उद्योग व स्वयंरोजगार सुरू झाले आहेत. सर्वांना रोजगार आहे. राज्यातील सर्वांची क्रयशक्ती वाढली आहे. शिक्षण-आरोग्याच्या सोयी उपलब्ध आहेत. शहरेही सुनियोजित आहेत. वन-बागबगिच्यांनी राज्य फुलले आहे. फळ-फुलांची निर्यात केली जात आहे. कला-साहित्याचे क्षेत्र प्रगत व समृद्ध झाले आहे. तंत्रज्ञान आणि संशोधन क्षेत्रात राज्य आघाडीवर आहे. अधिकाधिक लोकांना अधिकाधिक सुखसोयींनी समृद्ध असा महाराष्ट्र माझ्या नजरेपुढे आहे. साऱ्यांनी आपापला वाटा उचलला, प्रयत्नांची पराकाष्ठा झाली, तर हे चित्र अशक्य कोटीतले नाही. पण भविष्यात काय दडले आहे हे कोणी सांगावे ?

(नितीन गडकरी : सार्वजनिक बांधकाम खात्याचे मंत्री)

***

महाराष्ट्र अग्रगण्यच असणार

मनोहर जोशी

आज महाराष्ट्र हे अनेक बाबतीत देशातील आघाडीचं, अग्रगण्य म्हणून मान्य झालेलं राज्य आहे. राजकारण, समाजकारण किंवा आर्थिक संदर्भानं जरी आपण विचार केला तरी महाराष्ट्र राज्य पहिल्या श्रेणीतील राज्य आहे आणि इ. स. २०२० पर्यंत ते तसंच अग्रगण्य राहील यात मला कसलाच संशय नाही, तशी माझी खात्रीच आहे. मी निराशावादी नाही, मी आशावादी आहे. पण माझा आशावाद वस्तुनिष्ठ स्वरूपाचा आहे. मी भूतकाळातील घटनांचा आजच्या घटनांशी असलेला संबंध तर लक्षात घेतोच, पण त्यातूनच उद्याचा वेधही घेऊ शकतो. असा विचार करताना मला असं वाटतं की, महाराष्ट्राची जागा, या राज्याचं स्थान दुसरं कोणतंही राज्य घेऊ शकत नाही. इतर राज्य महाराष्ट्राला मागे टाकत आहेत असं मला अजिबात वाटत नाही. पन्नास-साठ वर्षांपूर्वी 'व्यापारनगरी' म्हणून मुंबईचं जेवढं आकर्षण होतं तसं ते आजही आहे. भारताची 'आर्थिक आणि व्यावसायिक राजधानी' हा मुंबईचा लौकिक आणि तशी तिची प्रतिष्ठा सतत वाढत गेलेली दिसेल. आपल्या राज्याला नैसर्गिक साधनसंपत्तीचं वरदान आहे. ती राज्याची शक्ती आहे. याशिवाय महाराष्ट्राची कामाची विशिष्ट शैली आहे. एक खास 'वर्क कल्चर' इथे आहे. लोकांची कष्ट करण्याची तयारी आहे, तशी आवडही आहे. मुंबई-पुणे-नाशिक हा उद्योग-व्यवसायांचा एक त्रिकोण मानला तर त्याच्या कक्षा संभाजीनगर-जळगाव-नगर पर्यंत वाढलेल्या पाहिल्या की इतर राज्य-औद्योगिकदृष्ट्या महाराष्ट्राला मागे टाकतील ही भीती मला व्यर्थ वाटते. मला असं वाटतं की, महाराष्ट्रानं आता इतर राज्यांशी स्पर्धा करणं सोडून देऊन इतर प्रगत देशांशी स्पर्धा करावी. महाराष्ट्रानं राजकारण थोडं केलं आणि समाजकारणात व्यापक दृष्टिकोन ठेवला तर महाराष्ट्र फारच पुढे जाईल असं मला वाटतं. हे राज्य आज देशातलं पहिल्या क्रमांकाचं राज्य आहे. समाजकारण आणि औद्योगिकीकरण यात आपण व्यापक भूमिका घेत गेलो तर प्रगत औद्योगिक देशांमध्येही महाराष्ट्र पहिल्या श्रेणीत येईल. महाराष्ट्र या संदर्भात बदलतो आहे हे निश्चित.

आर्थिकदृष्ट्या बघता महाराष्ट्र होता तसा राहिला नाही. इथे पैसा निर्माण व्हायला लागला. 'वेल्थ' वाढली. पण श्रीमंत अधिक श्रीमंत झाले. जे श्रीमंत झाले ते फारच श्रीमंत झाले. आज देशातल्या अतिश्रीमंत माणसांची यादी करायची ठरवली तर त्यात महाराष्ट्रातील लोकच अधिक असतील. ही मानसिकता, म्हणजे संपत्तीसंचय करणाऱ्या वर्गाची मानसिकता बदलायला हवी ही मानसिकता बदलायची असेल तर इन्फ्रास्ट्रक्चर (मूलभूत सुविधा) लागतं. उद्योगपतीलाही इन्फ्रास्ट्रक्चर लागतं. एखाद्या उद्योगपतीला कुणी चंद्रपूरला उद्योग सुरू कर म्हटलं तर तो करणार नाही. कारण तिथे विमानसेवा नाही. इन्फ्रास्ट्रक्चरमध्ये आपण चांगले रस्ते, वीज, भरपूर पाणी यांचा विचार करतो. मुख्य म्हणजे वाहतूक. दळणवळणाची साधनं उपलब्ध असणं. म्हणून आम्ही प्रथम, महाराष्ट्र विमानसेवेनं जोडण्याचा कार्यप्रकल्प हातात घेतला. महाराष्ट्राचं पुढच्या पंचवीस वर्षांतल्या प्रगतीचं इंगित डेव्हलपमेंट ऑफ इन्फ्रास्ट्रक्चर हेच असणार आहे. उद्योगांना अशा मूलभूत सुविधा उपलब्ध झाल्या तर महाराष्ट्राचा विकास वेगानं होईल. अशा विकासाचा प्रारंभ आम्ही केला आहे. राज्यात आम्ही नऊ ठिकाणी 'पंचतारांकित इंडस्ट्रिअल इस्टेटस्' उभारतो आहोत. उद्योजकाला आवश्यक असणाऱ्या गोष्टी त्याला या 'पंचतारांकित (हा मी घडवलेला शब्दप्रयोग आहे) औद्योगिक वसाहती'त लगेचच प्राप्त होतील. इ. स. २०२० पर्यंत या सर्व, नऊ वसाहती पूर्ण झाल्याचं स्वप्न मी बघतो आहे. त्या तशा पूर्ण होतील याची मला खात्री आहे. मला अनेकदा असं विचारलं जातं की, अमूक उद्योग करायचा तर इतकं किंवा तितकं भांडवल पाहिजे; ते कसं आणि कुठून आणायचं? मी नेहमी म्हणतो की, धंद्याला भांडवल लागत नाही. ते आपोआप येतं, तसं ते येऊ शकतं. आता मराठी माणूस या बाबतीत सुधारतो आहे. अगदी गुजराती माणसाएवढा नसला तरी सुधारतो आहे.

महाराष्ट्रानं शिक्षणाला अवास्तव महत्त्व दिलं म्हणून इथे 'उद्योजक' निर्माण झाले नाहीत. अशा म्हणण्यात मला काही अर्थ दिसत नाही. शिक्षण म्हणजे नुसती पदवी नाही. शिक्षण म्हणजे संस्कार, विवेकशीलता, सुसंस्कृतता! महाराष्ट्राचा पिंड अध्यात्माचा आहे. इथे पैशाला महत्त्व नाही तर विवेकाला आहे. मराठी माणूस प्रामाणिक आहे, सचोटीचा व्यवहार करणारा आहे. देशात आज या सचोटीमुळेच मराठी उद्योजक ओळखला आणि वाखाणला जातो. सुसंस्कृतता आणि पैसा या दोन्ही गोष्टी एकत्रित करायला मराठी माणूस आता शिकतो आहे. महाराष्ट्राचा दुसरा स्वभावविशेष आहे तो म्हणजे त्याचे योद्धापण, क्रांतिकारकपण आणि बंडखोरपणा! वासुदेव बळवंत, सावरकर किंवा लोकमान्य टिळक हे क्रांतिकारक आणि बंडखोरही होते. छत्रपती शिवाजी महाराज हे तर आद्य बंडखोर योद्धे! यांच्यापैकी कुणाचेच

महत्त्व आणि महानपण इ. स. २०२० पर्यंत कमी होणारे नाही. ते टिकायला, वाढायला हवे कारण ती महाराष्ट्राची परंपरा आहे.

आता अशी परंपरा असणाऱ्या महाराष्ट्रामध्ये राजकारणाला कोणत्याही प्रकारच्या प्रगतीपेक्षा अधिक रस आहे. राजकारणात इतका अवास्तव रस घेण्याचं महाराष्ट्रानं सोडलं तर हे राज्य आज आहे त्यापेक्षा कित्येक पटींनी प्रगती करू शकेल. पण आजच्या महाराष्ट्राकडे पाहिलं तरी असं दिसेल की इतर राज्यांच्या तुलनेत गेल्या पन्नास वर्षांत आपल्याकडे समाधानकारक प्रगती झाली. या प्रगतीत मुंबईचं स्थान अव्वल राहिलं. महाराष्ट्रात जेवढी लोकोत्तर व्यक्तिमत्त्वं झाली तेवढी इतरत्र दिसणार नाहीत. महाराष्ट्रातल्या या 'टॉवरिंग पर्सनॅलिटीज्' एकेकट्या राहिल्या. अशी एकेक व्यक्ती म्हणजे दीपस्तंभ! अशा दीपस्तंभांचा प्रदेश जो असतो तोच 'महा' असतो. महाराष्ट्रातील माणसांचा, त्यातही मराठी माणसांचा अधिक एक विशेष मला नोंदवावसा वाटतो. हा विशेष म्हणजे, असंगाशी संग करण्याच्या बाबतीत महाराष्ट्राची भूमिका नकारार्थी असते. असंगाशी संग करण्यापेक्षा मराठी माणूस उपाशी राहाणं पत्करतो. २०२० पर्यंत हेही वैशिष्ट्य महाराष्ट्र कायम राखेल असं वाटतं.

काहीजण असं म्हणतात की, सर्व क्षेत्रात मराठी माणूस मागें पडतो आहे. मला काही असं वाटत नाही. काही प्रमाणात मराठी माणसाची पीछेहाट झाली असेल, पण असे चढउतार तर असणारच. मला वाटतं की आपण ज्या क्षेत्रात असू त्या क्षेत्राप्रमाणे काम करावं. म्हणजे राजकारण राजकारणासारखं आणि व्यवसाय-धंदा धंद्यासारखा करावा. त्यात गल्लत करू नये. आपल्याकडे अशी चूक लोक करून बसले आहेत. आपण राजकारणात धंदा आणला आणि धंद्यात राजकारण आणल्यानं दोन्ही क्षेत्रांचं नुकसान झालं. मी बाहेरच्या राज्यातले मोठे राजकीय नेते बघतो, तेव्हा लक्षात येतं की त्यांनी राजकारण हे राजकारणासारखं केलं. त्यामुळे त्यांना विश्वासार्हता आहे. आपल्याकडे राजकारणात धंदा आल्यानं नेत्यांची विश्वासार्हता संपली. राजकारणात नेत्यांची विश्वासार्हता ही फार मोठी गोष्ट ठरते. त्यामुळे देशाच्या पातळीवर महाराष्ट्र मागे पडलेला दिसतो. यात दुसरा मुद्दा आहे तो भाषेचा. इंग्रजी आणि हिंदी भाषेवर प्रभुत्व असणारे नेते आपल्याकडे तुरळक आहेत, म्हणूनही केंद्रात आपण मागे पडलो.

महाराष्ट्राची अगदी डोळ्यात भरेल अशी प्रगती झाली नाही हे म्हणणं काहीसं खरं आहे. पण याचं कारण काय? मला वाटतं की आपला मुख्य रस्ता चुकला. हा मुख्य रस्ता म्हणजे आर्थिक रस्ता! हाच रस्ता चुकल्यानं आणि आर्थिक सामर्थ्याचं महत्त्व लक्षात न घेतल्यानं आपल्याकडे इतर राज्यांच्या तुलनेत वाहतुकीसाठी आवश्यक आणणारे रस्तेही दुय्यम दर्जाचे राहिले. आता आम्ही त्यात सुधारणा करतो आहोत. इन्फ्रास्ट्रक्चर उभारण्याकडे, उदारीकरणाकडे आपण दुर्लक्ष केलं. आता आमचं सरकार असं धोरण आखून काम करत आहे. आम्ही चार राजमार्गांचं काम हाती घेतलं आहे. ते तर पूर्ण होतीलच, पण इ. स. २०२० पर्यंत महाराष्ट्रात 'ऑटोबान'सारखं उत्तम रस्त्यांचं जाळं निर्माण होईल. आम्ही इतर विकासाच्या कामांहून अधिक महत्त्व रस्तेबांधणीला देतो आहोत, कारण रस्ते या राज्याच्या रक्तवाहिन्या आहेत. रस्ते व्यवस्थित असतील तर सगळं व्यवस्थित घडेल. आमच्या सरकारच्या पुढच्या अडीच वर्षांमध्येच किमान दोन राजमार्ग आम्ही 'पायलट रोडस्' म्हणून दाखवू शकू.

'कृष्णा खोरे प्रकल्पा'मुळे जलसिंचनाखालची जमीन दुप्पट होणार आहे. आज महाराष्ट्राचं इरिगेशनचं प्रमाण १३% आहे. मी राज्याच्या मुख्यमंत्रीपदी राहिलो तर इ. स. २०२०पर्यंत हेच प्रमाण मी २५% टक्क्यांपर्यंत तरी खात्रीनं आणेन. महाराष्ट्राला पाण्याचं महत्त्व एवढ्या वर्षांत कसं कळलं नाही, याचंच मला आश्चर्य वाटतं. महाराष्ट्रातला शेतकरी अतिशय चांगला आहे, कष्टाला तो मागे सरणारा नाही. पण पाणीच नसेल तर तो काय करील? शेतकऱ्याला पाणी पुरवणं हे सरकारचं काम आहे. २०२०पर्यंत शिवशाहीचंच सरकार राहिलं तर पाण्याचा प्रश्न बराचसा सुटेल असं मला वाटतं. असाच एक दुसरा मुद्दा मला मांडावासा वाटतो. तो जागतिकीकरणामध्ये महाराष्ट्राचं योगदान काय असेल हा आहे. आज पुण्याच्या आसपास मी जी 'फॉर्मेशन टेक्नॉलॉजी' पाहतोय ती मला फार समाधान देणारी गोष्ट वाटते. नवे विचार, नवे तंत्रज्ञान, व्यापक भूमिका घेणारा तरुणवर्ग जर पुढे आला तर काही अशक्य आहे असं मला वाटत नाही. मी तर आता शाळाशाळांतून संगणक देण्याचा निर्णय घेतो आहे. इंटरनेट, संगणक आणि इतर आधुनिक तंत्रज्ञान आपला तरुणवर्ग आत्मसात करील आणि तो महाराष्ट्राला पुढील पंचवीस वर्षांमध्ये खूप पुढे नेईल असं मला खात्रीनं वाटतं. हीच आधुनिक दृष्टी राजकारणातल्या लोकांनी ठेवावी अशी माझी अपेक्षा आहे. मुख्य मुद्दा हा आहे की, राज्याचा आर्थिक पाया भक्कम पाहिजे. हा पाया भक्कम असला तर त्यावर आधारलेला विकास साध्य होईलच. इ. स. २०२०पर्यंत या दृष्टीनं समाधानकारक परिस्थिती असेल असं मला वाटतं.

परदेशस्थ भारतीयांना भारतात उद्योगधंदे, व्यवसाय, शिक्षण, कारखानदारी यासाठी परत येण्यासारखी परिस्थिती आपण झपाट्यानं निर्माण करायला हवी. करमरकर, काकडे आणि इतर अत्यंत बुद्धिमान, कर्तृत्ववान परदेशस्थ मराठी किंवा महाराष्ट्रीय व्यक्तींकडे मी फार आशेनं बघतोय. त्यांनी महाराष्ट्रात परतावं, इथं काम करावं आणि महाराष्ट्रानं त्यांना प्रतिसाद द्यावा असं मला वाटतं. सर्वांनी महाराष्ट्राच्या उन्नतीचाच केवळ विचार केला आणि सहकार्याची भूमिका घेतली, तर इ. स. २०२०पर्यंत महाराष्ट्र राज्य सर्वच क्षेत्रात अधिक 'महा' होऊन जागतिक पातळीवरही सामर्थ्यवान आणि अग्रगण्य होईल असा मला विश्वास वाटतो.

(मनोहर जोशी : महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री)

नव्या जीवनाची पहाट

भवरलाल जैन

भारतवर्षात महाराष्ट्राचे असलेले मानपानाचे स्थान कायम ठेवण्यासाठी नव्हे, तर त्यावर तुरा चढविण्यासाठी महाराष्ट्राने भविष्याची चाहूल घेऊन त्यासाठी कंबर कसली पाहिजे.

प्रस्थापित कायदेकानून, रूढीरिवाज, नियम, परंपरा, तत्त्व, आदर्शकार्यपद्धती, दंडक, परिपाठ, सवयी, मूल्य, गृहितसत्य, प्रतिबंध, अंधश्रद्धा, आग्रही वा दुराग्रही मतप्रणाली, कलुषित मत या सर्वांची गोळाबेरीज म्हणजेच आपली संस्कृती. तिच्या आधारे निर्मित व तिच्या अनुषंगाने नांदत असणारी मानवजात यालाच आपण समाज म्हणतो. जेव्हा जेव्हा यापैकी एक किंवा अधिक आधारस्तंभावर मूलभूत आधार होता, प्रस्थापितांना किंवा वस्तुस्वरूप अधिष्ठानांना ललकारले जाते, त्या त्या वेळी सामाजिक जीवनात काही किंवा अनेक समुद्रासारख्या लाटा निर्माण होतात.

पूर्वी अशा लाटा साठ वर्षांत एकवेळी उठत असत. १८ व्या शतकांत जे ६०-७० वर्षांत घडत असे ते १९ व्या शतकात १५-२० वर्षात घडले. २१व्या शतकामध्ये असे मूलभूत बदल आपल्या जीवनाच्या प्रत्येक दालनात सुमारे ७ ते १० वर्षांत किंबहुना त्यापेक्षा कमी काळात घडून येणार असे चित्र स्पष्ट दिसते आहे. ही संस्कृतीच्या वयाची उतरती भाजणी पाहिली तर सध्याच्या संस्कृतीचा अंत दृष्टीपथातच आहे हे दिसते. आपल्या हयातीतच आपल्या संस्कृतीचा विनाश पाहाणारी २१व्या शतकांत जन्मलेली पहिली पिढी ही पहिलीच ठरणार.

सध्याच्या माहितीवर आधारित अर्थव्यवस्थेला (उद्योगव्यवसाय, कृषीउद्योग व तंत्रज्ञान सेवा आधारित व्यवसाय किंवा उद्योग) ललकारणारी नवीन जैविक अर्थव्यवस्था २१व्या शतकात सूक्ष्म-करण व अभियांत्रिकी मार्गांनी प्रस्थापित व्यवस्थेला मागे टाकणार. तिचा प्रसार भयानक वेगाने होत असून ती व्यवस्था मानव जातीचे पूर्ण अस्तित्व व्यापणार आहे. मानवी केसाच्या फक्त दुप्पट जाडीच्या जागेत जाऊन बसेल असे सूक्ष्म मशीन, स्थिरविद्युत, सूक्ष्म सेन्सर्स, सूक्ष्म इलेक्ट्रॉन्स, न्यूरो कॉम्प्युटर्स, सूक्ष्म सिलीकॉन चिप्स यांच्या सहाय्याने असली मशीनरी बनायला लागली आहे व त्यास आवश्यक ते तंत्रज्ञान व अभियांत्रिकी बैठक आपल्या दृष्टीपथात आहे.

जैविक शास्त्रावर आधारित गोष्टींचे व्यापारीकरण होताच ते आपल्या जीवनास वेढून टाकतील, बाथरूम असो, स्वयंपाकघर असो, खेळणी असोत, गाड्या असोत, शेती असो वा कारखन्ने असो व त्यापेक्षाही जास्त म्हणजे मानवी शरीर असो त्यामध्ये त्याचा शिरकाव होईल आणि त्या सूक्ष्म तंत्रज्ञानाच्या आधाराने कमीत कमी किमतीत जास्ती कार्यक्षम वस्तू बनविल्या जातील. आगपेटीएवढा फ्रिज, साबणाएवढी गाडी, आपल्या रक्तपेशीत जाऊ शकेल असा रोबो मानव हे सर्व कल्पनेच्या विश्वातून प्रत्यक्ष दृष्टीपथात येऊ घातले आहेत. याच तर्काच्या आधारे २१व्या शतकामध्ये उद्योगव्यवसाय, मानवी शरीरसंपदा या सर्वांना जैविक अर्थपद्धतीचा आधार घ्यावा लागेल आणि म्हणूनच महाराष्ट्राने आता उगवत्या जैविक युगाला सामोरे जाण्याची तयारी ठेवावी.

यापुढे आकस्मिक योगायोगाने घडणाऱ्या घटना, अंदाधुंदी, गोंधळ यांचा प्रादुर्भाव वाढून त्याच्या अनुषंगाने अर्थव्यवस्थेत व प्रशासनाच्या तत्त्वप्रणालीत बदल घडतील. उद्दिष्ट किंवा विकास हा आधार राहणार नाही. जैविक व्यवस्थेत निर्माण झालेल्या सुबत्तेमुळे, फोफावलेल्या लोकसंख्या वाढीने, अतिसूक्ष्म मशिनच्या अमर्याद वाढीने बेकारीचा प्रादुर्भाव वाढून सामाजिक शांतीला भलेमोठे खिंडार पडणार. अर्थात हे सगळे व्हायला अजून ३०-४० वर्षांचा अवकाश आहे. आता असलेले अमाप शासकीय हस्तक्षेप, आवाक्याबाहेर गेलेल्या औद्योगिक, व्यावसायिक, राजकीय संस्थांना मोठे खिंडार पडून त्या जागी लहान व्यवसाय, लहान शासन, विकेंद्रित सत्ताकेंद्रे यांचा उदय होईल. जग आहे त्यापेक्षाही लहान होऊन अंतर आणि वेळ यांच्या मूलभूत व्याख्यांमध्येच बदल होईल. आजच्या कॉम्प्युटर्सची पॉवर झुरळाएवढीच आहे. जनावराएवढी वा माणसाएवढी नव्हे. उद्याच्या कॉम्प्युटरची स्मरणशक्ती माणसाच्या मेंदूएवढी असेल व माणसाला जशा भावना, अंतर्ज्ञान, न्यायनिवाड्याची शक्ती असते तशी त्याच्याही अंगी असेल.

महाराष्ट्राला देशाच्याच नव्हे पण जागतिक पातळीवर विकास साधावयाचा असेल तर या येऊ घातलेल्या मूलभूत बदलांकडे किंवा ते घडवून आणण्याची धमक, दूरदृष्टी असणाऱ्या व्यक्तीकडे, तंत्रज्ञानाकडे, शास्त्रशुद्ध विचारांकडे, वरकरणी 'मूर्खपणा' वाटणाऱ्या

कल्पनांकडे आकसाने न बघता खुल्या हृदयाने त्यांचे स्वागत करायला शिकले पाहिजे.

सत्तेचे विकेंद्रीकरण, अर्थव्यवस्थेचे मुक्तीकरण, प्रादेशिक अपेक्षांचे लोंढे थोपविण्यापेक्षा त्यांना सामोरे जाऊन वळण घालता आले तर बरे. परंतु तसे न जमल्यास त्यांना मुक्त सोडणे शहाणपणाचे ठरेल. कृषी क्षेत्रात आणि एकूण सामाजिक व्यवस्थेमध्ये पाणी हा अत्यंत स्फोटक प्रश्न राहणार असून त्याच्या नियोजनाबद्दल उदासीनता दाखविली तर तो प्रश्न अशांततेची व अराजकतेची ठिणगी ठरणार आहे. सामाजिक आणि आर्थिक प्रगती पाणी नियोजनावर व पाण्याच्या प्रतीशी संबंधित राहणार आहे. २०२० वर्षांपर्यंत महाराष्ट्राच्या भूतलात असलेले पाणी आणखी खाली जाणार आहे. जमीन नापिक ठरणार आहे. कीटक- नाशके व रासायनिक खते यांच्यामुळे दुष्परिणाम जास्त ठळक होणार आहेत.

जे अशक्य वाटते परंतु ते साध्य केले तर आपल्या जीवनात आमूलाग्र बदल घडून येतील अशा गोष्टींना व व्यक्तींना उत्साहित केले पाहिजे. ही काळाची गरज आहे. अशक्य वाटणारे सगळे प्रस्ताव खुल्या दिलाने आपल्या सहकाऱ्यांशी, ज्यांच्या फायद्यासाठी ते आहेत त्यांच्याशी व ज्यांना त्या गोष्टीचा काहीही अनुभव नाही अशा नवख्या लोकांशीसुद्धा चर्चिले गेले पाहिजेत. महाराष्ट्राचे भवितव्य त्यांनी स्वत:च घडविले पाहिजे अन्यथा ते दिल्लीतील केंद्र शासन किंवा शेजारपाजारचे गुजरात, कर्नाटकासारखे प्रांत किंवा इतर कुणी शक्ती घडवतील.

आपण इतरांपेक्षा चांगले आहोत या सुखद भावनेपोटी किंवा आहे ते चांगले आहे, यापेक्षा चांगले घडणे अशक्य आहे, आपला भूतकाळ उज्ज्वल होता म्हणून भविष्यकाळसुद्धा चांगलाच राहील अशा गोड गैरसमजामध्ये आपण राहता कामा नये. इतरांशी तुलनेने जगण्यापेक्षा आपल्या स्वत:चे उच्चतम दंडक बदलत्या काळाची चाहूल घेऊन घालून घेतले पाहिजेत व त्यांना सतत तपासत राहिले पाहिजे. विजय ज्यावेळी अगदीच दृष्टीपथात असतो नेमका त्याचवेळी या गतिमान जगात इतर कोणीतरी नवीन कल्पनेच्या आधारे आपल्याकडून तो विजय हिरावून घेतो. अशी कित्येक उदाहरणे आपल्या समोर आहेत.

आपण 'जैसे थे' अशा प्रणालीने वागण्यापेक्षा 'बदल' आपल्या जीवनाच्या विविध पैलूंचा अविभाज्य घटक मानला पाहिजे. मग ते जीवन व्यक्तिगत असो, सामाजिक असो, सांस्कृतिक असो वा आर्थिक असो आपला उज्ज्वल भूतकाळ आपल्या उत्तम भविष्याची हमी धरता येणार नाही. बदल अटळ आहे. तांत्रिक बदलांमध्ये कॉम्प्युटर्स, सामाजिक बदलांमध्ये जातीपाती, धर्म-अधर्म, वेशभूषा-केशभूषा, सूक्ष्म कुटुंबाची किंवा कुटुंबविरहित मैत्रीपूर्ण स्त्रीपुरुषांचे संबंध असण्याची, राजकीय क्षेत्रात स्वैरलोकशाहीपेक्षा गाईडेड् लोकशाही प्रस्थापित होण्याची, प्रसंगी लहानलहान राज्ये होण्याची शक्यता मुळीच टाळता येणार नाही.

नवनवीन संधी व दालने जी पूर्वी दृष्टीपथातही नव्हती ती आता आपल्या आवाक्यात येऊ लागली आहे. या सर्व गोष्टी ज्या कोणी प्रथम उच्चारल्या त्या वेळी त्याला समाजाचा, शासनाचा रोष पत्करावा लागला, हा इतिहास असला तरी त्याची पुनरावृत्ती महाराष्ट्रात तरी होऊ देता कामा नये.

जपानसारख्या राष्ट्राने आपली सरासरी उंची २ इंचांनी वाढवून घेतली. एकेकाळी टाकाऊ म्हणून नामुष्किला आलेली त्यांची उत्पादने आज गुणवत्तेच्या यादीत जागतिक बाजारपेठेत अग्रेसर झाली असून तो देश आर्थिकरीत्या इतर सर्व देशांच्या पुढे गेला आहे. जर सबंध देश असल्या अशक्य गोष्टी अवघ्या २०-२५ वर्षांत घडवून आणू शकत असेल तर किमान पक्षी त्याच्या पायावर पाय ठेवण्याचे धारिष्ट्य महाराष्ट्राने दाखवावे. आपला महाराष्ट्र वेगळा आहे, आम्ही आधी करून पाहिले आहे, असल्या गोष्टी फार पुरोगामी स्वरूपाच्या आहेत, असे करणे पॉलिसीला धरून नाही, हे अशक्य आहे असल्या सबबी न मांडता खुल्या दिलाने आपण या अमर्यादित जगाकडे आशेच्या व आदराच्या भावनेने बघितले पाहिजे. तरच आपण उद्याचा समृद्ध महाराष्ट्र घडवू शकू.

गलथानपणा, आहे ते चालू द्या अशी वृत्ती, भ्रष्टाचार, गुन्हेगारी व राजकारण यांच्यात झालेली दिलजमाई व्यापार-उद्योगांच्या अंगी बसलेली समाजविन्मुखता तोडल्याशिवाय पुढे येऊ घातलेला अशांततेचा डोंगर आपल्याला काबीज करता येणार नाही. श्रीमंती व गरिबीतील तफावत कमी करण्यासाठी उत्पादकता वाढविल्याशिवाय पर्याय नाही. हे सर्व करण्यासाठी प्रस्थापित कायदेकानू, समाजव्यवस्थांना निष्ठूरपणे बदलून टाकणे आवश्यक होणार आहे. तसे आपण करणार नसू तर ते घडून येईल, मग त्यास आपण क्रांती म्हणा वा उत्क्रांती म्हणा!

(भवरलाल जैन : शेती व विकासाशी बांधिलकी मानणारे उद्योगपती)

***

सौ. मेधा पेंडेटळे संचालित
रोज फक्त एक चिमूट तन्वीसत्व वापरा आणि उत्तम गुण मिळवा.
तन्वीसत्व Tanvi
स्वीटस्लिम - वजन कमी करण्यासाठी
ओजसा - तल्लख बुद्धीसाठी
केस, त्वचा आणि आरोग्याच्या तक्रारींवर ४० तन्वीसत्वे केमिस्ट शॉप्समध्ये उपलब्ध.
एकाच वेळी अनेक तन्वीसत्वेही वापरता येतात.
संपर्क - तन्वी घंटाळी रोड, ठाणे (प.)
महाराष्ट्र, भारत
दूरध्वनी - ५३७५२१२, ५४०८२५०.

उत्तम अर्थव्यवस्थेची निकड

माधव जोग

महाराष्ट्राची २०२० साली काय परिस्थिती असेल त्याचा अंदाज करण्यासाठी महाराष्ट्राच्या १९६० पासूनच्या वाटचालीचा आणि सध्याच्या परिस्थितीचा आढावा घेणे आवश्यक आहे.

विविध कारणे, प्रयत्न आणि त्यातून निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे १९६० साली विदर्भ-मराठवाड्यासहित आणि बेळगाव, कारवार, निपाणी शिवाय मराठी भाषिकांचे महाराष्ट्र राज्य स्थापन झाले. या राज्याच्या गेल्या ३७ वर्षांच्या राजकीय वाटचालींमध्ये सुमारे ३३ वर्षे काँग्रेस, २ वर्षे पुरोगामी लोकशाही आघाडी आणि अडीच वर्षे शिवसेना-भाजपच्या युतीने राज्याला प्रगतीचा मार्ग दाखवण्याचा प्रयत्न केला.

पळवाटा म्हणून सांगितल्या जाऊ शकतील अशा विविध राजकीय, सामाजिक आणि प्रशासकीय कारणांमुळे गेल्या ३७ वर्षांत महाराष्ट्राची स्वाभाविक क्षमता पूर्णपणे वापरली गेली नाही. आणि म्हणून शक्य असलेली सुबत्ता महाराष्ट्र गाठू शकला नाही.

महाराष्ट्र भारतातील सर्वांत प्रगत व श्रीमंत राज्य आहे, पण स्वतंत्र राज्य निर्मितीच्या नंतर तीन तपांहून अधिक काळ लोटूनसुद्धा आज महाराष्ट्रात जागतिक दर्जाची विद्युतनिर्मिती आणि पुरवठा व्यवस्था नाही, संपूर्ण देशाच्या ३५%हून अधिक कर देणाऱ्या मुंबई आणि पुणे या दोन शहरांना जोडणारा जागतिक दर्जाचा रस्ता नाही, निर्माण केल्या गेलेल्या धरणांची संपूर्ण सिंचन क्षमता कालवे बांधून न झाल्यामुळे अजूनही वापरात नाही, लक्षावधी पदवीधरांना रोजगार किंवा स्वयंरोजगार उपलब्ध नाही, प्राथमिक शिक्षणासाठी किमान आवश्यक असलेल्या गरजा आणि शाळांसाठी साध्या खोल्या उपलब्ध नाहीत, माणसे उपासमारीने मरू नयेत यासाठी आवश्यक असलेली साधी अन्नधान्य वितरण व्यवस्था नाही, हे लक्षात घेणे आवश्यक आहे.

सुमारे ८.५ कोटी लोकसंख्येच्या महाराष्ट्राचे राज्यस्तरीय उत्पन्न सुमारे रुपये १,२०,००० कोटी असून यापैकी १९% शेतीतून, ३५% कारखानदारीतून, १९% व्यापार व वाणिज्यातून आणि २५% अर्थव्यवसायातून निर्माण होते. हिंदुस्थानातील सर्व महत्त्वाच्या वित्तीय संस्था आणि बँकांची प्रधान कार्यालये मुंबईत असल्याने मराठी माणसे मुंबईला हिंदुस्थानची आर्थिक राजधानी म्हणू शकतात. महाराष्ट्रातील सुमारे ४१% लोकसंख्या शहरी भागात राहते, तर ५९% लोकसंख्या ग्रामीण आहे. महाराष्ट्रात सुमारे २०० लाख हेक्टर जमीन शेतीखाली असून यापैकी फक्त ३३ लाख हेक्टर जमीन ओलिताखाली आहे. विविध शेतीमालाच्या हेक्टरी उत्पादनाच्या बाबतीत महाराष्ट्र राष्ट्रीय सरासरीपेक्षा बराच खाली असून बिहार व उत्तर प्रदेश यांसारखी अप्रगत समजली जाणारी अनेक राज्येसुद्धा या बाबतीत महाराष्ट्राहून अग्रेसर आहेत. गेल्या १० वर्षांचा आढावा घेता असे लक्षात येते की, आयकर, कंपनी कर आणि अबकारी कर या केंद्र शासनाच्या उत्पन्नाच्या प्रमुख बाबींमध्ये महाराष्ट्राचा वाटा केंद्राच्या उत्पन्नाच्या २६%हून अधिक आहे. परंतु अशा रीतीने केंद्र सरकारने महाराष्ट्रातून गोळा केलेल्या १ रुपया करांपैकी ११ पैसेसुद्धा महाराष्ट्राच्या वाट्यास परत येत नाहीत. महाराष्ट्राच्या अंतर्गतसुद्धा करांपोटी मिळणारा महसूल आणि शासनातर्फे होणारा खर्च यांच्यात मोठी तफावत दिसते. महाराष्ट्राच्या एकूण उत्पन्नाच्या ६% हिस्सा विपुल नैसर्गिक व खनिज संपत्ती असलेल्या विदर्भातून येतो, २% हिस्सा मराठवाड्यातून येतो तर ९२% हिस्सा मुंबई, कोकण व पश्चिम महाराष्ट्रातून येतो. या उत्पन्नाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाच्या एकूण खर्चापैकी अनुक्रमे २४%, २२% आणि ५४% खर्च विदर्भ, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रासाठी होतो. म्हणजेच महाराष्ट्र विदर्भ, मराठवाड्यावर तेथील उत्पन्नाच्या ४००%, १०५०% आणि ५९% खर्च करतो.

यातून असे दिसते की नैसर्गिक संपत्तीच्या समृद्धीपेक्षा माणसाच्या कष्टातून निर्माण होणारी संपत्ती कितीतरी जास्त असते. म्हणजेच महाराष्ट्राच्या प्रगतीचा आलेख मांडताना नैसर्गिक संपत्तीच्या दृष्टीने गरीब असलेल्या पण आर्थिकदृष्ट्या जगातील एक महासत्ता असलेल्या जपानचे उदाहरण घ्यायची आवश्यकता नाही. तसे उदाहरण छोट्या प्रमाणावर इथेच हिंदुस्थानच्या तुलनेत महाराष्ट्र आणि महाराष्ट्राच्या तुलनेत पश्चिम महाराष्ट्र अशा रूपाने उपलब्ध आहे.

२०२० सालास इथून पुढे २३ वर्षांचा कालावधी आहे आणि या काळात महाराष्ट्राची काय प्रगती होऊ शकेल याचा आलेख मिळविण्यासाठी सध्याची सामाजिक व आर्थिक परिस्थिती, राष्ट्रीय स्तरावरील विविध गुंतागुंतीचे प्रश्न तसेच केंद्र-राज्य संबंध आदींची नोंद घेणे

आवश्यक आहे. महाराष्ट्रातील प्रखर राष्ट्रीय भावना आणि आर्थिक प्रश्नांकडे दुर्लक्ष करण्याची लक्षणीय क्षमता, तसेच एकत्र कुटुंबाच्या कर्त्याप्रमाणे कुटुंबातील इतर सर्वांची काळजी घेण्याची हौस लक्षात घेता, महाराष्ट्र निव्वळ आर्थिकदृष्ट्यासुद्धा हिंदुस्थानापासून स्वतंत्र होण्याची मागणी करणार नाही असे मी गृहीत धरतो. मराठवाड्यातील आणि विशेषत: विदर्भातील मराठी माणसेसुद्धा आपली स्थानिक 'अस्मिता' बाजूस ठेवून फक्त विकासाची कास धरतील आणि उपरोक्त कारणांसाठीच पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाड्यास आपल्यापासून वेगळे होऊ देणार नाहीत असेही मी गृहीत धरतो.

महाराष्ट्रात उपलब्ध असलेली नैसर्गिक संपत्ती, उत्कृष्ट दर्जाचे आणि कष्टाळू मनुष्यबळ, कसदार जमिनीचे प्रचंड क्षेत्र आणि त्यासाठी पाण्याची विपुल उपलब्धता, ७२० कि. मी. लांबीची आणि तीन-चार आंतरराष्ट्रीय दर्जाची बंदरे सामावून घेण्याची क्षमता असलेली समुद्री किनारपट्टी आणि सर्वांत मुख्य म्हणजे महाराष्ट्राची अत्यंत गतिमान राजधानी मुंबई हे शक्तिमान महायंत्र मराठी माणसांनी खडबडून जागे होऊन चालवले तर काय होऊ शकेल ? आणि सध्याच्याच पद्धतीने महाराष्ट्र 'प्रगती' करत राहिला तर काय होईल ? अशी दोन चित्रे आहेत.

पहिला विचार शेतीसंबंधी करू. शेती हा शब्द मी जमिनीतून उत्पन्न होणाऱ्या कृषीविषयक विविध विशेष शास्त्रशाखांना एकत्रितरीत्या संबोधित करण्यासाठी वापरत आहे. कोयना अवजलातून कोकणामध्ये २ लाख हेक्टर, कृष्णा खोऱ्यामध्ये २२ लाख हेक्टर, तापी खोऱ्यामध्ये १२ लाख हेक्टर, गोदावरी खोऱ्यामध्ये १० लाख हेक्टर आणि विदर्भातील विविध नद्यांच्या खोऱ्यांमध्ये २० लाख हेक्टर अशी एकूण ६६ लाख हेक्टर जमीन, सुमारे २५,००० कोटी रुपये खर्च करून ओलिताखाली आणणे शक्य आहे. हे १० वर्षांत सहज होऊ शकते. असे झाल्यास महाराष्ट्राची सिंचनक्षमता सध्याच्या तीनपट होऊन शेतीमालाचे उत्पादनही किमान तीन पट होऊ शकेल. सध्या महाराष्ट्रातील शेती उत्पादनाचा फक्त २% हिस्सा अन्नप्रक्रियेच्या मार्गाने जातो, तो ५०% पर्यंत वाढवणे शक्य आहे. अशा प्रकारच्या प्रक्रियेसाठी लागणाऱ्या कारखान्यात सुमारे २०,००० कोटी रुपयांची भांडवली गुंतवणूक लागेल. हे केले असता शेतीमाल आणि त्यावरील प्रक्रिया यातील राज्यस्तरीय उत्पन्न सध्याच्या ८ पट होऊ शकते. यासाठी सोडवण्यास अशक्य नसलेल्या दोनच अडचणी आहेत. पहिली — कमाल शेतजमीन धारणा कायदा. हा अत्यंत अनैसर्गिक कायदा योग्यरीत्या बदलला असता, किंबहुना रद्द केला असता शेतीमध्ये मोठ्या प्रमाणावर औद्योगिकीकरण आणि त्यासाठी लागणारे भांडवल आकर्षित करणे सहज साध्य आहे. दुसरी अडचण सिंचनक्षमता निर्माण करण्यासाठी आवश्यक असलेला भांडवली खर्च. खात्रीने असे म्हणता येईल की, पहिल्या अडचणीचे निराकरण केल्यास व कृष्णा खोरे महामंडळ आणि विदर्भ सिंचन विकास महामंडळ यांच्याच धर्तीवर रोखे काढल्यास त्यास अभूतपूर्व प्रतिसाद मिळून हे भांडवल देशातून आणि परदेशातून सहजरीत्या उभे करता येईल. वाढीव राज्यस्तरीय उत्पन्नाच्या किमान ६% हिस्सा कररूपाने राज्य शासनाकडे येतो, असे गेल्या काही वर्षांचा अभ्यास करता दिसते. वर म्हटल्याप्रमाणे राज्यस्तरीय शेती उत्पादन आठपट झाल्यास वाढीव उत्पादन सुमारे रुपये १,४०,००० कोटी इतके असेल. म्हणजेच राज्य शासनास कररूपाने या वाढीव उत्पादनातून सुमारे ८,००० कोटी रुपये इतका वाढीव कर मिळू शकेल. २५,००० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीवर वरीलप्रमाणे ८,००० कोटी रुपयांचा परतावा हा ३२% होतो. असा परतावा असल्यास रोख्यातून उभारलेले कर्ज आणि त्यावरचे व्याज याची परतफेड सहज शक्य आहे. त्यामुळे राज्य शासनाससुद्धा हा उपक्रम थोड्या दूरदृष्टीने पाहिल्यास अत्यंत लाभप्रद ठरणाराच असेल.

शेती आणि अन्नप्रक्रिया उद्योगाच्या विकासाच्या बरोबरीनेच अतिशय साहजिकपणे ग्रामीण भागातील सुधारणा आर्थिक सुधारणेनुरूप होतील यात शंका नाही.

दुसरा महत्त्वाचा विषय उद्योग. महाराष्ट्र राज्य उद्योगात अग्रेसर समजले जाते. परंतु महाराष्ट्रातील बहुसंख्य कारखानदारी अमराठी माणसांच्या मालकीची अथवा व्यवस्थापनाखालील आहे. महाराष्ट्रातील नोंदणीकृत कंपन्यांपैकी ९२% कंपन्या फक्त मुंबई आणि पुणे येथे नोंदणी झालेल्या असून बाकी उर्वरित महाराष्ट्रात फक्त ८% कंपन्या आहेत. पण हिंदुस्थानच्या ९% लोकसंख्या असलेल्या महाराष्ट्राचे कारखानदारीतील उत्पादन हिंदुस्थानच्या २१% आहे. यामध्ये स्थूलमानाने अन्नप्रक्रिया, अभियांत्रिकी, रासायनिक, औषधे, पेट्रोकेमिकल, वस्त्रोद्योग, सामुद्रिय, सेवाविषयक, पर्यटन, करमणूकविषयक असे कित्येक विभाग मोठ्या प्रमाणावर विकसनक्षम आहेत.

अभियांत्रिकी उद्योगास फक्त देशांतर्गत वापरासाठी नव्हे तर निर्यातीसाठी उत्पादन करण्यास प्रोत्साहन दिले असता, तसेच उच्च तंत्रशास्त्रीय, संगणकविषयक आणि दूरसंचारविषयक अत्युच्च पातळीवर काम करणाऱ्या मराठी व भारतीय परदेशस्थांना विविध मार्गांनी आश्वासित व प्रोत्साहित करून त्यांचे उद्योग परदेशाबरोबरच महाराष्ट्रात चालू करण्यास उद्युक्त केले असता, सध्याचे या क्षेत्रातील महाराष्ट्राचे उत्पादन किमान वीसपट वाढवणे अशक्य नाही.

महाराष्ट्राच्या समुद्र किनाऱ्यावर उपलब्ध असलेला आणि सध्या वाया

जाणारा नैसर्गिक वायू पाईपलाइनच्या जाळ्याद्वारे कोकण, पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ व मराठवाड्यात वळवला तर त्यापासून कित्येक खत व औषधी कारखाने, वस्त्रोद्योग, ऊर्जानिर्मिती केंद्र यांचे मोठ्या प्रमाणावर मोहोळ उठवता येणे शक्य आहे.

कोकणच्या किनारपट्टीवर मुंबई आणि न्हावाशेवाव्यतिरिक्त दोन आंतरराष्ट्रीय दर्जाची व कुवतीची बंदरे उभारल्यास ही पश्चिम आणि पूर्वेकडील देश यांच्यातील अत्यंत मोक्याची संक्रमण आणि रूपांतर केंद्रे ठरू शकतात. या किनारपट्टीवरच मोठ्या संख्येने छोटी बंदरे बांधून मत्स्यव्यवसाय अतिशय मोठ्या प्रमाणावर वाढवता येईल. शासनातर्फे चालवला जाणारा मत्स्यव्यवसाय तोट्यात जात असतो. तो खाजगी क्षेत्रास विकून राज्य शासन स्वत:साठी पैसे उभे करू शकेलच, शिवाय संस्थापित उत्पादनक्षमता जास्तीत जास्त वापरली जाऊन राज्यस्तरीय उत्पन्नात भरीव वाढ होऊ शकेल.

सहकाराची चळवळ महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर फोफावली असून सध्या सुमारे १,४०,००० सहकारी संस्था अस्तित्वात आहेत. या संस्थांतून सुमारे ५५ हजार कोटी रुपयांचे भांडवल गुंतवले गेले असून या भांडवलाची उत्पादकता अवर्णनीय कमी आहे. तरीही सहकारामुळे ग्रामीण महाराष्ट्राचा काहीना काही प्रमाणात आर्थिक विकास होऊ शकला, ही वस्तुस्थिती आहे. उद्योगात सद्यस्थितीत सहकार क्षेत्राचे स्थान मोठे आहे. परंतु त्यातील उत्पादनक्षमता खालच्या पातळीवर असण्याचे प्रमुख कारण या क्षेत्रास शासनातर्फे मिळणारी विविध प्रकारची अनुदाने, कमी दराची कर्जे, विविध सवलती आणि सोयी असून यामुळे सहकार क्षेत्रातून पुढे येऊ इच्छिणाऱ्या उद्योजकांना पैशाची आर्थिक बाजारातील खरी किंमत न ओळखता आल्यामुळे अनुत्पादकता वाढीस लागते. ही परिस्थिती बदलणे सामाजिक, राजकीय व आर्थिकदृष्ट्या शक्य आहे.

सहकार क्षेत्रातील कंपन्यांना 'कॉर्पोरेट' कंपन्या करणे आणि शासनाने आपली गुंतवणूक त्या क्षेत्रातून लवकरात लवकर बाहेर काढणे हे सहकार क्षेत्राच्या उत्पादनक्षमतेस पोषक ठरेल. शासनाच्या स्वत:च्या मालकीच्या विविध क्षेत्रांत अनेक कंपन्या आहेत. सुयोग्य व्यावसायिक व्यवस्थापनाअभावी यातील कित्येक कंपन्या मोठ्या प्रमाणावर तोट्यात चालतात. त्यांचे खाजगीकरण केल्यास या कंपन्याही ऊर्जितावस्थेत येतील आणि शासनाचेही या क्षेत्रात आणि सहकारात अडकलेले हजारो कोटी रुपयांचे भांडवल टप्प्याटप्प्याने जनहिताच्या कामांसाठी शासनास उपलब्ध होईल.

स्वातंत्र्योत्तर काळात महाराष्ट्रामध्ये नाव घेण्यासारखे एकही हिल स्टेशन (गिरिस्थान) निर्माण केले गेले नाही. सध्याची सर्व गिरिस्थाने निव्वळ इंग्रजांची देणगी असून त्याच पद्धतीने पर्यटन विकासासाठी तशीच किमान सहा गिरिस्थाने निर्माण करणे आवश्यक, आर्थिकदृष्ट्या फायद्याचे आणि म्हणून शक्य आहे. महाराष्ट्रातील निवडक गड, किल्ले, लेणी, भूशास्त्रीय सौंदर्याच्या जागा, ऐतिहासिक महत्त्वाची स्थळे, पुरातन वास्तू, अतिशय सुंदर असे नैसर्गिक परिसर, पर्यटनाच्या दृष्टीने अत्यंत आकर्षक केंद्रे होऊ शकतात. संपूर्ण देशाला अभिमानास्पद ठरू शकेल अशा प्रतीचे डिस्नेलँडच्या तोडीस तोड असे एकच करमणूक केंद्र उभारण्यास मुंबई-पुणे पट्ट्याइतकी उत्कृष्ट जागा कुठेही नाही. अशा एकाच डिस्नेलँडसाठी टोकियोमध्ये ३,५००हून अधिक कक्ष असलेली सहा पंचतारांकित हॉटेल्स पूर्णपणे सतत गजबजलेली असतात. यावरून अशा एका करमणूक केंद्राचे सामाजिक व आर्थिक बळ जोखून त्याच्या निर्मितीची किती आवश्यकता आहे हे लक्षात येणे अवघड नाही.

उद्योग अमर असतात ही समाजवादी आणि कालबाह्य कल्पना त्याज्य आहे. आजारी उद्योगांना त्यांचे नैसर्गिक मरण मरू दिल्यास काही फार प्रचंड उत्पात घडतील आणि कित्येक लोकांवर बेरोजगारीची कुऱ्हाड कोसळेल असे नाही. प्रत्यक्षात अशा आजारी उद्योगांना तगवण्यासाठी वाया घालवण्यात येणारे अर्थबळ योग्य मार्गाने वळविले असता त्यातून निर्माण होणारे फायदे काल्पनिक तोट्यांपेक्षा निश्चितच अधिक असतील.

उद्योग, कामगार, रोजगार आणि शिक्षण यांचा एकत्रित विचार करणे आवश्यक आहे. सध्या अस्तित्वात असलेल्या उद्योगांची ओरड अशी आहे की, त्यांना त्यांच्या आवश्यकतेनुसार योग्य दर्जाचे मनुष्यबळ मिळू शकत नाही. दुसरीकडे तरुणांचा ओरडा आहे की, त्यांना रोजगार मिळत नाही. या विपर्यस्त अवस्थेचे कारण शैक्षणिक व सामाजिक आहे. शाळा-कॉलेजातून दिले जाणारे शिक्षण व प्रशिक्षण व्यवहारात बऱ्याच अंशी उपयोगी पडले असे म्हणणारे फक्त १% पदवीधर मिळणेसुद्धा अशक्य आहे. शालेय आणि उच्च शिक्षणामध्ये व्यवसायाभिमुखतेचा अभाव आहे. प्रत्यक्षात प्रत्येक कारखानदार किंवा उद्योजक बाजाराची आवड-निवड व आवश्यकता विचारात घेऊन आपला माल तयार करतात आणि विकतात. शैक्षणिक क्षेत्रात मात्र शिक्षणाच्या कारखान्यांत बाहेरच्या जगाची आवश्यकता काय आहे आणि शिकणाऱ्या मुला-मुलींची गरज काय आहे याची सांगड घालायचे प्रयत्न झालेले दिसत नाहीत. परिणामत: एकीकडे १०वी, १२वी उत्तीर्ण आणि पदवीधरांचे लोंढेच्या लोंढे बाहेर पडत असताना त्या मुला-मुलींनी आपल्या आयुष्यातील १० ते १६ वर्षे इतका

बहुमूल्य वेळ खर्ची घालून घेतलेले शिक्षण त्यांना जगाच्या बाजारपेठेत नोकरी किंवा व्यवसाय या दृष्टीने पायावर उभे राहण्यास समर्थ करीत नाही. विचित्र सामाजिक व्यवस्था आणि दर्जाविषयी भोंगळ कल्पना, तरुण मुला-मुलींना शारीरिक क्षमतेवर आधारित आणि स्वत:च्या हाताने करावयाची कामे असलेले ड्रायव्हिंग, ऑपरेटिंग, गवंडीकाम, सुतारकाम, इलेक्ट्रिशियनचे काम, फिटरकाम, प्लंबरकाम आणि इतर असे अनेक, महिना तीन हजार ते १० हजार रुपये उत्पन्न देणारे व्यवसाय करण्याऐवजी, पंख्याखाली टेबल-खुर्चीवर महिना ८०० ते १५०० रुपये देणारी 'बौद्धिक' कामे करण्यास प्रवृत्त करतात. श्रमांचे महत्त्व आणि महत्ता याची किंमत सध्याच्या समाजात न राहिल्याने हे चित्र उभे राहिले आहे. त्यातूनच कामगार चळवळीचा विचित्र विषय एक वेगळेच परिमाण उभे करीत आहे. कामगार वर्ग हा इतर समाजाहून काही वेगळाच असल्यासारखे त्याचे रूप कामगार नेत्यांनी चुकीच्या आर्थिक कल्पना आणि कित्येकदा स्वार्थापोटीसुद्धा उभे केले आहे. अत्यंत किचकट कामगार कायदे, अकार्यक्षम कामगार, शिरजोर कामगार नेते, वाढती व्यावसायिक स्पर्धा आणि सामान्यत: नेहमीच उपस्थित असलेली आर्थिक चणचण अशा कचाट्यात सापडलेल्या लहान किंवा मोठ्या कुठल्याच उद्योजकास मात्र कायद्याचे कुठलेच संरक्षण नाही. या परिस्थितीत कायदे मोडण्याची किंवा त्यांतून पळवाटा काढण्याची, कामगार नेतृत्वाबरोबर फक्त खाजगी तह करण्याची प्रवृत्ती बळावल्यास आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. महाराष्ट्रास मोठ्या प्रमाणावर औद्योगिक प्रगती करावयाची असल्यास शैक्षणिक धोरणात बदल करून ते व्यवसायाभिमुख करण्याची, कामगारविषयक कायद्यात बदल करून ते उद्योजक आणि कामगार या दोघांसाठी समतोल करण्याची आवश्यकता आहे.

जसजशी शेती आणि उद्योगात वाढ होत जाईल तसतशी नागरीकरणाची वाढ होणार हे निश्चित आहे. हे नागरीकरण सुसह्य होण्यासाठी त्याचे दूरलक्षी नियोजन अति महत्त्वाचे आहे. यात पाणीपुरवठा, मलनिस्सारण, वाहतूक, रस्ते, वीजपुरवठा आदी पायाभूत सुविधांबरोबरच इतर सामाजिक आवश्यकता आणि त्यांच्या पुरेशा पुरवठ्याचा विचार करणे आवश्यक आहे. मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक, कोल्हापूर, औरंगाबाद व नागपूर या शहरांची नागरी वाढ सूत्रबद्ध न होता अस्ताव्यस्त अशा प्रकारची झाली आहे. त्यातच आर्थिक लाभासाठी महाराष्ट्रातील ग्रामीण भागातून, तसेच भारताच्या इतर प्रांतांतून या शहरात माणसांच्या लोंढ्यांनी घुसखोरी केली असून या शहरांना, विशेषत: मुंबई व पुण्यास झोपडपट्टीचा रोग लागला आहे.

झोपडपट्ट्यांचे पुनर्वसन हा सध्याचा सरकारचा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम, बांधकाम व्यवसायातील एका घटकाने या प्रकल्पाद्वारे निर्माण होणाऱ्या घरांच्या स्वस्ताईच्या धसक्यामुळे रेंगाळला आहे. या व्यवसायातील इतर कार्यक्षम घटकांना या कार्यक्रमात ओढून घेऊन शासनाने स्वत: याविषयी काही पावले उचलल्यास आणि स्वत: हा कार्यक्रम हाती घेतल्यास येत्या आठ-नऊ वर्षांत निश्चितच पूर्णपणे यशस्वी होऊ शकेल. झोपडपट्ट्यांचे पुनर्वसन यशस्वी होणे हे यापुढील शहरीकरण सुसह्य होण्याच्या दृष्टीने तसेच उद्योगास खऱ्या अर्थाने चालना मिळण्याच्या दृष्टीने अत्यावश्यक आहे. हा कार्यक्रम यशस्वी न झाल्यास त्याचे विशेषत: मुंबईवर आणि पुण्यावरसुद्धा अतिशय मोठे दुष्परिणाम होतील. या शहरांचे शहरपण कुजत, सडत जाऊन त्यांना काही वर्षांपूर्वीच्या कलकत्त्याची अवकळा येईल आणि ती आली असता या शहरांचाच काय, महाराष्ट्राचा आणि पर्यायाने हिंदुस्थानाचा विकास हे दिवास्वप्न ठरेल. या कार्यक्रमाचे हे महत्त्व लक्षात घेऊन तो जिद्दीने राबविणे आवश्यक आहे.

या सर्व सुधारणांसाठी मूलभूत सुविधांची उपलब्धता अत्यावश्यक आहे. या मूलभूत सुविधा उत्तम दर्जाचे रस्ते, रेल्वे, हवाई आणि समुद्री वाहतूक सुविधा, मुबलक पाणी व वीजपुरवठा, दळणवळणाच्या इलेक्ट्रॉनिक साधनांची सुविधा अशा प्रकारच्या आहेत.

महाराष्ट्रात उत्तम रस्ते बांधण्यासाठी एका मर्यादेपर्यंत खाजगीकरणाचा मार्ग शक्य आहे. महाराष्ट्रातील सर्व तालुक्यांच्या गावांना जोडणारे उत्तम राज्य-रस्ते, सर्व जिल्ह्यांच्या प्रमुख ठिकाणांना जोडणारे उत्तम महामार्ग आणि सर्व अतिमहत्त्वाच्या शहरांना जोडणारे द्रुत महामार्ग करण्यासाठी सुमारे ३०,००० कोटी रुपयांचा खर्च येईल. मुंबई बेट आणि कोकणपट्टीचा प्रमुख भूभाग यांना जोडणारा शिवडीपासून शेवापर्यंत १८.४ कि.मी. लांबीचा जलसेतू निर्माण करणे आवश्यक आहे. या जलसेतूवरून रस्ते व रेल्वे अशी दोन्ही प्रकारची वाहतूक करण्याची सुविधा करता येईल. त्याचप्रमाणे मुंबईमध्ये सुमारे ७५ उड्डाणपूल आणि २० कि. मी. लांबीचे उच्चस्तरीय पूलमार्ग निर्माण करणे मुंबईतील वाहतुकीच्या दृष्टीने अत्यावश्यक आहे. असे जलसेतू व मुंबईतील मार्ग तयार करण्यास सुमारे ६,००० कोटी रुपयांचा खर्च येईल. यापैकी मुंबईतील रस्त्यांचा सुमारे २,५०० कोटी रुपयांचा खर्च मुंबईसाठी प्रवेश कर, पुलांखालील जागांचा व्यापारी तत्त्वावर वापर इत्यादी मार्गांनी भागवता येईल. तसेच जलसेतू निर्माण झाल्यास शेवा परिसर मुंबईतील अर्थसत्तेचा व राजसत्तेचा केंद्रबिंदू असलेल्या नरिमन पॉईंट परिसरातून अवघ्या ३०-३५ मिनिटांच्या

अंतरावर येईल. शेवा परिसरात सरकारी मालकीची हजारो एकर जमीन असून तिच्या व्यापारी वापरातून उपरोक्त खर्च वजा जाता महाराष्ट्रातील सर्व रस्ते उत्तम दर्जाचे करण्यासाठी लागणाऱ्या खर्चाची रक्कम उभी करता येईल. अशा रीतीने महाराष्ट्रातील दळणवळणाचे प्रमुख साधन निर्माण करणे आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण आहे.

सद्य परिस्थितीत रेल्वेविषयक कामे केंद्र शासनातर्फेच होतात आणि केंद्र शासनाचे महाराष्ट्राकडे सतत दुर्लक्षच असते. हे लक्षात घेता महाराष्ट्राने स्वखर्चाने काही रेल्वेमार्ग निर्माण करणे आवश्यक आहे. असा एक रेल्वेमार्ग, मुंबई-पुणे मार्गात, पनवेल व कर्जत ही दोन ठिकाणे थेट जोडण्याचा आहे. यामुळे मुंबई-पुणे रेल्वे प्रवासाचे अंतर सध्यापेक्षा सुमारे दीड तासाने कमी होईल. ज्यामुळे वेळेची, इंधनाची, पैशाची बचत होऊ शकेल. असे इतरही अनेक रेल्वे मार्ग महाराष्ट्रामध्ये निर्माण करणे शक्य आहे. ही शक्यता व्यवहार्य होण्यासाठी केंद्र शासनाबरोबर वेगवेगळे करार करणे आवश्यक ठरेल आणि अशा करारांमध्ये केंद्र शासनावर आर्थिक बोजा नसल्याने असे करार होणे शक्य आहे.

दिल्ली, कलकत्ता, चेन्नई, तिरुअनंतपुरम आणि बंगलोरसारखे विविध आंतरराष्ट्रीय विमानतळ स्पर्धेत असतानासुद्धा आज मुंबईचा परदेशातून येणाऱ्या विमानवाहतुकीत ७५% हिस्सा आहे. तो आहे तसाच राखण्यासाठी मुंबईचा विमानतळ सध्यापेक्षा अधिक सुंदर आणि कार्यक्षम करावयास हवा. हे करण्यासाठी सध्याच्या विमानतळाची सुधारणा करणे किंवा रेवस-मांडवा येथे किंवा नव्या मुंबईमध्ये नवीन विमानतळ उभारणे असे विविध पर्याय आहेत. या पर्यायांविषयी लवकरात लवकर निर्णय करून उशिरात उशिरा २००२ सालापर्यंत नवी व्यवस्था कार्यान्वित होणे अत्यावश्यक आहे.

वरील सर्व वाढीस आवश्यक अशी वीजपुरवठ्याची बाब दुर्लक्षून चालणार नाही. सध्या सरकारने अवलंबिलेल्या खाजगीकरणाच्या मार्गातून सध्या काम चालू असलेल्या प्रकल्पांव्यतिरिक्त २०,००० मेगावॅटहून अधिक क्षमता निर्माण होईल.

तरुणांची बेकारी, दूरदर्शनच्या विविध चॅनेल्सवरून दिसणारे काल्पनिक सुखाचे कित्येक मार्ग आणि ते प्रत्यक्ष आयुष्यात उपभोगण्याची निर्माण होणारी इच्छा, त्यातून निर्माण होणारी कष्ट न करता मिळवावयाच्या पैशाची हाव, परकीय देशांच्या सूत्रबद्ध योजना, राजकारणी लोकांनी दिलेले अभय, पोलिसांनी केलेला काणाडोळा आणि समाजाची अनास्था, या सर्वांचा परिपाक म्हणून सामाजिक कायदा व सामाजिक सुव्यवस्था सतत वाढत्या गतीने ढासळत आहे. विशेषत: शहरी भागात कित्येक ठिकाणी गुंडांचे व टोळ्यांचे साम्राज्य पसरू लागले आहे. विचारवंतांपासून लोकप्रिय समाजनेत्यांपर्यंत आणि उद्योगपतींपासून लोकप्रिय कलावंतांपर्यंत कित्येकांना पोलीस संरक्षणाव्यतिरिक्त फिरणे दुरापास्त झाले आहे. पोलीस दलातील अपुरे मनुष्यबळ, त्याची खालच्या दर्जाची यंत्र आणि तंत्र सिद्धता, तसेच स्वत:च्याच कुटुंबियांच्या सुरक्षिततेची काळजी यामुळे सर्वसामान्य जनतेच्या संरक्षणासाठी मात्र फारसे कुणीच शिल्लक उरत नाही.

याचीसुद्धा बहुतांशी कारणे अर्थप्रधान असून विलक्षण राजकीय इच्छाशक्ती, राज्यस्तरीय उत्पन्नात म्हणजेच पर्यायाने दरडोई उत्पन्नात भरीव वाढ हे सद्य परिस्थिती सुधारण्याचे मूळ घटक आहेत. अशा सुधारणा न झाल्यास औद्योगिकीकरणास वेग येणे अवघड आहे, पण अशा सुधारणा होणे मात्र अवघड नाही.

देशात असलेल्या मुबलक कायद्यांविषयी दुर्जनांना भीती आणि सज्जनांना विश्वास वाटत नाही, कारण कुठलेही प्रकरण न्यायप्रविष्ट झाल्यानंतर १५ ते २० वर्षे त्याचा अंतिम निर्णय न्यायालयातून मिळत नाही. याचे एक प्रमुख कारण साक्षीपुराव्यामध्ये, तसेच वकिलांनी तारखा घेण्यात आणि युक्तिवादात वाया घालवलेला प्रचंड अवधी. यासाठी इंडियन इव्हिडंस ॲक्टमध्ये राज्याच्या अखत्यारीत काही बदल करून सर्व दिवाणी खटल्यात साक्षीचे काम न्यायालयाऐवजी न्यायालयाने नियुक्त केलेल्या प्राधिकृत प्रतिनिधीवर सोपवल्यास, तसेच वकिलांना त्यांचा सर्व युक्तिवाद लेखी देऊन तोंडी युक्तिवादास मर्यादित वेळ दिल्यास न्यायदानाची प्रक्रिया सध्याच्या मानाने कितीतरी पट वेगवान होऊ शकेल. त्यामुळे गरजवंतांना अल्प कालावधीत न्याय मिळून जनतेचा कायद्यावरील विश्वास दृढतर होईल आणि न्यायालयांचा सन्मान वृद्धिंगत होईल.

वरीलप्रमाणे राष्ट्रउभारणीच्या विविध कामांसाठी बांधकाम उद्योग पाया आहे. बांधकाम आणि तदनुषंगिक उद्योग यातून निर्माण होणारे राष्ट्रीय उत्पन्न, मनुष्यबळाचा वापर आणि याची सामाजिक आवश्यकता याविषयी आतापर्यंत महाराष्ट्रातच काय संपूर्ण देशात गांभीर्याने विचार केला गेलेला जाणवत नाही. कोणत्याही प्रकारच्या प्रकल्पाच्या निर्मितीत बांधकामाचा हिस्सा २०% ते ९०% असतो. बांधकामासाठी आवश्यक असलेले सिमेंट, पोलाद आणि अशा इतर अनेक वस्तूंचे उद्योग पायाभूत मानले जातात. पण या उद्योगांचे संपूर्ण उत्पादन वापरणारा आणि त्यात उत्पादक भर घालणारा बांधकाम उद्योग दुर्लक्षित आहे, हे देशाचे दुर्दैव आहे.

बांधकाम व्यवसायात जागतिक दर्जाची गुणवत्ता आणि वेग आणण्यासाठी जागतिक दर्जाची मानके स्वीकृत करायला हवीत. सध्या देशात बहुसंख्येने भारतीय मानक संस्थेने निर्माण केलेल्या तरतुदी वापरल्या जातात. या विविध तरतुदी आणि त्यातील बदल यांचा वेग जागतिक पातळीवर होणाऱ्या तंत्रज्ञान विकसनाच्या वेगापेक्षा कितीतरी कमी पडतो आणि म्हणून त्या काळाच्या मागे राहतात. महाराष्ट्राने किमान हे जोखड झुगारून देऊन अमेरिकन, ब्रिटिश, जर्मन आणि जपानी मानक संस्थांच्या तरतुदी तात्काळ अंगीकृत करावयास हव्यात. सुदैवाने असे करण्यास कोणतेही कायदे किंवा प्रशासकीय बाबी आड येऊ शकत नाहीत, हे महत्त्वाचे. हे केले असता जगातील तंत्रज्ञानाची सर्व प्रगती महाराष्ट्राच्या दारात वापरासाठी तात्काळ उपलब्ध होते आणि असे प्रगत तंत्रज्ञान वापरल्यासच महाराष्ट्र प्रगत होऊ शकतो.

बांधकाम व्यवसायात अत्यंत महत्त्वाच्या उद्योगाचा दर्जा देऊन तो व्यवसाय शिस्तबद्ध करून आणि त्यास प्रगत तंत्रज्ञानाची जोड देऊन वरील विविध प्रकल्प राबवल्यासच त्या प्रकल्पाच्या यशाची शक्यता वाढेल, अन्यथा नाही.

अशाप्रकारे महाराष्ट्राने प्रगतीपथावर वाटचाल चालू केली असता देशातील इतर राज्यांतून माणसांचा महापूर इकडे वाहू लागेल. तो थांबवता येणे राष्ट्रघटनेच्या आधारे शक्य नाही. परंतु अशा आगंतुक येणाऱ्या महाराष्ट्राबाहेरील देशबांधवांनी महाराष्ट्रातील सरकारी आणि खाजगी जमिनीवर अतिक्रमण करून राहणे हे निश्चितच घटनाबाह्य आहे. या दृष्टिकोनातून विचार केला असता महाराष्ट्राबाहेरून येणाऱ्या लोकांची संख्या आवश्यक तेवढीच आत येऊ देणे आणि बाकीची परस्पर बाहेर ढकलणे हे घटनेच्या तरतुदींना अनुसरूनसुद्धा निश्चित शक्य आहे.

अशी प्रगती महाराष्ट्राने केली असता महाराष्ट्राचे राज्यस्तरीय उत्पन्न २०२० साली सध्याच्या १,२०,००० कोटींवरून २०,००,००० कोटी रुपयांपर्यंत वाढू शकते. म्हणजे इथून पुढे उरलेली २३ वर्षे सरासरी मानाने १३% चक्रवाढ वाढदराने प्रगती होऊ शकते. महाराष्ट्राची लोकसंख्या वार्षिक १.५% गतीने पहिली १० वर्षे आणि नंतर १% गतीने उरलेली १३ वर्षे वाढली असता २०२० साली महाराष्ट्राची लोकसंख्या सुमारे ११.२५ कोटी असावी. याचाच अर्थ सध्या दरडोई सुमारे १४,०००/- रुपये असलेले उत्पन्न, दरडोई सुमारे १,७१,०००/- रुपये होऊ शकेल. म्हणजे दरडोई उत्पन्नात प्रतिवर्षी ११.४४% चक्रवाढ वाढ होऊ शकते. सध्याचा विनिमय दराने हे दरडोई उत्पन्न ४,७५० अमेरिकन डॉलर्स एवढे होते आणि सध्याच्या क्रयशक्ती गुणांक स्थिर राहिला असे गृहीत धरल्यास अमेरिकेच्या किंवा युरोपमधील प्रगत देशांच्या सध्याच्या दरडोई उत्पन्नाच्या तोडीस तोड होते.

हे झाले काय होऊ शकते त्याचे चित्र. प्रत्यक्षात काय होऊ शकेल? गेल्या १५ वर्षांत महाराष्ट्राचे राज्यस्तरीय उत्पन्न ८.८% गतीने, तर लोकसंख्या २.३% गतीने वाढल्याने दरडोई उत्पन्न ५.५% दराने वाढले आहे. या पार्श्वभूमीवर पुढच्या कालावधीत ११.४४% वार्षिक वाढ असंभवनीय वाटते. पण समाजवादाची भोंगळ तत्त्वे कवटाळून बसणे आणि ती सोडून देऊन योग्य अर्थव्यवस्थेची वाट धरणे हा मुख्य फरक पूर्वीच्या आणि भावी कालावधीत असेल अशी आशा करण्यास हरकत नाही. असे वाढीचे दर पूर्वेकडील कितीतरी देशांनी शिस्तीच्या जोरावर साधून दाखवलेले आहेत.

डॉक्टर आंबेडकर यांनी तर अर्थदृष्ट्या समाज भक्कम होण्यासाठी वेळोवेळी मार्गदर्शन केले आहे. उगाच काल्पनिक वंशद्वेष, सवर्ण द्वेष सोडून देऊन उन्नती आपली आपणास करून घेता येते हे स्वआचरणाने दाखविलेले आहे. दलित समाजास त्याची जाग येऊ लागली आहे, हेही उत्तम लक्षण आहे. येत्या पंचवीस वर्षांत हळूहळू हा विद्वेष कमी होऊन, ज्याच्या त्याच्या ताकदीने पण समाजहितच व त्यामुळे अर्थहितच करू अशी धारणा होईल व त्या दृष्टीने पावले पडतील असा काळ दिसतो. तरीही भारताची संघराज्यात्मक बांधणी, त्यात महाराष्ट्रावर सातत्याने होणारे आर्थिक अन्याय, केंद्र शासनाची राज्यांना पैसे वाटतानाची 'कार्यक्षमतेसाठी शिक्षा आणि अकार्यक्षमतेसाठी बक्षीस' अशा प्रकारची भूमिका, राज्यातील राजकारणामध्ये असलेल्या व्यक्तींमध्ये अपवादाने सापडणारी दूरदृष्टी व अभावाने असलेली कार्यक्षमता या विविध बाबी लक्षात घेता महाराष्ट्राची प्रत्यक्ष वाढ उपरोक्त दोन वाढदरांच्या सरासरीच्या जवळपास म्हणजेच ८.५%च्या जवळपास असेल असे गृहीत धरण्यास हरकत नाही. म्हणजे उपरोक्त विविध उद्दिष्टे सुमारे ३७% पर्यंत गाठली जातील, राज्यस्तरीय उत्पन्न सुमारे ७,८५,००० कोटी रुपये असेल आणि दरडोई उत्पन्न सुमारे ७०,००० रुपये असेल, हे इसवी सन २०२०चे महाराष्ट्राचे चित्र वाटते. वरील सर्व गणित किमती भाववाढविरहीत आणि स्थिर राहतील असे गृहीत धरून केलेले आहे. भाववाढीच्या प्रमाणात उपरोक्त विविध संख्या तसेच, क्रयशक्ती गुणांक जरी बदलले तरीही वरील संख्या त्या अनुरूप बदलून जीवनमान आणि रुपये यांचे गुणोत्तर स्थिर राहील.

इतर सर्व बाबी अर्थाधारित असल्याने या दरडोई उत्पन्नास साजेसे महाराष्ट्राच्या समाजपुरुषाचे रूप असेल.

(माधव जोग : उद्योजक आणि 'उर्वरीत महाराष्ट्र वैधानिक विकास महामंडळाचे' अध्यक्ष)

***

अनामिक एकलव्यांची अंतःप्रेरणा

कुमार केतकर

आणखी २३ वर्षांनी, म्हणजे इ. स. २०२० साली महाराष्ट्र राज्य आता आहे याच भौगोलिक आकारात आणि सीमांच्या कक्षेत असेल, असे गृहीत धरले, तर त्याचे भविष्य आणि त्या सीमा अनेक कारणांनी बदलल्या गेल्या तर 'त्यावेळच्या' महाराष्ट्राचे भविष्य हे वेगवेगळे असेल. शिवाय भारताच्याच किंवा भारतांर्गत राज्यांच्या सीमाही आज आहेत तशाच त्यावेळेला असतील असे गृहीत धरण्याचे कारण नाही.

भौगोलिक सीमा भेदून जाणाऱ्या माध्यम-माहिती-सायबर क्रांतीच्या रोलर-कोस्टरवर आपण सर्वजण आहोत. जत्रेमधल्या किंवा एसेलवर्ल्ड वा डिस्ने रोलर-कोस्टरचा मार्ग खडतर असला तरी अगोदरच बांधलेला असतो. आज आपण ज्या रोलर-कोस्टरवर आहोत, त्याचा पुढला मार्ग आपल्याला माहीत नाही आणि कशा प्रकारच्या चढ-उतारांवरून आपण जाणार आहोत, याचा फक्त ढोबळ अंदाज करू शकतो.

आपल्याला वाटतो तेवढा २३ वर्षांचा काळ तितका नजीक नाही. कल्पनेत नसलेल्या आणि कोणाच्याही योजनेत विचार न केलेल्या घटना २३ वर्षांत घडू शकतात. महाराष्ट्र राज्य स्थापन झाले, त्या अगोदरच्या २३ वर्षांत म्हणजे इ. स. १९३७ ते १९६० या काळात किती प्रचंड उलथापालथी झाल्या, याचा वेध घेतला म्हणजे या विधानाची प्रचीती येऊ शकेल. इ. स. १९३७ साली जर प्रस्तुत भविष्य-वेधी निबंधमालेप्रमाणे लेख लिहिण्याचे आवाहन तत्कालिन राजकारण्यांना वा विचारवंतांना केले असते तर किती जणांनी, १९३९ साली दुसरे महायुद्ध सुरू होईल आणि ते सहा वर्षे चालेल; त्यानंतर दोन वर्षांनी भारत स्वतंत्र होईल पण फाळणी होऊन पाकिस्तानची निर्मिती होईल; गांधीजींची हत्या होईल; प्रजासत्ताक भारताची स्थापना होऊन भाषिक राज्ये निर्माण होतील-आणि विदर्भ-मराठवाड्यासहित पण बेळगाव-कारवाररहित महाराष्ट्र राज्याची स्थापना होईल-असे भाकीत केले असते?

पुढील २३ वर्षांत जगाच्या, देशाच्या वा महाराष्ट्राच्या सीमा बदलणारच नाहीत असे विधिलिखीत नाही. मात्र त्या बदलल्या तरी मराठी माणूस असेलच. मुंबई आणि अरबी समुद्र असेल, सह्याद्रीच्या रांगा असतील आणि कोकणचे देखणे सौंदर्य असेल, सिंहगड, रायगड, सज्जनगड असतील, शिवाजी महाराजांचा तेजस्वी वारसा असेल. राजकीय सीमा बदलल्या तरी इतिहास आणि भूगोल बदलत नाही, संस्कृती आणि परंपरा अधिक समृद्ध होत जातात-उधळल्या जात नाहीत.

तेव्हा इ. स. २०२० साली हा मराठी माणूस कुठे असेल? मुंबई कशी दिसेल? कोकण, पश्चिम आणि दक्षिण महाराष्ट्र, विदर्भ-मराठवाडा हा प्रदेश आणि तिथला मराठी माणूस कोणत्या आर्थिक स्तरावर असेल? त्याची जीवनशैली कशी असेल? त्याचे प्रश्न कोणते असतील आणि त्याचे बाकी भारतीय जीवनाशी संबंध कशा प्रकारचे असतील?

सर्वात पहिली गोष्ट विचारात घ्यायची ती लोकसंख्येची. कारण शेवटी आपण त्या लोकांच्याच भविष्याचा विचार करतो आहोत. आजच्या राजकीय-भौगोलिक महाराष्ट्रात सुमारे आठ कोटी लोक आहेत. त्यापैकी मुंबईतच एक कोटी आहेत. मुंबईप्राधिकरण आणि पुण्यापर्यंतचा प्रदेश एकत्र विकासपट्ट्याचा भाग मानला तर मुंबई-ठाणे-रायगड-पुणे या पट्ट्यात दोन कोटींच्या आसपास लोक आहेत. म्हणजे राज्यातील प्रत्येक चौथी व्यक्ती या भागात राहते.

कोणत्याही प्रशासनाला, नियोजन करणाऱ्यांना, राजकीय पक्षाला आणि उद्योगपतीला दोन कोटींची ही घट्ट विणलेली शहरे आणि गावे म्हणजे एक संधी आणि आव्हान आहे. उर्वरित महाराष्ट्रापेक्षा हा प्रदेश दळणवळणाच्या सुविधांनी अधिक चांगल्या रीतीने जोडला गेला आहे. मुंबईसारखे देशातील सर्वोत्तम बंदर आणि आंतरराष्ट्रीय विमानतळ असलेल्या या प्रदेशाला निसर्गाचेच वरदान लाभले आहे. त्यामुळे राज्याच्या वा देशाच्या सीमा कशीही असोत, हा विकासपट्टा म्हणजे भविष्याचे, आधुनिकतेचे केंद्र होऊ शकेल. याचा अर्थ उर्वरित महाराष्ट्रातील लोक कमी कुवतीचे आहेत असे नव्हे. जगभर असे विकासपट्टे, इतिहासाच्या ओघात तयार झाले आहेत. ते विकासपट्टेच जगाला नवी दिशा, नवी मूल्ये, नवे विचार, नवी संस्कृती देत आले आहेत.

अमेरिकेतला बोस्टन-न्यूयॉर्क-फिलाडेल्फिया-वॉशिंग्टन हा पूर्व किनाऱ्यावरील पट्टा किंवा सॅनफ्रॅन्सिको-सॅनहोसे-लॉसएंजेलिस-सॅनडिएगो हा पश्चिम किनाऱ्यावरील पट्टा यांनाही असेच वरदान लाभले आहे. सायबरक्रांती

सॅनहोसेमध्ये सुरुवात होऊन, सिलीकॉन व्हॅलीच्या सीमा भेदून जगभर पसरावी आणि न्यूयॉर्क बंदरातल्या 'लिबर्टी' पुतळ्याची प्रतिकृती बिजिंगच्या विद्यार्थ्यांनी तयार करून ती तिएनमेन चौकात आणावी हे समजण्यासाठी विकासपट्ट्यांचे महत्त्व ओळखावे लागेल. त्याशिवाय लॉसएंजेलिसच्या हॉलिवूड मधून जगाची मूल्यव्यवस्था कशी साकारत गेली हे समजणार नाही आणि बोस्टनच्या मॅसेच्यूसेट्स् विद्यापीठातील प्राध्यापकाचा 'इंटेलेक्चूअल' म्हणून जगभर दबदबा का झाला हे उमजणार नाही. बर्लिन-प्राग-बुडापेस्ट ही पूर्व युरोपातील सांस्कृतिक केंद्रे अशाच एका पट्ट्यात आहेत. लंडन-पॅरिस-ॲमस्टरडॅम या तीन शहरांना, नकाशावर एका लहानशा वर्तुळात बसविता येईल. या लहान वर्तुळाने गेल्या साडेतीनशे वर्षांचा जगाचा इतिहास आणि भूगोलही घडविला आहे. चीनमधल्या हाँगकाँग-कँटन(गुआंगझाऊ)-शांघाय-नानजिंग या पट्ट्याने आता अवघ्या चीनला नवीन अर्थव्यवस्था, बाजारपेठ आणि एकविसाव्या शतकातील महासत्तेचे स्थान बहाल केले आहे. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र राज्य निर्माण होण्यापूर्वी आणि १९४७च्या अगोदर मुंबई प्रांतात कराचीपर्यंतचा प्रदेश समाविष्ट केला जात असे. स्वातंत्र्याचे स्फुल्लिंग याच पट्ट्यात प्रज्वलित झाले आणि नव्या अर्थव्यवस्थेचे निशाण मुंबईनेच प्रथम हाती घेतले. इतकेच काय, आधुनिक समाजसुधारणांचा विचार, कामगार चळवळ आणि समाजवादी विचारसरणीही याच पट्ट्यातील भूमीत रसरसून आली होती. त्यामुळे मुंबईसहित महाराष्ट्राच्या विचाराचे केंद्र मुंबई-कोकण-पुणे पट्टा हे असावे यात काहीही आश्चर्य नाही.

आश्चर्य हे आहे की निसर्गाचे, भूगोलाचे आणि इतिहासाचे असे वरदान लाभूनही आपले राज्यकर्ते, विचारवंत आणि मराठी उद्योगपती त्याबद्दल बेफिकीर आहेत. त्यांची बेफिकिरी असूनही या भागातील लोक मात्र स्वस्थ नाहीत. ते आत्मगतीने इ. स. २०२० चा व त्यापुढचाही 'महाराष्ट्र' घडविण्याच्या प्रयत्नाला लागले आहेत.

आजच्या बाळासाहेब ठाकरे, मनोहर जोशी, शरद पवार, विलासराव देशमुख किंवा शरद जोशी अशांपैकी कोणी वा अन्य कोणी जर महाराष्ट्र राज्याच्या इ. स. २०२०च्या हीरक महोत्सवाकडे लक्ष ठेवून काही उद्दिष्टे व त्यांना अनुसरून एखादा कार्यक्रम जाहीर केला असता, त्यानुसार संघटना बांधली असती तर लोकांच्या आत्मगतीला वेग आणि दिशा प्राप्त झाली असती. परंतु सध्या एकाही राजकीय पुढाऱ्याकडे, पक्षाकडे वा अन्य कोणत्या समांतर नेत्याकडे तसा भविष्यदर्शी कार्यक्रम नाही-इतकेच काय तसे लखलखते स्वप्नही नाही.

महाराष्ट्राची आजची लोकसंख्या जर्मनीच्या लोकसंख्येइतकी जवळपास आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर पराभूत झालेला जर्मनी ५० वर्षांपूर्वी बेचिराख अवस्थेत होता. घायाळ, उजाड, लाचार आणि फाळणीमुळे पूर्व व पश्चिम भागात दुभंगला गेलेला जर्मनी फक्त उभा राहिला नाही तर युरोपात त्याने उत्तुंग स्थान संपादन केले. जर्मन तंत्रज्ञानाचा युद्धपूर्व असलेला गवगवा युद्धानंतर पहिल्या २०-२५ वर्षांतच प्रस्थापित झाला. डळमळणारा डॉइश मार्क युरोपातील सर्वात प्रभावी चलन म्हणून ओळखला जाऊ लागला. युद्धातील विजेती राष्ट्रेही मुकाट्याने जर्मनीला कुर्निसात करू लागली. जर्मनीने हे वैभव केवळ मार्शल योजनेच्या सल्ल्याने संपादन केले असे म्हणणे हे जर्मन सर्जनशीलतेवर अन्याय करणारे ठरेल. तीच गोष्ट रशियाची. रशियाने दुसऱ्या महायुद्धात दुष्ट व विकृत नाझीवादाचा पराभव केला परंतु त्यासाठी त्यांना २ कोटी लोकांचे बलिदान करावे लागले होते. रशियाही जर्मनीप्रमाणेच बेचिराख झाला होता. दुसऱ्या महायुद्धानंतर फक्त अमेरिका अधिक श्रीमंत झाला होता. किंबहुना ते युद्ध हीच अमेरिकेला लागलेली आकस्मिक लॉटरी होती. त्या युद्धामुळे, युरोपपासून दूर असलेल्या अमेरिकन उद्योगपतींना बाजारपेठ मिळाली होती. अशा अमेरिकेलाही जर्मनी आणि रशिया या दोघांपुढे नांगी टाकण्याचे अनेक प्रसंग आले.

विषयांतर करून या इतिहासाचे संदर्भ इतक्याचसाठी दिले की महाराष्ट्राचे भारतातील स्थान, युरोपातील जर्मनीचे आहे, तसे आहे. हिटलरसारख्या वेड्या, विकृत आणि विषारी नेत्याने जर जर्मनीला युद्धाच्या खाईत लोटले नसते तर कदाचित जर्मनी ही जगातली औद्योगिक महासत्ता १९३० ते १९४० या काळातच एक नवी भविष्यदर्शी शक्ती ठरली असती. युद्धामुळेच जर्मनी त्या काळात समर्थ झाला असे मापन काही तज्ज्ञ करतात. ते अर्धसत्य आहे. युद्धामुळे आणि झिंग आलेल्या महत्त्वाकांक्षेमुळे जर्मनीचा या शतकातला सगळा वेळ पराभवात आणि त्यातून पुन्हा उभे राहण्यात गेला आहे. त्याची गरज नव्हती. पहिल्या आणि दुसऱ्या महायुद्धात मिळून जर्मनीचे सुमारे एक कोटी तरुण बळी गेले वा जायबंदी होऊन कामातून गेले. हा शक्तीचा अपव्यय होता.

महाराष्ट्राला अशा कोणत्याही आपत्तीला तोंड द्यावे लागलेले नाही. महाराष्ट्राला निसर्गाने जो विलक्षण समुद्र किनारा व बंदर दिले आहे, त्याच्या आधारे हाँगकाँगइतकी समृद्धी या राज्याला भविष्यात मिळणे अशक्य नाही.

परंतु त्यासाठी रस्ते, महामार्ग, उड्डाणपूल, रेलमार्ग, भुयारी रेल्वे, कंटेनर-मार्ग यांचे एकच एक जाळे उभारावे लागेल. शेतकऱ्यांना जाचक निसर्गातून मुक्त करावे लागेल. कारण इ. स. २०२० साली राज्याच्या याच सीमा असतील त्या सीमांतर्गतची लोकसंख्या १५ ते २० कोटी इतकी झालेली असेल. इतक्या लोकांना महाराष्ट्रातील शेतीव्यवस्था रोजगार आणि उत्पन्न देऊ

(पुढील मजकूर पान १४७ वर)

शिक्षणाला पर्याय नसावा

केशुब महिंद्र

पंचवीस वर्षांनंतर महाराष्ट्र कसा असेल हे सांगणे, ठरवणे किंवा त्याविषयी भाकीत करणे अतिशय कठीण आहे. पण महाराष्ट्राची आर्थिक आणि सामाजिक परिस्थिती कशी असावी असे जे मला वाटते ते सांगतो.

पहिली गोष्ट म्हणजे पंचवीस वर्षांनंतर महाराष्ट्रात एकही गरीब माणूस नसावा. महाराष्ट्राचा शैक्षणिक दर्जा आता आहे त्यापेक्षा उंचावलेला असावा. आणि शिक्षणाचा दर १००% असावा. महाराष्ट्रातल्या प्रत्येक माणसाला छोटेसे का होईना, पण स्वत:चे घर असावे.

प्रत्येक गावात पाण्याची, शिक्षणाची, व्यवसायाची उत्तम सोय असावी. सरकारने उत्तम आरोग्यव्यवस्थेची सोय करावी. ज्यामुळे मला अशी आशा आहे की, आजच्या मुंबईचे रूपांतर एका स्वच्छ सुंदर शहरात झालेले दिसेल.

पण हा बदल नक्की कितपत होईल हे सांगता येत नाही, पण थोडासा का होईना, बदल करता येईल आणि यासाठी सरकार आणि जनता यांनी परस्पर सामंजस्याने प्रयत्न करायला हवेत, असे मला वाटते. यात सर्वप्रथम गरिबी दूर व्हायला हवी. यासाठी सरकारने एक भक्कम आर्थिक पाठबळ उभारणे आवश्यक आहे. जेणेकरून सर्वसामान्य माणसाच्या अत्यावश्यक गरजा पूर्ण होतील. कारण आर्थिकदृष्ट्या कमकुवत असणाऱ्या देशातील गरिबी दूर करणे अशक्यप्राय आहे. उलट ती वाढण्याचीच शक्यता जास्त आहे. गेल्या पन्नास वर्षांच्या परिस्थितीचा विचार करता, त्यात फार बदल करणे कठीण आहे.

पण, आर्थिकदृष्ट्या काही बदल व्हायला लागले आहेत. यासाठी एक महत्त्वाचा बदल असा व्हायला हवा की, कसेही करून पैसा उभारणे आणि बचत करणे किती आवश्यक आहे याची जाणीव प्रत्येकाला व्हायला हवी. पण यासाठी लोकांकडे योग्य शिक्षण असणे आवश्यक आहे. आज महाराष्ट्रातील ५०% लोक अशिक्षित आहेत. आणि जर हीच परिस्थिती राहिली तर महाराष्ट्र पंचवीस वर्षांनंतरही शैक्षणिक क्षेत्रात मागासलेला राहील. जर लोकांकडे योग्य शिक्षण नसेल तर त्यांना त्यांच्या जबाबदाऱ्यांची जाणीव होणार नाही. केरळकडे पहा. केरळमध्ये शिक्षणाचा दर ९९% आहे. काही वर्षांनी म्हणजे २००० सालापर्यंत त्यांच्या लोकसंख्यावाढीवरही नियंत्रण येईल. पण ओरिसा, बिहारमध्ये घरात ४ ते ५ मुले असतात. तिथे शिक्षणाचा प्रसारही केरळइतका नाहीये. आणि जर महाराष्ट्रातही हीच परिस्थिती राहिली तर महाराष्ट्राचा बिहार-ओरिसा व्हायला वेळ लागणार नाही.

असे, जरी असले तरी बदलत्या काळानुसार परिस्थितीत बदल होतच असतात. आता बरे वाईट कसे होतील ते सांगता येत नाही. पण बदल होतात आणि ते व्हायलाच हवेत. उदा. काही वर्षांपूर्वी आपण म्हणत होतो की भारतात Data-base नाही. पण कॉम्प्युटरर्सनी सगळे दृश्य पालटले. आता सगळे जग ही एक लायब्ररी बनलेय. याचा प्रभावी परिणाम पुढच्या काळात नक्कीच होईल.

महाराष्ट्र शेतीच्या क्षेत्रात प्रगत आहे आणि राहील यात शंकाच नाही. पण महाराष्ट्रात दुर्लक्षिला गेलेला महत्त्वाचा भाग म्हणजे infrastructure. आपण रस्ते, धरणे, सुपर हायवेज् कितीतरी ठिकाणी बांधू शकतो. पण ते बांधले गेले नाहीत / जात नाहीत याचे महत्त्वाचे कारण म्हणजे राजनैतिक दृष्टिकोन. पण यात केवळ राजकारण्यांचाच दोष आहे असे नाही, तर जनताही याला तितकीच जबाबदार आहे. कारण लोकही त्याबाबतीत तितकेच उदासीन आहेत.

या गोष्टीचा सरकारकडून विचार होणे आवश्यक आहे की गावात पाण्याची सोय नाही ती का नाही? कारण धरणे, कालव्यांची सोय नाही. चांगले रस्ते नाहीत असे का? प्रत्येकाला जर घर हवे तर ते कसे देता येईल.

महाराष्ट्राला जर भारताच्या बरोबरीने जगाशी बरोबरी करायची असेल तर infrastrucature कडे लक्ष द्यायला हवे. चांगले रस्ते, धरणे, पुरेसा वीजपुरवठा, आवश्यक टेलिकम्युनिकेशननी वगैरे हे नक्कीच साधेल. यासाठी पैसा उभारताना पूल बांधून त्यावर टोल बसवणे किंवा कर घेणे या मार्गांनी काही प्रमाणात पैसा येऊ शकतो. कोल्हापूर, जयसिंगपूरला असे प्रयोग चालू आहेत. हैद्राबादला टोलब्रीज आहे. जर योग्य आखणी आणि पुरेशी आर्थिक गुंतवणूक यांचा मेळ घातला तर 'महा'राष्ट्र नक्कीच 'महान' होईल.

भारताच्या अर्थकारणाचा शेतीशी परस्परसंबंध आहे. त्याची प्रगती बहुतांशी शेतीवर अवलंबून आहे, हे आपण नाकारू शकत नाही. पण देशातील शेतीयंत्रणा गुंतागुंतीची आहे. या संदर्भात नवीन तंत्रज्ञानाची, योग्य पाणीपुरवठ्याची,

आयात-निर्यातीची आवश्यकता आहे. ट्रॅक्टरर्सचा शेतीशी संबंध आहे. शेतीला त्याचा अतिशय उपयोग होतो.

शेती, infrastructure बरोबर auto आणि petrolium industry चाही विचार करायला हवा. भारतातील auto industries चा भारताच्या आर्थिक सुधारणेशी संबंध आहे. ही एक सरकारी मदत आहे असे मानायला हरकत नाही. याचा उपयोग शेतीक्षेत्रात होईल. गावांत (खेड्यांत) डिझेलचा उपयोग होईल. पण वीजोत्पादन चांगले नसताना केला तर डिझेलचा तो दुरुपयोग ठरेल. पण महाराष्ट्र त्याबाबतीत सुदैवी आहे की तिथे वीजनिर्मिती चांगली होते. पण दिल्ली वगैरे बाजूला बहुतेक रोज वीजपुरवठा खंडित केला जातो.

भविष्यात भारताला डिझेल, पेट्रोलचा तुटवडा भासणार आहे. कारण त्यांची मागणी वेगाने वाढतेय. त्यासाठी आपल्याला काही नवीन मार्ग शोधून ठेवायला हवेत. यादृष्टीने जर आपली आर्थिक व्यवस्था बळकट असेल तर चीनप्रमाणे तेलविहिरीत पैसा गुंतवायला काहीच हरकत नाही, कारण आपल्याकडे तेलाचा तुटवडा आहे. यावर एक उपाय असा आहे, की बॅटरीवर चालणाऱ्या गाड्या तयार करायच्या पण त्यात ऊर्जा(energy) साठवता येत नाही. तसे झाले तर तेलाचा तुटवडा खूपच कमी जाणवेल.

या सगळ्यासाठी योग्यप्रकारे गुंतवणूक केली गेली पाहिजे. तसेच आपल्याकडे कमी पगारात करणारे कुशल कामगार (Skilled labour) आहेत. पण त्याचबरोबर उत्पादनक्षमता कमी असणारेही आहेत. पण कामगारांची किंमत आणि उत्पादनक्षमता यात एक गुणोत्तर हवे.

Infrastructure चा विचार करताना कुशल कामगारांबरोबर auto maker चाही विचार करायला हवा. कारण जर उत्पादनक्षमता कमी असेल तर व्यवसायी यंत्रांकडे वळेल. जिथे कमी माणसात जास्त उत्पादन मिळवता येईल. शेवटी प्रत्येकजण स्वत:च्या सोयीचा विचार करील. यासाठी या संदर्भात कायदे असणे आवश्यक आहे. उदाहरणार्थ, जर तुम्ही रस्ता बांधताय पण मध्ये एक घर येतेय, तर घरमालकाला पैसे देऊन ते घर पाडून घेता येईल. नाहीतर ते कोर्टात जातील.

सरकारकडून या सगळ्याची अपेक्षा करताना हीच अपेक्षा सामान्य जनांकडून आहे. प्रत्येकाला हे जाणवते म्हणण्यापेक्षा जाणवले पाहिजे. लोकसंख्या कमी का होत नाही, कारण शिक्षणाचा अभाव आहे. केरळमध्ये ९९% लोक शिक्षित आहेत. केरळमध्ये हे होऊ शकते, तर आपण महाराष्ट्रात का नाही करू शकत? यासाठी खडतर प्रयत्न लागतील. आणि हे शिक्षणानेच साध्य होईल.

हा प्रयत्न स्वातंत्र्यापासून सुरू आहे, पण त्याकडे हवे तेवढे लक्ष पुरवलेले नाही. त्याला प्राधान्य देणे आवश्यक आहे. शिक्षण ही यशाची पायरी आहे. पण त्याचा योग्य प्रसार करायला सुरुवात करायला हवी.

शिक्षण, infrastructure आणि राजनैतिक दृष्टिकोन यामुळे हा 'महाराष्ट्र' जगाशी बरोबरी करून 'महान' होईल.

(केशुब महिंद्र : 'महिंद्र अँड महिंद्र' चे अध्यक्ष आणि उद्योगपती)

***

(अनामिक ... पान १४५ वरून)

शकणार नाही.

महाराष्ट्रासारख्या राज्यात बेकारी असावी हा त्या तरुणांचा दोष नाही आणि नसेल. दृष्टीहीन पुढाऱ्यांचा तो दोष आहे. महाराष्ट्राकडे आज परकीय भांडवल जरा संशयाने पाहते हा आपल्या सत्ताधाऱ्यांचा अक्षम्य गुन्हाच आहे. त्यामुळे आपण आज विलक्षण विचित्र परिस्थितीतून जात आहोत.

करण्यासारखे इतके काम असूनही बेकारी आहे. पैसे असूनही भांडवलाची चणचण आहे. प्रगल्भ बाजापेठ असूनही ती तशी ओस पडली आहे. कल्पक आणि बुद्धिमान तरुण आपल्या सर्जनशीलतेने काही घडविण्याऐवजी गुटख्याच्या आणि परमीट रूम्सच्या वेढ्यात पडले आहेत. तंत्रज्ञानाचे कसब असूनही अनुरूप यंत्राच्या अभावी ते कौशल्य गंजत आहे. दलित समाज आपल्यावरील सांस्कृतिक अन्यायाला, शिवसैनिक आपल्या पोकळ अस्मितेला, मराठा समाज आपल्या स्वयंभू 'अहं'ला गोंजारून आत्म-करुणेचे बळी होत आहेत. सुस्थित ब्राह्मणांचे डोळे अमेरिकेकडे लागले आहेत. इतर सवर्ण विभाग आत्मकेंद्री झाले आहेत. अशा प्रतिकूल सांस्कृतिक-मानसिक स्थितीतही काही एकलव्य स्वत:च्या अंत:प्रेरणेने ठिकठिकाणी काम करीत आहेत. आज ते संख्येने थोडे आहेत. काहीजण युरोप-अमेरिकेतील फळा-फुलांची, आधुनिक भाज्यांची बाजारपेठ पादाक्रांत करू पाहत आहेत. काही जणांनी असे तंत्र विकसित केले आहे की ज्यामुळे जर्मन इंजिनियर्सही प्रभावीत झाले आहेत. काहीजण जागतिकीकरणाच्या लाटेवर स्वार होऊन सॉफ्टवेअरच्या माध्यमातून सायबरविश्वात उतरले आहेत.

आज जी मुले-मुली वयाच्या ५ ते १२ या गटात असतील ती इ.स. २०२० साली २८ ते ३५ या वयोगटात असतील. त्यांच्यासमोर आदर्श असतील ते ठाकरे-पवार-देशमुखांचे नाहीत तर त्या अनामिक एकलव्यांचे, जे नवा महाराष्ट्र घडविण्याच्या क्रमात आजच लागले आहेत. त्या एकलव्यांचा शोध घेऊन त्यांना प्रकाशात आणणे आणि नवीन 'रोल मॉडेल्स' तयार करणे, इतके जरी काम आपण आज केले तरी इ. स. २०२०चा महाराष्ट्र आपल्याला आपल्या मनाप्रमाणे उभारता येईल. निसर्गाच्या वरदानाचे चीज करता येईल.

(कुमार केतकर : 'महाराष्ट्र टाइम्स' चे संपादक)

***

मुस्लिम समाज बदलेल

अब्दुल कादर मुकादम

येत्या पाव शतकात महाराष्ट्राचे रंगरूप कसे असेल वा कसे असू शकेल हा या परिसंवादाचा विषय तसा खूपच व्यापक आहे, कारण हा शोध अनेक अंगांनी घेता येऊ शकेल. तो राजकीय असू शकेल, आर्थिक असू शकेल किंवा सामाजिक व सांस्कृतिकही असू शकेल. असा विविधांगी वेध एका लेखाच्या मर्यादेत किंवा एका व्यक्तीला घेता येणे शक्य नाही. त्यामुळे निवड आली. माझ्यापुरती ही निवड सामाजिक व सांस्कृतिक पैलूंपुरती मर्यादित ठेवली आहे. अर्थात हे सर्वच पैलू काही प्रमाणात स्वतंत्र असले तरी ते एकमेकांशी संबंधित असल्यामुळे व त्यांचा एकमेकांवर भलाबुरा परिणाम होत असल्यामुळे वर्ण्यविषयांव्यतिरिक्त इतर बाबींचा संदर्भ कारणवशात येण्याची शक्यता आहे. शिवाय भारतीय मुसलमान हा माझ्या अभ्यासाचा खास विषय असल्यामुळे महाराष्ट्रातील मुस्लिम समाजात येत्या पंचवीस वर्षांत सामाजिक व सांस्कृतिकदृष्ट्या काही फेरबदल होण्याची शक्यता आहे किंवा असल्यास त्याचे स्वरूप काय असेल व महाराष्ट्राच्या एकूण सामाजिक व सांस्कृतिक चौकटीत त्याचे स्थान काय असेल, याचाही थोडा ऊहापोह करण्याचा मानस आहे. आणखी एक मुद्दा इथे व्यक्त करावासा वाटतो. अशा तऱ्हेचा भविष्यकालीन शोध घेताना भूतकालीन अनुभवाचा त्याला आधार असला तरी शेवटी ते सारे अनुमान असते. त्यामुळे तसे घडेलच असे छातीठोकपणे सांगणे कठीण असते. शिवाय लेखकाचा स्वभावधर्म आणि त्याचा जीवनविषयक दृष्टिकोन या बाबीही अशा तऱ्हेच्या विवेचनात आपली भूमिका बजावत असतात. तेव्हा या मर्यादा विचारात घेऊनच वाचकांनी त्याकडे पहावे अशी अपेक्षा आहे.

सामाजिक क्षेत्राचा विचार दोन तऱ्हेने करता येईल. एक म्हणजे हिंदू समाजांतर्गत चालू असलेले सामाजिक न्यायासाठीचे संघर्ष व त्याचे भावी स्वरूप आणि दुसरे म्हणजे मुस्लिम समाजातील परिवर्तनाची चळवळ! परंपरागत हिंदू समाज पद्धतीत अंगभूत असलेल्या अन्याय आणि शोषण यांच्या जाणिवेतून निर्माण झालेल्या चळवळीला दीड शतकाचा काळ लोटला आहे.

म. फुले, डॉ. आंबेडकर यांच्यापासून आगरकर-कर्वे यासारख्या अतिरथी-महारथींनी या चळवळीला शक्ती आणि दिशा दिली. असे असले तरीही सामाजिक न्याय व समता या दृष्टीने ही चळवळ फारशी यशस्वी झालेली दिसत नाही. अशी परिस्थिती असूनही आपल्यावरील अन्यायाची जाणीव मात्र दिवसेंदिवस प्रबळ होत जाईल व त्या प्रमाणात न्याय-अन्याय, समता-विषमता या मधील संघर्ष अधिक तीव्र व आक्रमक होईल. या चळवळीला शोषित दलित वर्गाकडूनच बळ मिळेल असेही नाही. तर सवर्ण हिंदू समाजगटातील पुरोगामी व समंजस व्यक्ती व संस्था यांचे पाठबळही पुढील पाव शतकात वाढलेले दिसेल. आज सवर्ण हिंदू समाजात पारंपरिक श्रद्धा व परंपरा जपण्याचे व जोपासण्याचे प्रयत्न होत आहेत हे नाकारण्यात अर्थ नाही. सती प्रथेचे समर्थनच नव्हे तर उदात्तीकरण होत आहे. स्त्रिया व दलितांवरील अन्याय केवळ वाढतच आहेत असे नव्हे तर ते अधिकाधिक हिंसक होत आहेत. पण हे मान्य केले तरी अन्याय-अत्याचार अंगभूत असलेल्या पारंपरिक हिंदू समाज व्यवस्थेचे प्रच्छन्न समर्थन करणे या प्रतिगामी शक्तींनाही आता शक्य होत नाही. म्हणूनच अस्पृश्यता नष्ट झाली पाहिजे, शुद्रातिशूद्र आमचे बांधव आहेत असे तोंडदेखले म्हणत का होईना पण एकीकडे सामाजिक समरसतेचे प्रयत्न तर दुसरीकडे वनवासी जनांच्या (आदिवासी?) कल्याणाचे कार्यक्रम राबवणे प्रतिगामी शक्तींना भाग पडत आहे. अर्थात ही सर्व वरवरची मलमपट्टी आहे, कारण समता व न्याय या मूल्यांवर अविचल श्रद्धा असल्याशिवाय सामाजिक परिवर्तनाची भूमिका प्रामाणिकपणे घेता येत नाही. उलट काळाच्या ओघात त्यातील सुप्त अशी दुटप्पी व दुहेरी भूमिकाच व्यक्त होऊ लागेल. याचा एक परिणाम होईल की सवर्ण हिंदू समाजातील परिवर्तनवादी व पुरोगामी शक्ती बलशाली होतील व त्याचा फायदा दलित शोषित समाजातील चळवळीला होईल.

महाराष्ट्रातील मुस्लिम समाजातील परिवर्तनाच्या चळवळीच्या दृष्टीनेही येते पावशतक मला आशादायी वाटते. महाराष्ट्र पुरोगामी चळवळींच्या बाबतीत नेहमीच अग्रेसर राहिला आहे. म्हणूनच भारतीय मुस्लिम समाजातील पहिलीवहिली परिवर्तनवादी चळवळ महाराष्ट्रातच सुरू झाली. किंबहुना या चळवळीने म. जोतिबा

फुलेंच्या कार्यातूनच प्रेरणा घेतली हे त्याहीपेक्षा महत्त्वाचे समजले पाहिजे. १९७१च्या डिसेंबरमध्ये मुस्लिम सत्यशोधक मंडळातर्फे पुण्यात घेण्यात आलेल्या पहिल्या मुस्लिम महिला परिषदेने या आंदोलनाचे शिंग फुंकले. तेव्हापासून आजपर्यंत महाराष्ट्रातच नव्हे तर साऱ्या देशभर या विषयावर विचारमंथन सुरू झाले. मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डसारख्या प्रतिगामी संस्थांनी परिवर्तनविरोधी भूमिका घेतली असली तरी मौलाना वहिदुद्दीनसारखे काही उदारमतवादी धार्मिक नेतेही मुस्लिम स्त्रियांवर होणाऱ्या अन्याचा विरुद्ध बोलू लागले आहेत. असगर अली इंजिनीयर, मुंबईच्या सेंट झेवीयर्स कॉलेजमधील इस्लामिक स्टडीजच्या प्राध्यापिका झीनत शौकत अली यासारखे इस्लामी धर्मशास्त्राचे विद्वानही मुस्लिम व्यक्तिगत कायद्यातील त्रुटींमुळे मुस्लिम स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध लिहीत आणि बोलत आहेत. त्यांचे मार्ग व अग्रक्रम याविषयी मतभेद असले तरी मुस्लिम व्यक्तिगत कायद्याच्या मर्यादांची जाणीव त्यांना झाली आहे याविषयी दुमत होण्याचे कारण नाही. डॉ. रिफात हुसेनसारख्या पाकिस्तानी विदुषी तर या प्रश्नावर बंड करून उठल्या आहेत. याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे उत्तरेत लखनौला व दक्षिणेत केरळमध्ये मुस्लिम महिलांनी मशिदीत पुरुषांच्या बरोबरीने नमाज पढण्याचा हक्क बंड करून मिळविला. आजूबाजूला अशा घटना घडत असताना महाराष्ट्रातील मुस्लिम समाजात पाव शतकापूर्वी सुरू झालेले परिवर्तनवादी विचारमंथन थंडावेल असे समजण्याचे कारण नाही. उलट महाराष्ट्रातील पुरोगामी चळवळींची एकूण परंपरा पाहता, हे विचारमंथन संघर्षाच्या पातळीवरही अधिक प्रखर व प्रभावी होईल, अशी अशा करण्यास निश्चितच वाव आहे.

सामाजिक परिवर्तनाचा विषय मुस्लिम समाजाच्या अंतर्गत प्रगतीच्या दृष्टीने महत्त्वाचा असला तरी बहुसंख्य हिंदू समाजातील वाढत्या व आक्रमक जातीयवादामुळे मुस्लिम समाजापुढे जीवनमरणाचा प्रश्न तीव्रतेने उभा ठाकला आहे. बाबरी मशीद-राममंदिर आंदोलनातून मुस्लिम समाजाच्या विरुद्ध पद्धतशीरपणे निर्माण केलेली वैराची भावना व तद्नंतरच्या हिंसा, दंगली यांनी हा प्रश्न अधिकच अधोरेखित केला आहे. या आंदोलनात दलित आणि ओबीसी मोठ्या प्रमाणात सामील झाले होते हे मान्य केले तरी अशा आंदोलनातून आपले रोजीरोटीचे व मानवी हक्कांचे प्रश्न सुटण्याची सुतराम शक्यता नाही. उलट अशा तऱ्हेच्या धार्मिक आवाहनातून उच्च वर्णीयांचे हितसंबंधच जपले जातील याची जाणीव या वर्गांना झाली आहे असे गेल्या दोन-तीन वर्षांतील घटनांवरून वाटते. या वर्गांची आपल्या हक्कांसाठी व आपल्यावर होणाऱ्या अन्यायाच्या परिमार्जनासाठी सुरू झालेली आंदोलने नजीकच्या भविष्यकाळात तीव्रतर होतील. याचा दुहेरी फायदा मुस्लिम समाजाला होणार आहे. हिंदू समाजात जवळजवळ बहुसंख्य असलेल्या दलित आणि ओबीसी या समाजगटांचा पाठिंबा यापुढे धार्मिक आवाहने व त्यातून निर्माण होणारी आंदोलने यांना मिळणार नाही असे वाटते. त्यामुळे हिंदू समाजातील जातीयवादाला परस्पर आळा बसू शकेल. दुसरे म्हणजे बहुसंख्य समाजातील जातीयवादामुळे आपल्या समाजाची किती परवड होते याची जाणीव १९९२-९३च्या जातीय दंगलीमुळे मुस्लिम समाजाला फार तीव्रतेने झाली आहे. त्यामुळे त्यांच्यात काही स्वागतार्ह बदल झाले आहेत. मागील लोकसभेच्या व राज्य विधानसभेच्या निवडणुकीतील मुस्लित समाजाच्या मतदानातून ही गोष्ट स्पष्ट झाली. आपल्या धार्मिकच नव्हेत तर राजकीय नेत्यांच्या आवाहनाला बळी न पडता फार मोठ्या प्रमाणावर आपल्या विवेकबुद्धीनुसार त्यांनी मतदान केले. अशा काही घटनांमुळे येत्या काही वर्षांत मुस्लिम समाज सामाजिकदृष्ट्या प्रगत विचारांच्या व राजकीयदृष्ट्या जातीयवादी प्रवृत्तींतून मुक्त होण्याच्या दिशेने वाटचाल करील, अशी आशा करावयास जागा आहे.

सांस्कृतिक क्षेत्रातील फेरबदलाची दखल घेणेही महत्त्वाचे आहे असे वाटते. या प्रश्नाचा विचारही अनेक अंगांनी करता येण्यासारखा आहे. मराठी रसिकतेचे विद्यमान स्वरूप काय आहे ? भावी काळातील काही भलेबुरे बदल होण्याची शक्यता आहे का ? मुस्लिम समाजाचे या क्षेत्रात काही योगदान आहे का ? त्याचे स्वरूप भावी काळात कसे असेल ? हे या संदर्भातील काही महत्त्वाचे प्रश्न आहेत. सुगम, शास्त्रीय संगीतापासून रंगभूमी, सिनेमा व अलीकडचे दूरदर्शन मालिकांसारखे प्रयोगशील (परफॉर्मिंग) कलांचे क्षेत्र आजपर्यंत तरी जातीयवादी विचारांच्या प्रभावातून फार मोठ्या प्रमाणावर मुक्त राहिले आहे. किंबहुना हे क्षेत्र भारताच्या मिश्र संस्कृतीचे प्रातिनिधिक उदाहरण मानता येईल. तसे पाहायला गेले तर सुगम व सिनेसंगीताचे क्षेत्र अपवाद नसले तरी शास्त्रीय संगीताच्या क्षेत्रातील मुस्लिम कलावंतांचे योगदान वादातीत आहे. पण त्याबरोबरच मराठी रसिकांनी या कलावंतांची व त्यांच्या कलेची केलेली कदर व त्यांना दिलेली दादही तितकीच महत्त्वाची आहे. म्हणून तर संगीत सम्राट खाँ साहेब अल्लादियाँ खाँसारख्या कलावंतांनी म्हणून ठेवले आहे की, संगीत कला उत्तरेत मिळवायची व महाराष्ट्रात तिचा आविष्कार करावयाचा. मराठी रसिकतेनेही त्यांचे हे विधान सातत्याने सिद्ध केले आहे. ही परंपरा यापुढेही

(पुढील मजकूर पान १५१ वर)

बुद्धिवादी मध्यमवर्गच सत्तेत राहणार

शरद पवार

२०२० सालाचा विचार करताना सर्वात प्रथम एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, २०२०पेक्षा २०१० सालाचा विचार करणे आज जास्त महत्त्वाचे ठरेल. याचे कारण म्हणजे गेल्या दहा वर्षांत जे घडले आहे ते इतके क्रांतिकारक आहे, त्याची फळे येत्या दहा वर्षांत मिळणार आहेत. माहिती आणि दळणवळणाच्या क्षेत्रात जी क्रांती झाली आहे त्याची फळे दहा वर्षांत दिसू लागतील. उपग्रह दूरसंचार (सॅटेलाईट कम्युनिकेशन ॲन्ड इंटरनेट) या विषयांतील क्रांतीकडे पाहता, गेल्या ४०-५० वर्षांत जे घडले नाही ते आता झपाट्याने घडू लागले आहे. प्रगतीची एक हनुमान उडी जग घेणार आहे. मुंबईसारखीच पुणे, नाशिक यांसारखी शहरे महाराष्ट्रात फार महत्त्वाची ठरणार आहेत. मुंबई हे केंद्र धरून महाराष्ट्रातील इतर शहरे त्याची उपकेंद्रे होतील आणि ही प्रगतीची हनुमान उडी महाराष्ट्रात पाहावयास मिळेल. शिक्षण क्षेत्रात आपल्याकडे जे तांत्रिक शिक्षण संस्थेचे जाळे निर्माण झाले आहे, त्याच्यामुळे एक टेक्नोक्रॅट (तंत्रकुशलांचा) वर्ग हा राज्यामध्ये नव्याने उभा आहे, आणि तो हे आव्हान स्वीकारून महाराष्ट्राला प्रगतीपथावर घेऊन जाईल. अमेरिका व इंग्लंडमध्ये जो भारतीय माणूस गेलेला आहे तो खाजगी क्षेत्रातून गेलेला नसून आय. आय. टी.सारख्या शिक्षण संस्थांतून तयार होऊन गेलेला आहे. त्यांनी आज अमेरिकेच्या सॉफ्टवेअर उद्योगात जवळजवळ २०% इतके आपले स्थान निर्माण करून ठेवले आहे. या कारणामुळे देशाच्या आणि देशाच्या बाहेरच्या गरजा भागविण्याचे केंद्र महाराष्ट्र होणार आहे. यापुढच्या काळात जी औद्योगिक वाढ अपेक्षित आहे त्यात पैसा हे भांडवल राहणार नाही. मेंदू (ब्रेन) हे भांडवल राहणार आहे. बुद्धिमत्ता हेच भांडवल राहील. बिल गेटस्‌चे उदाहरण पाहता हा मुद्दा स्पष्ट होतो. जगातील सर्वांत श्रीमंत माणूस हा संशोधन याच भांडवलावर यशस्वी होऊ शकेल. महाराष्ट्रातील मराठी बुद्धिजीवी मध्यमवर्गाचे स्थान हे महाराष्ट्रातले सत्ताकेंद्र ठरेल आणि ही मध्यमवर्गीयांची पुढची पिढी शिक्षणाच्या आणि बुद्धिमत्तेच्या भांडवलाच्या जोरावर कुठच्या कुठे निघून गेलेली दिसेल, आणि हा काळ काही फार दूर नाही. मराठी कुटुंबातील शिस्तप्रियता आणि पारंपरिक कुटुंबव्यवस्था तसेच मुलांची जिज्ञासा पुरविण्याची पालकांची इच्छा, यामुळे भावी पिढीचा आवाका हा कल्पनेपेक्षाही पुढचा असेल. आता यापुढे टाटा, बिर्ला डिक्टेट करण्याचे दिवस राहाणार नाहीत, तर बुद्धीच्या जोरावर उद्योग करणाऱ्यांचे, डिक्टेट करणाऱ्यांचे दिवस येतील आणि त्यात पुन्हा मध्यमवर्गाचे वर्चस्व अधिक राहील.

एकूण जर गेल्या शंभर वर्षांचा इतिहास पाहिला, तर सुरुवातीची प्रगती ही शेतीची हरितक्रांती होती. त्यानंतर युरोपमधील औद्योगिक क्रांती झाली. त्यावेळी शाळेच्या क्रमिक पुस्तकांत सुऱ्याकात्र्या बनविण्याचे केंद्र शेफील्ड (यु. के.) असे आपण वाचत होतो. त्यानंतर धातू आणि रसायन क्षेत्रांतील क्रांती ही महत्त्वाची होय. त्यानंतर झालेली क्रांती म्हणजे दळणवळण आणि प्रसार माध्यमांच्या क्षेत्रात झालेली क्रांती! आता मात्र परत हे चक्र उलटे फिरू लागणार आहे. मानवी समाजाची जी अन्नाची गरज आहे, ती दर्जेदार अशा अन्नाची गरज होईल. फळे, चांगल्या दर्जाचा भाजीपाला शिवाय फुले याचीही गरज जगात वाढणार आहे, आणि या गोष्टींचे उत्पादन करायला जगात महाराष्ट्रासारखी दुसरी अधिक चांगली भूमी नाही. ही भूमी सर्व दृष्टीने उत्कृष्ट म्हणजे सुदैवाने आपले हवामान असे आहे की, अनेक प्रकारची फळे आणि फुले इथे भरपूर प्रमाणात होऊ शकतात. जगात बहुतेक ठिकाणी वर्षातून काही वेळा अतिशय थंड किंवा अतिशय उष्ण असे हवामान असते, तसे हवामान या भूमीत नाही. तेव्हा या भूमीत तंत्रकुशल अशी बागायतदारांची एक नवीन पिढी उद्याचा महाराष्ट्र घडवणार आहे. त्यासाठी इन्फ्रास्ट्रक्चरची गरज मात्र भासेल आणि ते नजीकच्या भविष्यात निर्माण होईल अशी आशा आहे. शेती जमिनीतच होईल असे नाही, कारण मातीत पीक येण्याचे दिवस संपले. ग्रीनहाऊस तंत्रज्ञानामुळे हवामान नियंत्रणाखाली येऊन कोणतेही पीक बारमाही घेता येण्याची शक्यता आहे. कारण पाणी, तपमान आणि सूर्यप्रकाश या गोष्टी नियंत्रणाखाली आल्यावर होणारे बदल हे विस्मयकारक ठरतील. रात्री सूर्यप्रकाश नसल्यामुळे जी वनस्पतीची वाढ खुंटते ती न थांबता २४ तास सूर्यप्रकाश देऊन उत्पादन प्रचंड वाढविण्याची सोय या ग्रीनहाऊस टेक्नॉलॉजीमुळे उपलब्ध होणार आहे. त्यामुळे तीन महिन्यांत येणारे पीक दीड महिन्यातही येऊ शकेल आणि उत्पादन प्रचंड होईल आणि ही जगाची अन्न-फुला-फळांची गरज भागविण्याची कुवत महाराष्ट्रात आहे. या देशातला शेतमाल आता निर्यात होऊ लागला आहे. पूर्वी चहा वगैरेसारखी हाताच्या बोटांवर मोजण्यासारखीच पिके निर्यात होत असत आणि तीसुद्धा टाटासारख्या मोठ्या

उद्योगसमूहांकडून होत असे. परंतु शेतकरी निर्यातीच्या क्षेत्रांत देशामध्ये पहिला महाराष्ट्र उतरला. द्राक्षे, डाळिंबे, फुले आणि आंबा या चार पिकांची निर्यात महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी करून दाखविली आहे. जवळजवळ दीडशे कोटी रुपयांची निर्यात महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी करून दाखविली आहे, आणि हे फारसे कोणाला माहीत नाही. आता लंडनमध्ये ऑक्सफर्ड स्ट्रीटला आपलीच द्राक्षे मिळतात. 'मार्कस् ॲन्ड स्पेन्सर्स' या लंडनमधील आलिशान डिपार्टमेंट स्टोअर्समध्ये तासगावची द्राक्षे मिळतात. आता खेड्यांमधील लोकसुद्धा डॉलर्स आणि पौंडस्मध्ये होणारे चढउतार बोलू लागले आहेत. पुढील काही वर्षांमध्ये ही नित्याची बाब होणार आहे.

महाराष्ट्रापुरतेच नाही तर देशाच्या सीमाही आता धूसर होऊ लागल्या आहेत. ग्लोबल खेडे किंवा वैश्विक कुटुंब ही जी संकल्पना बोलली जायची ती प्रत्यक्षात उतरताना दिसत आहे. तंत्रज्ञानाचा उपयोग जेव्हा विकासासाठी होईल तेव्हा त्याचा लाभ सर्वात जास्त उठविणारा हा महाराष्ट्रातील मध्यमवर्ग असेल. कारण त्याला दृष्टी आहे, प्रामाणिकपणा आहे आणि मेहनत करण्याची तयारी आहे. महाराष्ट्रात चोऱ्या करण्याची वृत्ती तुलनेत खूपच कमी आढळून येते. चोऱ्या करून कमी वेळात पटकन पुढे जाता येते, परंतु सातत्य राहत नाही. महाराष्ट्राची मानसिकता मात्र वेगळ्या प्रकारची असून, ती प्रामाणिक आहे. पण यासाठी आजच्या पिढीने मात्र उद्याचा विचार करून सोयींची उपलब्धता करून घ्यायला पाहिजे. आता जसे कालनिर्णय इंटरनेटवर उपलब्ध करून दिले गेले. जगातल्या सगळ्या लोकांना संकष्टी कधी आहे ही माहिती त्यामधून घरबसल्या मिळू शकेल असा दृष्टिकोन आहे. तसे व्हावे आणि थोडे पुढे बघून काम करण्याची वृत्ती जोपासावी लागेल. आजचा दिवस गेला, उद्याचे उद्या बघू हे यापुढे चालणार नाही. त्यासाठी पुढच्या पिढीला झोकून देऊ या! पाण्यात पडले की आपोआप पोहता येते असे सांगण्याची गरज आहे. आमच्या लहानपणी आम्हाला पोहता यावे म्हणून विहिरीत ढकलून दिले आणि विहिरीत ढकलून दिल्यानंतर आम्ही शिकलो पोहायला! फारतर दोन-तीन वेळा मुलें गटांगळ्या खातात. काठावर उभे राहून ती बुडत नाहीत एवढेच जाणते पाहतात. पण माणसाची मनातील जगण्याची जी दुर्दम्य इच्छा असते ती त्याला पोहायला भाग पाडते. शिवाय बुडायला लागले तर कोणीतरी आपल्याला वर काढील हा मानसिक आधार असतो. त्याचप्रमाणे या नव्या ज्ञानाच्या आणि तंत्रज्ञानाच्या विहिरीत आपण आपली मुले फेकली पाहिजेत. सगळ्या गोष्टी उपलब्ध करून देऊन अगदी लहानपणापासूनच फेकले पाहिजे. पालकांची जबाबदारी उपलब्धतेची आणि सुरक्षिततेची सोय करण्याची आहे. पण फेकावी ही लागतीलच! नव्या पिढीची जबाबदारी आहे, हे ज्ञान आत्मसात करून आत्मविश्वासाने उभे राहण्याची, आव्हाने स्वीकारण्याची. मग यश आपोआपच पदरात पडणार. समजा, अपयश आलेच तर खचून जाण्याचे कारण नाही. प्रयत्न करीत राहिले पाहिजे. मग या सगळ्या क्षेत्रांमध्ये महाराष्ट्राचा हात देशात काय जगातही कोणी धरू शकेल असे मला वाटत नाही.

मुंबई हे फायनान्स आणि ट्रेडिंगचे एक महत्त्वाचे केंद्र म्हणून प्रस्थापित होईल, तेही अगदी नजीकच्या भविष्यकाळात. हिंदुस्थानात नव्हे तर जगात या शहराला फार महत्त्व येणार आहे. सिंगापूर, हाँगकाँगसारख्या भौगोलिक मर्यादा मुंबई शहराला नाहीत, आणि टोकियोपासून लंडनपर्यंत जो सूर्यास्त आणि सूर्योदय यामधील अंधाराचा काळ आहे तो भरून काढायला मुंबईला पर्याय नाही. आर्थिक क्षेत्राचे व्यवहार प्रचंड मोठे होत जातील, आणि ते २४ तास चालण्यास लंडन, टोकियोमधील अंधाराच्या वेळेची ही दरी भरून काढण्यासाठी मुंबईचा उपयोग जग खचितच करून घेईल. हाँगकाँगच्या मर्यादा दिवसेंदिवस अधिकाधिक स्पष्ट होऊ लागल्या आहेत. येत्या ५-१० वर्षांत हे सगळे चित्र आकार घेत असल्याचे नजरेला येईल. यासाठी शिक्षण क्षेत्रातील आतापर्यंतची जी परंपरा आहे ती मात्र बदलावी लागेल. येत्या १०-१५ वर्षांत शिक्षणामध्ये शिक्षक हा हळूहळू गुप्त होताना दिसेल. तुमच्या घरात असलेल्या टी. व्ही. चॅनेलवर तुमची मुले हवे ते शिक्षण घेताना दिसतील. ई-मेलवर इंटरनेटवरून त्यांच्या नोटस् येतील. परीक्षा पद्धती ही इंटरॲक्टिव्ह असेल. नोकरीच्या मुलाखती सॅटेलाईटद्वारे घेतल्या जातील. फार बदल होणार आहेत. फक्त ते पचविण्याची क्षमता निर्माण करता आली पाहिजे. इंदिरा गांधी ओपन युनिव्हर्सिटीत अशा प्रकारचे प्रयोग सुरू झालेले आहेत ते आपण पाहतोच.

आता शेवटचा मुद्दा हा भांडवलाचा! कारण इन्फ्रास्ट्रक्चर निर्माण करण्यासाठी जे भांडवल लागते त्याची आपणाकडे चणचण आहे आणि देशाची अर्थव्यवस्था व्याजाच्या ओझ्याखाली आणि लोकसंख्येच्या रेट्याखाली दबलेली आहे. हे भांडवल कुठून येणार? हे भांडवल जागतिकीकरणाच्या प्रक्रियेशिवाय येणे शक्य नाही. संकुचित वृत्ती सोडून मुक्त अर्थव्यवस्थेचा पाठपुरावा सावधगिरीने करावयाला लागेल. फार घाई करून चालणार नाही आणि फार संथगतीनेही चालणार नाही. एन्रॉनचा प्रकल्प हा या विषयांत 'टेस्ट-केस' ठरला. सगळीकडून त्याची पाहणी, चाचपणी, विरोध, आंदोलने झाली. पण आता वीज क्षेत्रात तसे १० नवीन प्रकल्प येत आहेत. त्यातील काही 'रिलायन्स'सारख्या भारतीय कंपन्या उभारीत आहेत, ही जमेची बाजू नाही का? सुरुवातीच्या काळात या गोष्टी रुचत नाही, पचत नाहीत, उमजत नाहीत. भारतासारख्या खंडप्राय देशात हा मामला आणखीनच कठीण होऊन बसतो. पण लोकशाही मार्गात चालताना जनमताचा कौल पाहूनच गोष्टी करायला लागतात. मग त्यात सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्ष असतो. विचारवंत-पत्रकार यांची तात्त्विक मारामारी पण असते. पण लोकशाही म्हटल्यावर हे सगळं व्हायचंच. मोठे प्रकल्प उभारू इच्छिणाऱ्याला

प्रकल्पाचे काम करण्याची संधी प्राप्त करून दिली पाहिजे. यायला खूप तयार आहेत पण त्यातले योग्य ते प्रकल्प निवडणे हे आपले काम आहे. ते निवडताना भवितव्याचा विचार करणे आवश्यक आहे. कारण त्याची भलीबुरी फळे ही पुढच्या पिढीला मिळणार आहेत याचे भान हवे. महाराष्ट्र या बाबतीत सुदैवी ठरला आहे. ऊर्जा खात्याचे लोक दिल्लीत मला सांगतात, ५० प्रकल्प आले तर त्यातील ४५ लोकांना महाराष्ट्रात यायची इच्छा असते. हे वातावरण पुढे असे कसे चालू राहील याची जबाबदारी राजकारणी लोकांनी घ्यायला हवी. सध्याचे सरकार असा दुरोगामी विचार करताना दिसत नाही ही खेदाची बाब आहे.

जागतिकीकरण सुरू होताना काही देशांतील अर्थव्यवस्था (काही काळासाठी) कोलमडताना दिसतात. उदा. मेक्सिको, थायलंड, मलेशिया, इंडोनेशिया, ब्राझिल इत्यादी. पण हे कोसळणे तात्पुरत्या स्वरूपाचे असते हे लक्षात घ्यावयास हवे. अमेरिकेची अर्थव्यवस्था ही एकेकाळी अशा जबर तडाख्यातून तावूनसुलाखून निघाली होती. पण त्यात अनावश्यक अशी अर्थव्यवस्थेवरची चरबी झडून जाते असे माझे मत आहे. जागतिकीकरणामुळे आर्थिक शिस्त लागते आणि शिस्तीला पर्याय नाही. आपल्यालाही अशा परिस्थितीतून जावे लागले तर त्यासाठी मानसिक तयारी असायला हवी. पण या परिस्थितीतून गेल्याशिवाय विकासाला पर्याय नाही, हेही ध्यानात ठेवावयास हवे. तेजीमंदीच्या लाटा या नेहमी येतच असतात. अर्थव्यवस्था जेव्हा स्वदेशी संरक्षणाच्या बेगडी भिंती तोडून जागतिक होतील तेव्हा येणारी अशी मंदीची लाट वादळी ठरण्याची शक्यता असते. परंतु अशावेळी जगातील इतर देश तुमची अर्थव्यवस्था संपूर्णपणे उद्ध्वस्त होणार नाही असे पाहतात, कारण शेवटी त्यांनाही धंदा करावयाचा असतो असा अनुभव आहे. अमेरिका तर 'ग्रेट डिप्रेशन'मधून उभी राहिलेली आपण पाहिली. गोर्बाचेव्हच्या सत्तेनंतर (ग्लॅसनॉत, पेरिस्त्राईका) कोसळलेली रशिया हळूहळू परत उभा राहत आहे. त्यासाठी हिंमत, शिस्त आणि काम करण्याची तयारी मात्र हवी. सरकारच्या आर्थिक संरक्षणाखालील कुबडीवाल्या अर्थव्यवस्था यापुढे शिल्लक राहणार नाहीत. कारण अर्थव्यवस्थेला जागतिक स्पर्धेच्या वातावरणात आर्थिक संरक्षण देण्याची क्षमता सरकारांना भविष्यात राहाणार नाही, असे मला वाटते. अर्थव्यवस्था ही सरकारच्या कुबड्यांशिवाय स्वतःच्या पायावर उभी राहावयास पाहिजे. या संदर्भात या देशात महाराष्ट्राचा रोल मोठा महत्त्वाचा राहाणार आहे, हे ध्यानात घेऊन कामास लागणे हाच एक पर्याय आहे. मग २०१० काय आणि २०२० काय, जीत आपलीच आहे.

(शरद पवार : राज्याचे माजी मुख्यमंत्री, माजी संरक्षण मंत्री आणि अ. भा. काँग्रेस पक्षाचे लोकसभेतील नेते)

***

(मुस्लिम ... पान १४९ वरून)

खंडित होणार नाही. म्हणून तर गुलामअली व मरहूम नुसरत फतेह अलीसारख्या पाकिस्तानी कलावंतांनी आपली कला इथे सादर करण्यात केवळ आनंदच नाही तर अभिमान बाळगला आहे. सिने संगीताच्या क्षेत्रातही गुलाम हैदर, नौशादपासून ए. आर. रहेमानपर्यंत अनेक संगीत दिग्दर्शकांनी एकाहून एक सुरेख सिनेगीतांचे देणे देऊन संगीताची परंपरा समृद्ध केली आहे. गेल्या काही वर्षांतील पॉप व रॉक संगीताच्या लाटेमुळे ही परंपरा तूर्तास खंडित झालेली दिसत असली तरी ती फार काळ टिकणार नाही, कारण संगीत आणि काव्य यांचा संबंध माणसांच्या भाव जीवनाशी असतो त्यामुळे अर्थहीन किंवा केवळ शारीरिक सौंदर्याचे रसहीन वर्णन फार काळ लोकांना आकर्षित करू शकणार नाही. दूरदर्शनवरच्या सारेगमसारख्या कार्यक्रमांतून गायल्या जाणाऱ्या गीतांतून आजच्या तरुणांनीही आपल्या आवडी-निवडीचे स्वरूप स्पष्ट केले आहे. त्यामुळे येत्या काही वर्षांत पॉप-रॉक संगीताची लाट फार काळ टिकेल असे समजण्याचे कारण नाही.

प्रयोगशील कलाक्षेत्राचा विचार करत असताना दूरदर्शन व इतर वाहिन्यांवरील मालिका व इतर कार्यक्रमांची दखल घेणेही आवश्यक आहे. परदेशी वाहिन्यांच्या भारतातील प्रक्षेपणामुळे या अतिशय प्रभावी अशा अत्याधुनिक माध्यमावरील विविध कार्यक्रमांची रेलचेल झाली आहे. त्यामुळे एकीकडे कलावंतांची मागणी वाढली आहे. पण त्याबरोबरच विविध तंत्रज्ञ व इतर कामगारांची गरजही या क्षेत्रात सतत वाढती राहणार आहे, त्यामुळे मराठी तरुणांना एक नवे क्षेत्र रोजगार व कलात्मक निर्मिती या दोन्ही बाबतीत उपलब्ध झाले आहे. अनेक जुन्या-नव्या कलावंतांनी या संधीचा फायदा उठविला आहे. मुस्लिम तरुणही याबाबतीत मागे नाही. जवळजवळ सर्वच मालिका/कार्यक्रमात मुस्लिम तरुणांचा या ना त्या स्वरूपात सहभाग असलेला आढळतो ही गोष्ट मला जितकी उत्साहवर्धक तितकीच महत्त्वाची वाटते. रोजगाराच्या इतर क्षेत्रात मुस्लिम तरुणांना एकतर संधी मिळत नाही आणि मिळालीच तर या क्षेत्रातील जातीयवादी प्रवृत्तीमुळे त्याला अनेक अडचणींना तोंड देत दिवस काढावे लागतात. त्या तुलनेत कलाक्षेत्र जातीयवादी विखारापासून खूपच मुक्त असल्यामुळे तिथे होतकरू मुस्लिम तरुणांना वाढत्या संधी मिळत आहेत. मुस्लिम तरुणांच्या दृष्टीने ही परिस्थिती जितकी आशादायक व आर्थिकदृष्ट्या प्रगतीची होणार आहे तितकीच ती सामाजिक अभिसरणाच्या दृष्टीनेही महत्त्वाची ठरणार आहे. कारण प्रेक्षक, सहकलावंत व या क्षेत्रात उतरणारे मुस्लिम कलावंत / तंत्रज्ञ यांच्या परस्परातील सामंजस्य सतत वाढते राहणार आहे.

(अ. का. मुकादम : ज्येष्ठ अभ्यासक आणि 'मुस्लिम सत्यशोधक समाजाचे' कार्यकर्ते)

***

भविष्य आकर्षक आहे

बाळ फोंडके

भविष्यकाळात डोकावणे ही विज्ञानकथालेखकाची आणि भाकीत करणे ही वैज्ञानिकांची सहजप्रवृत्ती असते. तरीही, आजपासून साधारण पंचवीस वर्षांनी, म्हणजे २०२०साली, महाराष्ट्रातील परिस्थिती काय असेल, याचं भाकीत करणं जोखमीचंच ठरेल. कारण वैज्ञानिकांना अभिप्रेत किंवा परिचित असलेलं भाकीत आणि इथं संपादकांना अपेक्षित असलेलं भाकीत, यात काही मूलभूत फरक आहेत. वैज्ञानिक भाकीत किंवा विज्ञानकथेत रंगवलं जाणारं भविष्यकाळाचं चित्रण हे नाही म्हटलं तरी तर्कसंगतीचं बोट घट्ट धरून जाणारं असतं. त्यात भावविशेषांना स्थान नसतं. याउलट सामाजिक भाकीत, त्या समाजावर वैज्ञानिक दृष्टिकोनाचा पगडा कितपत आहे, यावर अवलंबून असतं. त्या दृष्टीनं विचार केल्यास आपल्या समाजावर अजूनही भावनिक आंदोलनांचं प्रभुत्व आहे, हे अमान्य करता येत नाही. त्यामुळं तो समाज भविष्यकाळात कसा वागेल आणि कोणत्या प्रकारची स्थिती स्थापन करील याचा अचूक आढावा घेणं, हे अतिशय जोखमीचं ठरू शकतं.

तरीही, वरवर तर्कविसंगत, प्रसंगी तर्कदुष्ट वाटणाऱ्या सामाजिक वर्तणुकीलाही तर्कसंगतीचं अधिष्ठान असतं, उत्क्रांतीच्या काही मूलभूत प्रेरणांच्या ठायीच या वागणुकीचं सुकाणू असतं आणि जीवशास्त्रीय प्रमेयांच्या आधारानं त्यांची उकल करता येणं शक्य होतं, हे 'बिहेवियरल सायन्सेस' या विज्ञानाच्या नवीन शाखेची मुहूर्तमेढ रचणाऱ्या निक्को टिनबर्गेन, कोन्रॅड लॉरेन्झ प्रभृती शास्त्रज्ञांच्या संशोधनातून दिसून आलेलं आहे. त्यामुळेच आपापल्या विषयातील भाकितं वर्तवताना शास्त्रज्ञ ज्या प्रणालीचा वापर करतात तिची कास धरली, तर सामाजिक स्थितीबद्दलही काही डोळस अंदाज बांधता येणं शक्य आहे.

या वैज्ञानिक प्रणालीचा पाया आहे पक्की, वादातीत गृहितं. त्यासाठीच ज्या पदार्थांच्या भविष्यकालीन स्थितीविषयीचा अंदाज व्यक्त करायचा, त्याच्या सद्य:स्थितीची अचूक आणि सम्यक माहिती करून घेणं आवश्यक ठरतं. विशेषत: जे प्रवाह त्या स्थितीची बैठक ठरवतात, त्या प्रवाहांचा मागोवा घेतच पुढील काळातील स्थितीविषयीचा अंदाज बांधला जातो. पंचवीस वर्षांनंतरचा महाराष्ट्र कसा असेल याचा आढावा घेताना आपल्याला याच पद्धतीचा वापर करणं इष्ट ठरेल.

त्यानुसार, प्रथमत: आजच्या काही प्रमुख प्रवाहांची माहिती करून घ्यायला हवी. विशेषत: ज्या प्रवाहांमुळे ठोस सामाजिक बदल घडून येत आहेत, किंवा तसे होणं शक्य आहे, त्यांचा विचार करणं आवश्यक आहे. हे प्रवाह कमजोर वा तात्पुरते नाहीत, त्यांच्यात काही सर्वदूर आणि कायम स्वरूपाचे सामाजिक बदल घडवून आणण्याची क्षमता आहे, याची खातरजमा करून घेतली की त्या प्रवाहांचा मागोवा घेत भविष्यातल्या समाजाचं स्वरूप आपण जाणून घेऊ शकतो. भविष्यकथनाची ही बैठक स्पष्ट केली, की त्या भाकितावर कितपत विश्वास ठेवायचा, हे ठरवणंही इतरांना सहज शक्य होतं.

गेल्या काही वर्षांमध्ये महाराष्ट्रात शिक्षणाचा प्रसार वेगळ्या दिशेनं होत आहे. इथंच स्थायिक असलेल्या शिक्षणतज्ज्ञांना हे विधान कदाचित पटणार नाही. परंतु गेली काही वर्षं मी महाराष्ट्राबाहेर वास्तव्य करून असल्यानं इथल्या परिस्थितीकडे वेगळ्या कोनातून पाहणं मला शक्य झालं आहे. शिवाय इतरत्र शिक्षणाची काय परिस्थिती आहे, याचीही ओळख पटलेली आहे. शालान्त परीक्षेपर्यंतचं शिक्षण मुलामुलींना, आणि मुलींना तर बारावीपर्यंतचं शिक्षण मोफत झाल्यामुळे शिक्षणाचा प्रसार आजवर उपेक्षित राहिलेल्या ग्रामीण भागात आणि स्त्रीवर्गात झपाट्यानं होत आहे, हे नाकारता येणार नाही. ग्रामीण भागात शिक्षणाविषयी उपेक्षित वर्गात किती उत्साह आहे, हे प्रत्यक्ष अनुभवायलाच हवं. कोकणासारख्या मागासलेल्या, आणि तरीही बॅकलॉगचं तुणतुणं नेहमीच न वाजवणाऱ्या प्रदेशात तर हे पदोपदी जाणवतं. या पायाभूत शिक्षणाच्या दर्जाबद्दल शिक्षणतज्ज्ञ टीका करतात. ती अवाजवी आहे असंही नाही. परंतु जिथे शिक्षणाचा संपूर्ण अभावच होता तिथं शिक्षण सहज आणि पदरमोड न करता उपलब्ध झालं असेल, तर त्याच्या

दर्जाविषयीचा विचार थोडाफार दूरवरच ठेवणं आवश्यक आहे. शिक्षणतज्ज्ञांचं असमाधानच तो दर्जा सुधारण्याला साह्यभूत होणार आहे. या प्राथमिक शिक्षणात सुधारणा करण्यासाठी गेल्या दोन-तीन वर्षांपासून जे काही प्रयोग केले जात आहेत, त्यामुळेही अधिक संख्येनं पुढची पिढी शिक्षणाकडे आकर्षित होऊन गळतीचा, ड्रॉपआऊटचा, रोग नाहीसा होण्याची शक्यता वाढीस लागली आहे.

उच्च शिक्षणातही आज अनेक नवनवे पर्याय उपलब्ध होऊ लागले आहेत. ज्ञानाच्या नवनवीन शाखांचा उदय होत आहे. त्याच्या अनुषंगानं त्या त्या शाखांचं शिक्षण मिळविण्याचीही व्यवस्था होऊ लागली आहे. विद्यार्थ्यांचा, आणि त्यांच्या निवडीत प्रमुख सहभाग असणाऱ्या त्यांच्या पालकांचा कल गेल्या काही वर्षांमध्ये मूलभूत ज्ञानशाखांपासून दूर जात व्यवसायाभिमुख शाखांकडे वळत आहे. यापाठी उंचावलेल्या जीवनमानाच्या अपेक्षा असल्या तरी त्याचा परिणाम शिक्षित विद्यार्थी व्यवसायक्षम होण्याकडे होत आहे, हेही ध्यानात घेतले पाहिजे.

औद्योगिकीकरणाच्या क्षेत्रात महाराष्ट्र तसा सुरुवातीपासूनच आघाडीवर राहिला आहे. आर्थिक सुधारणा अंमलात आल्यानंतरच्या गेल्या पाच-सहा वर्षांमध्ये भारताच्या इतर राज्यातही त्या दिशेनं अधिक जोमानं प्रगती होत असली, तरी महाराष्ट्रातली वाढही लक्षणीय आहे. विशेषत: या औद्योगिकीकरणाच्या यशासाठी आवश्यक असणारी कामाची शिस्त महाराष्ट्रात जितकी रुजली आहे, तितकी इतरत्र आढळत नाही. ती अधिक भक्कम होण्याची आवश्यकता आहे हे निश्चित. पण आज ती समाजात भिनली असल्याचं दिसून येतं. त्याचबरोबर अधिक परिश्रम करून अधिक उत्पन्न मिळवावं, हा विचारही बळावतो आहे. नवे उद्योग पूर्वी केवळ पुणे-मुंबई क्षेत्रातच स्थापन होत असत. आज ती परिस्थिती राहिलेली नाही. राज्याच्या इतर, मागास भागातही आज नवीन उद्योगांची प्रतिष्ठापना होत आहे. पायाभूत सोयींचा विस्तार होईल, तसा हा प्रवाह अधिक जोमदार बनेल.

उद्योगधंद्यांच्या या दिशेनं होत असलेल्या वाढीमुळं आज राज्याचं शहरीकरण अधिक वेगानं होत आहे. तरीही ते वेगळ्या प्रकारचं आहे. पूर्वी उद्योगधंदे काही विशिष्ट भागापुरतेच मर्यादित राहिल्यामुळं रोजगाराच्या शोधात ग्रामीण भागातील रहिवाशांचे लोंढे याच दोन-चार भागांकडे येत असत. त्यामुळे त्या भागातील शहरांची वाढ बेसुमार होत होती आणि बाकीचा सारा भाग अविकसितच राहत होता. त्यामुळे बकालपणा सर्वत्र वाढत आहे, अशी तक्रार काहीजण करत असले, तरी अनेक सोयीसुविधाही सर्वत्र पसरत आहेत आणि उपभोग्य मालाचा पुरवठाही सर्वत्र होत आहे, हे नजरेआड करता येत नाही.

उद्योगधंद्यांप्रमाणे शेतीतही आज बरेच बदल झाले आहेत. विशेषत: फळबागायतीत महाराष्ट्रानं क्रांतिकारक बदल घडवून आणले आहेत. फळं, भाजीपाला, नगदी पिकं यांचं उत्पादन वाढीव प्रमाणात करून त्यांची निर्यात करण्याची प्रवृत्ती वाढीस लागली आहे. फळं आणि भाजीपाला ही तशी नाशिवंत उत्पादनं. परंतु त्यांच्यावर प्रक्रिया करून त्यांच्या उपभोग्य कालमर्यादेत वाढ करण्याचे किंवा त्यांच्यापासून इतर टिकाऊ उत्पादनं तयार करण्याचे प्रयत्न होत आहेत. अधिक उत्पादन देणारी किंवा येथील जमिनीत व हवामानात व्यवस्थित वाढू शकणारी पिकांची नवनवीन वाणं तयार करण्यातही महाराष्ट्रातील शेतकी वैज्ञानिक आघाडीवर आहेत. शेतकरीही प्रयोगशील असल्यामुळे त्यांचं सहकार्यही मोठ्या प्रमाणात मिळत आहे.

आजचं युग माहितीचं आहे. इन्फर्मेशन एज आहे. संगणकाचा वापर करून अधिक अचूक, अधिक ताजी आणि अधिक उपयुक्त, तसंच जिच्यावर योग्य ते संस्कार केले गेलेले आहेत, अशी माहिती मिळवण्यावर आज जगभर भर दिला जात आहे. याही क्षेत्रात महाराष्ट्र मागे नाही. इंटरनेटच्या आजच्या युगात संपर्कसाधनांना आणि त्यांचं जाळं बांधण्याला, नेटवर्किंगला, फार मोठं महत्त्व आलेलं आहे. घरबसल्या इतरांशी संपर्क साधून स्वत:च्या बैठकीवरून न हलताही अनेक कामं करून घेता येणं आज शक्य होत आहे.

तंत्रज्ञानाचा असा अधिकाधिक वापर करण्याकडे कल असताना पर्यावरणाविषयी महाराष्ट्रातील जनता अधिक जागरूक होत आहे. सामाजिक वनीकरणाचा कार्यक्रम हा आज केवळ सरकारी कार्यक्रम न राहता त्याला एका प्रकारे सामाजिक चळवळीचं स्वरूप येत आहे, हे अनेक शहरांमधील वाढत्या हिरवाईमधून आणि ग्रामीण भागातील नव्यानं लागवड केल्या गेलेल्या वृक्षराजीला टिकवून धरण्यासाठी होत असलेल्या प्रयत्नांमधून जाणवत आहे.

या सर्वांबरोबर साथसंगत करत वैज्ञानिक दृष्टिकोण रुजवण्यासाठीही अंधश्रद्धा निर्मूलनासारख्या आंदोलनानंही मूळ धरावयास सुरुवात केली आहे. हे आंदोलन शासकीय स्तरावर न होता सेवावृत्ती संस्थांकरवी केले जात आहे, ही आशादायक घटनाच आहे. तसंच या

प्रयत्नांमध्ये केवळ बुद्धिवंतांचा, विचारवंतांचाच सहभाग नसून समाजाच्या सर्वच थरांतील कार्यकर्ते मिळत आहेत.

हे झाले काही इष्ट आणि सुष्ट प्रवाह. याचबरोबर भ्रष्टाचाराचा होत असलेला प्रसार आणि गुन्हेगारीचा राजकीयच नव्हे तर सांस्कृतिक, शैक्षणिक, औद्योगिक यासारख्या इतर क्षेत्रातही होत असलेला मुक्त संचार यासारखे दुष्ट प्रवाहही आज सामाजिक जीवनाचा ढाचा ठरवण्यात अग्रेसर आहेत. तरीही या दुष्ट प्रवाहांबद्दल नाराजीच व्यक्त होत आहे. आज ती केवळ बोलाच्याच रूपात असली, तरी कृतीच्या स्तरावरही ती उतरेल अशी आशा बाळगावी, अशाही घटना घडत आहेत. त्यांचं अजून प्रवाहात रूपांतर झालेलं नाही. पण तसं ते होणारच नाही, असं मानावयास जागा नाही.

महाराष्ट्रातील भविष्यकालीन समाजाची जडणघडण करण्यात या प्रवाहांचं महत्त्वाचं योगदान असेल, यात शंका नाही. म्हणूनच या प्रवाहांबरोबर कालप्रवास करून जर पंचवीस वर्षांनंतरच्या समाजाविषयीचं भाकीत केलं, तर ते फारसं जोखमीचं ठरणार नाही असा विश्वास वाटतो.

वैज्ञानिक भाषेत ज्याला Extrapolation, अतिदेशन, म्हणतात तशा प्रकारच्या या भविष्यकाळाच्या केलेल्या पाहणीतून समोर उभा ठाकतो तो एक सुशिक्षित सुसंस्कृत समाज. ज्या तऱ्हेनं शिक्षणाची वाढ होत आहे ती पाहता, केवळ साक्षर समाज असणार नाही, तर तो उच्च शिक्षणाच्या जवळपास पोहोचलेला समाज असेल. आणि या शिक्षणापोटीच त्याच्यावर चांगले संस्कार झालेले असतील, असं वाटतं आहे. त्याचबरोबर हे शिक्षण ठराविक साच्यातलं नसून व्यवसायाभिमुख असल्यानं हा समाज अधिक स्वावलंबीही झालेला असेल.

व्यवसायाभिमुख शिक्षणाचा लाभ मिळाल्यानं स्वयंरोजगाराकडे वळण्याचा कल वाढीस लागेल. ज्यांना तांत्रिक शिक्षण मिळालेलं आहे असा आजचा तरुणही नोकरीकडे वळला, तरी तो बहुतांशी अनुभव मिळवण्यासाठी आणि आपला व्यवसाय सुरू करण्यासाठी सुरुवातीला जे काही भांडवल लागतं त्याची थोडीफार बेगमी करण्यासाठीच त्या दिशेनं जाताना दिसतो. स्वतःचा स्वतंत्र व्यवसाय सुरू करण्याची इच्छा तो निश्चित बाळगून असताना दिसतो. हा प्रवाह अधिक विस्तारेल, अधिक जोमदार बनेल, अशी मानसिकता तयार होताना दिसते आहे. त्यामुळे नोकरीवर अवलंबून असण्याचं प्रमाण बऱ्याच अंशी कमी होईल. तेवढ्या प्रमाणात सरकारवर अवलंबून राहण्याची प्रवृत्ती उतरणीला लागेल. साहजिकच सरकारी नोकऱ्यांमधील आरक्षणापायी आज जो सामाजिक तणाव निर्माण होताना दिसतो, तोही कमी झालेला असेल. त्याशिवाय यापैकी बहुतांश व्यवसाय उत्पादक स्वरूपाचे असल्यानं राज्याच्या दरडोई उत्पन्नातही लक्षणीय भर पडलेली दिसेल.

भविष्यातील बहुतांश व्यवसाय तंत्रज्ञानावर आधारित असल्यानं साहजिकच तांत्रिक शिक्षणाची वाढ होईल. परंतु त्याचबरोबर मूलभूत विज्ञानाच्या शिक्षणातही तशीच जोरदार वाढ होईल असं नाही. त्यासाठी काही खास प्रयत्न करावे लागतील. ते करणं आवाक्याबाहेरचं आहे असं निश्चितच नाही. तशी इच्छा मात्र हवी. कारण नवीनतम तंत्रज्ञानाची निर्मिती उच्च दर्जाच्या मूलभूत विज्ञानातील संशोधनावरच अवलंबून असते. त्यामुळे जर मूलभूत विज्ञानाकडे दुर्लक्ष झालं तर व्यवसायासाठी वापरायचं तंत्रज्ञान नेहमीच दुसरीकडून आयात करावं लागेल. स्वावलंबन टिकवून धरण्याच्या प्रयत्नांना ही परिस्थिती खीळच घालील. म्हणून शिक्षणातील हा समतोल सांभाळणं आवश्यक आहे. समाजाची एकंदरीत प्रकृती निकोप राहिल्यास हा समतोल आपोआपच राखला जाईल.

पर्यावरणाविषयीच्या जागरूकतेतून वैयक्तिक तसंच सामाजिक आरोग्यही सुधारू लागेल. त्यातूनच उभा राहील तो अधिक निरोगी, अधिक सुदृढ समाज. त्यामुळे लोकसंख्यावाढीच्या वेगावरही नियंत्रण येईल. परिणामी एकंदरीत समाजात असलेल्या तरुणांच्या प्रमाणात फारशी वाढ होणार नसली, तरी सरासरी आयुर्मर्यादेत वाढ झाल्यानं वरिष्ठ नागरिकांच्या, सीनियर सिटिझन्सच्या, संख्येत लक्षणीय भर पडणार आहे. ही मंडळी रूढार्थानं वृद्ध असली तरी शारीरिक तसंच मानसिकदृष्ट्या सक्षम असतील. त्यामुळे समाजाच्या भल्यासाठी त्यांच्या क्षमतेचा व अनुभवाचा वापर करून घेणारे कार्यक्रम अंमलात आणावे लागतील. त्यासाठी खरं तर आजपासूनच तशी व्यवस्था व्हावयास हवी. त्याचबरोबर या वृद्धांना त्यांच्या आवडीनिवडीनुसार जगण्यासाठी त्यांच्या राहण्याची तसंच त्यांच्या इतर गरजा भागवण्यासाठी वृद्धाश्रमासारख्या संस्थांची वाढही अपेक्षित आहे. त्यांच्यासाठी निवृत्तीवेतनाची वेगळीच व्यवस्था अंमलात आणावी लागेल.

इंटरनेटसारख्या संपर्कसाधनांच्या जाळ्याचा विस्तार सर्वत्र पसरल्यानं, जागतिक प्रवाहांशी इथले सामाजिक प्रवाह निगडित राहतील. त्याचबरोबर जीवनमानाविषयीच्या अपेक्षांवरही जगात

इतरत्र असलेल्या जीवनप्रणालींचा प्रभाव वाढीस लागलेला दिसेल. एका अर्थी महाराष्ट्रातील राजकीय आणि शासकीय व्यवस्थेवर योग्य ते अंकुश ठेवण्याच्या दृष्टीनं त्यांचा उपयोगच होईल.

संपर्कसाधनांमधल्या या सुधारणांपोटी आपला व्यवसाय घरी बसून करणं शक्य होणार आहे. एखादी व्यक्ती अगदी नोकरी करत असली, तरी तिच्या घरचा संगणक नेटवर्किंगद्वारा ऑफिसमधल्या प्रमुख संगणकाशी जोडलेला असेल. त्यामुळे त्या व्यक्तीनं करावयाचं काम तिला घरपोच करण्यात येईल. आणि ती व्यक्ती ते काम घरीच करून संगणकाद्वारे ते परत ऑफिसात पाठवू शकेल. अशी व्यवस्था अंमलात आल्यास आज कचेरीत जाण्यायेण्यापायी जो वेळ वाया जातो, तसंच त्याचा वाहतूकयंत्रणेवर जो ताण पडतो, तो वाचेल. त्यातून इंधनाचीही बचत होईल. रहदारी अधिक सुलभ होईल. प्रत्येक व्यक्तीला आपल्या कुटुंबियांसाठी अधिक वेळ देता येईल. त्यातून कुटुंबसंस्था अधिक जोमदार बनेल. साहजिकच समाजही अधिक सुदृढ व मानसिकदृष्ट्या अधिक निकोप झालेला असेल.

जगण्याच्या पद्धतीतच होणाऱ्या या बदलाचं प्रतिबिंब अर्थात शहरीकरणाची वाढ अधिक वेगानं होण्यात पडेल. परंतु हे शहरीकरण वेगळ्या प्रकारचं असेल. आज ज्यांना आपण शहर म्हणतो तिथं अपेक्षित असलेल्या सोयी, सुविधा सर्वत्र उपलब्ध होतील. त्यामुळे, आणि नोकरीच्या जागेच्या जवळ राहण्याची गरज संपल्यानं, दाटीवाटीच्या शहरांच्या बदली तुरळक वस्ती असलेली पण सर्व शहरी सोयी उपलब्ध असलेली उपनगरं अधिक संख्येनं अस्तित्वात येतील. त्यामुळे एका ठिकाणाहून दुसरीकडे जाण्यासाठी वैयक्तिक वाहन बाळगण्याकडे अधिक प्रवृत्ती राहील. पर्यावरणविषयक जागरूकतेतून ही वाहनं पर्यावरण दूषित करणार नाहीत, यावर कटाक्ष ठेवण्यात येईल.

राहणीमानातल्या या बदलांचा परिणाम शिक्षणपद्धतीवरही झाल्याशिवाय राहणार नाही. इथं दोन पर्याय संभवतात. एकतर संगणकांच्या जाळ्याचा उपयोग करून घेऊन प्रत्येकाला घरबसल्या शिक्षण घेता येईल. तसं झाल्यास ते सर्वत्र सारख्याच दर्जाचं राहील. कारण त्याच्या वितरणाचं केंद्रीकरण झाल्यानं एकाच ठिकाणाहून ते प्रसारित होऊ शकेल. शिवाय त्याला संदर्भासाठी जगाच्या पाठीवरील कोणतंही संदर्भालय उपलब्ध असेल. परंतु तसं झाल्यास लहान संस्कारक्षम वयातले विद्यार्थी एकत्र येऊ शकणार नाहीत. एकमेकांशी प्रत्यक्ष संपर्क साधू शकणार नाहीत. एकमेकांशी खेळू शकणार नाहीत. भविष्यकालीन समाज याच घटकांचा बनणार असल्यानं तसं होणं, हे समाजाच्या आरोग्याच्या दृष्टीनं विधायक ठरणार नाही.

त्यामुळेच दुसरा पर्याय अस्तित्वात येणं अधिक उपयुक्त ठरेल. यात शिक्षणासाठी मुलाला शाळेत ठेवणं जरुरीचं होईल. दुसऱ्या शब्दात सांगायचं तर पूर्वीच्या गुरुकुल पद्धतीची सुधारित आणि विकसित आवृत्ती अस्तित्वात येऊ शकते. तसं होणं हे अनेक दृष्टींनी लाभदायक ठरेल.

या साऱ्या सामाजिक व्यवहारामध्ये मराठी भाषेचा सहभाग मात्र फारसा असणार नाही. तिचा वापर फार फार तर घराच्या चार भिंतीआडच होत राहील. कारण मराठीनं आज फार संकुचित वृत्ती धारण केलेली आहे. मराठी भाषेची गळचेपी होते, अशी फार ओरड होत असते. पण ती तशी होऊ नये यासाठी जे उपाय सुचवले जातात, प्रसंगी अंमलातही आणले जातात, ते मराठीची वाढ करण्यासंबंधीचं नसून इंग्रजी किंवा हिंदी यांच्यावर बंधनं घालण्यासारखे असतात. झपाट्यानं बदलत जाणाऱ्या जागतिक प्रवाहांमध्ये सामील होण्याच्या दृष्टीनं मराठी भाषेत बदल करण्यासाठी ठोस प्रयत्न फारसे केले जाताना दिसत नाहीत. भविष्यातील बहुतेक सर्व व्यवहार संगणकाच्या आधारे होणार असल्यानं, त्यावर, विशेषत: इंटरनेटवर, वापर होऊ शकेल अशा रीतीनं भाषेत बदल करण्याचे, उच्चातिउच्च ज्ञानभंडार सहजगत्या आणि कोणालाही सहज समजू शकेल अशा रीतीनं मराठीत आणण्याचे प्रयत्न होताना दिसत नाहीत. नाही म्हणायला सी-डॅकसारख्या संस्थेनं इंग्रजीमधील अत्याधुनिक सॉफ्टवेअरच्या तोडीस तोड असं मराठी भाषेतील सॉफ्टवेअर तयार केलेलं आहे. हा लेख त्याचाच उपयोग करून मी लिहीत आहे. पण असे तुरळक प्रयत्न होऊन चालणार नाही. इस्त्रायलनं जसे सुनियोजित प्रयत्न करून हिब्रूसारख्या मृतप्राय भाषेला संजीवनी दिली तसे, किंबहुना त्याहूनही अधिक जोमदार प्रयत्न होणं आवश्यक आहे.

एकंदरीत पंचवीस वर्षांनंतरच्या महाराष्ट्राचं चित्र आकर्षक वाटतं आहे. ते तसंच उमटावं अशी इच्छा असल्यास सध्या मन विचलित आणि विषण्ण करणाऱ्या दुष्ट प्रवाहांना थारा मिळणार नाही, यासाठी संघटित प्रयत्न मात्र नेटानं होणं आवश्यक आहे.

(बाळ फोंडके : शास्त्रज्ञ, विज्ञानलेखक)

***

सकारात्मक होऊया

श्रीनिवास पंडित

भौगोलिक-राजकीय परिवर्तन

महाराष्ट्राच्या स्वरूपाचा पुढील २५ वर्षांचा वास्तववादी वेध जागतिक परिवर्तनाच्या पार्श्वभूमीवर घेण्याचा या लेखाचा उद्देश आहे.

साम्राज्यवाद, अणुयुद्धे, शीतयुद्ध यातून मानव जातीची मुक्ती गेल्या १०० वर्षांत झाली. जागतिकरणाची प्रक्रिया शीतयुद्धामुळे पुढे सरकत नव्हती. तसे पाहिले तर मुक्ती आणि सत्ता, वाढ आणि वाटप यांचे शीतयुद्ध नेहमीच चालते व चालणार. पण या काळात जागतिक संस्थांच्या माध्यमातून अंतराळ संशोधन ते दारिद्र्य निर्मूलन या सर्व विषयांवर वैश्विक दृष्टिकोन, रचना व मांडणी करण्यात आली. दूरदर्शन, दूरध्वनी व संगणकाच्या माहिती क्रांतीद्वारे हे 'विश्वची माझे घर' ही संकल्पना प्रत्यक्षात साकार झाली. भूखंड आधारित, भाषा अधिष्ठित, संस्कृतीजन्य राष्ट्र संकल्पनेला ओलांडून मानवी सुशिक्षितावस्था (civilization) कालचक्राच्या खुल्या वातावरणाच्या शीघ्र गतिमान युगात येऊन ठेपली आहे. मानवाच्या अघोरी अत्याचारातून पर्यावरणाच्या मुक्तीसाठी, धर्माच्या संघर्षातून मानवाच्या मुक्तीसाठी, पुरुषाच्या वर्चस्वातून स्त्री-मुक्तीसाठी अर्थ, व्यापार, उद्योग, राजकारण यांच्या खुल्या जागतिक व्यवस्था अस्तित्वात येत आहेत. येत्या १०० वर्षांच्या सुशिक्षितावस्थेची पायाभरणी झालेली आहे. सुशिक्षितावस्थांचा सॅम्युअेल हंटिंगटन भाकीत धर्मरेषांवर (Fault Lines) आधारित झगडा हा आशिया खंडातला समाज मिश्र वर्तुळात (Concentric Circles) गांवोगांव राहत असल्यामुळे संभवत नाही. "वसुधैव कुटुंबकमचा" आकृतीबंध म्हणजे सार्कराष्ट्रे युरोप महासंघाच्या एकत्रीकरणाच्या तत्त्वावर जास्त एकगुंफित होण्यासाठी प्रयत्नशील होताना दिसतील. म्हणून भारत, पाकिस्तान, बांगलादेश पुनःश्च एकत्रित होण्याच्या वाटाघाटी करतील. भारतातले मवाळ मुसलमान त्यात मोठा पुढाकार घेताना पाह्यला मिळेल. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या चालकांनी अलीकडेच अशी मागणी केली हे त्याचे सूचक चिन्ह आहे. टेक्नॉलॉजी व भांडवलाच्या साम्यकुलात जे निर्णय घेतले जातात, त्यावर कुठल्याही लोकशाहीने कितीही आदळआपट केली तर स्वतःच्या राष्ट्राच्या अर्थसाह्यित (subsidised) संपत्तीची नासधूस करण्याव्यतिरिक्त तिच्या हातात निर्णायक निवड कुठलीच राहत नाही. हे समजून वागण्यात आपला स्वार्थ आहे.

महाराष्ट्राचे परिवर्तन

महाराष्ट्राची लोकसंख्या १९७१ ते १९९६ या २५ वर्षांत ५ कोटींवरून ९ कोटींवर गेली. भूकंप, अवर्षण, पूर, वादळ वगैरे नैसर्गिक आपत्ती व धरणे कोसळणे, दंगेधोपे, मामुली युद्धे वगैरे मानवनिर्मित आपत्तींनी मनुष्यहानी फार होत नाही. बऱ्यापैकी अन्नधान्य, दवापाणी, हॉस्पिटलस् वगैरे अर्थसाह्यित सुविधांमुळे लोकांचे आर्युमान सुधारले आहे. महाराष्ट्रात भारताच्या तुलनेत जन्म-मृत्यूंचे प्रमाण कमी होऊनसुद्धा कामधंदा व नोकरीच्या आकर्षणामुळे जे बाहेरच्या प्रांतातून स्थलांतर घडते आहे त्यामुळे २०२० सालापर्यंत आमची लोकसंख्या १४ कोटींवर जाईल असे गृहित धरणे वास्तवाचे ठरेल. गेल्या एका तपात महाराष्ट्राच्या शहरांची संख्या ३०७ वरून ३३६वर गेली आहे. पुढच्या दोन तपात ती ४००च्या आसपास असेल. भारताच्या शहरी लोकसंख्येचे प्रमाण २५ टक्के आहे, आमचे ३९ टक्के. ते २०२० मध्ये ६५ टक्क्यांवर जाईल.

महाराष्ट्राची नववी पंचवार्षिक योजना ४५००० कोटी रुपयांची आहे. १४वी योजना ३०० हजार कोटी रुपयांच्या घरात जाईल. रुपयाचे अवमूल्यन लक्षात घेतासुद्धा एवढी प्रचंड गुंतवणूक, तांत्रिक शिक्षित मनुष्यबळ, आमची बऱ्यापैकी दरडोई उत्पन्न वाढ, रिसर्च आणि डेव्हलपमेंटचा मजबूत पाया, संस्था आणि सिस्टिमस्चे नेटवर्क यामुळे महाराष्ट्र इतर राज्याच्या तुलनेत पहिल्या-दुसऱ्या क्रमांकावर असेल. हा नंबर खाली घालवण्याचे काम आमची रांगडी, अरेरावी वर्तणूक करू शकते.

भारताअंतर्गतची राज्ये, रेल्वे, टेलिकम्युनिकेशन्स्, प्रसारमाध्यमे, अर्थव्यवस्था, कायदे, संरक्षण, उद्योगधंदे, मार्केटस् व राज्याराज्यातील वेगवेगळ्या भाषिकांच्या स्थलांतरामुळे एवढी जोडली गेलेली आहेत की भारताचा युगोस्लाव्हिया होणे संभवत नाही. याच कारणामुळे दुसरी भाषा अधिष्ठित प्रांतरचना होणे पण असंभवनीय वाटते. राज्यांना जास्त स्वायत्तता देणे निकडीचे ठरेल. वरील कारणास्तव कोकण, विदर्भ, मराठवाडा अशा विभाजनाऐवजी ठराविक लोकसंख्येवरची शहरे व त्या लगतचे संतुलित संलग्न प्रदेश यांना नेटवर्किंगच्या तत्त्वावर व सक्षम स्थानिक व्यवस्थापनाच्या दृष्टिकोनातून जास्त स्वायत्तता देण्यात येईलसे वाटते. शहर विरुद्ध खेडे, श्रीमंत विरुद्ध गरीब, भांडवलवाद विरुद्ध समाजवाद या वादांऐवजी टेक्नॉलॉजी विरुद्ध पर्यावरण, स्वच्छता विरुद्ध प्रदूषण हे विषय सेंटर स्टेजवर राहतील.

महाराष्ट्राच्या स्वरूपतेतला बदल

महाराष्ट्राच्या या परिवर्तनामध्ये एक आमूलाग्र सरूपतेचा (identity) बदल आहे. त्याची जाण मराठी राष्ट्रकर्त्यांना व समाजाला झालेली नाही. त्याच्या स्वरूप बदलाअंतर्गतची ठळक लक्षणे अशी :

१) मुंबईमध्ये प्रचंड प्रमाणात व इतर शहरांमध्येपण वेगवान रीतीने बहुभाषिकांचे जे स्थलांतर झाले व त्यांच्या इथे जन्मलेल्या नव्या पिढ्यांचे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, वैचारिक व राजकीय घडणीत जो सहभाग होतो आहे तो महाराष्ट्राच्या सरूपतेमध्ये रचनात्मक (structural) बदल घडवत राहिला आहे. यामध्ये पुढच्या २५ वर्षांत ज्या अविरत स्थलांतरांची भर पडेल त्यामुळे त्यांचे या त्यांच्या दत्तक भूमीबद्दलचे स्वप्न आमच्या प्रगतीस मोठ्या प्रमाणात कारणीभूत होईल. त्यांच्या स्वयंप्रयत्नामुळे संपन्न बनलेल्या आर्थिक ताकदीमुळे त्यांच्या मतांना - निवडणुकीतल्या नव्हे - बहुमोल किंमत येईल.

२) महाराष्ट्राच्या सरकारी सेवेतून ब्राह्मणी वर्गाचे इच्छित उच्चाटन झाल्यामुळे आरक्षित नसलेल्या जागांवर मराठी बोलणारे इतर भाषिक बहुसंख्येने पाहायला मिळतील. इतर भाषिक झोपडपट्ट्यांच्या प्रचंड प्रादुर्भावामुळे व त्यांच्यातल्या मुलांच्या वाढत्या शिक्षणामुळे आरक्षित नोकऱ्यातसुद्धा मधल्या व खालच्या स्तरांवर 'हॅव नॉटस्ना' प्रोव्हिजन करण्याच्या तत्त्वावर सामावून घ्यावे लागेल. परिणामत: सरकारी नोकरशाहीत मऱ्हाटी जनांचे प्राधान्य बरेचसे कमी होईल.

३) भारत सरकारचे प्रकल्प ज्या ज्या ठिकाणी महाराष्ट्रात असतील तेथे मराठींना नोकरीत प्राधान्य देण्याचा प्रश्न पूर्वीही नव्हता व यापुढे तर तो मुळीच राहणार नाही. हे सर्व भाषिक महाराष्ट्रात मतदान करतात. वसुधैव कुटुंबकम् वृत्तीचे (cosmopolitanisation) आत्मग्रहण व फैलाव (expansion) महाराष्ट्राचा सांस्कृतिक कायापालट घडवून आणील. महाराष्ट्राच्या संकुचित वृत्तीला आळा बसेल. पर्यायाने स्वत:च्या प्रांताचे भवितव्य घडवायचे निर्णायकी नेतृत्व आमच्या हातातून थोड्याबहुत प्रमाणात निसटेल. थॉमस सॉवेल यांच्या Migrations and Cultures : A world view या पुस्तकातील खालील उतारा बोलका तर आहेच, पण तो महाराष्ट्राला तंतोतंत लागू पडतो.

"In most societies, the internal resources of the migrant communities have made the difference in whether they succeed or not. Political action rarely mattered. Protest politics was of little importance. Successful migrants and their descendants remained nonpolitical even in the face of discrimination and hostility from the native population. When they did stand for office, it was not as ethnic leaders. Nor did they try to improve their circumstances through government employment. Instead, migrants and their children turned their energies toward education and accumulating wealth in whatever form of the private sector their cultural and human capital would be most profitable, becoming merchants, industrialists, farmers, skilled craftsmen and professionals. International experience overwhelmingly demonstrates that differences in skills and cultural values among communities are the principal determinants of advancement, not affirmative action programmes or political protest movements."

आपल्याकडे स्थलांतरित लोक सरकारी नोकऱ्यात पण शिरले व शिरणार. कारण पाश्चात्यांच्या स्थलांतरींच्या तुलनेने त्यांची मानसिकता नोकरीपेशाची होती व वर उल्लेखिलेली सर्व स्किल्स् मोठ्या प्रमाणात त्यांच्याजवळ नव्हती.

अत्यल्प प्रमाणात जे मराठी इंग्लंड, ऑस्ट्रेलिया व विशेषत: अमेरिकेकडे जाऊन स्थायिक झाले तेही इतर स्थलांतरितांच्या चाकोरीतूनच जात आहेत. कागदी मोजदाद नसतानासुद्धा असे म्हणता येईल की भारताच्या इतर प्रांतांत स्थायिक झालेले मराठी बांधव बऱ्या परिस्थितीत राहतात. जागतिक महाराष्ट्रीय विश्व (diaspora) जे महाराष्ट्राच्या व भारताच्या बाहेर पसरलेले आहे ते महाराष्ट्राच्या सरूपतेमध्ये मोठे सकारात्मक योगदान करणार आहे. त्यात पारसी, जैन, मारवाडी, गुजराथी, सिंधी यांचा प्रचंड सहभाग असेल हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

मराठी मनाला या बदलत्या सरूपतेचे आंतरीकरण (internalisation) करायला १५ वर्षांचा तरी काळ खचित लागेल. कारण मराठी राजकीय पुढारी वैयक्तिक हेव्यादाव्यात गुंतले. राजकीय वैमनस्यामुळे आपल्याकडे समाजसंवाद साधला गेला नाही तर समाजवाद आला. त्यामुळे विस्फारीत महाराष्ट्राचा ते फायदा पण उठवू शकले नाहीत व त्याचे फायदे समाजाला समजावू शकले नाहीत. प्रथम आर्थिक संपन्नता की प्रथम दारिद्र्याचे समान वाटप या युगानयुगे चघळलेल्या निरर्थक वादाचे रवंथ करण्यापलीकडे त्यांनी काही केले नाही. विसंगतीचे राजकारण (politics of disharmony) उतरत्या भाजणीने खेळण्यात त्यांच्या अप्रगल्भतेचे दर्शन सारखे घडते.

अधिकारी संस्थापना विरुद्ध स्वाभाविक वैर

मराठी रक्तात स्पर्धा कमी आहे, आरक्षणप्रियता जास्त आहे. विरोध, विद्रोह, निषेध, मोर्चेबांधणी, हरताळ, गो-स्लो, संप यात हातखंडा व सक्रिय सहभाग. थोडक्यात सरकारविरोधी, मॅनेजमेंटविरोधी पवित्रा (anti-government, anti-management stance) सहजतेने घेतला जातो. कामगार क्षेत्र मागे पडले तर पर्यावरण क्षेत्रात मराठी माणूस मुसंडी मारील. महाराष्ट्राच्या एकंदर गुंतवणुकीपैकी ५३ टक्के गुंतवणूक कोकणात होणार आहे. ऊर्जा, तेल व गॅस यामध्ये ४३% गुंतवणूक होणार आहे.

कोकणची नाळ मुंबईशी बांधलेली आहे. ती लक्षात घेता व स्थानिकांच्या भांडकुदळ मनोवृत्तीकडे पाहता कोकणात विद्रोहाचे विदारक दर्शन घडेल. गिरणगांवावर करवून घेतलेल्या वज्राघाताने व हिंदू-मुसलमान दंग्यामुळे टोळीयुद्धाचा फैलाव मुंबईत झाला. त्यात आता दलित-दलितेतर अशा तेढीची भर पडणार. मराठी दलितांना त्यांची परिस्थिती भारतातल्या इतर दलितांच्या व आफ्रिकेतल्या दलितांच्या तुलनेत कशी वाटते याचा अंदाज नाही. पण अलीकडच्या रमाबाई नगरातल्या गोळीबारानंतर मानवी अधिकारावर (human rights) संक्रमण झाल्याचे दाखवून परदेशात राहणाऱ्या मराठी दलितांनी युनायटेड नेशन्स्कडे धाव घेतल्याचे वाचनात आले. हे सामाजिक जागतिकरणाचे द्योतक आहे. जातीची सरूपता (Caste identity) ही राष्ट्राच्या सरूपतेपेक्षा (National dentity) महात्त्वाची वाटते. देशाभिमानाच्या संक्रमणावस्थेचा वस्तुनिष्ठ अभ्यास हिंदुत्ववाद्यांनी व भाषिक अतिरेक्यांनी करणे जरुरीचे ठरते आहे. व्यापारधंद्याच्या जागतिकरणाच्या विरुद्ध जेव्हा आमचे विद्रोह-सम्राट उभे ठाकतात तेव्हा या वस्तुस्थितीकडे पण त्यांनी दुर्लक्ष करता कामा नये. गुन्हेगारीचे आंतरराष्ट्रीयकरण केव्हाच झाले आहे आणि म्हणूनच जस्टिस मायकेल कर्बी, प्रेसिडेंट ऑफ द इंटरनॅशनल कमिशन ऑफ ज्युरिस्ट, ''इंटरनॅशनल कोर्ट फॉर क्रिमनल ऑफेन्सिस्'' स्थापण्याची कैफियत जगासमोर मांडतात. रिमोट कंट्रोलचा इतिहास जुना आहे. महात्माजींनी ५५ कोटी रुपये पाकिस्तानला द्यायला लावल्यापासून ते शिवसेनाप्रमुख ते दाऊद इब्राहिम व आणखी इतर रिमोट कंट्रोलचे वेगवेगळे अवतार व त्यांचा प्रभाव आमची भारतीय सुशिक्षितावस्था लोकशाहीच्या नळकांड्यातून जात असता अनुभवत आहे. त्याच्या नीतिविषयक मूल्यमापनाची एक परिभाषा आता वापरात आहे. त्यामुळे लोकशाहीला अस्थिपंजर करणाऱ्या रिमोट कंट्रोलना, कंट्रोल करणारा एखादा आंतरराष्ट्रीय संरक्षण कक्ष सॅटेलाईटद्वारे उभारावा लागेल का याचे स्वप्नरंजन करण्यास हरकत नाही.

वेगवेगळ्या समाजवादांच्या नशेने धुंद झालेले आमचे निषेध-प्रवीण समाजसुधारक जेव्हा जेव्हा इतरांच्या कुबड्या घेऊन सरकारात डेरेदाखल झाले तेव्हा सरकार चालवण्याचे कसब (managing skills) अंगी नसल्यामुळे, नको नको ते अंतर्गत वितंडवाद घालून स्वत:चीच सरकारे बरखास्त करण्यात मशगुल झाले. पुन्हा आत्मपरीक्षण शून्य. कामगार वर्गाचा कलह व्यापक करून त्यात शेतमजूर आणून क्रांती करता आली नाही. दलित केंद्रित, भिन्न जाती-वर्ण आधारित समीकरणेसुद्धा आम्हाला अराजकतेकडे नेण्याला समर्थ नाहीत. त्यामुळे अराजकतेच्या परिभ्रमणातून सुराज्याकडे जाण्याचा मार्ग पण चोखाळला जाणार नाही आणि हे सगळे मराठी भाषिकात चाललेले घोषित युद्ध ख्रिश्चन, मुसलमान व इतर भाषिक दुरून उभे राहून पाहत आहेत. दलित जेव्हा वेगवेगळ्या युत्या करून प्राधान्याने सत्तेवर येतील त्या वेळेला नामांतर व रिझर्व्हेशनस्पलीकडल्या टेक्नॉलॉजी, भांडवल, समाजसंतुलन व नोकरशाही कार्यान्वित करण्याच्या प्रक्रियेशी त्यांचा संघर्ष घडेल. त्यातून मूलभूत विषयांचे ध्रुवीकरण होईल. रिझर्वेशनस् व ज्येष्ठतेच्या पलीकडे कामातली पात्रता, कौशल्य, बुद्धीजनांचे नेतृत्व करण्याचे कसब, व पूर्वग्रह सोडून एका न्यायदृष्टीने करायचे टीमवर्क ह्याचे महत्त्व त्यांना कळायला लागेल. कारण हे केल्याशिवाय काम होत नाही, रिझल्टस् दाखवता येत नाहीत. विद्रोहाच्या कुशीत पालनपोषण झाल्यामुळे निषेध सम्राटांना हाताळणे कठीण जाते. आणि सगळीकडून कावळे कांवकांव करायला लागतील तेव्हाची संघर्षमय परिस्थिती कोणती दिशा दाखवते ते पाह्यचे. पण आमच्या अतिप्रसिद्ध (proverbial) सहिष्णुततेमुळे अराजक मात्र टळेल.

मराठी भ्रष्टाचारी बनले

भ्रष्टाचार महाराष्ट्रात पूर्वी अल्पसा होता. नीतिमत्तेसाठी मान ताठ ठेवणाऱ्या मराठी संस्कृतीला मंत्र्यांच्या भ्रष्टाचाराने जेवढी लाज आणली नसेल त्याच्या शतपट लाज सरकारी नोकरीतल्या, सहकार क्षेत्रातल्या, बँकांतल्या व इतर संस्थांतल्या सामान्य माणसांच्या भ्रष्टाचाराने आणली. किकबॅकस् व स्कॅमस् इतर राष्ट्रांतही फार उच्च पातळीवर चालतात. ते वर-खाली चालत राहतात. त्यांना निपटून काढण्याची यंत्रणा आहे. पण पुढारलेल्या पश्चिमेकडल्या देशात सामान्य माणूस भ्रष्टाचारी बनला नाही ही वस्तुस्थिती आहे. आपली सामान्य माणसांची नीतिभ्रष्टता आपल्या मराठी संस्कृतीला शरमेने मान खाली घालायला लावत आहे. प्रसार क्रांती, कारभारातली पारदर्शकता व बदलत्या राजकीय ध्रुवीकरणामुळे वेगवेगळ्या नेत्यांना जो सरकार चालवण्याचा अनुभव येईल त्यातूनच हा रोग कमी झालेला दिसेल. सर्व तऱ्हेच्या विकेंद्रीकरणामुळे व संगणक प्रार्दुभावामुळे भ्रष्टाचार आटोक्यात आणणे शक्य होईल.

जात-व्यवसायाचे बदलते समीकरण

सरकारी व्यवस्थापन, शिक्षण क्षेत्र व राजकीय प्रक्रियेतून ब्राह्मणी समाज संपूर्ण बाहेर पडलेला असेल. त्यांची या क्षेत्रातली निवृत्ती समाजस्वास्थ्यात भर टाकेल. तो छोटे धंदे, संगणकसंबंधित सर्व्हिसेस्, विक्रेता-वितरण, व्यापार, कारखानदारी व परदेशगमन यात जाईल. या सगळ्या हालचालींचा (activities) आवाका लहान असेल. तो खाजगी स्वरूपाचा असेल. मराठा समाज सहकारी क्षेत्राच्या विळख्यातून शेतीविषयक छोटेखानी धंदे, ट्रान्सपोर्ट, शिक्षण, पोलीस, संरक्षण क्षेत्रात प्रगतीपथावर राहील. इतर मागासलेले, अमराठी स्थलांतरित व दलित मोठ्या प्रमाणात मराठ्यांशी युतीचे राजकारण खेळून, राज्य शासन व सरकारी सेवेत घोडदौड करतील. पण एकंदरीत सरकारचा प्रभावच कमी होईल. आपल्याला सरकारी हस्तक्षेप कमीच हवा आहे. तो प्रत्यक्षात तसा कमी झालेला दिसेल. गुंतवणुकीतल्या फेरबदलांमुळे प्राथमिक शिक्षणाची वाढ

होईल व उच्च शिक्षणाचा दर्जा खालावेल. व्यवसायकेंद्रित व तांत्रिक शिक्षण वाढेल. परदेशी विश्वविद्यालये व बहुराष्ट्रीय शैक्षणिक संस्थांशी कोलॅबरेशन ऑग्रिमेंटस् करून व संगणक सॉफ्टवेअरचा उपयोग करून खाजगी क्षेत्रातला उच्च शिक्षणाचा दर्जा पाश्चिमात्य दर्जाचा बनवण्याचा स्तुत्य उपक्रम बऱ्याच संस्था हाती घेतील. मुंबईचे मोक्याचे महत्त्व (strategic importance) कमी कसे करायचे यावर मोठ्या प्रमाणात भारत सरकारला विचार करावा लागेल. महाराष्ट्रातले विकेंद्रीकरण, शहरांची वाढ, कोकणातल्या एखाद्या पर्यायी बंदराची मुंबईला मागे टाकील एवढी वाढ मुंबई बेटाच्या अडथळ्यावर मात करायला मदत करील.

निरलस समाजसेवक

महाराष्ट्राचे एक दणकट कार्यक्षेत्र म्हणजे विद्रोहविरहित निरलस समाजसेवा. मग ती ग्रामसुधारणा असो, व्यसनमुक्ती असो, शिक्षण, शुश्रूषा वगैरे सर्व क्षेत्रात आत्मसमर्पणाच्या वृत्तीने काम करणारी खूप माणसे आहेत. झपाट्याने होणाऱ्या शहरीकरणाच्या कुशीतसुद्धा असे प्रकल्प व त्याला वाहून घेणारे कार्यकर्ते महाराष्ट्राचे नाव उज्ज्वल करतील. त्यांना परदेशस्थ मराठी माणसांचे अर्थसहाय्य मोठ्या प्रमाणावर मिळेल.

परमार्थाकडून इहवादाकडे

पारंपरिक परमार्थाचे शिक्षण मागे पडेल व मानसशास्त्रावर आधारित तत्त्वज्ञानाचे (psychophilosophy) शिक्षण वाढेल. महाराष्ट्र परमार्थवादाकडून इहवादाकडे वाटचाल करताना दिसेल. त्यामुळे पारंपरिक मूल्यांना हादरा बसेल. मिश्रमूल्यांकडे (hybrid values) झुकणारे हे पारडे स्त्री-मुक्तीला मदत करील. विषयांकडे वस्तुनिष्ठ पुराव्यावरून बघण्याची मानसिकता तयार होईल. मराठी साहित्य, मराठवाडा व इतर ग्रामीण भागात दलित व इतर जमाती जास्त वाचतील म्हणून त्याची पीछेहाट होणार नाही. क्रीडाक्षेत्रात विशेषत: क्रिकेटमध्ये महाराष्ट्र प्रथम क्रमांकावर राहील. महाराष्ट्रातला उच्च वर्ग अमेरिकेच्या नेतृत्वाखाली असेल व ओबीसी, दलित चीनकडे नेतृत्वाची अपेक्षा करतील. महाराष्ट्रातील संस्थांचे जाळे, सिस्टिम्सचे नेटवर्क, टेलिकम्युनिकेशन्स व संगणक क्षेत्रातील प्रगती व चाकोरीत नीट काम करण्याची आपली सवय आपल्याला अग्रस्थानी ठेवायला मदत करील.

एशियन टायगर्स व महाराष्ट्रीय वाघ

मराठी माणसांमध्ये चपळता कमी आहे. हालचाल मंद व बुद्धिमत्ता प्रखर असली तरी तल्लखता कमी असल्यामुळे हा महाराष्ट्रीय वाघ एशियन टायगर्सच्या म्हणजे मलेशिया फिलिपिन्स, इंडोनेशिया, सिंगापूर, कोरिया यांच्या तुलनेची उत्पादक झेप घेऊ शकणार नाही. इतर राज्यांच्या तुलनेत स्थलांतरितांच्या प्रचंड योगदानामुळे तो अर्थकारणात आघाडीवर असेल, समाजकारणात प्रगतीपथावर असेल व राजकारणात मात्र पिछाडीवर राहील. महाराष्ट्राची नखे बोथट झालेली असतील. गुजरात, कर्नाटकबरोबरचे संबंध फार सलोख्याचे झाले नाहीत तरी अर्थकारण, व्यापार, टेक्नॉलॉजी या संबंधात सांघिक मतप्रदर्शन - म्हणजे पूर्वीच्या मुंबई इलाख्याचा एकोपा - होईल व ते महाराष्ट्राच्या प्रतिमेच्या दृष्टीने हितकारक ठरेल.

भारतातल्या राजकीय ध्रुवीकरणाचा, सामाजिक परिवर्तनाचा व आंतरराष्ट्रीय संबंधांचा ऊहापोह व त्याचे महाराष्ट्रावर होणारे परिणाम याचा या लेखात विचार केलेला नाही. फक्त मुंबईच्या संरक्षणासाठी कोकणातील एखादे बंदर युद्धपातळीवर बांधणे आवश्यक ठरेल असे वाटते. अन्यथा इतर प्रांतांच्या तुलनेत आमच्यावर वेगळे असे परिणाम होणार नाहीत.

संक्षिप्त अवलोकन

महाराष्ट्राच्या ऐतिहासिक, सुपरिचित तंटे-बखेडे करून दुसऱ्याला नखे मारून कुरतडण्याच्या स्वभावात बदल नाही. असल्या हेव्यादाव्यांच्या मानसिक युद्धात हार खायची व मग स्वत:चीच जखम चघळत स्वत:वर अन्याय झाला आणि तो दुसऱ्यांनी दूर करावा म्हणून औदासीन्यात खितपत पडायचे हा स्थायीभाव महाराष्ट्रात उत्साहवर्धक वातावरण देत नाही. तांत्रिक कुशलता (Technical compitency) व दुसऱ्यांकडून काम करून घेण्याचे कौशल्य (Managing skills) पैदा करण्याच्या सकारात्मक कार्याला तो वाहून घेत नाही. या संस्कृतीत जन्माला आलेले व वाढलेले नेते दूरदृष्टी ठेवून महाराष्ट्राला महान करण्याची स्वप्ने पाहू शकले नाहीत. अभिजन वर्गातील कर्तृत्ववान माणसे एकसंधी मानसिक टीमवर्कसुद्धा करू शकली नाहीत. त्यामुळे नेतृत्व उजळायला पूरक अशा प्रेरणादायी व्यक्तींचे समूह एकत्रित झाले नाहीत. या परस्परपूरक अभावांमुळे मराठी मनोवृत्ती (mindset) नकारात्मक राहिली. परंतु छोट्या मोठ्या शहरातली काही स्मार्ट मराठी युवक-युवती इतिहासाचा फाजिल अभिमान न बाळगता, जाहिरात, प्रसारमाध्यमे, टीव्ही, संगणक व पाश्चिमात्य संगीत यांच्या प्रभावशाली इंग्रजी वातावरणात वाढल्यामुळे व अमराठींच्या सान्निध्यात शिकल्यासवरल्यामुळे आपले असे न्यूनगंड न जोपासता स्पर्धात्मक जगामध्ये स्वयंप्रयत्नाने पुढे आपले असे न्युनगंड न जोपासता स्पर्धात्मक जगामध्ये स्वयंप्रयत्नाने पुढे सरकताना दिसतात हे आपल्या प्रगतीचे एक सुचिन्ह आहे. वर उल्लेखिलेल्या कारणमीमांसेमुळे व आताच्या ४५ वयोगटातील पिढी - म्हणजे स्वातंत्र्याच्या संधी काळातल्या (१९३७ ते १९५२) वैचारिक वेष्टनाचा लेप घेऊन जन्माला आलेली - जेव्हा २०१० सालाच्या आसपास पडद्याआड होईल तेव्हा आमचा वृत्तीवेध सकारात्मतेकडे झुकायला लागेल. त्याचा परिपाक म्हणजे सरूपता बदललेला महाराष्ट्र २०२० साली पुढच्या २५ वर्षांत होणाऱ्या लक्षणीय प्रगतीच्या पहिल्या पायरीवर ताठ मानेने उभा राहिलेला असेल.

(श्रीनिवास पंडित : मॅनेजमेन्ट काउन्सेलर)

***

सरकारी वेताळपंचविशी

प्रदीप रावत

'आपण खूप पुढारलेले आहोत,' असा महाराष्ट्राचा लाडका समज आहे. ओरिसा, बिहार यासारख्या राज्यांशी तुलना करता तो खरा भासतो. पण हे सातवी 'ब'मधल्या मुलांनी सातवी 'ड' तुकडीकडे तुच्छतेने बघण्यासारखे आहे. भविष्याचा विचार करताना असे गंड बाजूला सारणे श्रेयस्कर. त्याचप्रमाणे भूतकाळातील अनेक वैचारिक भूते, पिंगळे अजून मराठी मनाच्या ढोलीत आसऱ्याला आहेत. त्यातला सर्वात मोठा वेताळ 'सरकारशाही'चा. आपले (म्हणजे कुणाचेही!) भवितव्य उज्ज्वल घडविण्याची जबाबदारी मुख्यत: सरकारची आहे. हा वेताळाचा मंत्र, या मंत्रचळेपणात मराठी राजकीय मानसिकता जखडली आहे.

त्याचे देखील अनेक अवतार महाराष्ट्राच्या परंपरेत आहेत. एक अवतार समाजवादी, साम्यवादी विचारसरणीचा. या अवतारानुसार उत्तरोत्तर सर्व उद्योग व जबाबदाऱ्या सरकारी मालकीच्या, सरकारी भांडवलातून साकारल्या की सह्याद्रीवर व त्याच्या पठारावर स्वर्ग अवतरेल. त्यासाठी लागणारे भांडवल, आर्थिक साधने कुठून येणार हे कुणालाच माहीत नाही. पण श्रद्धा असली तर सगळे घडते. मग भांडवल पण आपोआप मिळेलच की!

दुसऱ्या अवतार कथेनुसार मुख्यत: सहकारी चळवळ आणि सरकारी योजनातून घरोघरी नळकोंडाळी टाकून समृद्धी पुरविली जाईल. ज्यांना सहकारी वारीत वेगळी दिंडी नाही, त्यांना स्वयंसेवी संस्था नावाची दिंडी चालवून विकासपंढरी गाठणे महत्त्वाचे वाटते. या दिंडीत जर 'स्वदेशी विचाराचा गजर' झाला तर सोन्याहून पिवळे!

...तिसरा अवतार रौद्र (म्हणजे मराठी कल्पनेनुसार पिंजारल्या केसांचा) आहे. तो मराठी समाजातल्या शोषित जातींच्या नावाने चांगभले बोलणारा. पण त्यालादेखील सरकारनिर्मित राखीव जागांपलीकडे गावकुसात जाणारी विकासाची पायवाट सापडत नाही. थोडक्यात सामाजिक मालकीऐवजी किंवा बरोबर सामाजिक न्याय असे हे 'सरकार'वादी ध्रुवपद दलितवाद नावाने चालू आहे. पुढील पंचवीस वर्षांत या मंत्रचळेपणातून मुक्तता होईल का? हा खरा प्रश्न आहे. हा प्रश्न फक्त महाराष्ट्रातच आहे असे नव्हे. निदान या मानसिकतेपुरता का होईना पण महाराष्ट्र भारताचा भाग आहे हे पटते.

सरकार आणि सहकार वादामुळे महाराष्ट्रात अनेक महामंडळांची जलपर्णी दुष्काळी महाराष्ट्रावर पसरली आहे. शंभर रोगांवर एकच उपाय म्हणून आपण शंभर महामंडळे काढली आहेत. सरकारी उपक्रमांचा तोटा, प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष अनुदाने यामधून सुमारे दीड ते दोन हजार कोटी रुपये महाराष्ट्र वाया घालवितो.

महाराष्ट्रातल्या सरकारवादी परंपरेला आपण स्वतंत्र राष्ट्र नसल्याची सूक्ष्म खंत आहे. त्यामुळे वरती केंद्रात असणाऱ्या यंत्रणेसारखी यंत्रणा आपल्या राज्यपातळीवर राबवण्याची त्यांना हौस आहे. केंद्राला वित्त आयोग नेमता येतो, म्हणून आपण जिल्हावार साधने वाटण्यासाठी राज्यवित्त आयोग नेमतो. केंद्रातले नियोजन मंडळ गुंडाळून ठेवण्याची अवस्था आली आहे. पण आपण या हौसेपोटी राज्य नियोजन मंडळ नेमतो. थोडक्यात दिल्लीत न मिळणाऱ्या संधीची आणि सत्तेची हौस राज्यातल्या भातुकलीवर भागवतो. पंचवीस वर्षांनंतर ही हौस राहणार नाही. राहिली तर परवडणार नाही.

शेती हा महाराष्ट्राचा एक प्रमुख व्यवसाय आहे. शेती हा आपला आर्थिक कणा आहे, असे म्हणण्याचा प्रघात आहे. हा कणा अगोदरच पुरेसा मोडलेला आहे. पंचवीस वर्षांनंतर त्याचे सापेक्ष महत्त्व अजूनच घटलेले असेल. जे काही राहील ते जमिनीच्या चिंध्या झालेल्या लहान तुकड्यावरील शेतांमुळे नव्हे तर आधुनिक तंत्रानी चालणाऱ्या मध्यम वा मोठ्या शेतांमुळे, कदाचित हरितगृहांमध्ये. सोलापूर-बीडइतका दुष्काळी व पाण्याचे दुर्भिक्ष्य असणारा, आकाराने त्याहून लहान असणारा इस्राएल कृषिक्षेत्रात अग्रगण्य उत्पादक होऊ शकतो. जिद्द आणि आर्थिक दूरदृष्टी असेल तरच सोलापूर, बीडमध्ये पुढील पंचवीस वर्षांत असे काही घडू शकेल. अन्यथा जिरायत शेती आजइतकीच भुकेकंगाल अवस्थेत राहील.

सेवाक्षेत्रात महाराष्ट्राची चलती आहे. ती चाकरमानी, कारकुनी स्वरूपाची आहे. त्यातही पांढरपेशा सेवांमध्ये उदा. शिक्षण, बँका, विमा, सरकारी, संगणक, नोकरी इ. पण साध्यासाध्या दुरुस्ती किरकोळ सेवांत मराठी माणूस आजही कमीच आढळतो. उदा. पानाची दुकाने भैया लोकांनी, हॉटेल उडप्यांनी, व्यापार जैन, माहेश्वरी, गुजराथ्यांनी आणि टायर दुरुस्ती केरळी अण्णांनी अशी ही मराठी मातीतली श्रमविभागणी आहे. पंचवीस वर्षांनंतर सातारा, कोल्हापूर राहू दे पण पानाची गादीतरी मराठी माणसाकडे यावी.

उद्योग व सेवाक्षेत्रांत भरघोस वाढ करण्याखेरीज महाराष्ट्राला तरणोपाय नाही. त्यासाठी विक्रीकर करपद्धतीत आमूलाग्र बदल करावे लागतील. राज्य स्वायत्ततेचे भांडण केंद्राशी अधिक उघड व तीव्रपणे भांडावे लागेल. राज्याची वित्तीय क्षमता बळकट करण्यासाठी अनेक फाफटपसारा बनलेले विभाग, योजनांना कुलूप ठोकावे लागेल. परराज्य व परदेशातील भांडवल येण्यास दार सताड उघडे ठेवावे लागेल. गुजरात, मध्य प्रदेश, कर्नाटक, गोव्याबरोबर समान विक्रीवर व गुंतवणूक धोरणाचे करार सफल करावे लागतील.

असे न झाल्यास, 'पूर्व दिव्य ज्यांचे त्यांना...' असे म्हणत स्वत:ची दीन अवस्था थोपटत बसण्याची पाळी येईल.

(प्रदीप रावत : उद्योजक आणि भा. ज. प. पुणे जिल्ह्याचे अध्यक्ष)

***

अभ्युदयाच्या संधींचा काळ

सदानंद वर्दे

या पुढील पंचवीस वर्षांत महाराष्ट्राची जडणघडण कशी असेल, महाराष्ट्राची म्हणून खास वैशिष्ट्ये आहेत ती घट्टमुट्ठ होतील की त्यात बदल होईल, जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत महाराष्ट्र पुढे जाईल की मागे रेटला जाईल?...' या प्रश्नांची उत्तरे आजच्या महाराष्ट्राच्या आणि देशाच्या 'वास्तवा'च्या संदर्भात पाहायला हवीत. स्वप्नरंजन किंवा मनोरथांचे मनोरे उभारणे नव्हे, तर आजच्या वास्तवाच्या प्रकाशात २०२० साली संभाव्य काय आहे याचा अंदाज घेण्याचा हा प्रश्न आहे.

भारतीय स्वातंत्र्याच्या सुवर्णमहोत्सवी वर्षात मला हे अभिमानाने म्हणावेसे वाटते की स्वातंत्र्याच्या आंदोलनात महाराष्ट्राची कामगिरी खडग्हस्तांची राहिलेली आहे. 'देश गेला खड्ड्यात; अगोदर महाराष्ट्राचे काय ते बोला' असे आक्रस्ताळीपणाने बोलणारे लोक हे लक्षात घेत नाहीत की, देश खड्ड्यात गेला तर महाराष्ट्रासाठी वेगळा खड्डा खणण्याची आवश्यकता राहणार नाही. काही ठळक अपवाद सोडले तर देशाशी फटकून वा अलग राहून नव्हे तर देशाशी एकात्म व सुसंवादी राहूनच महाराष्ट्राला भवितव्य आहे असे मानणारे नेतृत्वच महाराष्ट्रात प्रभावी राहिले आहे. 'महाराष्ट्र मेला तरी राष्ट्र मेले' असे म्हणणाऱ्या सेनापती बापटांच्या मनात प्रादेशिक दुरभिमान नव्हता तर, राष्ट्राच्या उभारणीत महाराष्ट्राने पेलावयाच्या जबाबदारीची जाणीव व आत्मविश्वास होता. आपल्या डोळ्यांसमोर रशियन कम्युनिस्ट संघराज्याचे विघटन झालेले आपण पाहिले आहे. भारतीय संघराज्याचे विघटन होऊ नये यासाठी झटणाऱ्या शक्तींमध्ये महाराष्ट्र अग्रभागी असेल. घटकराज्ये ही राष्ट्रे नाहीत तर राष्ट्राला चैतन्य आणि बळ देणारे भिन्न भाषिक, सांस्कृतिक आणि काही प्रमाणात आर्थिक स्रोत आहेत. मात्र त्यांची वाजवी स्वायत्तता आणि अस्मिता यांचा आदर केल्याने केंद्रसत्ता मजबूत होईल हा शहाणा व प्रगल्भ विचार महाराष्ट्रात मान्य झालेला असेल. किंबहुना फुटिरतेला खंबीर विरोध करणाऱ्या व संघराज्याचे सामर्थ्य व ऐक्य टिकविणाऱ्या शक्तींचे नेतृत्व महाराष्ट्राने केलेले असेल आणि त्याचे फायदेही त्यामुळे आर्थिक विकासाच्या क्षेत्रात देशाला झालेले असतील.

'उत्तम विद्या, मध्यम शेती आणि कनिष्ठ व्यापार' या त्रिसूत्रीत व्यक्त झालेले मराठी माणसाचे ब्रीद वा निष्ठा यात निश्चितच परिवर्तन झालेले आहे. आजच्या जागतिकीकरणाच्या आणि संपर्क-माध्यमे आणि माहिती क्रांतीच्या रेट्यात असे कालबाह्य ब्रीद हे महाराष्ट्राची पीछेहाट करील, किंबहुना विकासाच्या मुख्य प्रवाहाबाहेर महाराष्ट्र फेकला जाईल हे मराठी माणसाने ओळखले आहे. अर्थव्यवस्थेचे उदारीकरण आणि खुलीकरण तसेच झपाट्याने बदलणारे संगणकावर आधारित आधुनिक तंत्रज्ञान यामुळे अभ्युदयाच्या या अनेक संधी उपलब्ध होत आहेत. त्याच्या अग्रभागी भारतात महाराष्ट्र असेल आणि महाराष्ट्रातील उद्योजकांनी या क्षेत्रात खास नाव कमावलेले असेल.

अलीकडेच मी वाचले की, प्रसाद आजगावकर या मराठी तरुणाने 'भूतकाळाला वर्तमानकालीन तंत्रज्ञानाच्या सहाय्याने 'सीडी'वर (कॉम्पॅक्ट डिस्क) उतरविण्याची किमया केली आहे. हे तंत्रज्ञान नुकतेच आपल्याकडे आले असताना प्रसाद आजगावकर यांनी देशाच्या ३०० निवडक पर्यटन स्थळांची माहिती देणारी 'इनव्हिटेशन इंडिया' ही भारतात 'लिहिलेली' पहिली सीडी बाजारात आणली. त्यानंतर ७०० पाककृतींची माहिती देणारी 'रसोई' तसेच १८५७ ते १९४७ या ९० वर्षांतील स्वातंत्र्य आंदोलनातील महत्त्वाच्या घटनांची वेध घेणारी 'आजादी : मेकिंग ऑफ द नेशन' अशा 'सीडी' या तरुणाने आपल्या कर्तबगार सहकाऱ्यांच्या सहाय्याने तयार केल्या आहेत. येत्या वीस-पंचवीस वर्षांत ज्ञानाच्या व माहितीच्या क्षेत्रात महाराष्ट्रात व देशातही होऊ घातलेल्या विस्मयकारक स्थित्यंतरांचे हे 'प्रसाद-चिन्ह' आहे.

जागतिक अर्थव्यवस्थेपासून जवळपास पन्नास वर्षे अलग राहिल्यानंतर (isolation) आपली अर्थव्यवस्था खुली झाल्यामुळे सबंध देशाला विकासाची मोठी संधी उपलब्ध झाली आहे. या संदर्भात एक अंदाज असा करण्यात आला आहे की, साधारणतः प्रतिवर्षी राष्ट्रीय उत्पादनाची ७ टक्के वाढ गृहीत धरली तर दर दहा वर्षांनी भारताचे राष्ट्रीय उत्पन्न दुप्पट होईल; या आधारे असे अंदाज वर्तविण्यात येत आहेत की, २०२५ साली देशातील ५५ कोटी लोक मध्यमवर्ग या श्रेणीत मोडतील. हे अंदाज काहीसे अतिरंजित वाटले तरी भविष्यातील

आर्थिक विकासाचा वास्तव वेध घेणारे आहेत. महाराष्ट्रात अजूनपर्यंत आकृष्ट झालेले परदेशी भांडवल (जानेवारी १९९७पर्यंत विविध प्रस्तावांचे १२५०० कोटी रुपये), निर्याताभिमुख औद्योगिक युनिट्समधील प्रस्तावित गुंतवणूक (१९९६ डिसेंबर अखेर ५३७८ कोटी रुपये : भारतात या क्षेत्रात महाराष्ट्राचा पहिला क्रमांक) आणि महाराष्ट्रात जी काही आजच्या घडीला वित्तीय संस्थात्मक संरचना आहे ती ध्यानात घेता... या मध्यमवर्गाचा मोठा हिस्सा महाराष्ट्रात असेल.

सार्वजनिक मालकीच्या उपक्रमातील साधनसामग्रीच्या उघडमापीचे कठोर मूल्यमापन करून पॉप्युलिस्ट कल्पनांना दूर सारून या उपक्रमांची नव्याने निखळ कार्यक्षमतेच्या कसोटीवर पुनर्रचना झालेली असेल. मी असे म्हणावयाचे कारण हे की उत्पादन, विनिमय, गुंतवणूक... आदी विविध क्षेत्रांतील आर्थिक व्यवहारांना कार्यक्षमतेवर आधारित देशहिताची कसोटी लावणारे नेतृत्व केवळ आर्थिक क्षेत्रात नव्हे तर राजकीय क्षेत्रातही महाराष्ट्रात राखता आलेले असेल. आपल्याकडे भांडवलाची कमतरता आहे, म्हणून परदेशी भांडवलाचे स्वागत करायचे तर त्या भांडवलाचा वापर योग्य व कार्यक्षम व्हायला पाहिजे; देशाला भारभूत झालेले उपक्रम केवळ ते सार्वजनिक मालकीचे आहेत, म्हणून अर्थसंकल्पीय तरतुदींद्वारा महागडी अर्थसहाय्ये देऊन ते तगवणे देशहिताचे नाही, असे मानणारे खंबीर नेतृत्व राजकारणात स्थिर झालेले असेल.

महाराष्ट्राच्या शेतमालाच्या उत्पादनाचा विशेषत: अन्नधान्याच्या उत्पादनाचा वेग आकुंचित होण्याचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे अर्थव्यस्थेचे खुलीकरण झाले असले तरी शेतीच्या क्षेत्रात अजून कितीतरी जुनी बंधने आणि नोकरशाहीचा वरचष्मा कायम आहे. निर्यातीचे क्षेत्र जे शेतमालासाठी जवळपास बंद होते ते थोडेसे मोकळे करण्यात आले आहे. जागतिक व्यापारात भारताचा हिस्सा जेमतेम एक टक्का आहे. व्यापार हे आर्थिक विकासाचे महत्त्वाचे साधन आहे. निर्यातीचे प्रमाण वाढावयाचे असेल तर ही बंधने दूर व्हायला हवीत. सध्या महाराष्ट्राची द्राक्षे, आंतरराष्ट्रीय बाजारात झळकू लागली आहेत. येत्या पंधरा-वीस वर्षांत द्राक्षे, आंबा, डाळिंब आदी फळे, तसेच शेतीशी संलग्न प्रक्रिया उद्योग यांच्यात महाराष्ट्रात झपाट्याने प्रगती झालेली असेल. शेती क्षेत्राला उद्योजकतेचे साहस उपलब्ध करून देणाऱ्या उद्यमशील शेतकऱ्यांचे व त्यांच्या सहकारी संघटनांचे महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेतील प्राबल्य वाढलेले असेल. एकूण राष्ट्रीय निर्यातीत महाराष्ट्राची भागिदारी मोठी असेल.

विजेचा तुटवडा, अपुरे आणि वाहतुकीस गैरसोयीचे रस्ते आणि प्रमुख बंदरांतील मालाच्या ने-आणीची कोंडी हे महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाच्या मार्गातील मोठे अडथळे आहेत. एन्रॉनसारख्या प्रकल्पांना विरोध करणारे हे लक्षात घेत नाहीत की, वीज ही औद्योगिक विकासाची चालना-शक्ती आहे. वीज निर्मितीत एक युनिटची कमतरता म्हणजे औद्योगिक उत्पादनात पाच युनिट्सना मुकणे असे समीकरण तज्ज्ञ मंडळी मांडतात. 'इन्फ्रास्ट्रक्चर'मधील (पायाभूत क्षेत्र) ही दुरवस्था २०२० साली बरीचशी आटोक्यात आली असेल. औद्योगिक विकासापुढे वाढते शहरीकरण, वाहतुकीची कोंडी, प्रदूषण, दाटीवाटीच्या वस्त्या... अशा मुंबई, पुणे, नागपूर यांसारखी शहरे ज्या समस्यांना सध्या तोंड देत आहेत, त्या समस्यांना नव्या शहरांना तोंड द्यावे लागेल. नाही असे नाही; पण यांतून मार्ग काढलेला असेल. शहरीकरणाचा वेग वाढल्याने महाराष्ट्राची जवळपास ५० टक्के लोकसंख्या शहरात राहील हे अपरिहार्य वाटते. अर्धा किंवा त्याहून अधिक महाराष्ट्र शहरात या मोठ्या आव्हानाला महाराष्ट्राला सामोरे जावे लागेल. ही महाराष्ट्राची सत्त्वपरीक्षा ठरेल.

महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाचे सामाजिक निर्देशांक म्हणजे - शिक्षण, आरोग्याचा प्रसार व सोयी - पण देशातील इतर राज्यांच्या तुलनेने वरच्या श्रेणीतील असले तरी समाधानकारक नक्कीच नाहीत. अजूनही कुपोषणामुळे ठाणे जिल्ह्याच्या आदिवासी भागात व इतरत्रही लहान मुले मृत्युमुखी पडतात. ६ ते १४ वयोगटातील ज्या मुलांनी शाळेत जावयास हवे अशी जवळजवळ २० लाख मुले आज शाळेच्या बाहेर आहेत. मुंबईसारख्या प्रगत शहरात प्राथमिक शाळांतील गळतीचे प्रमाण चिंतनीय आहे. लोकसंख्यावाढीच्या प्रमाणात हे प्रश्न अधिक कळीचे ठरतील. १९९१च्या जनगणनेप्रमाणे महाराष्ट्राची लोकसंख्या भारताच्या एकूण लोकसंख्येच्या ९.३ टक्के म्हणजे ७ कोटी ८९ लक्ष होती. पण दर दशकातील महाराष्ट्राच्या लोकसंख्येच्या वाढीचा वेग देशाच्या वेगापेक्षा, ७० ते ८०चे दशक सोडता, अधिक राहिलेला आहे. या हिशेबाने आणि महाराष्ट्रातील कुटुंबनियोजनाचे प्रयत्न आणि कमी होणारा मृत्युदर पाहता २०२० साली महाराष्ट्राची लोकसंख्या १२ कोटींच्या घरात गेलेली असेल.

एक केरळचा अपवाद सोडता प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण आणि साक्षरता या क्षेत्रात देशाची कामगिरी स्पृहणीय राहिलेली नाही. महाराष्ट्रात खासगी शिक्षणसंस्थांचे पसरलेले जाळे आणि शिक्षणाची वाढती लोकजाणीव लक्षात घेता शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाच्या क्षेत्रात महाराष्ट्राची

कामगिरी भविष्यात समाधानकारक झालेली असेल. शाळेच्या बाहेर असलेल्या मुलांचे प्रमाण कमी झालेले असेल आणि माध्यमिक शिक्षणात संगणकाचा वापर वाढलेला असेल. वर वाढत्या मध्यमवर्गाचा उल्लेख आलेला आहे. त्या संदर्भात हे अनुमान खरे ठरावे.

ग्रामीण भागासाठी रोजगार हमीचा कायदा करणारे महाराष्ट्र हे एकमेव राज्य. हा कायदा संमत झाल्याला यंदा २५ वर्षे झाली. या काळात रोजगार हमी योजनेद्वारा ग्रामीण भागात रस्ते, विहिरी, सिंचन आदी क्षेत्रांत भांडवलनिर्मितीची कामे जरूर झाली. पण जी उत्पादनक्षमता निर्माण झाली, तिच्या परीक्षणाची कामे रोजगार हमी योजनेतून होऊ शकली नाहीत. अंमलबजावणीत भ्रष्टाचारही झाला. पण योजनेचा परिणाम म्हणून महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातून मुंबईसारख्या शहराकडे येणाऱ्या लोकांचे प्रमाण, इतर राज्यांतून येणाऱ्या लोकांच्या तुलनेने कमी झाले. निखळ दारिद्र्य कमी करण्याला ही योजना काहीअंशी कारणीभूत झाली हे मान्य करावयास हवे. पण तरीही आज महाराष्ट्रात दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांची संख्या ७७ लाख आहे.

तळागाळाच्या या लोकांची परिस्थिती २०२० साली काय असेल? सुधारली असेल की कुधारली असेल? नव्या आर्थिक धोरणाचा पाठपुरावा चालू राहिला तर बेकारी वाढेल, गरीब अधिक गरीब होतील असा एक ठाम जवळपास अपरिवर्तनीय दृष्टिकोन या संदर्भात डाव्या विचारसरणीच्या लोकांचा आहे. मी त्याच्याशी सहमत नाही. उदारीकरण (लिबरलायझेशन), खुलीकरण, जागतिकीकरण आणि उत्पादन आणि माहिती तंत्राचा स्फोट... याचा तत्कालीन परिणाम प्रतिकूल दिसला तरी दीर्घकालीन तो तसा राहणार नाही. जगाच्या व्यापारात भारताचा हिस्सा वाढत गेला आणि भारताच्या योगदानातील महाराष्ट्राचा सहभाग ठाशीव असेल तर त्यातून अधिक रोजगारनिर्मिती होईल, दारिद्र्य कमी होईल आणि कमालीच्या आर्थिक हलाखीत राहणाऱ्यांचे प्रमाणही कमी होईल. राष्ट्रीय उत्पादनाची प्रतिवर्षी ७ टक्के वाढ गृहीत धरली (आणि ही अव्यवहार्य वा अतिरंजित नाही) तर काय आर्थिक सुपरिणाम संभवतात, याचा लेखात वर उल्लेख आलेला आहे. उत्पादन क्षमता वाढते आहे की नाही याचा विचार न करता दारिद्र्याचे वाटप म्हणजे समाजवाद असे मानणाऱ्यांचा हा आग्रही दृष्टिकोन दिसतो की खुलीकरणाने देश आणि म्हणून महाराष्ट्र खड्ड्यात जाईल; देश सार्वभौमत्व गमावून बसेल. असे भेसूर भवितव्य वर्तविणारे २०२० साली किंवा त्याच्या अगोदरही खोटे ठरल्याचे दिसून येईल.

अफाट लोकसंख्या आणि प्रतिवर्षी तिच्यात दोन ते अडीच टक्क्यांनी होणारी वाढ यामुळे श्रमबाजारात रोजगाराची मागणी सतत वाढती राहणार आणि ती पुरी करणे केवळ अशक्यप्राय असल्यामुळे बेकारी ही देशाची आणि महाराष्ट्राची कायम समस्या राहणार आहे. एका बाजूला ही परिस्थिती असताना दुसऱ्या बाजूला ज्यांना रोजगार आहे आणि विशेषत: जे सार्वजनिक उपक्रमात आणि सरकारी क्षेत्रात (उद्योग व सेवा) आहेत, त्यांना सामान्यत: श्रमसंस्कृतीचे वावडे आहे आणि संघटनेच्या जोरावर कोणतीही मागणी समाजाला व सरकारला वेठीस धरून पदरात पाडून घेता येते अशी उर्मट जाणीव आहे. आपण मागतो आहे ते वेतन, बोनस आणि भत्ते यांचा उत्पादनक्षमतेशी संबंध असायला हवा आणि ज्यांनी ही वेतने द्यायची त्यांच्या देण्याच्या क्षमतेचाही विचार व्हायला हवा. याबाबत हे संघटित वर्ग बेफिकीर आणि बेपर्वा आहेत.

मला आशा आहे की २०२० साली महाराष्ट्रात

(१) लोकसंख्येची वाढ रोखण्यासाठी इतकी जागरूकता झाली असेल की पती-पत्नीचे एक मूल या प्रमाणकाचा (Norm) सार्वत्रिक स्वीकार झाला असेल.

(२) आर्थिक व्यवहार शासनावर सोपविल्याने उत्पादक रोजगाराचा आणि म्हणून संपत्तीचा झपाट्याने विस्तार होतो याबाबत बुद्धिजीवी वर्गाचा पूर्ण भ्रमनिरास झालेला असेल.

(३) व्यापक समाजहितासाठी समंजस निर्बंधापलीकडे शासन आर्थिक व औद्योगिक व्यवहारात लुडबूड करणार नाही.

(४) सधन, भांडवली या शब्दांचा शेलक्या शिव्या म्हणून वापर केला जाणार नाही.

(५) संघटितांची टर्रेबाजी समाज सहन करणार नाही याची जाणीव झाल्याने संघटित क्षेत्र अधिक जबाबदारीने वागेल.

(६) ठराविक वैचारिक घटपटांची झापडे डोळ्यांना बांधून वास्तवाकडे पाहणाऱ्या डाव्यांचे 'डी-ॲडिक्शन' (Deaddiction) झालेले असेल.

विख्यात आंग्ल कवी रॉबर्ट ब्राऊनिंग यांनी एका कवितेत म्हटले आहे :

"Ah, but a man's reach should exceed his grasp or what's a heaven for?"

महाराष्ट्राच्या लोकजीवनाचे २०२० साली हे ब्रीद राहील.

(सदानंद वर्दे : आर्थिक विचारवंत आणि राज्याचे माजी शिक्षणमंत्री)

***